सप्टेंबर –ऑक्टोबर २०२३ / पाने ७६ / किंमत ₹१०

# लोकराज्य



## मराठवाडा मुक्तिसंग्राम

## अमृत ७५ महोत्सव

महाराष्ट्र शासन



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

१ वर्षपूर्ती

## संकल्प निरोगी महाराष्ट्राचा

### सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतलेले

# महत्त्वपूर्ण निर्णय व राबविलेले उपक्रम



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री





## सर्व नागरिकांना मिळणार
## १५ ऑगस्ट २०२३ पासून मोफत वैद्यकीय उपचार

- महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या विमा संरक्षण मर्यादित रु. **१.५० लाखांवरून ५ लाख** रुपयांपर्यंत वाढ. योजना राज्यातील सर्व रहिवाशांना लागू.
- 'जागरुक पालक, सुदृढ बालक' अभियानांतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील **२,१८,४०,५१४** बालकांची सर्वांगीण आरोग्य तपासणी आणि संदर्भ सेवा.
- पंढरपूर येथील महाआरोग्य शिबिरात **११ लाखांपेक्षा** अधिक वारकऱ्यांची आरोग्य तपासणी आणि संदर्भ सेवा.
- आशा स्वयंसेविकांच्या मोबदल्यात वाढ – 'आशा'ना **रु. ५०००/-** व गटप्रवर्तकांना **रु. ६२०० /-** मासिक मानधन.
- 'सुंदर माझा दवाखाना' अभियानांतर्गत आरोग्य संस्थांची स्वच्छता आणि सुशोभीकरण.
- आधुनिक उपकरणासहित व तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकासह **१७५६** ॲम्बुलन्स खरेदीचा निर्णय.
- मेळघाट सारख्या दुर्गम भागासाठी **४३ कलमी** कार्यक्रमाची अंमलबजावणी.
- ठाणे व कोल्हापूर (उदगाव) येथे अत्याधुनिक प्रादेशिक मनोरुग्णालय उभारणार.
- हृदयरोग रुग्णांसाठी कार्डियाक कॅथलॅब.
- मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्र अभियान.
- 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' अभियानांतर्गत एकूण **४,३९,२४,१००** माता-भगिनींची आरोग्य तपासणी. त्यात **२७,९७,३९४** गरोदर मातांचा समावेश.
- शासकीय रुग्णालयात **मोफत वैद्यकीय उपचार** करण्याबाबतचा ऐतिहासिक निर्णय.
- राज्यात 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना'ची स्थापना. **७००** ठिकाणी सुरु करणार.
- आतापर्यंत **३ कोटी** पेक्षा अधिक नागरिकांचे 'आयुष्मान भारत डिजिटल हेल्थ कार्ड' (आभा कार्ड) बनविण्यात यश.
- 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कारा'ला प्रारंभ.
- महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाची स्थापना.
- नीती आयोगाच्या प्रकल्पातून धाराशिव येथे 'फिरते मल्टीस्पेशालिटी रुग्णालय' सुरू.
- जालना, भिवंडी, पुणे आणि नागपूर येथे मानसिक आरोग्य व नवीन व्यसनमुक्ती केंद्रे निर्मितीची प्रक्रिया सुरु.
- चार जिल्ह्यांमध्ये **३० खाटांच्या** आयुष रुग्णालयांची निर्मिती.
- अधिक पारदर्शकता आणि अचूकतेसाठी राज्यातील शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे बदल्या.

**लवकर निदान, मोफत उपचार, निरोगी ठेवा आपला परिवार**

माता सुरक्षित तर घर सुरक्षित | महाआरोग्य शिबिर | हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना | जागरुक पालक सुदृढ बालक | सुंदर माझा दवाखाना

**सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन**

प्रा. डॉ. तानाजी सावंत
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

अजित पवार
उपमुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

## ६ भारतीय सामर्थ्याची चुणूक

संपूर्ण हैद्राबाद संस्थानात, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा लढा कुणी विसरू शकणार नाही. मराठवाड्यात निजामांच्या पंतप्रधानास रोखण्यासाठी मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात स्वातंत्र्यसंग्राम तेजस्वीपणे लढला गेला. हैद्राबाद स्वतंत्र करण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी १४ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबाद संस्थानात भारताचे सैन्य घुसवले आणि निजामाच्या सैन्याचा बिमोड करून तो सगळा भाग भारतात सामील करून घेतला.

## १४ स्वातंत्र्यसंग्रामाच्या आठवणी

इ.स.१९११ मध्ये मीर उस्मानअली खान (सातवा निजाम) गादीवर आला. इ.स १९१७ मध्ये दसरा आणि मोहरम एकाचवेळी आल्याने निजाम सरकारने धार्मिकतेबाबतीत कडक नियम जाहीर केले होते. दुसरे पाकिस्तान निर्माण करण्याचा, सहकार्याऐवजी सूड व न्यायाऐवजी अन्याय या निजामच्या धोरणामुळे हिंदू जनतेच्या मनात जबाबदार राज्यपद्धती (जिम्मेदारांना हुकूमत) अमलात यावी असा आग्रह होता. असा आग्रह धरणाऱ्या हजारो शांतताप्रेमी स्वातंत्र्य सैनिकांच्या त्याग आणि बलिदानाची ही स्फूर्तिदायी कहाणी आहे.

## १८ जाज्वल्य इतिहास

शैक्षणिक, सामाजिक चळवळींबरोबरच स्वातंत्र्य चळवळीतही औरंगाबादचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. एकीकडे ब्रिटिश राजवटीतून भारताच्या स्वातंत्र्यासाठी चळवळ सुरू होती, तर मराठवाड्यात निजामी राजवटीतून मुक्ततेसाठी लढा सुरू होता..



## ३० युवकांचा पुढाकार

तेलंगणा (तेव्हाचा आंध्र प्रदेश), विदर्भातील काही तालुक्यांसह संपूर्ण मराठवाडा व कर्नाटकातील काही भागांवर निजामाच्या रझाकारांनी सामान्य नागरिकांवर अत्याचाराची परिसीमा गाठली होती. हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या अर्थात निजामाच्या बेबंदशाहीतून मुक्त होण्यासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी बलिदान दिले.

## ४४ मराठवाड्यातील संत परंपरा

मराठवाडा हा प्रदेश संतांची भूमी म्हणून ओळखला जातो. हा भाग निजामी राजवटीखाली असल्यामुळे शासनाकडून मराठी भाषेची गळचेपी होत असे. उर्दू आणि फार्सी भाषांना शासकीय व्यवहारात अग्रक्रम असे. त्यामुळे मराठी भाषा समृद्ध करण्याची जबाबदारी ही मराठी भाषकांची होती.

## ५६ नमो ११ कलमी कार्यक्रम

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७३व्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण राज्यात 'नमो ११ कलमी कार्यक्रम' राबवण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे, छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा मुक्तिसंग्रामदिनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत या अभियानाची घोषणा केली. 'नमो ११ कलमी' कार्यक्रमात समाविष्ट असलेल्या विविध घटकांवर टाकलेला हा दृष्टिक्षेप...

## ६२ माझी माती, माझा देश...

ऑगस्ट क्रांती दिनापासून सुरू झालेल्या 'मेरी मिट्टी, मेरा देश' अर्थात 'माझी माती माझा देश' या अभियानाच्या पहिल्या टप्प्यात राज्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक गाव, शहर आणि महानगरात या अभियानाला भरभरून प्रतिसाद मिळाला.


| | |
|---|---|
| भारतीय सामर्थ्याची चुणूक | ६ |
| सुवर्णाक्षरांनी लिहावा असा मुक्तिसंग्राम! | ८ |
| संघर्षाचा इतिहास... | ११ |
| स्वातंत्र्यसंग्रामाच्या आठवणी | १४ |
| झेंडा आंदोलन | १७ |
| जाज्वल्य इतिहास | १८ |
| मुक्तिलढ्यात जनता सहभागी | २१ |
| पाऊलखुणा... | २४ |
| स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढा... | २७ |
| युवकांचा पुढाकार | ३० |
| सशस्त्र संघर्ष | ३२ |
| झुंजार पत्रकार अनंत भालेराव | ३५ |
| कांचनमुक्त तारा | ४० |
| हैद्राबाद मुक्तिसंग्राम अमृतमहोत्सव | ४२ |
| मराठवाड्यातील संत परंपरा | ४४ |
| मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे अमृतमहोत्सवी वर्ष | ४८ |
| मराठवाड्याचा कायापालट करण्याचा संकल्प | ५३ |
| नमो ११ कलमी कार्यक्रम | ५६ |
| ऐतिहासिक वैभव... | ५८ |
| माझी माती, माझा देश... | ६२ |
| कल्याणकारी निर्णय | ६४ |
| पौष्टिक तृणधान्य विशेष महिना संकल्पना | ७१ |
| आरोग्य सेवांचा जागर | ७३ |

वर्ष ७४ वे | अंक ११ | सप्टेंबर-ऑक्टोबर २०२३

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

- मुख्य संपादक — जयश्री भोज
- प्रबंध संपादक — हेमराज बागुल, डॉ. राहुल तिडके
- संपादक — दयानंद कांबळे
- सहसंपादक — अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- विशेष साहाय्य — धोंडिराम अर्जुन
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# 'आयुष्मान भव' मोहिमेचा शुभारंभ

निरोगी आयुष्यासाठी 'आयुष्मान भव' असा आशीर्वाद दिला जातो. या भावनेतून देशवासियांच्या निरोगी आयुष्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'आयुष्मान भव' मोहिमेची सुरुवात राज्यभर करणार आहोत. या मोहिमेत महाराष्ट्र देशामध्ये उत्कृष्ट काम करून नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून देईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

देशात 'आयुष्मान भव' मोहिमेस सुरुवात झाली असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशपातळीवर या मोहिमेचा शुभारंभ केला. यावेळी राज्याच्या मोहिमेचा शुभारंभ सह्याद्री अतिथीगृह येथे राज्यपाल रमेश बैस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यावेळी उपस्थित होते.

राज्यात मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षाच्या माध्यमातून नागरिकांना भक्कम आधार देण्यात आला. गेल्या वर्षभरात १०० कोटींपेक्षा जास्त मदत देण्यात आली आहे. सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री आरोग्य योजनेंतर्गत एकत्रितपणे २ कोटी कार्डांचे वाटप करण्यात येणार आहे. आता ५ लाखांपर्यंत आरोग्य संरक्षण मिळणार आहे. महाराष्ट्र आरोग्याच्या क्षेत्रात देशात अग्रेसर असून सर्वसामान्य नागरिकाला केंद्रबिंदू ठेवून आरोग्यविषयक योजना आणि उपक्रम राबवले जात असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

आयुष्मान कार्डच्या माध्यमातून सामान्यांना वेळेवर वैद्यकीय उपचार घेणे शक्य होणार असून, यासाठी 'आयुष्मान भव' ही महत्त्वाकांक्षी मोहीम १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत राबवली जाणार आहे. मोहिमेत पात्र लाभार्थ्यांच्या आयुष्मान कार्डची नोंदणी करून त्याचे वितरण करण्यात येणार आहे.

## विविध उपक्रमांचा शुभारंभ

याप्रसंगी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात उल्लेखनीय काम केलेल्या निक्षय मित्र व जिल्ह्यांना देखील गौरवण्यात आले. तसेच महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री आरोग्य या एकत्रित योजनेच्या कार्ड वाटपास सुरुवात करण्यात आली. राज्यात या योजनेचे २ कोटी कार्डांचे वाटप करण्यात येणार आहे.

या समारंभात आरोग्य आधार ॲप, महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲप; तसेच राज्यातील आरोग्यवर्धिनी केंद्रातील अधिकाऱ्यांसाठीचे समुदाय आरोग्य अधिकारी ॲप यांचा शुभारंभ करण्यात आला. २ ऑक्टोबर रोजी आयुष्मान ग्रामसभा होणार असून ती आयुष्मान भारत आरोग्य योजनेच्या जाणीवजागृतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# प्रेरणादायी संघर्ष

मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विशेष अंक आपल्या हाती देताना आनंद होत आहे. १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा भारतीय संघराज्यात विलीन झाला. पूर्वी मराठवाडा या प्रदेशावर हैद्राबादचे निजाम शासन करत होते. भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला; पण त्यावेळी संपूर्ण देश विविध संस्थानांमध्ये विखुरलेला होता. त्यावेळच्या ५६५ पैकी ५६२ संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन झाली. मात्र हैद्राबाद, काश्मीर आणि जुनागढ ही तीन संस्थाने स्वतंत्र भारतात सामील झाली नव्हती. स्वातंत्र्यानंतर ब्रिटिश राजवट गेली; पण या तीन संस्थानांतील लोक मात्र अद्याप स्वतंत्र झाले नव्हते. त्या काळात मराठवाडा हा हैद्राबाद संस्थानाचा भाग होता आणि मराठवाड्याच्या जनतेला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी हैद्राबादच्या निजामाविरोधात दीर्घ लढा द्यावा लागला. तसेच अनेकांना या लढ्यात त्यांच्या जीवाचे बलिदान द्यावे लागले.




१९३८ ते १९४८ हा मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा प्रमुख कालखंड म्हणून ओळखला जातो. याच काळात मराठवाडा निजामाच्या राजवटीतून मुक्त करण्यासाठी वेगवेगळी राजकीय आंदोलने, विद्यार्थी चळवळी इतकेच नाही तर सशस्त्र आंदोलनेदेखील झाली. हैद्राबाद हे भारतातील सर्वात मोठे संस्थान होते. त्यामध्ये तेलुगू, कन्नड, मराठी-भाषक प्रांत होते. त्याठिकाणी निजामाची एकतंत्री राजवट होती. तेथे नागरी व राजकीय हक्कांचा अभाव होता. आपले हक्क मिळवण्यासाठी हैद्राबाद संस्थानातील जनतेने तेलंगणा भागात आंध्र परिषद, मराठवाडा भागात महाराष्ट्र परिषद व कर्नाटक भागात कर्नाटक परिषद या संस्था स्थापन केल्या.

१९३८ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैद्राबाद स्टेट काँग्रेसची स्थापना केली. निजामाने या संघटनेवर बंदी घातली. हैद्राबाद स्टेट काँग्रेसला मान्यता मिळवण्यासाठी व लोकशाही हक्कांसाठी लढा सुरू झाला. या लढ्याचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ या झुंजार सेनानीने केले. त्यांना नारायण रेड्डी, सिराझ-उल्-हसन तिरमिजी यांची साथ लाभली. पी.व्ही.नरसिंहराव व गोविंदभाई श्रॉफ हे स्वामीजींचे निष्ठावान अनुयायी होते. १९४७ च्या जुलैमध्ये हैद्राबाद स्टेट काँग्रेसने हैद्राबाद संस्थान भारतात विलीन करावे असा ठराव केला, मात्र निजामाने भारतविरोधी धोरण स्वीकारले. तो हैद्राबाद संस्थान पाकिस्तानात विलीन करण्याच्या हालचाली करू लागला. निजामाचा सहकारी कासिम रिझवी याने संस्थानातील प्रजेची भारतात विलीन होण्याची मागणी धुडकावून लावण्यासाठी रझाकार नावाची संघटना स्थापन केली. कासिम रिझवी व त्याच्या साथीदारांनी हिंदूंवरच नव्हे, तर लोकशाहीवादी चळवळीला पाठिंबा देणाऱ्या मुस्लिमांवरही अत्याचार केले. त्यामुळे सर्वत्र लोकमत भडकू लागले. निजामाशी सामोपचाराने बोलणी करण्याचा प्रयत्न भारत सरकार करत होते; परंतु निजाम दाद देत नव्हता. अखेरीस भारत सरकारने १३ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाविरुद्ध पोलीस कारवाई सुरू केली. यास 'ऑपरेशन पोलो' असे सांकेतिक नाव होते. शेवटी १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजाम शरण आला. हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले.

१७ सप्टेंबर हा हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा दिवस मराठवाड्यात 'मराठवाडा मुक्तिदिन' म्हणून साजरा केला जातो. स्वतंत्र भारतात मराठवाड्याचा समावेश १५ ऑगस्ट १९४७ मध्ये झालेला नव्हता. हा प्रदेश १९४८ मध्ये जनतेच्या स्फूर्तिदायी लढ्यानंतर स्वतंत्र भारतात विलीन करण्यात आला.

'लोकराज्य'च्या या अंकात मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विशेष लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध लोकाभिमुख निर्णय घेण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठवाड्याचा कायापालट घडवणारा तब्बल ४६ हजार ५७९ कोटी ३४ लाख रुपयांचा संकल्प जाहीर केला. त्याचा आढावा घेण्यात आला आहे. याबरोबर 'मेरी माटी, मेरा देश' या अभियानांतर्गत राज्यात राबवण्यात आलेल्या उपक्रमाचा आढावा असणारा लेख, तसेच 'मंत्रिमंडळात ठरले' या सदराचाही समावेश करण्यात आला आहे. हा अंक आपणांस उपयुक्त ठरेल, असा विश्वास आहे.

**जयश्री भोज**
(मुख्य संपादक)

**संपूर्ण हैद्राबाद संस्थानात, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा लढा कुणी विसरू शकणार नाही. मराठवाड्यात निजामांच्या पंतप्रधानास रोखण्यासाठी मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात स्वातंत्र्यसंग्राम तेजस्वीपणे लढला गेला. हैद्राबाद स्वतंत्र करण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी १४ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबाद संस्थानात भारताचे सैन्य घुसवले आणि निजामाच्या सैन्याचा बिमोड करून तो सगळा भाग भारतात सामील करून घेतला. देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामासारखीच राष्ट्रभावना या लढ्यातही होती. हैद्राबाद मुक्तिसंग्राम ही भारतीय सामर्थ्याची एक चुणूक होती, जी जगाने पाहिली हे आपण मुळीच विसरता कामा नये.**

# भारतीय सामर्थ्याची चुणूक

**एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री



जेव्हा जेव्हा भारतीय स्वातंत्र्यदिन येतो, तेव्हा तेव्हा देशाच्या स्वातंत्र्यानंतर एक वर्षाने स्वतंत्र झालेल्या हैद्राबाद संस्थानाच्या मुक्तिसंग्रामाचीसुद्धा आठवण येते. देश स्वतंत्र झाला; पण हैद्राबाद स्वतंत्र करण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी १४ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबाद संस्थानात भारताचे सैन्य घुसवले आणि निजामाच्या सैन्याचा बिमोड करून तो सगळा भाग भारतात सामील करून घेतला. देशाच्या स्वातंत्र्य संग्रामासारखीच राष्ट्रभावना या लढ्यातही होती आणि म्हणूनच मराठवाड्यात जेव्हाही कधी येतो, तेव्हा त्याकाळात निजामाच्या अत्याचाराविरोधात तेथील जनतेने कसा प्रतिकार केला असेल हे आठवून अंगावर काटा येतो. हैद्राबाद संस्थानात लोकांना राजकीय पारतंत्र्य तर होतेच; पण मूलभूत अधिकारही नव्हते. आपली संस्कृती, भाषा, धर्म याबाबतही स्वातंत्र्य नव्हते. धार्मिक सण आणि त्यांचे उत्सव यांच्यावर अनेक बंधने होती आणि म्हणूनच हैद्राबादला निजामापासून मिळालेल्या स्वातंत्र्याचे वेगळे महत्त्व आहे.

आज देशाला मराठवाड्याच्या स्वातंत्र्यलढ्याची नीट माहिती नाही. विशेषतः आताच्या पिढीला याविषयी माहिती देणे गरजेचे आहे. आपण सगळे मिळून यासंदर्भात जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. हैद्राबाद मुक्तिसंग्राम ही भारतीय सामर्थ्याची एक चुणूक होती, जी जगाने पाहिली, हे आपण मुळीच विसरता कामा नये.



### दबलेल्या राखेतून अंगार बाहेर

कुठलीही क्रांती ही दडपशाहीची प्रतिक्रिया असते. जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केल्यास कसा इतिहास घडतो ते आपल्या देशातील जनतेने ब्रिटिशांना दाखवून दिले, जगभरातही झालेल्या वेगवेगळ्या क्रांतीचा इतिहास हेच सांगतो. देश स्वतंत्र झाला होता; पण मराठवाड्यात निजाम मगरूरपणे इथल्या जनतेला चिरडतच होता. जनता गरीब आहे, आपण अधिक दडपू, त्यांच्याकडून काय प्रतिकार होणार? अशा भ्रमात निजाम होता; पण एखाद्या दबलेल्या राखेतून अंगार बाहेर पडतो तसे मराठवाड्यातून अनेक तरुण ज्वाळा बनून पुढे आले आणि जुलमी राजवट पाहता पाहता त्यात राख झाली.

संपूर्ण हैद्राबाद संस्थानात, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा लढा कुणी विसरू शकणार नाही. यात दिगंबरराव बिंदू, गोविंदभाई श्रॉफ, रवीनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, विजयेंद्र काबरा, बाबासाहेब परांजपे अशी कितीतरी नावं घेता येतील. मराठवाड्यात निजामांच्या पंतप्रधानास रोखण्यासाठी पूल उडवून देणारे काशिनाथ कुलकर्णी, मराठवाड्याची राणी लक्ष्मीबाई बदनापूर तालुक्यातील धोपटेश्वर गावच्या दगडाबाई शेळके, रोहिल्यांना जेरीस आणणारे बीडचे विठ्ठलराव काटकर, बर्दापूर पोलीस ठाणे उडवून देणारे लातूरचे

हरिश्चंद्रजी जाधव, नळदुर्ग सर करणारे धाराशिव जिल्ह्यातील होटी गावचे जनार्दन होर्टीकर गुरुजी; तसेच परभणीत रझाकारांना हुसकावून लावणारे सूर्यभान पवार, विनायकराव चारठाणकार, विश्वनाथराव कात्नेश्वरकर, नांदेड येथील देवरावजी कवळे, जीवनराव बोधनकर आदींच्या रूपाने मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात स्वातंत्र्य संग्राम तेजस्वीपणे लढला गेला.

## वल्लभभाईंनी अशक्यप्राय काम केले...

संपूर्ण महाराष्ट्रात ब्रिटिश अंमल होता. मात्र मराठी भाषिक प्रदेश असलेल्या मराठवाड्यात निजामशाही होती. ब्रिटिश सत्ता होती, तिथे शिक्षणाविषयी जागरूकता होती; पण मराठवाड्यात निजाम जे म्हणेल तीच पूर्व दिशा होती. निजामाचे सामाजिक, सांस्कृतिक आक्रमण सुरूच होते. शिक्षण संस्थांमध्ये 'वंदे मातरम्' गीत म्हणण्यास बंदी होती. 'वंदे मातरम्' चळवळीने विद्यार्थी आणि एकूणच जनमानसात मोठी जागृती झाली. हैद्राबाद संस्थानात हळूहळू राजकीय जागृती होत होती; पण १९३८ पासून निजामाच्या विरुद्ध लोकभावना तापू लागली आणि अखेर १९४८ मध्ये तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निजाम सरकारच्या विरोधात पोलीस ॲक्शनची घोषणा केली आणि भारताला एकसंघ ठेवण्याचे अशक्यप्राय कार्य केले.

## माझा मराठवाड्याशी संबंध

मला नेहमीच मराठवाड्याच्या या पवित्र भूमीचे कुतूहल वाटते. माझे गाव सातारा जिल्ह्यात, पश्चिम महाराष्ट्रात. माझी कर्मभूमी ठाणे. मराठवाडा भौगोलिकदृष्ट्या दूर असला तरी शिवसेनेचा, बाळासाहेबांचा झंझावात मराठवाड्यात सुरू झाल्यानंतर मराठवाड्याशी संबंध येऊ लागला. सहा वर्षांपूर्वी दुष्काळामुळे मराठवाड्यातून काही कुटुंबांना घरदार सोडावे लागले होते. उपजीविकेसाठी ठाण्यात आलेल्या ४०० दुष्काळग्रस्तांना आम्ही निवाऱ्याची आणि उदरनिर्वाहाची सोय केली होती. त्या काळातही मराठवाड्यात फिरताना दुष्काळाची झळ कशी सोसावी लागते ते मी पाहिले होते.

## गनिमीकाव्यासारखा लढा

आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचा समारोप होतोय. मराठवाड्यालासुद्धा स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. दोन्ही स्वातंत्र्यात एक फार मोठा फरक आहे. भारताचा स्वातंत्र्यलढा अहिंसात्मक होता; पण मराठवाडा मुक्तिसंग्राम मात्र सशस्त्र होता. रझाकारांच्या विरुद्ध हातात शस्त्र उचलणारी मराठवाड्यातील तरुण मंडळी आणि मोगलांच्या राजवटीविरुद्ध छत्रपती शिवरायांच्या मावळ्यांनी पुकारलेले गनिमी युद्ध यात माझ्या दृष्टीने तसा काही फरक नाही.

## समृद्ध नैसर्गिक वारसा

मराठवाडा हा कोकणासारखा पावसाचा प्रदेश नाही. पश्चिम महाराष्ट्रासारखी सधनता नाही; पण मराठवाड्यातील लोकांनी कष्टाने या प्रदेशाला फुलवले आहे. आपल्या घामाचे सिंचन याठिकाणी केले आहे. संतांचे संस्कार, मेहनती युवक, शिक्षणाला प्राधान्य देणारे नागरिक, संकटांवर मात करणारा शेतकरी, वाढणारे उद्योग ही सगळी या भूमीची वैशिष्टे आहेत. खरंच मराठवाड्यात काय नाही? येथे समुद्र नसला तरी सागरातील मौल्यवान मोती याठिकाणी आहेत. पर्यटनाच्या भरपूर संधी आहेत. गडकिल्ले, लेणी, महत्त्वाची धार्मिक स्थळे असा समृद्ध नैसर्गिक वारसा याठिकाणी आहे.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या काळात मराठवाडा भाषेच्या आधारावर महाराष्ट्रात सामील करण्यात आला. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या वेळीसुद्धा मराठवाड्यातील जनतेने मोठे योगदान दिले. त्यानंतर १ मे १९६०ला महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली.

एखाद्या देशाच्या विकासात त्या देशातील एखाद्या प्रदेशाचादेखील मोठा वाटा असतो. मराठवाड्यानेदेखील खूप चांगले, धोरणी, राजकीय नेतृत्व देशाला दिले. विकास किती झाला आणि किती नाही झाला, किंवा का नाही झाला यावर चर्चा होऊ शकते; पण राजकीय इच्छाशक्ती असणे गरजेचे आहे आणि ती आमच्यात आहे.

मराठवाड्याला 'मागासलेला' या शब्दापासूनच मुक्ती मिळवून देण्यासाठी कृषी, उद्योग, जलसंपदा, शिक्षण, रोजगार, पायाभूत सुविधा, आरोग्य या सर्वच क्षेत्रात मराठवाड्याला आघाडी मिळवून देणार आहोत. मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे कार्यक्रम मराठवाड्यात उत्साहाने साजरे केले जात असून यासाठी चार कोटी रुपये निधी आम्ही दिला आहे. जिल्हा नियोजनमधून प्रत्येक जिल्ह्याला दोन कोटी रुपये दिले आहेत. छत्रपती संभाजीनगर येथे एक अतिशय सुंदर असे स्मृती स्मारक उभारण्यासाठी १०० कोटी रुपये निधीला मंजुरी दिली आहे.

मराठवाड्याच्या दुष्काळग्रस्त भागाला पाणी मिळावे म्हणून कृष्णा भीमा स्थिरीकरण योजनेच्या सर्वेक्षणाला तत्वतः मंजुरी मिळाली आहे. हा महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. भविष्यात दुष्काळी भागाचा कायमस्वरूपी शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न यामुळे मिटणार आहे, हा संपूर्ण भाग ओलिताखाली येणार आहे. यामुळे रोजगार मोठ्या प्रमाणामध्ये उपलब्ध होईल. हरितक्रांतीबरोबर आर्थिक क्रांती होईल.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग सुरू झाला आहे. याचा फायदा मराठवाड्याला व्हायला सुरुवात झाली आहे. ऑरिक हे राज्यातील पहिले नियोजित शहर नावारूपाला येत आहे. शेंद्रा-बिडकिन येथील या ऑरिक सिटीमध्ये साडेपाच हजार कोटींची गुंतवणूक झाली आहे. उद्योगांना भूखंड देण्यात आले आहेत. येथे ३ लाख लोकांना रोजगार मिळणार आहे. स्वातंत्र्याची नवी पहाट दाखवणाऱ्या स्वातंत्र्यसेनानींचा लढा आम्ही वाया जाऊ देणार नाही. या लढ्यात हुतात्मा झालेल्या ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आणि अत्याचारग्रस्त नागरिकांचे मुक्तिलढ्यातील योगदान आम्ही कधीच विसरणार नाही. महाराष्ट्राच्या विकासात मराठवाड्याचे मोठे योगदान आहे. मराठवाड्याची सर्व क्षेत्रात कालबद्ध प्रगती, हेच आमच्या समोरचे ध्येय आहे आणि त्यासाठी आमचे सरकार अविरत प्रयत्न करत राहील. मराठवाड्याला, देशातील एक अग्रेसर प्रदेश बनवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

**शब्दांकन : अनिरुद्ध अष्टपुत्रे,**
मा. मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

**आपण भारतीय स्वातंत्र्याचा आनंदोत्सव साजरा करत होतो, तेव्हा मराठवाड्यातील जनता मात्र हैद्राबाद संस्थानमध्ये निजामाच्या आधिपत्याखाली अनन्वित अत्याचार सहन करत होती. देशाच्या नाभीस्थानी स्वतंत्र देश निर्माण करू पाहणाऱ्या निजामी राजवटीविरुद्ध मराठवाड्यातील जनतेने स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली मोठा मुक्तिलढा उभारला. सर्व जातीधर्मातील लोकांनी एकत्र येत अत्यंत संयमाने हा लढा लढला होता. त्यामुळे मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसेनानींचे हे योगदान अमूल्य आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या तब्बल १३ महिन्यांनंतर मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव संपत असताना आता मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचा अमृतमहोत्सव आपण विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा करत आहोत.**

# सुवर्णाक्षरांनी लिहावा असा **मुक्तिसंग्राम !**

**देवेंद्र फडणवीस,** उपमुख्यमंत्री

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास मराठवाडा मुक्तिसंग्रामाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. हा मुक्तिसंग्राम देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील सोनेरी पान आहे. अनन्वित अत्याचार सहन करत, स्वातंत्र्यासाठी त्यागाची परिसीमा गाठणाऱ्या, प्राणाची आहुती देणाऱ्या क्रांतिवीरांचे आपण सदैव स्मरण ठेवायला हवे. आपल्याला जे स्वातंत्र्य मिळाले आहे, त्याचे मोल ठेवायला हवे. त्यामुळे मराठवाडा स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी असलेल्या नाम व अनाम अशा स्वातंत्र्यसेनानी व हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचा अमृतमहोत्सव विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा केला जात आहे.



मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृतमहोत्सवी पर्वाचा साक्षीदार होताना मी स्वत:ला भाग्यवान समजतो. या स्वातंत्र्यसंग्रामात अनेकांनी घरावर तुळशीपत्र ठेवून हौतात्म्य पत्करले होते. पराकोटीचा त्याग या संग्रामात पाहायला मिळाला. या मुक्तिसंग्रामात योगदान देणाऱ्या स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रविनारायण रेड्डी, भाऊसाहेब वैशंपायन, देवीसिंग चौहान, बाबासाहेब परांजपे, वेदप्रकाश, शंकरसिंग नाईक, विजयेंद्र काबरा, श्रीधर वर्तक, जानकी लालजी राठी, शंकरराव जाधव, जालन्याचे जनार्दन मामा, किशनसिंह राजपूत, गोविंदराव पानसरे, राजाभाऊ वरकड, विश्वनाथ भिसे, जयंतराव पाटील, रमनभाई पारिख, पटवर्धन, दगडाबाई शेळके, ताराबाई परांजपे, कुसुम जोशी, प्रतिभाताई वैशंपायन, कांताताई देशपांडे, गीताबाई चाटणकर, शांताबाई कोटेचा, चंदाताई जरीवाला अशा कितीतरी शिलेदारांचा उल्लेख होतो. या स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी असलेल्या ज्ञात आणि सर्व अज्ञात सेनानींना मी विनम्र अभिवादन करतो.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे प्रमुख नेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्यावर १९९९ मध्ये श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना भारत सरकारने टपाल तिकीट काढले होते. नांदेड येथील विद्यापीठालाही त्यांचे नाव देण्यात आले आहे. आज आपण स्वातंत्र्याचा श्वास घेतो आहोत, तो या स्वातंत्र्यसेनानींमुळेच घेत आहोत याचे स्मरण आपण सर्वजण ठेवू या.



## अत्याचाराविरुद्ध संघर्ष

अन्याय-अत्याचाराची निजामशाहीने परिसीमा गाठल्यामुळे मराठवाड्यातील स्वातंत्र्यसैनिक पेटून उठले. निजामाच्या जुलमाला सर्व स्तरातील व्यक्ती बळी पडल्या होत्या. त्यामुळे या मुक्तिलढ्यात सर्वांचा सहभाग होता. बहुजन, महिला

यांनी आपली जबाबदारी व कर्तव्य वेळोवेळी निभावून नेले. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली मोठा मुक्तिलढा उभा राहिला. उमरी बँक लूट, निजामाच्या पोलीस स्टेशनवर हल्ला करणे, उमरीजवळ रेल्वे रूळ उखडणे आदी घटना जनतेच्या मनातील असंतोषाचा उद्रेक दर्शवणाऱ्या होत्या. निजामाची मनीषा स्पष्ट होती. आपल्या अमलाखाली असलेला मुलूख हा त्याला स्वतंत्र देश म्हणून निर्माण करावयाचा होता. शेतसाऱ्यासाठी शेतकऱ्यांचा छळ सुरू होता. अनन्वित छळाच्या किती तरी कहाण्या होत्या. राज्यातील बहुसंख्येने असलेल्या हिंदू जनतेला त्यांचे सांस्कृतिक व धार्मिक हक्कही नाकारण्यात आले होते. निजामशाहीत झालेल्या अन्यायाची, अत्याचाराची वर्णने आजही अंगावर शहारे आणतात.

१९२० पासूनच सुरू झाला होता. त्याकाळात त्याच्या विरोधात निजाम राजवटीतल्या कुठल्याही भागामध्ये कोणत्याही प्रकारचा मेळावा, अधिवेशन, सभा घेण्यावर बंदी होती. त्यावेळच्या इंग्रजांचा अंमल असलेल्या संपूर्ण देशामध्ये वृत्तपत्रे काढता येत होती. मात्र निजामाच्या राजवटीमध्ये वृत्तपत्रांवरही बंदी घातली गेली होती. हैद्राबाद राज्यामध्ये सरकारविरुद्ध काम करणाऱ्यांचा कुठलाही खटला न चालवता संपत्ती जप्त करण्याचे प्रकार झाले.

त्या काळात सर्व शाळा निजामाच्या आशीर्वादानेच चालत. त्यामुळे याठिकाणी स्वातंत्र्य किंवा राष्ट्रभक्ती अशा गोष्टींचा उल्लेख करण्यास देखील बंदी होती. अनेक स्वातंत्र्यसेनानींच्या पुढाकाराने राष्ट्रभक्तीचे संस्कार मुलांवर होण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय

बंदी केली होती. १९४८ मध्ये पोलीस ॲक्शनमुळे हैद्राबाद संस्थानचे अस्तित्व संपले. हैद्राबाद व त्याच्या अमलाखाली असलेला मराठवाडा भारतीय स्वराज्याचा भाग बनला.

## एकात्मतेला सुरुंग लावणारी कृती

भारतीय स्वातंत्र्याची चळवळ सुरू होती, तेव्हा इंग्रजांचे राज्य असताना लंडनच्या पार्लमेंटला अनेक अधिकार होते. लॉर्ड माऊंटबॅटन यांचे मित्र असलेले लॉर्ड मॉक्टन यांना हाताशी धरून थेट इंग्लंडमध्ये आपली धोरण वकिली निजामाने सुरू केली. लॉर्ड माऊंटबॅटन यांचे मन त्यांचा मित्र मॉक्टन वळवू शकेल, असा विश्वास निजामाला होता. यासाठी इंग्लंडमध्ये जाऊन निजामाने लॉर्ड मॉक्टनच्या

## निजामावर कारवाई

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी १९३८ साली शनिवारवाड्यावर झालेल्या विशाल सभेमध्ये हैद्राबाद मुक्ती आंदोलनाची सैद्धान्तिक भूमिका मांडली होती. महाराष्ट्रातील अक्षरशः हजारो लोकांनी वेगवेगळ्या संस्था निर्माण करून आंदोलन सुरू केले होते. प्रामुख्याने हे निःशस्त्र विरोधी आंदोलन होते. ज्यामध्ये लोकशाही स्वराज्य दल, भागानगर हिंदू साहाय्यता निधी, हिंदू महासभा अशा वेगवेगळ्या नावांनी, संस्थांनी विविध पद्धतीची आखणी केली.

हैद्राबाद संस्थानाचा निजाम अली याच्याबरोबर अगदी निर्वाणीचा एक कराररही त्यावेळचे ब्रिटिश गव्हर्नर लॉर्ड माऊंटबॅटन यांनी केला होता. त्याला सरदार पटेलांनीच संमती द्यावी, अशी इच्छा होती. या करारातील बराचसा भाग सरदार पटेल यांना मान्य होण्यासारखा नव्हता; परंतु माऊंटबॅटन यांना दिलेला शब्द पाळण्यासाठी ते तयारही झाले होते; परंतु ज्यावेळी पटेलांची संमती घेऊन माऊंटबॅटन निजाम अली याच्याकडे आले, तेव्हा त्याने परत आपली भूमिका बदलली आणि हा करार आपल्याला मान्य नसल्याचे माऊंटबॅटन यांना कळवून टाकले. हाच येथे महत्त्वाचा मुद्दा ठरला आणि सरदार पटेल पेटून उठले. आता काही झाले तरी माघार घ्यायची नाही, असा निर्धार त्यांनी केला. हैद्राबाद संस्थानाच्या विलीनीकरणाबाबत भारत सरकार आणि विशेषतः सरदार पटेल गृहमंत्री म्हणून दृढनिश्चयी होते. मराठवाडा मुक्तीचा अर्थात हैद्राबाद संस्थानाच्या विलीनीकरणाचा जटिल प्रश्न त्यांनी निर्धाराने सोडवला.

निजामाविरुद्ध सैनिक कारवाई करण्याचा निर्णय योग्य असला, तरी त्या मोहिमेला 'पोलीस ॲक्शन' असे नाव द्यावे, असा सल्ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला होता. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची बाजू मांडण्याची वेळ आल्यास सोयीचे होईल, अशी दूरदृष्टी त्यामागे होती. त्याप्रमाणे १ ते १७ सप्टेंबर १९४८ या काळात भारताने निजामाविरुद्ध 'पोलीस कारवाई' नावाने सैनिकी कारवाई करून लढा यशस्वी केला.

१९३८ ते १९४८ ही १० वर्षे मराठवाडा मुक्तिसंग्रामासाठी खूप महत्त्वाची ठरली. १९३८ पासून प्रारंभ झालेल्या या स्वातंत्र्यलढ्यात आर्य समाजाने सुरू केलेले आंदोलन, हैद्राबाद स्टेट काँग्रेसने आरंभलेला सत्याग्रह, हिंदू महासभेने आरंभलेला भागानगर नि:शस्त्र सत्याग्रह तसेच विद्यार्थ्यांनी सुरू केलेली 'वंदे मातरम्' चळवळ ही अत्यंत महत्त्वाची ठरली.

निजाम राजवटीचा हाहाकार प्रत्यक्षात शाळा काढण्यात आल्या. त्याचीही मोठी चळवळ उभी झाली होती.

राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन चालवल्या जाणाऱ्या शाळांना राष्ट्रीय शाळा म्हटले जात असे. निजामाच्या लेखी या बागी मदरसा म्हणजेच बंडखोरांच्या शाळा होत्या. या बंडखोरांच्या शाळांनीच स्वातंत्र्यलढ्यासाठी अनेकांना प्रेरित केले. आंदोलनाची दिशा काय असावी हे ठरवण्याचे, चिंतनाचे प्रमुख ठिकाणदेखील या शाळा असत. त्यामुळे त्याने या शाळांना

क्वॉवर्डचान्स ॲण्ड कंपनीसाठी थोडे-थोडके नव्हे, तर तब्बल १९ लाख पौंड खर्च केल्याची नोंद आहे. इंग्लंडचा मीडिया हाताशी धरला. आपले राज्य कसे चांगले सुरू आहे आणि भारत त्यात कसा हस्तक्षेप करतो आहे, अशा प्रकारचे जागतिक मत तयार करण्याचा त्याने प्रयत्न सुरू केला होता. त्याचबरोबर भारत कसा तकलादू देश आहे, वेगवेगळ्या संस्थानांना जबरदस्तीने आपल्याकडे घेतो आहे, अशा प्रकारचा जागतिक मतप्रवाह निर्माण

## मराठवाड्याचा अनुशेष भरून काढणार

मराठवाडा स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहे. मात्र गेल्या ७५ वर्षांत जो विकास येथे व्हायला हवा होता, तो दुर्दैवाने झाला असल्याचे दिसत नाही. मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यावर यापूर्वी आपल्या आणि आताचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्त्वातील सरकारने भर दिला आहे. मराठवाड्यासाठी भक्कम तरतूद करण्यात आली आहे.



मराठवाड्याच्या दुष्काळमुक्तीसाठी सिंचन, पिण्याच्या पाण्याच्या सततच्या समस्येवर मात करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर, वैजापूर व पैठण तालुक्यांना जायकवाडी धरणातून, बीड व लातूर जिल्ह्यांकरिता जायकवाडी, माजलगाव, उर्ध्वमनार या धरणांतून, धाराशिव जिल्ह्यासाठी उजनी, सिना कोळेगाव, निम्नतेरणा धरणांतून प्रथम, द्वितीय व तृतीय वॉटरग्रीड निर्माण करण्याची कार्यवाही सुरू आहे.



धाराशिव व बीड जिल्ह्यातील १३३ गावांना लाभ व्हावा, याकरिता कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पासाठी ११ हजार ६२६ कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता, छत्रपती संभाजीनगर विमानतळाच्या भूसंपादनासाठी ७३४ कोटी रुपये, छत्रपती संभाजीनगर येथे सर्क्युलर इकॉनॉमी पार्क व नवीन क्रीडा विद्यापीठ, पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यानाचा नागपूर येथील फुटाळा तलावाच्या धर्तीवर विकास, घृष्णेश्वर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र व परिसर विकास, जालना येथे नवीन व्यसनमुक्ती केंद्र, सोलापूर-बीड महामार्गावर एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली, विदर्भ व मराठवाड्यातील ११ जिल्ह्यांमध्ये दुग्धविकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा, लातूर जिल्ह्यामध्ये बांबू क्लस्टर, धाराशिव व परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बीड जिल्ह्यातील गहिनीनाथ गडाच्या संवर्धन व विकासासाठी २५ कोटी रुपये निधीची तरतूद यंदाच्या अर्थसंकल्पात आपण केली आहे.

अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ, वर्धा-यवतमाळ-नांदेड, नांदेड-बिदर, खामगाव-जालना, सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या रेल्वे मार्गांसाठी ५० टक्के राज्य हिश्शाची तरतूद केली असल्याने हे प्रकल्प लवकरच मार्गी लागतील. औंढा नागनाथ, परळी वैजनाथ ही ज्योतिर्लिंगे, नांदेड येथील तख्त सचखंड श्रीहजूर साहिब गुरुद्वाराला जोडणारा महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्ग हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव अशा सहा जिल्ह्यांतून जात असल्याने तो मराठवाड्यातील अर्थकारणाला भक्कम पाठबळ देणारा ठरणार आहे.

करण्याकरिता त्याने कोट्यवधी रुपये खर्च केले होते. त्याची ही कृती अखंड भारताच्या एकात्मतेला सुरुंग लावणारी होती.

मराठवाडा मुक्तिलढा जेव्हा मोठा झाला, तेव्हा निजामाने अनेक फुटीर गोष्टी करण्याचा प्रयत्न केला होता. त्याला धार्मिकतेचे व जातीयतेचे वळण लावण्याचा प्रयत्न झाला. जिहादचा नारा दिला जात होता. अशाप्रकारचे अनेक प्रयत्न त्याने केले, मात्र निजामाच्या कुठल्याही कारस्थानाला बळी न पडता विविध जातीधर्मातील स्वातंत्र्यसैनिकांनी मैदानात उतरून हा लढा यशस्वी केला. म्हणूनच हा इतिहास पुढील पिढीपर्यंत आपण पोहोचवला पाहिजे. स्वातंत्र्य आणि सहिष्णुता या दोन गोष्टी संविधानात तर आहेतच; परंतु त्या भारतीय संस्कृतीत, भारतीयांच्या रक्तात भिनलेल्या आहेत. त्याचे रोपण आपल्याला पुढच्या पिढीमध्ये करायचे आहे आणि ते हा इतिहास त्यांच्यापर्यंत पोहोचवून शक्य होईल, असे मला वाटते.

**शब्दांकन : प्रवीण कुलकर्णी,**
**राजाराम देवकर,**
मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे
सहायक जनसंपर्क अधिकारी

**मराठवाड्याची भूमी ही संतांची, महंतांची, शूरांची, वीरांची भूमी आहे. ज्ञानवंतांची, प्रज्ञावंतांची, बुद्धिमंतांची, कलावंतांची, कष्टकऱ्यांची भूमी आहे. या भूमीला धैर्याचा, शौर्याचा, संघर्षाचा वारसा आहे. मराठवाड्याला सहजासहजी काही मिळाले नाही. जे मिळाले ते मराठवाड्याने संघर्ष करून मिळवले आहे. मराठवाड्याच्या लढाऊ बाण्याला, संघर्षाच्या इतिहासाला, मराठवाड्याच्या पवित्र भूमीला, मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने वंदन करतो.**

# संघर्षाचा इतिहास...

**अजित पवार,** उपमुख्यमंत्री

देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामाइतकाच मराठवाडा मुक्तिसंग्राम महत्त्वाचा आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १३ महिने २ दिवसांनी, १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले. त्यासाठी मराठवाड्याला सशस्त्र संघर्ष करावा लागला. गावागावात आंदोलन केले गेले. निजामाच्या सैन्याशी रस्त्यावर उतरून सशस्त्र लढा झाला. महाराष्ट्र परिषदेसारख्या संस्था, संघटनांनी जनजागृती केली. त्यातून लढ्याला मोठे बळ मिळाले.

तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी हैद्राबादच्या निजामाविरुद्ध पोलिसी कारवाईचा दिलेला आदेश निर्णायक ठरला.

मराठवाडा मुक्तीचा लढा हा महाराष्ट्रासाठी न्यायाचा, हक्काचा, सन्मानाचा लढा होता. लढ्याचे नेतृत्व आदरणीय स्वामी रामानंद तीर्थ यांच्यासारख्या दिग्गज नेत्याने केले. सन्माननीय दिगंबरराव बिंदू, गोविंदभाई श्रॉफ, रवीनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, विजयेंद्र काबरा, बाबासाहेब परांजपे यांच्यासारख्या नेत्यांना, मराठवाड्यातील जनतेने मनापासून साथ दिली.



### मुक्तिलढ्यातील स्वातंत्र्यवीरांचे योगदान

मराठवाडा मुक्तीच्या लढ्यात हजारो, लाखो देशभक्तांनी योगदान दिले. हैद्राबादच्या निजामाचा पंतप्रधान मराठवाड्यात येऊ नये म्हणून पूल उडवून देण्याचे काम काशिनाथराव कुलकर्णी यांच्यासारख्या मुक्तिसैनिकांनी केले. बदनापूर तालुक्यातल्या धोपटेश्वरच्या दगडाबाई शेळके यांची मर्दुमकी बघून त्यांना मराठवाड्याची झाशीची राणी म्हणून गौरवण्यात आले. बीडच्या विठ्ठलराव काटकरांनी निजामाच्या रोहिल्यांना जेरीस आणले. लातूरच्या हरिश्चंद्र जाधवांनी बर्दापूरचे पोलीस स्टेशन उडवून दिले. उस्मानाबादमधल्या होर्टी गावच्या जनार्दन होर्टीकर गुरुजींनी नळदुर्ग सर केला. परभणीत रझाकारांना हुसकावून लावण्यात सूर्यभान पवार, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातनेश्वरकर आघाडीवर होते. नांदेडचे देवरावजी कवळे, जीवनराव बोधनकर यांच्यासारख्या हजारो मराठवाडा मुक्तिसैनिकांनी जीवावर उदार होऊन मराठवाडा मुक्तीचा लढा लढला, यशस्वी केला. या सर्वांच्या धैर्य, शौर्य, त्याग, पराक्रमामुळे मराठवाडा आज मुक्त, स्वतंत्र आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामात योगदान दिलेल्या स्वातंत्र्यवीरांचे, मुक्तिदिनाच्या अमृतमहोत्सवा निमित्ताने स्मरण करणे, मराठवाड्याचा इतिहास, मराठवाडा मुक्तिसंग्रामाची संघर्षगाथा आजच्या; तसेच भावी पिढीपर्यंत पोहोचवणे, हे आपले कर्तव्य आहे.

### अर्थसंकल्पात तरतूद

मराठवाडा मुक्तीचा अमृतमहोत्सव सर्वांच्या सहभागातून भव्य स्वरूपात साजरा झाला पाहिजे, ही राज्यातील नागरिकांची इच्छा आहे. राज्याचा उपमुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेता म्हणूनही मी यासाठी सातत्याने आग्रही राहिलो आहे. यापूर्वी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री असताना सादर केलेल्या वर्ष २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृतमहोत्सवाच्या कार्यक्रमासाठी ७५ कोटी रुपयांची तरतूद केली होती. माझ्यानंतर अर्थमंत्रिपद स्वीकारलेल्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही २०२३-२४च्या अर्थसंकल्पातही ती तरतूद कायम ठेवली. महाराष्ट्राच्या आतापर्यंतच्या सर्व नेत्यांनी मराठवाड्याच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. त्यांच्याही योगदानाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

मराठवाड्याच्या विकासामुळेच महाराष्ट्राचा विकास होऊ शकतो, याची जाण आतापर्यंतच्या प्रत्येक नेतृत्वाने कायम ठेवली. त्यातून मराठवाड्यात नाथसागरसारखे मोठे धरण, अनेक छोटी-



मोठी धरणे उभी राहिली. पाझर तलाव, साठवण तलाव, लघु, मध्यम, मोठे तलावांचे जाळे निर्माण झाले. गोदावरीवर बॅरेजेसची साखळी उभी राहिली. जलसंधारणाचे अनेक प्रकल्प मराठवाड्यात ठिकठिकाणी राबवले गेले. त्यातून लाखो हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्याचा प्रयत्न झाला. मराठवाड्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याने मर्यादित यश मिळाले; परंतु आपण प्रयत्नात कमी ठेवली नाही, हेसुद्धा तितकेच खरे आहे.

## समुद्रात वाया जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळवणार

येणाऱ्या काळात, मराठवाड्याला कायमचे दुष्काळमुक्त करण्यासाठी पश्चिम वाहिनी नद्यांचे समुद्राला वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळवण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. कोकणातील समुद्रात वाहून जाणारे पाणी, तुटीच्या भागात उपलब्ध होण्याबरोबरच गुजरातकडे वाहून जाणारे अतिरिक्त पाणीही महाराष्ट्रात वळवले जाणार आहे. येत्या दोन वर्षांत महत्त्वपूर्ण असे १०४ प्रकल्प पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

पूर्वविदर्भ (वैनगंगा खोरे), नार पार-दमणगंगा, वैतरणा, पिंजाळ, उल्हास नदी खोरे येथील अतिरिक्त असलेले पाणी अनुक्रमे विदर्भातील अवर्षणप्रवण भाग, मराठवाडा आणि खान्देश, नाशिक, मुंबई, नवी मुंबई, पालघर, ठाण्याकडे वळवण्याबाबत विचार सुरू आहे. नदीजोड-वळण प्रकल्पांबाबतही वेगाने कार्यवाही करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. निळवंडे प्रकल्प मार्गी लावण्यात आला असून ३५ सिंचन प्रकल्पांना नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

मराठवाड्याचा दुष्काळ मिटवण्यासाठी यंदा अर्थसंकल्पात २० हजार कोटींची तरतूद केली आहे. मराठवाडा दुष्काळमुक्त करण्यासाठी, सिंचन, पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यासाठी प्रथम, द्वितीय आणि तृतीय वॉटरग्रीड निर्माण करण्याची कार्यवाही सुरू आहे. मराठवाडा वॉटरग्रीडचा प्रस्ताव केंद्राकडे मान्यतेसाठी पाठवला आहे. हा प्रकल्प मार्गी लागल्यानंतर पाण्याचा अपव्यय टळेल. प्रत्येक गावात, घरात, नळापर्यंत बंद वाहिनीद्वारे पाणीपुरवठा शक्य होणार आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पात मराठवाड्यासाठी, बीड व उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरिकांच्या महत्त्वाच्या असणाऱ्या कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पासाठी ११ हजार ६२६ कोटींच्या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. उस्मानाबाद जिल्ह्याला उजनी, सीना कोळेगाव, निम्नतेरणा धरणातून पाणी दिले जाणार आहे. बीड जिल्ह्याला जायकवाडी, माजलगाव धरणातून पाणीपुरवठा केला जाणार आहे. यातून मराठवाड्यातील शेतकऱ्यांना शाश्वत शेतीचा मार्ग खुला होऊ शकेल.

शाश्वत शेतीतील महत्त्वाचा टप्पा म्हणून संपूर्ण राज्यातील शेतकरी बांधवांना आपण केवळ एक रुपयात पीकविम्याचे संरक्षण दिले आहे. महाकृषी विकास अभियानांतर्गत ५ वर्षांत ३ हजार कोटींचा निधी उपलब्ध केला जाणार आहे. 'मागेल त्याला शेततळे' योजना आहेच. त्यासोबत आता 'मागेल त्याला अस्तरीकरण' ही योजना राबवण्यात येत आहे.

शेतकरी सन्मान योजना शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा आधार बनली आहे. केंद्राच्या ६ हजार रुपयांच्या मदतीत आता, राज्याने प्रति शेतकरी ६ हजार रुपयांची भर घातली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रतिवर्ष १२ हजार रुपये सन्माननिधी मिळणार आहे.

## मराठवाड्यात मंत्रिमंडळ बैठक

मराठवाडा मुक्तीच्या अमृतमहोत्सवी वर्षाचा सांगता सोहळा तसेच मराठवाड्याच्या अनेक जिल्ह्यांतील दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन याच महिन्यात, १६ सप्टेंबला मराठवाड्यातील, छत्रपती संभाजीनगर येथे मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात आली. याआधी मंत्रिमंडळ बैठक मराठवाड्यात ७ वर्षांपूर्वी ४ ऑक्टोबर २०१६ ला झाली होती. ७ वर्षांनंतर ही बैठक झाली असून या बैठकीत मराठवाड्याच्या विकासाचे आणि शेतकऱ्यांना दिलासा देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

## शक्तिपीठ महामार्ग महत्त्वाचा

शेती विकासाबरोबर मराठवाड्याच्या पर्यटन विकासावरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. येथे ऐतिहासिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक महत्त्वाची अनेक पर्यटनस्थळे आहेत. तेथील पर्यटनाला चालना देण्यासाठी, राज्य शासनाने जाहीर केलेला नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्ग महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. एकूण ७५० किलोमीटर लांबीच्या, ८६ हजार कोटी खर्चाच्या, सहापदरी महामार्गाची घोषणा यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. या शक्तिपीठ महामार्गामुळे विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकणातला मोठा भाग रस्त्याने थेट गोव्याशी जोडला जाणार आहे. याचा फायदा मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, बीड, उस्मानाबाद या जिल्ह्यांना होणार आहे. समृद्धी महामार्गानंतर शक्तिपीठ महामार्ग मराठवाड्याच्या विकासाचा महामार्ग ठरू शकतो.

## पर्यटन, आरोग्य, कामगार हिताचे निर्णय

पाटोदा तालुक्यातील गहिनीनाथ गडाचे संवर्धन व विकासासाठी अर्थसंकल्पात २५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. महात्मा फुले जन आरोग्य या योजनेमध्ये दीड लाखांपर्यंत आतापर्यंत मोफत उपचार होत होते. आता दीड लाखांची मर्यादा पाच लाखांपर्यंत वाढवली आहे. उपचारांची गरज भासणाऱ्या आजारांमध्ये जे आजार आधी नव्हते, त्यांचाही समावेश करण्यात आला आहे.

मराठवाड्यातील असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या मोठी आहे. रोजंदारीवरील कामगार, घरगुती कामगार, रिक्षा व्यावसायिक, छोट्या व्यवसायात काम करणाऱ्या राज्यातल्या तीन कोटी असंघटित कामगारांकरिता असंघटित कामगार कल्याण मंडळ तयार करण्यात येत असून त्याचा फायदा मराठवाड्यातील कामगारांना होणार आहे.

## मराठवाडा विकासाचे महत्त्वपूर्ण निर्णय

राज्याचा उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री म्हणून मलाही मराठवाड्यासाठी काही निर्णय घेता आले, याचे मनापासून समाधान आहे. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात जालना येथे ३६५ खाटांच्या नवीन प्रादेशिक मनोरुग्णालयासाठी ६० कोटी रुपयांची तरतूद केली. नांदेडमध्ये ५० खाटांचे प्रथम दर्जाचे ट्रॉमा केअर युनिट उभारण्याचा, औरंगाबाद आणि हिंगोली येथे प्रत्येकी १०० खाटांच्या स्त्रीरोग रुग्णालयाचा निर्णय घेतला. बीडमधील स्त्री रुग्णालयाचे बांधकाम, श्रेणीवर्धनाचे काम हाती घेतले. फर्दापूर, अजिंठा, वेरूळ येथे पर्यटनाला चालना देण्याचा; तसेच जायकवाडी येथे जलपर्यटनाचा निर्णय घेतला. हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे हळद पिकाच्या संशोधनासाठी १०० कोटी रुपयांची, नांदेडच्या खादी ग्रामोद्योग केंद्रासाठी २५ कोटींची तरतूद केली.

मराठवाडा, विदर्भात सोयाबीन- कपाशी पिकांसाठी विशेष कृती योजना जाहीर करून तीन वर्षांत एक हजार कोटींचा निधी उपलब्ध केला. आकांक्षित उस्मानाबाद जिल्ह्यात पाझर तलावांचे साठवण तलावात रूपांतर करून जलसिंचन सुविधा पुनर्जीवित करण्याची योजना आखली. देशी गायी, म्हशींची उत्पादकता वाढवण्यासाठी मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी प्रत्येकी एक अशा एकूण तीन मोबाइल प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय घेतला. औरंगाबाद येथील शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त १० कोटी रुपयांची तरतूद केली. समृद्धी महामार्गाचे काम पूर्णत्वाकडे नेले.

जालना-नांदेड द्रुतगती जोड महामार्गाच्या भूसंपादनासाठी निधीची तरतूद केली. नगर- बीड-परळी वैजनाथ रेल्वे मार्गाला चालना दिली. जालना-जळगाव रेल्वे प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या हिश्शाची तरतूद केली. नांदेड येथील खादी ग्रामोद्योग केंद्राच्या इमारतीची पुनर्बांधणी, विक्री केंद्र उभारणीसाठी २५ कोटींचा निधी उपलब्ध केला. हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मरणार्थ औरंगाबाद येथे अमृतमहोत्सवी वंदे मातरम् सभागृहाच्या बांधकामासाठी ४३ कोटींच्या निधीची तरतूद केली.

## शैक्षणिक, कौशल्य विकासावर भर

मराठवाड्याच्या शैक्षणिक आणि कौशल्य विकासावरही भर देण्यात येत आहे. कौशल्य प्रशिक्षण संस्थांना, सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये बदलण्यासाठी गुंतवणूक वाढवण्यात येत आहे. आयटीआय, पॉलिटेक्निक, स्किल डेव्हलपमेंटच्या सोयी मराठवाड्याच्याही ग्रामीण भागात नेण्यात येत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याने कुठले ना कुठले कौशल्य आत्मसात केले पाहिजे, यासाठी कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यात येत आहे.

## मराठवाड्यातील नेतृत्वाने महाराष्ट्र घडवला..

मराठवाड्याच्या विकासासाठी, मराठवाड्यातील जनतेच्या कल्याणासाठी जेवढे करता येईल, तेवढे करण्याचा आमचा मनापासूनचा प्रयत्न आहे. त्या प्रयत्नात जराही कमी राहणार नाही. कारण मराठवाड्याने अमृतमहोत्सवी वाटचालीत महाराष्ट्राला खूप काही दिले. सन्माननीय शंकरराव चव्हाण, विलासराव देशमुख, अशोकराव चव्हाण, शिवाजीराव निलंगेकर यांच्यासारखे मुख्यमंत्री दिले. गोपीनाथराव मुंडे, सुंदरराव सोळंके साहेबांसारखे उपमुख्यमंत्री दिले. शिवराज पाटील चाकूरकर साहेबांसारखे केंद्रीयमंत्री दिले. श्रीमती केशरकाकू क्षीरसागर, केशवराव धोंडगे, जयसिंहराव गायकवाड पाटील, बापूसाहेब काळदाते, पद्मसिंह पाटील, कमलकिशोर कदम, सूर्यकांताताई पाटील, नानाजी देशमुख, वसंतराव काळे, डॉ. रफिक झकेरिया, शिवाजीराव पंडित, विनायकराव मेटे यांच्यासारखे निरनिराळ्या क्षेत्रात योगदान देणारे मान्यवर नेते, लोकनेते दिले.

मराठवाड्याच्या मातीने अनेक संत, महात्मे, समाजसुधारक दिले. साहित्यिक, कलावंत, विचारवंत दिले. विरोधी पक्षात राहूनही मैत्री कशी जपावी, हे शिकवणारे विलासराव देशमुख, गोपीनाथराव मुंडे साहेबांसारखे मित्र दिले. मराठवाड्याने महाराष्ट्राचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक वैभव समृद्ध केले. मराठवाड्याने महाराष्ट्राला प्रगत, पुरोगामी विचार दिला. संघर्ष करण्याची ताकद दिली. महाराष्ट्रानंही मराठवाड्याचा विकास करताना हातचे कधी राखले नाही. राज्याचे नेतृत्व करणाऱ्या प्रत्येक नेत्याने मराठवाड्यावर मनापासून प्रेम केले. मराठवाड्याला भरभरून देण्याचा प्रयत्न केला.

## ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ

लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ स्थापन केले. महामंडळास स्वतःचा निधी मिळावा यासाठी ऊस गाळपावर प्रतिटन १० रुपये कल्याण निधी म्हणून कारखाना देईल, तर १० रुपये राज्य शासन देईल, अशी एकूण प्रत्येक टनामागे २० रुपये मिळतील, अशी कायमस्वरूपी व्यवस्था राज्य शासनाने केली आहे. ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेतून वसतिगृहे सुरू केली आहेत. ऊसतोड कामगारांसाठी, अपघात विमा, आरोग्य योजना, फिरते दवाखाने यांसह आणखी काही योजना आणण्याचा आपला प्रयत्न आहे.

औरंगाबाद विमानतळ भूसंपादनासाठी ७३४ कोटींची तरतूद केली आहे. मराठवाड्याला आर्थिक संपन्नतेकडे नेणाऱ्या फळबाग योजनेची कामे रोजगार हमी योजनेतून करण्यास परवानगी दिली. पीककर्जमाफी जाहीर करून मराठवाड्यातील लाखो शेतकऱ्यांनाही दिलासा देण्याचे काम केले. राज्याप्रमाणे केंद्र शासनानेही यंदाच्या अर्थसंकल्पात मराठवाडा आणि महाराष्ट्रासाठी भरीव तरतूद केली. मराठवाड्यासह राज्यातील रस्ते आणि रेल्वे प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध केला आहे.

**शब्दांकन : संजय देशमुख,**
मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

**इ.स.१९११ मध्ये मीर उस्मान अली खान (सातवा निजाम) गादीवर आला. इ.स १९१७ मध्ये दसरा आणि मोहरम एकाचवेळी आल्याने निजाम सरकारने धार्मिकबाबतीत कडक नियम जाहीर केले होते. दुसरे पाकिस्तान निर्माण करण्याचा, सहकार्याऐवजी सूड व न्यायाऐवजी अन्याय या निजामाच्या धोरणामुळे हिंदू जनतेच्या मनात जबाबदार राज्यपद्धती (जिम्मेदारांना हुकूमत) अमलात यावी असा आग्रह होता. असा आग्रह धरणाऱ्या हजारो शांतताप्रेमी स्वातंत्र्य सैनिकांच्या त्याग आणि बलिदानाची ही स्फूर्तिदायी कहाणी आहे.**

# स्वातंत्र्यसंग्रामाच्या आठवणी

**निशिकांत भालेराव**

हैद्राबाद मुक्तिसंग्रामामध्ये अनेक वीरांना, कार्यकर्त्यांना हौतात्म्य पत्करावे लागले. अनेक यातना सहन कराव्या लागल्या. त्यांच्या या बलिदानाचा स्फूर्तिदायक इतिहास आजही प्रेरणा देणारा आहे.

## हैद्राबाद स्वातंत्र्याचा आरंभ बिंदू

सन १९२० हा हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाचा आरंभ बिंदू मानला जातो; पण १९३२ ते १९४८ या १६ वर्षांतील संघर्ष आवर्जून सांगितला जातो. या १६ वर्षांच्या काळातील हैद्राबादच्या ७व्या निजामाविरुद्धचे जनआंदोलन म्हणजे मराठवाडा भागातील क्रांतीच म्हणायला हवी. या क्रांतीच्या शेवटच्या टप्प्यात स्वतंत्र भारताच्या लष्कराने हस्तक्षेप केला. पोलीस फौज जमा करून निजामला शरण येण्यास भाग पाडले. भारताच्या मध्यभागी 'मुस्लीम राष्ट्र' बनवण्याचे निजामाचे स्वप्न भंगले. पुढे कालांतराने भाषावार प्रांतरचनेत मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाला. भारतात दुसरे काश्मीर-पाकिस्तान निर्माण करण्याचा प्रयत्न निजामचा होता. तो अयशस्वी झाला. मुक्तिसंग्रामाचे जनक स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ यांची वैचारिक बैठक सर्वधर्मसमभाव असल्याने; तसेच महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव असल्याने हा मुक्तिसंग्राम निजाम आणि त्याच्या रझाकाराविरुद्ध असूनही मुस्लीमद्वेष्टा बनू दिला नाही. कोणत्याही क्षणी धार्मिक कडवेपणा उफाळून येण्याची शक्यता होती, कारण तशा हालचाली निजाम शासक निजाम, मीर उस्मान अली खान, राजाचा पक्ष मजलिस-ए-इत्तेहादुल मुसलमीन आणि त्याची सशस्त्र संघटना रझाकार यांनी सुरू केल्या होत्या. हैद्राबाद संस्थान हे ब्रिटिशांच्या दृष्टीने साम्राज्याचे मर्मस्थान होते. आशियायी मुस्लिमांचे केंद्रीकरण हैद्राबाद संस्थानात व्हावे, असे डावपेच निझामाचे होते. या विचारधारेला ब्रिटिशांचे प्रोत्साहन होते, मदतही होती.



## ब्रिटिशांची पंचसूत्री

संस्थानातील जनतेला नियंत्रणात ठेवता यावे, तसेच हिंदू-मुस्लीम द्वेष वाढत जावा यासाठी ब्रिटिश सरकारने निजामाला पंचसूत्री आखून दिली होती. शासक निझामाने जनतेवर प्रचंड निर्बंध लादले होते. हे निर्बंध धार्मिक, उपासना पद्धती, शिक्षण, मातृभाषा, उर्दू भाषेची सक्ती, नोकऱ्या, ज्या धर्माचा त्या धर्माच्या लोकांना प्राधान्य, भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्यावरील निर्बंध, वंदे मातरम् म्हणण्यास बंदी, प्रसारमाध्यमांवर अंकुश असे निर्बंध घातले होते. विशेष म्हणजे या निर्बंधांबरोबर शासक निजामाच्या 'रझाकार' या खासगी सैन्याची दहशत अधिक होती. भारत पुढेमागे स्वतंत्र झाला तरी हैद्राबाद संस्थान त्यात सामील करायचे नाही, त्यासाठी संस्थानाची आर्मी असावी म्हणूनच मजलिस-ए-इत्तेहादुल मुसलमीन (एमआय एम) या पक्षाला निजामाने पाठिंबा दर्शवला. या पक्षानेच पुढे संलग्नित सशस्त्र संघटना काढली. ती रझाकार सशस्त्र संघटना म्हणून ओळखली जाऊ लागली. या संघटनेचे लाखापेक्षा जास्त सैन्य होते. कासिम रिझवी हा त्याचा प्रमुख होता. रिझवी जेवढा महत्त्वाकांक्षी त्यापेक्षा अधिक पाताळयंत्री होता. शासक निजाम, पक्ष इत्तेहादुल यांच्या पुढे जाऊन भारताच्या मध्यभागी 'स्वतंत्र पाकिस्तान' बनवण्याचे त्याचे षड्यंत्र होते. तो जहालवादी असल्याने हिंदू आणि त्यांना मदत करणाऱ्या मंडळींवर त्याने वचक, दहशत पसरवली होती अनेकवेळा तर हैद्राबाद संस्थान इत्तेहादुल मुसलमीन आणि रझाकार चालवत होते की काय, अशी शंका त्यावेळी घेतली जायची.

## हैद्राबादमधील शासक

१९४६ ते १९४८ या काळात संस्थानात अतिशय विस्फोटक परिस्थिती निर्माण

झाली होती. इत्तेहादुल आणि रझाकार यांच्याबद्दल थोड्या विस्ताराने काही गोष्टी आपण समजून घेतल्या, तर मुक्तिसंग्राम हा किती अवघड होता, तो अहिंसक आणि धर्मनिरपेक्ष ठेवण्यामध्ये किती प्रयास करावा लागला असेल हे लक्षात येईल. महाराष्ट्रात सामील होण्यासाठी तेथील जनतेने काय किंमत मोजली याचा अंदाज येईल. मुस्लीम लीगची जातीयता आणि इत्तेहादुलची जातीयता यांच्यात फार मोठा फरक होता. इत्तेहादुल मुस्लिमांचे अध्यक्ष बहादूर यार जंग यांनी निजामाबादचे मौलवी गुलाम अहमद यांना पाठवलेल्या पत्रात ते म्हणतात, 'मुस्लीम लीगच्या तुलनेत हैद्राबादमध्ये इत्तेहादुलवर पडलेली जबाबदारी मोठी व वेगळी आहे. भारतात इतरत्र कुठेही मुसलमानांना हैद्राबादसारखा दर्जा नाही. ते हिंदूप्रमाणेच शासित आहेत. इत्तेहादुल आणि शासक निझाम हे भारतातील मुस्लिमांसह पाकिस्तानचे नेते आहेत, असे म्हटले जायचे. पाकची निर्मिती व्हायच्या आधीच मुस्लिमांमधील ज्येष्ठ राज्यकर्ते, शासक म्हणून शेखी निजाम आणि इत्तेहादुल मिरवत होते. हैद्राबाद आम्ही लढाई करून जिंकून मिळवले असल्याने आम्हाला लोकसंख्येचा निकष लागू होत नाही. इथल्या रयतेला आमचे गुलाम म्हणून राहावे लागेल. जनतेला लोकशाही हक्क मागता येणार नाही, असे उघड-उघड निजाम आणि त्याचे रझाकार बोलायचे. इत्तेहादुल ही संघटना निखळ जातीयवादी, कर्मठ असल्याने त्या पक्षात कडवेपणा ठासून भरला होता. हेच शासक निजामाला आवडत होते. त्यामुळेच इत्तेहादुलला बादशहाची पार्टी मानले जायचे.

## मुस्लिमांचे ऐक्य

१९३८ मध्ये निजामाच्या सरकारमधील धर्म खात्याच्या पुढाकाराने हा पक्ष अधिकृतच झाला. या काळात ब्रिटिश अमलाखाली भारतात महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मोहम्मद अली जिना यांच्या पुढाकाराने स्वातंत्र्य चळवळ वेग घेत होती. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळीनेही महाराष्ट्रात वेग घेतला होता. देशभरात अनेक संस्थाने जबाबदार राज्य पद्धती स्वीकारण्याच्या आणि लोकशाही हक्कासाठीच्या लढाईत आपला सहभाग नोंदवत होती. हैद्राबाद संस्थानात दुहेरी लढाई नेतृत्वाला लढवावी लागली. दारिद्र्य, मागासलेपण, विषमता, बेरोजगारी, कोरडवाहू शेती, जगण्याच्या साधन सुविधांचा अभाव, शिक्षणाच्या गैरसोयी, सरंजामशाही व्यवस्था यामुळे देशाच्या तुलनेत आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र मिळून बनलेल्या १३ जिल्ह्यांच्या या संस्थानाची अवस्था भीषण होती आणि त्यात शासक निजाम आणि इत्तेहादुलसारखे सल्लागार असल्याने स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ यांच्यासह हजारो स्वातंत्र्यसैनिकांचा कस लागला होता. स्टेट काँग्रेसचा उदय याच काळातील. भारताचे स्वातंत्र्य जसे दृष्टिपथात येऊ लागले, तसे हैद्राबाद संस्थानातील जनतेवर आणि आंदोलकांवर अतिनिर्बंध येऊ लागले. याच काळात ब्रिटिशांनी पाकिस्तानच्या निर्मितीचे पिल्लू सोडले होते. निजामाने स्वातंत्र्यानंतर संस्थान खालसा करू नये, सामीलनामा धुडकावून लावावा अशी चाल सुरू केली होती. इत्तेहादुलच्या कासिम रिझवीने आपली रझाकार सेना खेड्यापाड्यात पोहोचवली होती. उर्दू भाषेची सक्ती, निजामाचे गोडवे गाणाऱ्या प्रार्थनेची शाळांमधील सक्ती, वृत्तपत्र बंदी, याचबरोबर चौफेर सांस्कृतिक आक्रमण सुरू झाले होते. इत्तेहादुलने १९३८-३९ या काळात निजाम सरकारकडे काही मागण्यांचे निवेदन देऊन आश्वासन मिळवले होते. मुसलमानांचा दर्जा, धर्मदृष्ट्या त्यांचे वर्चस्व, राजा व सिंहासन यांविषयी त्यांच्या श्रद्धा यावर आधारलेल्या व लोकशाहीच्या प्राथमिक सिद्धान्ताच्या विरोधातच होत्या. या मागण्यांचे निवेदन निजाम सरकारला देण्यात आले होते.

१. हैद्राबादवर आसफजाही वंशाचाच बादशहा असेल आणि तो सार्वभौम असेल.
२. राज्यव्यवस्थेत अपरिहार्यपणे बदल करावा लागला, तर परंपरेने आलेले मुस्लीम समाजाचे श्रेष्ठत्व कायम ठेवून बदल केला जाईल.
३. हैद्राबादच्या राज्यव्यवस्थेत बदल अपरिहार्य असेल, तेव्हा मुस्लीम समाजाचे परंपरागत श्रेष्ठत्व कायम राहील.
४. स्वराज्यसंस्था व कायदेमंडळ यामध्ये मुसलमानांची बहुसंख्या राखली जाईल.
५. उर्दू ही राज्यभाषा असेल, तसेच मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघ असतील.

याचप्रमाणे रझाकार संघटनेच्या बाबतही अधिकृतरीत्या झालेले निर्णय पुढीलप्रमाणे:

१) प्रत्येक खेड्यात, गल्लीत रझाकार संघटना स्थापन केली जाईल. प्रत्येक शाखेत ३० रझाकार असतील. त्यांना 'जैश' म्हटले जाईल. गणवेष लष्करी शर्ट, खाकी पायजमा, काळी फेज टोपी. प्रत्येकाकडे जम्बिया सुरे असतील. अधिकाऱ्यांकडे बंदुका असतील आणि त्या वापरण्याचा त्यांना पूर्ण अधिकार दिला असेल. २) इत्तेहादुल हा शब्द असलेला आसफिया ध्वजच रझाकार संघटनेचा ध्वज असेल.

रझाकार संघटना कासिम रिझवीने इतकी कडवी आणि जातीय बनवली होती की, तिची दहशत कित्येक वर्षे टिकून होती. भारत स्वतंत्र झाल्यावर निजाम सरकार, ब्रिटिश सरकार आणि स्वतंत्र भारताचे सरकार यांच्यात संस्थानाबाबत कोणताच करार होऊ द्यायचा नाही; तसेच हैद्राबादला सामील होण्यापासून रोखायचे, त्यासाठी लोकांमध्ये दहशत माजवायची, लोकांची इच्छा नाही हे भासवायचे अशी रणनीती रिझवीने आखली होती.

## ऑपरेशन पोलो

१९४८ रोजी स्वतंत्र भारताच्या फौजा हैद्राबाद राज्यात शिरल्या आणि ऑपरेशन पोलो सुरू झाले. १७ सप्टेंबरला हैद्राबाद निजामाने पांढरा झेंडा फडकावला आणि असफशाही घराण्याचा झेंडा खाली उतरवला. हैद्राबाद सैन्याचा सेनापती अल् इद्रुसने शरणागती पत्करली. आणि हैद्राबादेत तिरंगा फडकवला. ही कारवाई म्हणजे लष्करी कारवाई होती. तिला ऑपरेशन 'पोलो' नाव दिले होते. मध्ययुगीन निजामी सल्तनतीच्या कारभाराचे रूपांतर आधुनिक प्रजासत्ताकीय यंत्रणेत होऊ लागले. हैद्राबाद स्वतंत्र भारताचा अविभाज्य

भाग बनला. या मोहिमेसाठी फर्स्ट ग्वालियर लान्सर्स, मैसूर लान्सर्स, मेवाड इन्फंट्री, फोर्थ ग्वालियर इन्फंट्री, राजाराम रायफल्स, फर्स्ट मैसूर इन्फंट्री यातील दले तैनात करण्यात आली होती. या लष्कराला हवाई दलाचे व रणगाड्यांचे साहाय्य मिळाले होते. सदर्न कमांडचे सरसेनापती लेफ्टनंट जनरल राजेंद्रसिंह हे पुण्याच्या मुख्यालयातून सर्व सूत्रे हलवत होते.

मराठवाड्याला हुतात्म्यांची १८५७ पासूनची परंपरा आहे. नांदेडचे रंगराव पागे नरखेडकर अंदमानच्या तुरुंगात १८६० मध्ये मृत्यू पावले. औरंगाबादचे अनंत कान्हेरे यांना जॅक्सन खुनामध्ये फासावर लटकवले. प्रत्यक्ष मुक्तिसंग्रामात ३०० पेक्षा जास्त हुतात्मे झाल्याची नोंद आहे.

## वंदे मातरम् – विद्यार्थी आंदोलन

हैद्राबाद संस्थानच्या आणि मराठवाड्याच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात वंदे मातरम्-विद्यार्थी आंदोलन हे अत्यंत महत्त्वाचे असे आंदोलन समजले जाते. मातृभाषेला उर्दूच्या तुलनेत दुय्यम स्थान, उस्मानिया विद्यापीठाचा घालावा लागलेला गणवेश व वंदे मातरम् या गीताचे सामूहिक गायनावरील बंदीमुळे विद्यार्थी चिडलेले होते. निजाम सरकारने हे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केले होते.

**भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा कृती कार्यक्रम जोमात सुरू होता, या कार्यक्रमाला पाठिंबा दिलेला निजामाला आवडत नव्हता. स्टेट काँग्रेसवर बंदी घातली गेली, वृत्तपत्रांवर बंदी घातली, अशा बिकट परिस्थितीत शांततेच्या अहिंसक मार्गाने निजामाशी लढता येणार नाही ही बाब सांगण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वर्ध्यात महात्मा गांधींची भेट घेतली. तेव्हा गांधीजींनी स्वामीजींना सल्ला दिला, या परिस्थितीत तुम्ही एकतर भीतीने स्थलांतर करा, शरण जा किंवा जशास तसे उत्तर देऊन बलिदानास तयार राहा.' यानंतर हैद्राबाद स्टेट काँग्रेसने बलिदानाचा मार्ग स्वीकारला.**

त्यामुळे या विद्यार्थ्यांना इतरत्र जावे लागले होते.

रझाकार यांना पुरून उरण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी सशस्त्र कृती केल्याच्या नोंदी आहेत. स्टेट काँग्रेसचे संस्थानात जवळपास ३०० पूर्णवेळ कार्यकर्ते होते. या स्वातंत्र्यसैनिकांना निजाम, रझाकार आणि ब्रिटिश सैनिकांकडून धोका असल्याने स्वातंत्र्यसैनिक सशस्त्र छुप्या कारवाया करण्यास भीत नसत, तरीही चारही बाजूने परिस्थिती बिकट असतानाही स्वातंत्र्यसैनिकांनी कधीही मुस्लिमांवर राग काढल्याच्या घटना झाल्याच्या नोंदी नाहीत. आपला लढा मुस्लीम शासकाविरुद्ध आहे मुस्लिमांविरुद्ध नाही, ही नेतृत्वाची शिकवण त्यांनी आत्मसात केली होती. या मुक्तिसंग्रामात दलित आणि काही स्वातंत्र्यप्रेमी मुस्लीम सहभागी झाल्याच्या नोंदी आहेत. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ज्याप्रमाणे सविनय कायदेभंग सत्याग्रह झाले अगदी त्याच धर्तीवर मराठी भाषा, गणेशोत्सव साहित्य संमेलन, जनता रेडिओ केंद्र, निजाम सरकारने शिंदीची लागवड प्रत्येक शिवारात सक्तीने केली होती त्यापासून तयार होणाऱ्या मद्यातून सरकारला खूप मोठा महसूल मिळे. शिंदी, ताडीमाडीमधून निजामाला उत्पन्न मिळू नये म्हणून जंगल सत्याग्रह झाला होता. त्यात ३५ हजार शेतकऱ्यांचा सहभाग होता, तेव्हा शेकडो शिंदीची झाडे शेतकऱ्यांनी उपटून टाकली होती.

जंगल सत्याग्रह, उमरी बँक लूट, इस्लापूर ठाण्यावरील हल्ला, तुरुंग फोडून पलायन, डोणगाव भामाठान चकमक, बोरीच्या फौजदारावर हल्ला, आजेगावचा संग्राम, बर्दापूर ठाणे काबीज, दुध्यातील रझाकारांचा धुव्वा, श्रीधर वर्तक यांचे बलिदान अशा महत्त्वाच्या घटनासुद्धा सामूहिक कृतीतून केल्या होत्या.

## संघर्षाचे अंतिम पर्व

स्वामी रामानंद तीर्थ आणि पद्मभूषण गोविंदभाई श्रॉफ यांच्या समतोल, वैचारिक, संयमी नेतृत्वामुळेच निजामाच्या जोखडातून ३ राज्यातील १३ जिल्ह्यांचा हा प्रदेश मुक्त झाला आणि देशाच्या स्वातंत्र्यानंतर ११ महिन्यांनी तिरंगा मराठवाड्यात फडकवता

**प्रत्यक्ष लष्करी कारवाई होण्यापूर्वी वर्षभरापूर्वीच मराठवाड्यातील झुंजार स्वातंत्र्यसैनिकांना आपण स्वतःच्या बळावर काही गावे निजामाच्या जोखडातून मुक्त करू शकतो, याचा विश्वास वाटत होता. मुक्त व्हायचे, आपले राज्य घोषित करायचे, मंत्रिमंडळ नेमायचे आणि कारभार सुरू करायचा, यामागे काँग्रेसमधील समाजवादी गट होता. जयप्रकाश नारायण, अरुणा असफअली, अच्युतराव पटवर्धन यांच्या विचारांची प्रेरणा होती. वैजापूर तालुक्यातील १४ गावांनी गोवर्धन जनसुराज्य जाहीर केले. धाराशिव येथे १०० गावांनी मुक्तापूर स्वराज्य स्थापन केले. परभणी १०० खेडी, नांदेड २४, छत्रपती संभाजीनगर १९ खेड्यांनी मुक्त करून घेतले. एकूण २६९ गावे मुक्त झाली.**

आला. भारताच्या उदरस्थानी वांशिक एकाधिकारशाही राष्ट्र निर्माण करण्याचे आणि लोकशाहीविरोधी आखलेले मनसुबे आपल्या हजारो स्वातंत्र्यसैनिकांनी उधळून लावले होते. हैद्राबाद मुक्तिसंग्रामात अनेक प्रसंगी मुस्लीम शासक विरुद्ध हिंदू प्रजा असा संघर्ष झाला. हा लढा धार्मिक विद्वेषी व्हावा, असेही अनेकदा प्रयत्न झाले; पण स्वामी रामानंद तीर्थ आणि गोविंदभाई श्रॉफ हे कट्टर गांधीवादी असल्याने त्यांनी प्रयत्नपूर्वक हा लढा धर्मातीत ठेवला. १७ सप्टेंबर १९४८ ला निजामाने शरणागतीची घोषणा केल्यावर स्वामी रामानंद तीर्थ यांनी रेडिओवरून विशेष संदेश प्रसारित केला. ज्यात त्यांनी म्हटले की, 'सध्याच्या स्थितीत जनतेने शांत व शिस्त पाळणे गरजेचे आहे. हिंद सरकार हे धर्मातीत सरकार आहे व हैद्राबादेत ही धर्मातीत राजवट तयार करण्यात येणार आहे. प्रत्येक नागरिकाला मग त्याची जात, धर्म काहीही असो पुढे येण्यासाठी समान संधी देण्यात येईल. मुस्लिमांनी अजिबात घाबरू नये. त्यांनी आपल्या मनातील शंका आणि भीती काढून टाकावी.

(लेखक हे ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

**त्रैभाषिक हैदराबाद संस्थानाचे वेगळे अस्तित्व ठेवण्याची अत्यंत धर्मांध असलेल्या निजाम कासिम रिझवीची भूमिका होती. या स्थितीत संस्थानी प्रजेने हैद्राबाद प्रांतातील स्वातंत्र्य-लढ्यापासून प्रेरणा घेऊन जो लढा दिला, तो खोलवर रुजलेल्या सरंजामी, प्रतिगामी शक्ती आणि अनियंत्रित सत्ता यांच्या विरुद्धचा लढा होता.**

# झेंडा आंदोलन

**प्रशांत दैठणकर**

कायदेभंग आणि असहकार बहिष्कार आदी माध्यमातून हैद्राबाद संस्थानात उठाव सुरू होता. कायदेभंग चळवळीत या प्रांतातील २७० खेड्यांनी लेव्ही देण्यास नकार दिला, तर ५५० खेड्यांनी कर निर्णय नाकारले. तिसऱ्या टप्प्यात बहिष्कार आणि असहकार आंदोलन मोठ्या प्रमाणावर झाले. यात संस्थानातील विविध शाळा महाविद्यालयात असलेल्या विद्यार्थ्यांनी शाळा-महाविद्यालयांवर बहिष्कार घातला.

निजाम आपल्या सैनिकांच्या बळावर सर्व आंदोलने संपवण्याचा प्रयत्न करत होते, हे लक्षात आल्यावर स्वातंत्र्यसेनानी मोतीलाल मंत्री आणि हिरालाल कोटेचा यांच्या नेतृत्त्वाखाली सशस्त्र उठाव करण्याचा निर्णय झाला. आंदोलनकारी स्वातंत्र्यसैनिकांनी १५२ करोडगिरी नाके बंद पाडले; तसेच ४७ पोलीस ठाण्यांवर आणि ६० रझाकार केंद्रांवर हल्ला केला. याला बीड जिल्ह्याचे 'गांधीयुग' म्हटले जाते.

## आंदोलनाची मुहूर्तमेढ

१९४३ ते मराठवाडा मुक्त होईपर्यंत म्हणजेच १७ सप्टेंबर १९४८ पर्यंतचा हा काळ होता. १९२१ मध्ये गश्ती निशान ५२ रद्द करण्यात आले होते. यानुसार संस्थानातील सर्व हिंदूंचे मूलभूत हक्क नाकारण्यात आले होते. मुस्लिमांच्या सणाप्रसंगी हिंदू सण येत असतील तर ते साजरे करण्यास बंदी घालण्यात आली होती. देशाला स्वातंत्र्य मिळाले असले, तरी निजामाने घेतलेल्या भूमिकेमुळे मराठवाडा तसेच कर्नाटक व तेलंगणाचा काही भाग हे निजामाच्या आधिपत्याखाली होते. मराठवाडा मुक्तीसाठी पुन्हा नव्याने आंदोलनाची मुहूर्तमेढ रोवली गेली. याचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ यांनी केले. हैद्राबाद येथे त्यांनी तिरंगा झेंडा घेऊन सभेचे आयोजन केले, मात्र हा तिरंगा दुसऱ्या देशाचा राष्ट्रध्वज असे निजामाने घोषित करून त्यांना अटक केली. त्यावेळी बीड जिल्ह्यात सर्वत्र झेंडा आंदोलन सुरू झाले. लढा केवळ गांधीवादी मार्गाने न लढता अनेक ठिकाणी सशस्त्र हल्ले; तसेच बँकेमधील निजामाची रक्कम लुटणे आणि सशस्त्र हल्ल्याचे प्रशिक्षण देणारे कॅम्प या मार्गाने हे आंदोलन चार टप्प्यांतून पुढे सरकत होते.



## निर्णायक लढे

बीड जिल्ह्याच्या सरहद्दीवर स्वातंत्र्य सैनिकांनी सशस्त्र केंद्रीय दले उभारली. यात अहमदनगरजवळील पाथर्डी येथे केंद्रप्रमुख काशिनाथराव जाधव होते. येथे ३०० ते ४०० सैनिकसंख्या होती यासोबत बार्शी तालुक्यातील आगळगाव, बीडमधील हातोळण मिरजगाव डोंबरी, डोंगर किनी बालमटाकळी खर्डा, पानगाव, कडा आदी ठिकाणी सुमारे १७०० सैनिक भूमिगत व सशस्त्र सैनिक २३०० असा मोठा लढा उभारला गेला. या सशस्त्र लढवय्या स्वातंत्र्य सैनिकांना मुक्ती सैनिकदेखील म्हटले गेले. रझाकारांची केंद्रे पेटवून देणे, लुटणे, बॉम्ब हल्ले करणे, पोलीस स्टेशन व सरकारी इमारतीत हल्ले घडवणे आदी सशस्त्र लढा ४६ ते ४८ या काळात झाला आणि त्यानंतर पकडल्या गेलेल्या मुक्तिसैनिकांना हरसूल तुरुंगात डांबण्यात आले. त्यावेळी मुक्तिसैनिकांनी तुरुंग फोडून सुटका करून घेण्याचे व आंदोलनाला गती देण्याचे काम केले. याच काळात बीड जिल्ह्यात सैनिकांनी केलेल्या हल्ल्यामध्ये गाजला तो बर्दापूर ठाण्यावरील हल्ला. सोबतच पाथरवाला ॲक्शन आणि इतर विविध लढ्यांची थोडक्यात माहिती देणे अशक्य आहे; परंतु जिल्हाभरात सर्वत्र एकाच उद्देशाने सर्व स्वातंत्र्यासाठी लढत होते. स्टेट काँग्रेसचा ठराव भारत सरकारला प्राप्त झाल्यानंतर भारत सरकारने यात लक्ष घातले.

या सर्व घडामोडींची पूर्ण माहिती प्राप्त झाल्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाने ९ सप्टेंबर १९४७ ला हैद्राबाद संस्थानावर लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. १३ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर १९४८ या कालावधीत त्याला मिलिटरी ॲक्शनऐवजी पोलीस ॲक्शन असे म्हणावे, असा सल्ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला होता.

१३ सप्टेंबर रोजी भारत सरकारने सुरू केलेल्या 'ऑपरेशन पोलो' याचे नेतृत्व मेजर जनरल जे.एन. चौधरी यांनी केले. संस्थानांच्या सरहद्दीला लागून तळ उभारण्यात आले. बीड जिल्ह्यात सरहद्दीवर अहमदनगर सीमेवरून पहिली सशस्त्र तुकडी बीड जिल्ह्यात शिरली. पहाटे चार वाजता ही कारवाई सुरू केली. १४ सप्टेंबरला लष्कराने छत्रपती संभाजीनगर, परभणी जिल्ह्यात प्रवेश केला. लष्कराने छत्रपती संभाजीनगर शहर, शहागडचा पूल ताब्यात घेतला.

## स्वातंत्र्यलढ्याची परिपूर्ती

सर्वात मोठे संस्थान हैद्राबाद, भारतीय संघराज्यात विलीन झाले. १७ सप्टेंबर रोजी भारतीय लष्कर बीडच्या सीमेवरील रणखांब सद्य:स्थित असणाऱ्या चंपावती शाळेचे प्रवेशद्वार येथे पोहोचले. १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या तावडीतून मुक्त झाला. हैद्राबाद मुक्तिसंग्राम यशस्वी करून मराठवाड्यातील जनतेने निजामाच्या अन्यायी राजवटीविरुद्धचा लढा यशस्वी केला. तो दिवस १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन म्हणून साजरा केला जातो.

**जिल्हा माहिती अधिकारी, बीड**

**शैक्षणिक, सामाजिक चळवळींबरोबरच स्वातंत्र्य चळवळीतही छत्रपती संभाजीनगरचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. एकीकडे ब्रिटिश राजवटीतून भारताच्या स्वातंत्र्यासाठी चळवळ सुरू होती, तर मराठवाड्यात निजामी राजवटीतून मुक्ततेसाठी लढा सुरू होता. हाच लढा हैद्राबाद मुक्तिसंग्राम म्हणूनही संबोधला जातो.**

# जाज्वल्य इतिहास

**डॉ. मीरा ढास**

हैद्राबाद मुक्तिसंग्रामचा इतिहास हा जाज्वल्य, स्फूर्तिदायी आहे; पण हा लढा निजाम आणि रझाकारांविरुद्ध असला तरी तो मुस्लीम समाजाविरुद्ध जाऊ न देण्याची पूर्ण खबरदारी शेकडो स्वातंत्र्यसैनिकांनी शेवटपर्यंत घेतली.

## स्वातंत्र्यसैनिकांचे महत्त्वपूर्ण योगदान

**गोविंदभाई श्रॉफ** हे छत्रपती संभाजीनगर येथे शासकीय हायस्कूलमध्ये शिक्षक होते. १९३७ च्या परतूर येथे महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनात त्यांनी सहभाग घेतला. तसेच विद्यार्थ्यांना संघटित करून 'वंदे मातरम्' ही घोषणा दिली. निजाम राजवटीत हा राजद्रोह ठरला. परिणामी गोविंदभाई श्रॉफ यांना निजाम सरकारने अटक केली. गोविंदभाई श्रॉफ हे अखेरपर्यंत मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे अग्रदूत राहिले. त्यांच्या नेतृत्वात संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्हा या लढ्यात सहभागी होता.

**आनंद कृष्ण वाघमारे** यांनी साप्ताहिक 'मराठवाडा'च्या माध्यमातून निजामविरोधी जनमत तयार केले. साहजिकच निजामाने या साप्ताहिकावर बंदी घातली; पण तब्बल ११ वेळा नाव बदलून निरनिराळ्या साप्ताहिकांद्वारे हा जनजागृतीचा वसा त्यांनी कायम ठेवला. मराठवाडा, नागरिक संग्राम, समरभूमी, हैद्राबाद स्वराज्य, मोगलाई, कायदेभंग, कायाकल्प, संजीवनी अशा ११ नावांनी वेळोवेळी वृत्तपत्र चालवून त्यांनी आपला लढा सुरूच ठेवला. त्यांना दीड वर्षांचा तुरुंगवास सोसावा लागला. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजात जागरूकता निर्माण करण्याचे काम आनंद कृष्ण वाघमारे यांच्या 'मराठवाडा' या साप्ताहिकांनी केले.

**अनंत भालेराव -** वैजापूर तालुक्यातील खंडाळा या गावातील अनंत भालेराव यांनी गंगापूर व छत्रपती संभाजीनगर येथे शिक्षण घेतले. १९३८ मध्ये भीमराव सोनदे व रघुनाथ भालेराव यांच्या तुकडीसोबत स्टेट काँग्रेसच्या आदेशाने केलेल्या सत्याग्रहात सहभाग घेतला. तसेच वंदे मातरम् सत्याग्रहात सहभाग घेतला. काही दिवसांतच त्यांना अटक झाली. निजाम सरकारच्या सक्तीच्या लेव्ही वसुलीविरुद्ध आंदोलनात त्यांचा सहभाग होता. नंतर 'मराठवाडा' वृत्तपत्रासाठी संपादक म्हणून भूमिका बजावली. 'मराठवाडा' या वृत्तपत्राच्या माध्यमातून मराठवाडा विकासाची अनेक ध्येयधोरणे निश्चित करण्यात त्यांचा मोलाचा सहभाग राहिला.

**माणिकचंद पहाडे -** डी. एल. पाठक यांच्यासमवेत त्यांनी गिरणी व विडी कामगार संघ स्थापन केला. २० नोव्हेंबर १९३८ला जाधवमंडी छत्रपती संभाजीनगर येथे सत्याग्रह केला. यात त्यांना अटक झाली. पुढे ७ ऑगस्ट १९४७ मध्ये छत्रपती संभाजीनगर शहरातील गुलमंडी येथे जाहीर सभा घेतली. तिरंगा फडकवत त्यांनी भाषण केले. मुक्तिसंग्रामासाठी त्यांनी अखेरपर्यंत लढा दिला.



**भाऊसाहेब मोरे -** कन्नड तालुक्यातील मक्रणपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत १९३८ ला बहुजन समाज सीमा परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्यसंग्रामातील बहुजन समाजाचे महत्त्व भाऊसाहेब मोरे यांच्या सहभागाने अधोरेखित झाले. मक्रणपूर परिषदेतून निजाम राजवट विरोधाचा निनाद झाला. त्यावेळी निजामाविरुद्ध बहुजन ऐक्य झाले. भाऊसाहेब मोरे यांच्यासोबत श्यामराव जाधव, आसाराम डोंगरे, हरिदास सानुले, सावळाराम त्रिभुवन यांच्यासह अनेक सहकाऱ्यांच्या मदतीने निजाम राजवटीविरुद्ध लढा उभारला.

**काशिनाथराव कुलकर्णी** यांनी पैठण तालुक्यातील बोकुड जळगाव येथे वंदे मातरम् चळवळीपासून मराठवाडा स्वातंत्र्य संग्रामास सुरुवात केली. बिडकिन येथे झेंडावंदन आणि सत्याग्रह केला. १९४७ -४८ च्या सशस्त्र स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला. पैठण तालुक्यातील एरंडगाव येथे ते कॅम्पचे प्रमुख झाले. १ जुलै १९४८ रोजी लायक अली पैठणला भेट देणार होते. त्यावेळी पैठणपासून २ मैल असलेला पूल उडवून दिला. रझाकार हादरले व दौरा रद्द केला. पैठण तालुक्यातून निजामाविरुद्ध बंडात काशिनाथराव कुलकर्णी यांनी सक्रिय सहभाग घेतला.

**बाबुराव जाधव** यांनी निजामाविरुद्ध छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आजूबाजूच्या भागात भूमिगत चळवळ सुरू केली. यावेळी पोलीस पाटील, पटवारी यांची दप्तरे जाळण्यात आली. कोलता टाकळी, लाडसावंगी, सावरखेडा येथे रझाकाराविरुद्ध संग्रामात सहभाग घेतला.


**विजयेंद्र काबरा** यांनी वैजापूर तालुक्यात गोवर्धन सराला या खेड्यावर ताबा मिळवून तेथे स्वातंत्र्य समाजवादी जनराज्यची स्थापना केली. निजामी फौजेच्या सैनिकांना दोनदा परतवून लावले. यानंतर १७ सप्टेंबरपर्यंत हे गाव त्यांनी त्यांच्या ताब्यात ठेवले.




अनंत भालेराव




चंद्रगुप्त चौधरी



माणिकचंद पहाडे



विजयेंद्र काबरा



आशाताई वाघमारे



करुणाताई चौधरी



राजकुंवरजी काबरा



चंदाताई जरीवाला

**श्रीधर रंगनाथ कुलकर्णी** यांचा जन्म पडेगाव येथे १९१६ साली झाला. त्यांनी हैद्राबाद मुक्तिसंग्राम व १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात भाग घेतला. त्यांना ५ वर्षांचा तुरुंगवास झाला.

**नागोराव पाठक** यांनी १९३८ च्या सत्याग्रहात सहभाग घेतला. छत्रपती संभाजीनगर येथे संघटनात्मक व भूमिगत कार्य केले. ते खोत, शंकरभाई यांच्या समवेत हर्सुल तुरुंगामधून पळाले व त्यांनी देऊळगावराजा येथील सशस्त्र कॅम्पमध्ये कार्य केले.

यांसह वैद्य तात्यासाहेब महाजन, रघुनाथराव रांजणीकर, चंद्रगुप्त चौधरी, श्रीधर वामन नाईक, श्यामराव बोधनकर अशा अनेक ज्ञात अज्ञात स्वातंत्र्यसेनानींनी मुक्तिसंग्रामात आपले सर्वस्व पणाला लावले.

## महिला स्वातंत्र्यसेनानी

पुरूषांसोबत महिलांचा सहभाग हे मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे वैशिष्ट्य म्हटले पाहिजे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आशाताई वाघमारे, राजकुंवर काबरा, कुसुमताई जोशी, करुणाबेन चौधरी, दगडाबाई शेळके, चंदाताई जरीवाला अशा अनेक ज्ञात-अज्ञात महिलांनी आपले योगदान मुक्तिसंग्रामात दिले.

**आशाताई वाघमारे** यांनी अ.कृ. वाघमारे यांच्याशी विवाह केल्यानंतर महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनात सहभाग घेत छत्रपती संभाजीनगरमध्ये झालेल्या लाठीहल्ल्यातील कार्यकर्त्यांना मदत केली. चळवळीत भाग घेतल्यामुळे त्यांना काही महिने तुरुंगवास झाला.

**विजयेंद्र काबरा यांच्या पत्नी राजकुंवर काबरा** यांनी लढ्यासाठी लागणाऱ्या शस्त्राची जमवाजमव, त्यांची ने-आण इ. कामे केली. अंकाई डोंगरावर हत्यारे चालवण्याचे प्रशिक्षण त्यांना दिले. तसेच लढ्यात सहभागी कार्यकर्त्यांची राहण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली होती. महिलांच्या सशस्त्र लढ्यात त्यांनी सहभाग घेतला. निजामी सत्ता झुगारून लावणारी काही गावे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात होती. यामध्ये वैजापूर तालुक्यातील गोवर्धन सराला नागमठाण, भालगाव यांचाही समावेश होता.

तसेच **कुसुमताई जोशी** यांनी आशाताई वाघमारे यांच्यासोबत भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना आश्रय देणे, त्यांना लपवणे अशी कामे केली. हॅन्डप्रेसवर छपाईचे काम करत पत्रके तयार करून ती पाठवणे अशी कामे या महिलांनी करून चळवळीस पाठबळ दिले.

**करुणाबेन चौधरी** यांनी मुक्तिलढ्याच्या कार्यात स्वत:हून सहभाग घेतला. प्रभात फेरी, शस्त्र मिळवणे, आंदोलन, निषेध, मोर्चे यात करुणाबेन चौधरी यांनी सक्रिय सहभाग घेतला.

**दगडाबाई शेळके** यांनी १९४७-४८ मध्ये सशस्त्र लढ्यात सहभाग घेतला. कोलते

टाकळी ता. भोकरदन (छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पूर्वीचा भाग) येथे त्यांचा जन्म झाला होता. शस्त्रांचे प्रशिक्षण आणि माहिती घेऊन प्रत्यक्ष लढाईत भाग घेतला. लष्करी प्रशिक्षण, सीमा कॅम्पवर रझाकारांना शह दिला. रझाकारांनी जप्त केलेला तिरंगा त्यांच्या केंद्रावर जाऊन परत आणणाऱ्या या धाडसी स्वातंत्र्यसेनानी आहेत. धोपटेश्वर येथे त्यांनी आपली कारकिर्द घालवली.

## प्रेरणादायी स्मृती

छत्रपती संभाजीनगर शहरातील गुलमंडी, जाधवमंडी, क्रांती चौक यांच्यासह कन्नड तालुक्यातील गौताळा, मक्रणपूर तसेच वैजापूर तालुक्यातील सराळा, पैठण तालुक्यातील काही गावांनी मुक्तिसंग्रामात सक्रिय सहभाग घेतला. स्वातंत्र्यसैनिकांच्या या योगदानामुळे जिल्ह्यात मुक्तिसंग्रामाच्या पाऊलखुणा आजही प्रेरणास्रोत ठरल्या आहेत. स्मृती स्मारकाच्या माध्यमातून स्वातंत्र्यसेनानींच्या स्मृती जागृत ठेवल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये मध्यवर्ती ठिकाणी सिद्धार्थ उद्यानात महानगर पालिकेच्यावतीने तयार केलेले वस्तुसंग्रहालय, मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांचे जीवनकार्य, त्यांचा लढा या संबंधित घटनाक्रम चित्रस्वरूपात साकारण्यात आला आहे. मराठवाड्यातील स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान, त्याग बलिदान यांच्या प्रेरणादायी स्मृती त्यात जपण्यात आल्या असून, पुढच्या पिढ्यांसाठी हा अमूल्य ठेवा जपण्यात आला आहे.

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्था

छत्रपती संभाजीनगर शहरातील औरंगपुरा भागात स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामाशी संबंधित सर्व दस्तऐवज, संदर्भ ग्रंथ, छायाचित्रे, प्रकाशने आदींची जपणूक या संस्थेत करण्यात आली आहे. 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्था' ही एक स्वयंसेवी संस्था असून सामजिक, आर्थिक क्षेत्रातील संशोधन कार्य आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी कार्य करत आहे. मुक्तिसंग्रामाच्या काळातील ऐतिहासिक दस्तऐवजांचे जतन, संवर्धन येथे करण्यात आले आहे. हेच दस्तऐवज अनेक संशोधक-अभ्यासकांसाठी संदर्भ साहित्य म्हणून उपलब्धही करून दिले जाते. त्यासाठी येथे परिपूर्ण संदर्भ ग्रंथालय निर्माण करण्यात आले आहे. स्वतंत्र अभ्यास कक्षांची निर्मिती करून अभ्यास - संशोधन सुविधा आहे. १० हजारांहून अधिक संदर्भग्रंथ पुस्तक आणि नियतकालिके या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची मान्यताप्राप्त संशोधन संस्था म्हणून संस्थेने अनेक वर्ष काम केले. आजही पीएच.डी. अभ्यास संदर्भ यासाठी अनेक विद्यार्थी नियमित या ग्रंथालयाचा लाभ घेतात.

## मुक्तिसंग्रामातील हुतात्मा स्मारके

- **काशिनाथ म्हतारबा मस्के,** हातमाळी ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांचे लाडसावंगी ता.जि. छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक.
- **सांडुजी सखाराम वाघ** (न्हावी) बोरगाव अर्ज ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर.
- **जयाजी बंडू साळुंके, श्रीपात भिवराजी साळुंके, सांडू म्हतारजी साळुंके, तात्याबा म्हतारजी साळुंके.** धानोरा ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर, जरंडी ता. सोयगाव येथे विश्वनाथ कालीदास राजहंस यांचे स्मारक.
- **हिरालाल कालुराम जैस्वाल, तुळशीराम हिरालाल जैस्वाल, दगडु बाळा बलांडे, सांडू बाळा बलांडे, तुकाराम शहाजी वाघ, नामदेव शहाजी वाघ, गोविंदा आनंदा साबळे.** फर्दापूर ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर.
- **भाऊराव तात्याराव कानडे,** दांगटपुरी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर.
- **जगजीवनराम, जगन्नाथ सखाराम भालेराव, गंगाधर तुकाराम** जातेगाव ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर.
- **जगन्नाथ सखाराम भालेराव,** वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर यांच्यासह छत्रपती संभाजीनगर शहरात दोन प्रमुख ऐतिहासिक स्मारके आहेत. यात महानगरपालिकेच्या सिद्धार्थ उद्यानात एक आहे; तसेच दुसरे क्रांती चौक शहराच्या मध्यभागी एक हुतात्मा स्मारक उभारले आहे. याबरोबर सिद्धार्थ उद्यानातच मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास, स्वातंत्र्यसेनानी यांचे संग्रहालय आहे.

## चित्रस्मृतींची जपणूक

डॉ. मंगला बोरकर यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक आणि हुतात्मे यांच्या चित्रांच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत त्यांच्या कार्याची ओळख पोहोचवली आहे. डॉ. बोरकर यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामात सहभागी झालेल्या स्वातंत्र्यसैनिक हुतात्मे यांचे एकूण १३६ चित्रे साकारली आहेत. दरवर्षी १७ सप्टेंबरला चित्रप्रदर्शनातून त्या हा इतिहास सादर करत असतात. त्यांनी पुस्तकदेखील प्रकाशित केले आहे, यासाठी त्यांनी २००५ पूर्वी त्यावेळी हयात असलेल्या स्वातंत्र्यसेनानींच्या प्रत्यक्ष भेटी घेतल्या व त्यांच्याकडील जुने संदर्भ व छायाचित्रे मिळवली. यामध्ये प्रामुख्याने दैनिक लोकमतचे ग्रंथालय, बलवंत वाचनालय व सरस्वती भुवन संस्था. स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था यांचेही संदर्भ व त्याचा वापर केला आहे. छायाचित्रावरून चित्र तयार करण्याची कला त्यांना अवगत असल्याने मराठवाडा मुक्तिसंग्रामातील सेनानी त्यांनी भावी पिढीपर्यंत पोहोचवले आहे. त्यांचा हा उपक्रम म्हणजे स्वातंत्र्यसेनानी आणि हुतात्म्यांची चित्र स्वरूपातील आदरांजलीच असे म्हणता येईल.

## संदर्भ सूची


१) **दिवस संघर्षाचे –** विजयेंद्र काबरा प्रथमावृत्ती २००२ डॉ. निर्मल सारडा, ग्रंथविशेष प्रतिष्ठान.

२) **बखर अनामिकाची –** डॉ. शिवाजी गडळकर. राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे, प्रथम आवृत्ती २०२२

३) **हैद्राबाद मुक्तिसंग्राम –** स्वातंत्र्यसैनिकांच्या मौखिक नोंदी– संपादक डॉ. प्रभाकर देव. प्रकाशक–कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड प्रथम आवृत्ती–१४ नोव्हेंबर १९९९

४) **हैद्राबाद मुक्तिसंग्राम –** मराठवाड्यातील क्रांतिकारक महिला डॉ. रश्मी बोरीक. प्रकाशक – सचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा इन्स्टिट्युट छत्रपती संभाजीनगर प्रथमआवृत्ती २०२३

५) **हैद्राबादचा स्वातंत्र्यलढा, मराठवाड्याची मुक्तीगाथा,** प्रकाशक – विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर १७ सप्टेंबर २०२२.



**माहिती अधिकारी, छत्रपती संभाजीनगर.**

**संपूर्ण मराठवाड्यातील तत्कालीन पाच जिल्हे आणि कर्नाटक राज्यातील काही जिल्हे मिळून निजाम उल्क मुल्क यांनी स्थापन केलेले हैद्राबाद संस्थान सध्याचे तेलंगणा राज्य होते. एकूण सात निजामांनी राज्य केले. त्या काळात लातूरचा भाग धाराशिव जिल्ह्यात येत होता. निजामापासून मुक्त होण्यासाठी इथल्याही लोकांनी मोठा संघर्ष केला आहे. त्यासंदर्भातील घटनांचा आढावा या लेखात घेतला आहे.**

# मुक्तिलढ्यात जनता सहभागी

**युवराज पाटील**

हैद्राबाद संस्थानांमध्ये सांस्कृतिक, साहित्यिक संस्थांच्या उभारणीनंतर राजकीय जागृतीला जोर आला. हैद्राबाद संस्थांनामध्ये राजकीय जागृतीच्या जडणघडणीत महाराष्ट्र परिषदेने महत्त्वपूर्ण वाटा उचलला. संस्थानात जबाबदार राज्य पद्धतीचा पुरस्कार याच मंचावरून करण्यात आला. महाराष्ट्र परिषदेसह इतर परिषदांनी जनतेत जागृती घडवून आणण्याच्या दृष्टीने पुढील दशकभर मोलाचे कार्य केले.

परतूर येथे १९३८ साली स्वातंत्र्याची आस असणाऱ्या लोकांचे संमेलन भरले. लातूरला १९३८ मध्ये परिषदेचे दुसरे अधिवेशन झाले. या अधिवेशनातच राजकीय संघटना स्थापनेबाबतच्या आपल्या अधिकारासाठी लढा उभारण्याचे ठरले. या परिषदेचे अध्यक्ष श्रीनिवासराव शर्मा होते, तर स्वागताध्यक्षपदी भास्करराव वकील नळदुर्गकर होते. या अधिवेशनाचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ यांनी केले होते. सर्वांच्या आग्रहाखातर स्वामीजींनी १९३८ मध्ये हैद्राबाद मुक्तिलढा लढायचे ठरवले. यामुळे या अधिवेशनाला ऐतिहासिक महत्त्व आहे. याच अधिवेशन काळात महिलांसाठी महिला परिषद लातूरमध्ये झाली होती. या परिषदेच्या अध्यक्षा काशिबाई किर्लोस्कर, तर स्वागताध्यक्षा सुशीलाबाई दिवाण होत्या. या परिषदेनंतर महिलांचाही सहभाग तितकाच उल्लेखनीय होता.

या अधिवेशनामुळे मराठवाड्यात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात जागृती घडून आली. मराठवाड्यातील जनतेला संघटित करण्याचे पायाभूत कार्य महाराष्ट्र परिषदेने यशस्वीरीत्या पूर्णत्वास नेले. महाराष्ट्र परिषदेच्या सहा अधिवेशनांनी परिषदेच्या कार्याचा वेग वाढवला. तसेच राष्ट्रीय विचारांचे वातावरण सर्वत्र निर्माण केले. बहुतेक अध्यक्षांनी शेती, शेतकऱ्यांचे, विणकरांचे जिव्हाळ्याने प्रश्न मांडले. शेतसारा, लेव्हीचा प्रश्न व सावकारशाहीच्या अन्यायी स्वरूपाचे प्रश्नही चव्हाट्यावर आणले. खादी ग्रामोद्योग व स्वदेशीचा पुरस्कार करण्यात आला. बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीच्या दृष्टीने महाराष्ट्र परिषदेने आग्रह धरला. शिक्षण प्रसार, अस्पृश्यता निवारण, प्रौढ शिक्षण, मंदिर प्रवेश, ग्रामोद्योग इत्यादींवर भर देण्यात आला.



## स्टेट काँग्रेसची स्थापना

हैद्राबाद संस्थानात २९ जून १९३८ रोजी स्टेट काँग्रेसची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रारंभापासूनच निजाम सरकारच्या मनात स्टेट काँग्रेसमधील काँग्रेस हा शब्द खटकत होता. स्टेट काँग्रेस संस्थांच्या बाहेरील लोकांशी संलग्न आहे, असे निजामाला वाटत होते. तसेच स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ इत्यादींना निजामशाही शत्रू मानत असे. स्टेट काँगेस ही संघटना घातपाती स्वरूपाची व जातीय विचारसरणीचे कार्य करणारी विध्वंसक संघटना आहे, असे सरकारचे स्पष्ट मत होते. म्हणून निजाम सरकारने स्टेट काँग्रेसवर ७ सप्टेंबर १९३८ रोजी बंदी घातली. या पार्श्वभूमीवर स्टेट काँग्रेसच्या लोकांना कायदेभंगाच्या चळवळीशिवाय अन्य मार्ग उरला नाही. हैद्राबाद स्टेट काँग्रेसने आपला लढा नागरी हक्कांसाठी आहे, असे स्पष्टपणे सांगितले. संपूर्ण संस्थानातून तरुण कार्यकर्ते सत्याग्रह करण्यासाठी तयार झाले. स्टेट काँग्रेसने शांततामय व सनदशीर मार्गाने लढा चालवला. या सत्याग्रहात एकूण १८ तुकड्या तुरुंगात गेल्या. स्टेट काँग्रेसने या संघटनेचे १,२०० सभासद नोंदवले. सन १९३८ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांनी सत्याग्रह केला. त्यामुळे त्यांच्यावर खटला





भरण्यात आला. स्वामीजींना दीड वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली.

सन १९३८ च्या अखेरीस हैद्राबाद संस्थानामधील परिस्थिती क्रमशः बदलत होती. तिन्ही भाषिक प्रदेशात आपापल्या संघटना स्थापन करून लोकजागृतीचे प्रयत्न सुरू झाले. निजाम सरकारने महाराष्ट्र परिषदेस जातीय ठरवले. हैद्राबाद संस्थानात बाहेरून येणाऱ्या २१ वृत्तपत्रांवर बंदी घालण्यात आली. स्वामी रामानंद तीर्थ हे सन १९३८ मध्ये अंबेजोगाई सोडून महाराष्ट्र परिषदेची संघटना बळकट करण्याच्या दृष्टीने हैद्राबाद येथे वास्तव्यासाठी गेले. राजकीय परिस्थिती खूप झपाट्याने बदलत होती. जनतेच्या मूलभूत हक्कांसाठी एखादी सर्वसमावेशक राजकीय संघटना निर्माण करण्याची गरज वाटू लागली.

## ‘चले जाव’ चळवळ

भारतीय स्वातंत्र्यलढ्याला धार आली ती ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत काँग्रेसच्या अखिल भारतीय अधिवेशनात ‘भारत छोडो’ ठराव मंजूर झाल्याने. ब्रिटिशांनी हिंदुस्थान सोडून जावे, या मागणीसाठी ९ ऑगस्ट १९४२ पासून ‘चलो जाव’चा नारा देऊन चळवळ सुरू झाली. ब्रिटिश सरकारने महात्मा गांधींसह काँग्रेसच्या इतर मोठ्या नेत्यांना अटक करून चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या अटकेनंतर अरुणा असफअली यांनी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे नेतृत्त्व केले. याचे पडसाद देशभर उमटले. हैद्राबाद संस्थानाचा भाग असलेल्या मराठवाड्यातही या आंदोलनाचे प्रतिध्वनी उमटले.

## राजकीय जनजागृती चळवळ

लातूर जिल्ह्यातील राजकीय जागृतीसाठी डॉ. निलकंठराव कुलकर्णी, चंद्रशेखर बाजपेयी, राघवेंद्रराव दिवाण (जिल्हा संघटक, लातूर), बाबुराव कानडे, श्रीनिवासराव अहंकारी, शेषराव वाघमारे (निलंगा), निवृत्ती रेड्डी, माणिकराव पागे (अहमदपूर), देवीसिंग चौहान (धोंडूसिंग नागरसोगेकर किंवा गुरुजी), व्यासाचार्य संधीकर (औसा), माधवराव धोणसीकर (उदगीर), किशनराव वकील, कालिदासराव देशपांडे, फुलचंद गांधी, दासराव बोकील, कॅप्टन व्यं. बा. जोशी (जिल्हा संघटक), नारायणराव चाकूरकर (औसा), विश्वंभरराव हराळकर आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी कार्य केलेले आहे. सर्वांचा नामोल्लेख करणे शक्य नसले तरी त्यांचा मुक्तिलढ्यातील सहभाग मोलाचा होता.

मराठवाड्यातील लातूरमध्ये १९४२ च्या ‘चले जाव’ आंदोलनात राघवेंद्र दिवाण, मदनलाल जोशी, चंद्रशेखर बाजपेयी, शंकरराव अस्तुर, लक्ष्मणराव बिदरकर आदी सहभागी होते. दिनांक १८ सप्टेंबर १९४२ रोजी धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अमीर अलीखान यांनी निजाम सरकारकडे गुप्त अहवाल पाठवला होता. त्यात लातूर हायस्कूलमधील दोन विद्यार्थ्यांनी सत्याग्रह केल्याची माहिती असून मुख्याध्यापक श्री. अय्यर हे काँग्रेस विचारसरणीचा प्रसार करतात म्हणून त्यांची त्वरित बदली करण्यात यावी, असे सुचवले होते.


बाबासाहेब परांजपे, किसन सदाशिव यांच्याबरोबर अनंतराव गजमुखी, राघवेंद्रराव दिवाण (यांनी वकिली सोडून चळवळीत भाग घेतला.), अब्दुल रझाक दिंडार,


अब्दुल हमीद यांसारख्या अनेकांचा सत्याग्रहात सहभाग होता. या चळवळीमध्ये मराठवाड्यातील जवळपास ४०० सत्याग्रहींना अटक झाल्याचे दिसते. यात जबाबदार राज्यपद्धतीला मान्यता देणे, राजबंदींना मुक्त करणे, हैद्राबाद स्वतंत्र करणे व येथून रेसिडेन्टला परत पाठवणे, नागरी स्वातंत्र्य देऊन हैद्राबाद स्टेट काँग्रेसची बंदी उठवणे यांसारख्या मागण्या केल्या गेल्या. उमरगा परिसरामध्ये १९४२ च्या आंदोलनामध्ये अनेकांनी सहभाग घेतला. त्यात देवीसिंग चौहान, श्रीनिवास अहंकारी, शंभुगिरी महाराज यांचे कार्य उल्लेखनीय होते. याचा जनमनावर मोठा परिणाम झाला. प्रखर लढा देणारे लातूरचे देशबंधू, पं. वीरभद्र आर्य आडप्पा (देवदत्त) आणि व्यंकोबा माळवदकर या तिघांना १४ फेब्रुवारी १९४२ रोजी गुलबर्गा सुभा कोर्टात रझाकार नेता कासिम रझवी याच्या समक्ष सात वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा दिली गेली. अन्य सहकाऱ्यांनासुद्धा कमीअधिक दंड झाला. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याची तीव्रता १९४२च्या आंदोलनाने वाढली आणि निजामाच्या राजवटीतून मुक्त होण्याच्या लढ्याला सुरुवात झाली. त्यामुळे ९ ऑगस्ट १९४२ चा क्रांतिदिन लातूर भागातील भूमीला प्रेरणा देणारा ठरला. त्यातून हैद्राबादच्या निजामशाहीतून मुक्त होण्याचा लढा तीव्र होत गेला.

## किसान दलाचे योगदान

या लढ्यात शेतकऱ्यांनीही आपली किसान दल संघटना स्थापन करून लढा दिला. २७ ऑक्टोबर १९४७ ला उद्‌गीर तालुक्यातील देवर्जन जवळ असलेल्या हत्तीबेटावर किसान दल आणि निजाम पोलिसांमध्ये चकमक झाली. यामध्ये किसान दलाने निजाम पोलिसांचा पराभव केला.

अनंत राजाराम जैन, गुरुसंग व काशिनाथ भोई यांनी रेल्वे व टेलिफोन व्यवस्थेच्या विरोधात मोडतोडीचे काम केले. त्यांना अटक होऊन १० महिन्यांची शिक्षा झाली व इंदूरच्या तुरुंगात पाठवण्यात आले. पोलीस कारवाईनंतर त्यांची सुटका झाली. निजामाविरुद्ध सुरू असलेल्या आंदोलनाचा एक भाग म्हणून २ सप्टेंबर १९४७ रोजी लातूरच्या गंजगोलाईतील टॉवरवर फडकत असलेला आसफ अलीचा आसफजाही झेंडा काढून तेथे तिरंगा झेंडा फडकवण्यात आला.





या कामी दाखवलेल्या साहसामध्ये शंकरराव अस्तुरे, विश्वनाथ आप्पा कापसे, रघुवीर शिंदे, मदनलाल जोशी, भीमराव वाबळे, श्यामराव किल्लारीकर यांचा सहभाग होता. पुढे त्यातील तिघांचा शोध घेऊन निजामांनी सक्तमजुरीची शिक्षा दिली.

लातूर जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिकांनी निजामच्या जुलमी रझाकारांविरुद्ध लढाया केल्या. त्याठिकाणी स्मारक उभे करण्याचा संकल्प जिल्हा प्रशासनाने केला आहे. जेणेकरून या लढाईत हौतात्म्य पत्करलेल्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली जाईल. या चळवळीत ज्या ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी महान कार्य केले, त्यांना वंदन...!!

जिल्हा माहिती अधिकारी, लातूर

**निजामी सरंजामी सत्ता झुगारून लावण्यासाठी अन्याय, अत्याचारातून सुटका करून घेण्यासाठी मराठवाड्यातील जनतेने स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वात सन १९३६ ते १९४८ या कालावधीत जो उत्स्फूर्त लढा दिला, त्यालाच हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा लढा म्हणून ओळखले जाते.**

# पाऊलखुणा...

**अरुण सूर्यवंशी**

मीर उस्मान अली हा हैद्राबाद संस्थानाचा शासक होता. तत्कालीन हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा, तेलंगणा आणि कर्नाटक भागातील जनता इंग्रज आणि निजाम अशा दुहेरी गुलामगिरीत जखडलेली होती. निजाम हा अतिशय जातीयवादी अत्याचार करणारा शासक होता. त्यांने संस्थानातील जनतेला कोणतेच हक्क दिले नव्हते. शिक्षणांची सोय नव्हती. स्त्रियांना तर मुळीच शिक्षण दिले जात नव्हते अन् अशा परिस्थितीत या संस्थानात मुक्तिसंग्रामाची चळवळ करणे हे अतिशय कठीण काम होते.

## ‘चले जाव’ आंदोलन

दुसऱ्या महायुद्धात काँग्रेसच्या या चळवळीने अधिकच जोर धरला होता. महात्मा गांधींनी ब्रिटिशांना ‘चले जाव’ असा इशारा दिला होता. १९४२ मध्ये स्वातंत्र्याचे प्रचंड आंदोलन भारतात झाले, तसे हैद्राबादेत ‘छोडो हैद्राबाद’च्या घोषणाही देण्यात आल्या होत्या. याचा अर्थ ब्रिटिशांनी भारत सोडावा व भारताला स्वातंत्र्य द्यावे, त्याप्रमाणे हैद्राबाद सोडावे व निजामाच्या या राज्यालाही स्वातंत्र्य द्यावे. म्हणजेच हैद्राबाद आझाद करावे, अशी भूमिका होती.

## सशस्त्र लढा

हैद्राबाद संस्थान स्वतंत्र भारतात सामील करून घेण्यासाठी मोठी चळवळ उभी करण्यात आली होती. निजामाच्या क्रूर राजवटीतील कासीम रझवीने स्थापन केलेल्या रझाकार संघटनेने ही चळवळ दडपून टाकण्यासाठी हिंसक मार्गाचाही मोठ्या प्रमाणात वापर केला होता. तेव्हा त्यास उत्तर देण्यासाठी सशस्त्र लढा उभारण्यात आला. भारताचा स्वातंत्र्यलढा अहिंसात्मक होता; परंतु मराठवाडा मुक्तिसंग्राम मात्र सशस्त्र लढा होता. निजामांच्या या अत्याचारातून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैद्राबाद संस्थानात मुक्तिसंग्राम सुरू झाला होता.

९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे अखिल भारतीय काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेशन झाले होते. याच अधिवेशनात महात्मा गांधी यांनी इंग्रजांना ‘भारत छोडो’ असे निक्षून सांगितले होते. या अधिवेशनाला स्वामी रामानंद तीर्थ आणि मराठवाड्यातील अनेक कार्यकर्ते गेले होते. परभणी जिल्ह्यातून श्रीरामजी भांगडिया, विनायकराव चारठाणकर, अनंत भालेराव, सदाशिव चौधरी आदी कार्यकर्ते या अधिवेशनास उपस्थित होते. या अधिवेशनाहून स्वामी रामानंद तीर्थ हैद्राबादमध्ये गाडीतून उतरताच त्यांना अटक करण्यात आली. स्वामीजींच्या अटकेच्या निषेधार्थ निदर्शने, सत्याग्रह करत मिरवणुका काढण्यात आल्या. परभणी जिल्ह्यातील अनेक तरुणांनी या सत्याग्रहात भाग घेतला होता. श्रीरामजी भांगडिया, विनायकराव चारठाणकर यांच्या नेतृत्त्वातील तुकड्यांनी सत्याग्रहात भाग घेतला. नंतर अनेक तुकड्यांनी सेलू केंद्रातून सत्याग्रह केला होता. या सत्याग्रहापासूनच मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या लढ्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली होती.

## रझाकार कालखंड

महाराष्ट्र परिषदेची स्थापना झाली त्यानंतर एका वर्षाने हैद्राबादमध्ये हैद्राबाद स्टेट काँग्रेसची स्थापना करण्यात आली हैद्राबाद संस्थानातील जनता अजूनही स्वातंत्र्याच्या प्रतीक्षेतच होती. निजामाने स्वत:ची सार्वभौम राजा म्हणून घोषणा करत भारत आणि पाकिस्तानात सामील व्हायचे नाही अशी घोषणा केली. हैद्राबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी निजाम सरकारकडून उठवण्यात आली होती; परंतु सातव्या निजामास सुरुवातीपासूनच जनतेचा विरोध होता. विरोध असण्याचे कारण म्हणजे सातवा निजाम हा अन्याय आणि अत्याचार करणारा शासक होता. त्यामुळेच त्याच्या



काळात त्याच्या मान्यतेने हैद्राबाद संस्थानात 'रझाकार' चळवळ मोठ्या प्रमाणात झाली होती. त्यामुळे सामान्य जनतेची लूटमार करून त्यांच्यावर अनेक अन्याय, अत्याचार रझाकारांनी केले होते. सन १९४५ ते १९४८ हा कालखंड मराठवाड्यामध्ये रझाकार कालखंड म्हणून ओळखला जातो. सर्वत्र हैद्राबाद संस्थानांमध्ये रझाकाराच्या सैन्याने थैमान घातले होते. रझाकार संघटनेचा प्रमुख कासिम रिझवी याने सर्वत्र उच्छाद मांडून जनतेचे जगणे मुश्कील केले होते. तसेच निजाम शासनाच्या अन्यायी लेव्ही वसुलीमुळे शेतकरीवर्ग त्रस्त झाला होता.

### करा किंवा मरा

रझाकार संघटनेपासून जनतेचे संरक्षण करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांनी आपल्या विचारांची धार अधिक करारी करत सरकारवर टीका केली होती. जनतेच्या मनामध्ये सरकारला विरोध म्हणून 'करा किंवा मरा' अशी भावना निर्माण झाली होती. यामुळे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वात मराठवाड्याच्या स्वातंत्र्यासाठी आणि हैद्राबाद संस्थान भारतात विलीन व्हावे म्हणून सर्वस्व पणाला लावून निजामी सत्तेविरुद्ध लढा देण्याचे आवाहन दिले. हा लढा फार मोठ्या प्रमाणात लढला गेला. तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटक या भागातील जनतेने एकजुटीने निजामशाही नष्ट करण्यासाठी लढ्यात सहभाग घेतला होता. याकरिता या भागातील जनतेने असहकार, सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, शेतसारा भरू नका इत्यादी चळवळी सुरू केल्या होत्या. विद्यार्थ्यांनी शाळा-महाविद्यालये बंद पाडली, तर लोकांनी कोर्ट कचेऱ्यांवर बहिष्कार टाकला. ही चळवळ दडपण्यासाठी निजामाने जनतेवर अनेक प्रकारे अत्याचार केले.

निजामाच्या अन्यायी राजवटीविरुद्ध प्रत्यक्ष संघर्षाची सुरुवात परभणी जिल्ह्यातील परतूर (आताचा जालना जिल्हा) महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनापासून झाली झाली. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष गोविंदराव नानल हे होते. याच अधिवेशनात मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या स्वातंत्र्यलढ्यास खरी सुरुवात झाली. हीच चळवळ नंतर संपूर्ण मराठवाड्यात आणि हैद्राबाद संस्थानात पसरली. निजामी सत्तेविरुद्ध लढा देण्यासाठी परभणी जिल्ह्यातील गोविंदराव नानल, मुकुंदराव पेडगावकर, विनायकराव चारठाणकर, श्रीनिवासराव बोरीकर आदी नेत्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. लढ्यात संघटना बांधण्यासाठी जनतेमध्ये वेळोवेळी जनजागृती निर्माण करण्याचे कार्य परभणी जिल्ह्यात संघटकांनी केले होते.

### ग्रंथालय चळवळ

मराठवाड्यातील सर्वात जुने व पहिले वाचनालय 'गणेश वाचनालय' परभणी येथे १९०१ मध्ये स्थापन झाले. त्यानंतर हिंगोली, कळमनुरी, वसमत, चारठाणा, परतूर, औंढा, सेलू, मानवत आदी ठिकाणी वाचनालये सुरू झाली. ग्रंथालयांच्या माध्यमातून विचारांचे आदान-प्रदान करत लोकजागृती करण्यात येत होती. जिल्ह्यातील तरुणांना व्यायामाचा प्रसार, प्रचार व शिक्षण यासाठी रंगनाथराव लाखकर यांनी खूप कष्ट घेतले. निजाम सरकारने पूर्वीच्या सर्व खासगी शाळा रद्द केल्या व नवा कायदा केला. शाळा काढण्याची परवानगी देण्याचे अधिकार स्वत:कडे म्हणजे मंत्रिमंडळाकडे ठेवले. उर्दूखेरीज इतर माध्यमांच्या शाळांना परवानगी द्यावयाची नाही; तसेच सरकारी अभ्यासक्रमाखेरीज इतर अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शाळा चालू द्यावयाच्या नाहीत आणि त्या शाळांतील विद्यार्थ्यांना संस्थानात परीक्षेस बसू द्यावयाचे नाही. इतकेच नाही तर त्यांना बाहेरही जाऊ द्यायचे नाही, असे निजाम सरकारचे धोरण होते. १९१६ मध्ये गोविंदराव नानल, केशवराव पत्की, रामचंद्रराव सरदेशपांडे, किशनराव उम्रीकर, नारायणराव कावळे आदी मंडळीनी परभणी येथे 'नूतन प्राथमिक विद्यालय' या नावाने खासगी शाळेची स्थापना केली.

### नूतन विद्यालय

१९३९ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांनी सेलू येथे 'नूतन विद्यालय' या नावाने राष्ट्रीय

### जनजागृतीच्या चळवळी

निजामी राजवटीविरुद्ध असंतोषाला योग्य नेतृत्त्व देण्यात परभणी जिल्ह्याचा मोठा वाटा आहे. न्यायमूर्ती केशवराव कोरटकर व वामनराव नाईक हे मुक्तिलढ्यातील अग्रगण्य पुढारी मानले जातात. त्यांनी अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी जिल्ह्यात व्यापक जनजागृतीच्या विविध चळवळी सुरू केल्या. व्यापक राजकीय चळवळ सुरू होण्यापूर्वी परभणीतील जनतेला प्रथम धार्मिक व शैक्षणिक आघाडीवर लढावे लागले. जनतेमध्ये वैचारिक जागृती होऊ नये म्हणून निजाम सरकार शिक्षणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत होते. त्यावेळी परभणी जिल्ह्याच्या ठिकाणी उर्दू माध्यमाचे हायस्कूल होते. न्यायमूर्ती केशवराव कोरटकर व वामनराव नाईक यांनी सोशल सर्व्हिस लीगतर्फे लोक जागृतीसाठी सामाजिक परिषद घेण्याचे ठरवले. सन १९१८, १९१९, १९२० सलग तीन वर्ष परिषदांची अधिवेशने नांदेड जिल्ह्यात झाली. १९२१ मध्ये हैद्राबाद येथे झाले. पाचवे अधिवेशन गुलबर्गा येथे झाले, तर सहावे अधिवेशन परत हैद्राबाद येथे झाले. या सामाजिक परिषदांमध्ये प्राथमिक शिक्षण, स्त्री-शिक्षण, अस्पृश्यता निवारण यासंबंधी ठराव मंजूर करण्यात आले. याचा परिणाम म्हणून राज्यात अनेक शाळा, वाचनालये आणि वसतिगृहे स्थापन झाली. सामाजिक परिषदेप्रमाणे शिक्षण क्षेत्रातही हैद्राबाद शैक्षणिक परिषद स्थापन करण्यात आली. या परिषदेची सहा अधिवेशने झाली. या परिषदेच्या व्यासपीठावरून उर्दू भाषेच्या सक्तीला विरोध होऊ लागला. माध्यमिक शिक्षण मातृभाषेतून, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत आणि धार्मिक शिक्षण मुसलमानांप्रमाणे हिंदूंनाही देण्यात यावे असे ठराव घेण्यात आले. त्यामुळे निजाम सरकारने या परिषदेस सरकारी स्वरूप देऊन शिक्षण परिषद आपल्या ताब्यात घेतली. त्यामुळे हिंदू समाजातील लोक या परिषदेतून बाहेर पडले. त्यानंतर केशवराव कोरटकरांच्या अध्यक्षेत हैद्राबाद जनता शिक्षण परिषदेची स्थापना करण्यात आली. शिक्षण क्षेत्रात निजाम सरकारने लादलेल्या बंधनांविरुद्ध लोकमत संघटित करण्यासाठी या परिषदेची अधिवेशने घेण्यात आली.

शाळा स्थापन केली. या शाळेचे संस्थापक विनायकराव चारठाणकर, अनंतराव भालेराव, मनोहरराव सोनदे, गरुड गुरुजी, लक्ष्मणराव कुळकर्णी आदी होते. ही संस्था एक ज्वलंत राष्ट्रीय संस्था म्हणून नावारूपास आली. हैद्राबाद मुक्तिसंग्रामात या संस्थेतील कार्यकर्ते, शिक्षक व विद्यार्थी यांनी भाग घेतला होता. हैद्राबाद मुक्तिसंग्रामात या दोन्ही शाळांचे फार मोठे योगदान होते.

## महिला संमेलन

मराठवाड्यातील महिलांनीदेखील हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील लढ्यात पुरुषांच्या बरोबरीने सक्रिय सहभाग घेतला होता. सेलू येथे महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन झाल्यानंतर महिला परिषदेचेदेखील आयोजन केले होते. परिषद यशस्वी करण्यासाठी गीताबाई चारठाणकर, शांता पेडगावकर यांसारख्या महिलांबरोबर इतर महिलादेखील सहभागी झाल्या होत्या. आणि या परिषदेतच 'महिला संमेलन' संघटना स्थापन करण्यात आली होती. निजामी राजवटीतून मुक्त होण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घ्यावे, असे अनेक महिलांचे एकमत झाले होते. लातूर येथे १९३८ मध्ये महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन झाले. त्यात शांताबाई चारठाणकर, शांता पेडगावकर, सौ. मानवतकर, सौ. बीडकर आदी महिला परिषदेत सहभागी झाल्या होत्या. महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देत मुक्तिसंग्रामात महिलांची राजकीय भूमिका मांडली होती. तसेच नांदेड येथे सन १९४४ मध्ये महिलांच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यातही परभणी जिल्ह्यातील महिला सहभागी झाल्या होत्या. दुसरे महिला शिबिर परभणी येथे सन १९४५-४६ मध्ये घेण्यात आले होते. त्यासाठी गीताबाई चारठाणकर, शांताबाई पेडगावकर, सुशीलाबाई भालेराव, सरस्वतीबाई बोरीकर यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी उल्लेखनीय कामगिरी केली होती. हिंगोली येथील सौ. देशपांडे, शैलजाबाई गोंगटे, सौ. टाकळकर, अनसूयाबाई खोडवे या चळवळीत सहभागी होत्या. सत्याग्रहासाठी हैद्राबादला महिलांच्या चार तुकड्या पाठवण्यात आल्या होत्या. यात सीताबाई नांदापूरकर, विमलताई मेलकोटे, उषा पांगरीकर आदी महिलांनी सत्याग्रहासाठी सहभाग घेतला होता. निजामी पोलिसांच्या व रझाकारांच्या अत्याचाराचा निषेध करण्यासाठी मे १९४८ मध्ये परभणी जिल्हा कचेरीवर १०० महिलांनी मूक मोर्चा नेला आणि धरणे धरून एक दिवसाचे उपोषण केले. मोर्चामुळे निजामी सत्तेस हादरा बसला.

## योजनाबद्ध व्यूहरचना

परभणी जिल्ह्याचे सशस्त्र लढ्यातील जिल्हा केंद्र हे वाशिम येथे होते. सैनिकांची भरती करणे, त्यांना शस्त्राचे ट्रेनिंग देणे व निरनिराळ्या ॲक्शनमध्ये पाठवणे हे कार्य कॅम्पमध्ये होत असे. हा कॅम्प उघडण्यासाठी विनायकराव चारठाणकर दादासाहेब चारठाणकर व शंकरलालजी सेठी यांनी



काँग्रेसचे पुढारी आणि अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या. विनायकराव चारठाणकर हे वाशिम कॅम्पचे प्रमुख होते, तर गंगाप्रसाद अग्रवाल उपकॅम्पप्रमुख होते. त्यानंतर जिंतुर तालुक्यासाठी लोणी (जि. वाशिम), हिंगोली तालुक्यासाठी व्याड (जि. वाशिम) वसमत तालुक्यासाठी दगड धानोरा (ता. पुसद, जि. यवतमाळ), कळमनुरी तालुक्यासाठी शेंबाळ पिंपरी (ता. पुसद) आणि परतूर तालुक्यासाठी सोनोसी (ता. मेहेकर जि. बुलडाणा) असे अन्य पाच सशस्त्र कॅम्प स्थापन करण्यात आले होते. या कॅम्पना मार्गदर्शन व त्यांच्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी जिल्हा कृती नियोजन समिती, निधी व अन्नधान्य वसुली समिती स्थापन करण्यात आल्या. जिल्हा कार्यालयाने कृती समितीच्या आदेशानुसार सरहद्दीवरील करोडगिरी नाकी, पोलीस ठाणी व रझाकार केंद्रे यावर हल्ले करून ती नष्ट करण्याची कामगिरी जिल्ह्यातील विविध कॅम्पांना सोपवण्यात आली होती.

योजनाबद्ध व्यूहरचना आखून रझाकारांचे कॅम्प आणि नाकी नष्ट करण्यात आली होती. याशिवाय सशस्त्र लढ्याच्या सैनिकांनी मंठा, बामणी, बोरी, शिरड शहापूर, गोरेगाव, हरंगुळ, केंधळी पोलीस स्टेशन इत्यादींवर हल्ला करून ती नष्ट केली होती. तसेच बर्डा, धानोरा, कापडसिंगी, जयपूर, गाडी-बोरी, शिऊर, सरकटे वझर आदी करोडगिरी नाक्यांवर हल्ला करून ती उद्ध्वस्त करण्यात आली. परभणी जिल्ह्यात सप्टेंबर १९४७ मध्ये सर्वत्र शिंदीची झाडे तोडून मोठ्या प्रमाणात जंगल सत्याग्रह करण्यात आला. याप्रकारे सशस्त्र लढ्यातील वीरांनी निजामी सत्ता खिळखिळी केली. इतकेच नव्हे तर १५ ऑगस्ट १९४८ पासून पोलीस ॲक्शन होईपर्यंत परभणी जिल्ह्यातील सुमारे १०० गावे स्वतंत्र करून भारतात विलीन करण्यात आली होती.

भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निजाम शासनाच्या विरोधात १३ सप्टेंबर १९४८ रोजी पोलीस कारवाई करण्याचे ठरवून लष्कर पाच बाजूने म्हणजेच औरंगाबाद, सोलापूर, आदिलाबाद, कर्नूल आणि विजयवाडा या ठिकाणाहून हैद्राबाद संस्थानात प्रवेश केला. १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद शहर निजामापासून मुक्त करून सैन्य हैद्राबादच्या दिशेने निघाले. भारतीय सैन्यापुढे निजामाचे सैन्य फार वेळ टिकू शकले नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबादच्या निजामाने युद्ध थांबवत असल्याची घोषणा करून शरणागती पत्करून हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. जनता यशस्वी झाली आणि निजामाला भारतात विलीन व्हावे लागले. खऱ्या अर्थाने मराठवाड्याची जनता मुक्त झाली.

**संदर्भ ग्रंथ :**

स्वातंत्र्य संग्राम परभणी जिल्ह्याचे योगदान, १९९६
– संपादक मंडळ

**जिल्हा माहिती अधिकारी, परभणी**

मराठवाडा मुक्तिसंग्राम आंदोलनात जालना जिल्ह्याचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. जिल्ह्यातील हजारो तरुणांनी अत्यंत जिद्दीने निजामाच्या पाशवी सत्तेशी झुंज दिली. प्रसंगी अनेकांनी मृत्यूलाही कवटाळले. हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर, स्वातंत्र्यसैनिक विजयेंद्र काबरा, दगडाबाई शेळके, अच्युतभाई देशपांडे, मनोहर सोनदे, मुरलीधरराव काळे, रघुनाथराव रांजणीकर, भा.सी. व्याहाळकर, बद्रीनारायण बारवाले, संपत नाईक भिल्ल, क्रांतिवीर इफ्तेखार अहमद अशा अनेक क्रांतिकारकांनी मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी झुंज दिली.

# स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढा...

**प्रमोद धोंगडे**

निजाम सरकारने धार्मिक आणि नागरी हक्कावर जी बंधने घातली होती. त्यामुळे लोकांमध्ये अस्वस्थता वाढत चालली होती. यासाठी ठिकठिकाणी आंदोलने केली गेली.

## महाराष्ट्र परिषद

हैद्राबादचा भारतीय संघराज्यामध्ये समावेश व्हावा व त्यासाठी लोकमत जागृत करण्याच्या उद्देशाने गोविंदराव नानल व वामनराव नाईक यांच्या प्रयत्नांनी महाराष्ट्र परिषदेची स्थापना झाली. पहिले अधिवेशन व आंदोलनाची आखणी जालना जिल्ह्याच्या भूमीतच झाली. १९३७ साली गोविंदराव नानल यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन परतूर येथे झाले. या लढ्याचे नेतृत्त्व स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांनी केले. स्टेट काँग्रेसवर बंदी आल्यामुळे महाराष्ट्र परिषदेशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

## स्त्रियांचा सहभाग

हैद्राबाद मुक्तिलढ्यात पुरुषांबरोबर महिलाही सहभागी झाल्या होत्या. रझाकारांचा मुकाबला स्वातंत्र्यसैनिक दगडाबाई देवराव शेळके यांनी केला. जालना जिल्ह्याच्या बदनापूर तालुक्यातील धोपटेश्वर या गावात राहणाऱ्या दगडाबाईंनी ग्रामीण भागात रात्री-अपरात्री हिंडून स्वातंत्र्य सैनिकांना मदत केली. स्वातंत्र्य सैनिक बाबुराव जाधव, लाला लक्ष्मीनारायण, डॉ. धामणगावकर यांच्यासमवेत जीवाची पर्वा न करता त्यांनी लढा दिला. रेल्वे रूळ उखडणे, पोलीस चौक्या जाळणे इत्यादी कामे करून त्यांनी रझाकारांना हैराण केले. हसनाबाद व नांदखेडा येथे झालेल्या दंगलीत पोटावर रांगत जाऊन अनेक रझाकारांना त्यांनी ठार केले. रुक्मिनीबेन शर्मा, सवितादेवी आर्य, माई अंबडकर, प्रतिभाताई देशपांडे, गोपिकाबाई काळे आदी महिलांनीही हैद्राबाद मुक्तिसंग्रामात मोलाचे कार्य केले. सवितादेवी आर्य यांनी १९३८ साली प्रथम स्टेट काँग्रेसच्या आंदोलनात भाग घेतला. आर्य महिला वीरांगणा दलाची स्थापना करून त्यांनी महिलांना संघटित केले. हैद्राबाद, नागपूर, मुंबई, दिल्ली येथील काँग्रेस अधिवेशनात भाग घेतला. त्यांचे पती नंदलालजी आर्य हे नऊ महिने तुरुंगात होते. रुक्मिणीदेव शर्मा आणि घनश्याम शर्मा या पती-पत्नीने मोलाची कामगिरी बजावली. माई अंबडकर या जालना जिल्ह्यातील पहिल्या सामाजिक आणि राजकीय कार्यकर्त्या होत्या. गोपिकाबाई काळे यांच्या पदरात तर सदैव निखारा असे. स्वातंत्र्यसैनिक भूमिगत कार्यकर्त्यांच्या त्यांच्या घरी नेहमी बैठका व्हायच्या. त्यांच्यामागे पोलिसांचा ससेमिरा असायचा; परंतु त्या डगमगल्या नाहीत.



## समग्र विचारांचा प्रभाव

स्वातंत्र्यसैनिकांचा मागोवा घेताना मनोहरराव सोनदे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. स्वामी रामानंद तीर्थ, बाळासाहेब परांजपे, गोविंदभाई श्रॉफ आदी मान्यवरांच्या विचाराने ते प्रभावित झाले. सोनदे यांची कार्यपद्धती अन् वाणीचे तेज लक्षात घेऊन स्वामीजींनी त्यांची जालना, अंबडसाठी पूर्णवेळ संघटक म्हणून नियुक्ती केली. जालन्याला राहून त्यांनी गुमास्ते, हमाल व विद्यार्थी संघटित केले. त्यांचे मेळावे घेऊन आंदोलने केली. तरुणांना शस्त्र आणि युद्धतंत्राचे लाठी-काठीचे शिक्षण देऊन मनामनात राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित केली. हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर, जनार्दन

शंकरराव कुलकर्णी नागापूरकर (मामा) यांचा मुक्तिसंग्रामातील तेजस्वी लढा स्मरणात राहणारा आहे. मामांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जालन्यात मामा चौक म्हणून प्रसिद्ध असलेल्या चौकात त्यांचा पुतळा उभारला आहे. सैनिकांशिवाय ॲड. स. कृ. निरखी, भाऊसाहेब देशपांडे, चंदू खोले, राधाकिशन लाला, विश्वनाथराव खेरूडकर, मनोहरराव जळगावकर, ॲड. द.ग. देशपांडे जाफराबादकर, आबासाहेब देशपांडे, ॲड. मोहनलाल गोलेच्छा, भाऊसाहेब मिटकर, ॲड. विश्वनाथराव कुलकर्णी, वसंत राक्षसभुवनकर, ॲड. सखारामपंत खापरखुंटीकर, भगवंतराव गाढे, भाऊसाहेब देशमुख, मदनलालजी चौविश्या, राधाकिशन मास्तर, हुतात्मा रयाजी म्हतारबा, दाजिबा म्हस्के, केशवराव कोलते, रामराव कुलकर्णी, सीताराम माळी, जयसिंग तुळशीराम या व अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी हैद्राबाद मुक्तिसंग्रामात मोलाचे कार्य केले. हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील एक प्रखर क्रांतिकारक म्हणून विजयेंद्र काबरा यांना ओळखले जाते. ते जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी या गावचे मूळ रहिवासी. छत्रपती संभाजीनगर व हैद्राबाद येथे शिक्षण पूर्ण होताच ते पत्नीसह हैदराबाद मुक्तिसंग्रामात सहभागी झाले. भोकरदन तालुक्यातील कोलते टाकळी येथील संपत नाईक भिल्लांचे नाव ऐकले की रझाकारांच्या अंगाला कापरे भरत असे. त्यांनी लाडसावंगी पोलीस ठाण्यावर हल्ला करून बंदुका पळवल्या.

## आर्य समाजाचे योगदान

१९३२ साली पं. माधवराव धुनसीकर यांच्या पुढाकाराने जालना शहरी आर्यसमाजाची स्थापना करण्यात आली. पं. कर्मवीर यांच्या नेतृत्वाखाली आर्यदल उभे राहिले. अन्यायाविरुद्ध त्यांनी संघर्ष करून समाजात राष्ट्रभक्ती रुजवली. १९३८ साली झालेल्या सत्याग्रहात घनश्यामदेव शर्मा, मांगीलाल दायमा, लक्ष्मीनारायण लाला, नंदलाल आर्य, शिवराम पिराजी, गणपत सोनार, सत्यनारायण शिंपी यांनी भाग घेतला व तुरुंगवासही भोगला. स्टेट काँग्रेसने पुकारलेल्या सत्याग्रहात लक्ष्मणराव देशपांडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी भाग घेतला, तर सत्याग्रहींना हार घातला म्हणून हरी सावजी, जगन्नाथ मित्तल यांना शिक्षा झाली. तर अंबडला रामचंद्र अष्टपुत्रे, राघवेंद्र देशपांडे, पं. गो. तत्सत, देविदास देशपांडे, दिगंबर अरळकर यांनी सत्याग्रह करून तुरुंगवास भोगला, तर वि.रा. जोशी, निरखी, खंडेराव खलसे, गोपाळराव सामनगावकर, बाबू शिंगणे, नरहर खरडकर, वसंत कल्याणकर, धरणीधर देशपांडे, विश्वनाथराव खेरुडकर यांनी सत्याग्रह करून शिक्षा भोगली. अनेकांनी खादीचा स्वीकार केला. डॉ. मुरलीधरराव काळे, गंगाबिशन करवा, मोहनलाल करवा, रामजीवन करवा, विष्णुदास शर्मा, गणेशलाल भक्कड, कटारिया यांचेही या स्वातंत्र्यलढ्यात योगदान महत्त्वाचे आहे.

जून १९४३ साली औरंगाबाद येथे महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन झाले. गोविंदभाई चिटणीस बनले व संघटना मजबूत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. जिल्हा, तालुका, गावपातळीवर संघटना बांधून विविध उपक्रमांतून मनामनात राष्ट्रभक्ती रुजवणे, अस्पृश्यता निवारण, खादीचा प्रसार आदी कार्यक्रम राबवण्याचे ठरले. मनोहर सोनदे यांची जालन्यासाठी संघटक म्हणून नियुक्ती केली. हनुमंत बेंडे, राजाराम गुंजकर, भा.सी. व्याहाळकर बद्रीनारायण बारवाले, गोपीकिशन निमोदिया उत्तमचंद जैन, विष्णू सावजी, दुरण्णा रामण्णा हे सहकार्य करत. जनार्दन मामा, बद्रीनारायण बारवाले व अनंतराव यांचेही मोलाचे सहकार्य मिळाले.

## स्वातंत्र्यसैनिकांचे महत्त्वपूर्ण योगदान

मराठवाडा मुक्तिलढ्यात भोकरदन व जाफराबाद तालुक्याचा मोलाचा वाटा आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या आदेशावरून मराठवाडा काँग्रेस शेतकरी संघाचे तत्कालीन अध्यक्ष अण्णासाहेब गव्हाणे, अंकुशराव घारे, जी.डी. लाड, पंडितराव गव्हाणे यांनी बुलडाणा जिल्ह्यातील धामणगाव येथे बैठक घेतली. यात भोकरदन तालुक्यातील पारध येथील वीर वामनराव गंगाराम लोखंडे यांना नियुक्त केले होते. नियुक्तीनंतर त्यांनी विदर्भातील पाडळी, देऊळगावराजा, जाफराबाद तालुक्यातील वरुड यांसारख्या ग्रामीण दुर्गम भागात तरुणांना लष्करी प्रशिक्षण दिले. इंग्रजांच्या लष्करातील मेजरपद सोडून स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या वामनराव लोखंडे यांनी स्वातंत्र्यसैनिकांना प्रशिक्षण दिले. शिवाय तेही या लढ्यात सहभागी झाले.



रझाकारांकडून होणारे अन्याय अत्याचार व संपत्तीची होणारी लूट पाहून त्यांनी प्रशिक्षण दिलेल्या जाफराबाद

तालुक्यातील वरुड येथील देविदास जैन, भगवंतराव देशमुख, जयसिंग घायवट, सीताराम सातव, श्यामराव कुलकर्णी, रामसिंग परिहार, तुकाराम सातव, किसनराव घाटगे यांच्यासह साठ मुक्तिसैनिकांच्या एका तुकडीने रझाकारांची



चांगलीच दैना उडवली होती. मात्र शरण आलेल्या रझाकारांकडून १९ सप्टेंबर १९४८ रोजी झालेल्या छोट्या हल्ल्यात स्वातंत्र्यसैनिकांच्या तुकडीतील चार मुक्तिसैनिक हुतात्मा झाले होते. १७ डिसेंबर १९४७ ला शेख चाऊस व रझाकारांनी भोकरदन तालुक्यातील वालसा वडाळा येथील गढीवर हल्ला केला होता. त्यांनी चक्क गोफणीने दगडांचा मारा करून रझाकारांना पळवले होते.

रात्री रझाकार झोपेत असताना स्वातंत्र्यसैनिकांनी हल्ला करून त्यांच्याकडील शस्त्रे हिसकावून घेतली होती. या कामगिरीत हरिभाऊ जगताप, पांडुरंग पोटे, फकिरा काळे, तुकाराम सोनुने, लक्ष्मण सोनुने, लक्ष्मण मिसाळ, किसनराव देशमुख, रुस्तुमराव देशमुख, साहेबराव लोखंडे व सहकारी सहभागी झाले होते. २७ जुलै १९४८ रोजी इब्राहीम याने शेकडो रझाकारांसह भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाईस वेढा दिला होता. तसेच पोलीस पाटील कौतिकराव देशमुख, मोतीलाल गुप्ता, प्यारेलाल गुप्ता यांना बांधून चावडीवर नेले होते. त्या क्षणी विश्वासराव वणी देशमुख, रुस्तुमराव देशमुख, किसनराव देशमुख, नारायण देशमुख, कडुबा चव्हाण, गोविंदा गावंडे, जाणू नरवडे, फुलसिंग राजपूत, वामन निकम यांनी चावडीवर गोळीबार करून सहकाऱ्यांची सुटका केली होती. हे पाहून रझाकार पिंपळगाव रेणुकाई येथून सात किलोमीटरवर असलेल्या हिसोडा गावाकडे पळून गेले. १४ सप्टेंबर १९४८ ला स्वातंत्र्यसैनिकांनी पारध काबीज करून येथील गढीवर विजयी राष्ट्रध्वज फडकवला होता. रघुनाथराव रांजणीकर यांचे हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील योगदान लक्षणीय आहे.

निजामी हद्दीतील पोलीस ठाण्यावर हल्ला करून ती ठाणी उद्ध्वस्त करणे, तेथील शस्त्रास्त्रे हस्तगत करणे, सरकारी कचेऱ्यांवर हल्ला करून तेथील कागदपत्रे जाळून टाकणे, रझाकारांच्या केंद्रावर हल्ला करून त्यांना पळवून लावणे, निजामी हद्दीतील पाटील, पटवाऱ्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यायला लावणे, त्यांनीदेखील हैद्राबाद मुक्तिलढा अधिक प्रखर केला.

## जंगल सत्याग्रह

हैद्राबाद सरकारला शिंदी आणि ताड्याच्या झाडापासून तयार होणाऱ्या मद्यातून खूप मोठा महसूल मिळत होता. त्यामुळे सर्व राज्यात ही झाडे तोडण्यास मनाई होती. शिंदीबन राखीव स्वरूपात ठेवण्यात आले होते. कायदा मोडण्याच्या सविनय कायदेभंगाचा हा प्रतिकात्मक सत्याग्रह होता.

## क्रांतिवीर इफ्तेखार अहमद

मुक्तिसंग्रामाच्या आंदोलनामध्ये अग्रभागी राहणारे क्रांतिवीर म्हणून जालना शहरातील इफ्तेखार अहमद यांच्याकडे पाहिले जाते. भारतीय स्वातंत्र्याचा लढा, मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यामध्ये त्यांनी एकूण पाच वर्षे कारावास भोगला. दोन वर्षे भूमिगत राहून त्यांनी चळवळ चालवली. विविध शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, कलात्मक कार्यक्रमात सहभाग घेऊन त्यांनी समाज प्रबोधनाचे काम केले.

रामसिंग पवार, भगवंतराव देशमुख, तुकाराम सातव, जयसिंग घायवट, कुळकर्णी ही मंडळी हुतात्मा झाली होती. अशा अनेक हुतात्म्यांचे स्मरण व्हावे, त्यांच्या कार्याची नव्या पिढीला जाणीव व्हावी, यासाठी वरुड येथे हुतात्मा स्मारक उभारण्यात आले आहे.

निजामाच्या तावडीतून मराठवाडा मुक्त करण्यासाठी पेटून उठलेले गावकरी व रझाकार यांच्यात २२ जून १९४८ रोजी सशस्त्र लढाई झाली. गावकऱ्यांनी गनिमी काव्याने दारुगोळा, बंदुकींच्या जोरावर रझाकारांशी दिवसभर चिवट झुंज दिली. या स्वातंत्र्यसमरात पिंपळगावातील चार जणांना हौतात्म्य आले.

मराठवाडा मुक्तिसंग्राम हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वाचे आणि रोमांचकारी सोनेरी पान आहे. मराठवाडा मुक्तीसाठी उभारलेल्या लढ्यातील अनेक शूरवीरांच्या प्रयत्नातून मिळालेले स्वातंत्र्य निश्चितच प्रेरणादायी आणि स्फूर्ती देणारे आहे.

**संदर्भ –** पुस्तिका, आपला जालना जिल्हा, प्रा.भगवान काळे

**जिल्हा माहिती अधिकारी, जालना**

**तेलंगणा (तेव्हाचा आंध्र प्रदेश), विदर्भातील काही तालुक्यांसह संपूर्ण मराठवाडा व कर्नाटकातील काही भागावर निजामाच्या रझाकारांनी सामान्य नागरिकांवर अत्याचाराची परिसीमा गाठली होती. हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या अर्थात निजामाच्या बेबंदशाहीतून मुक्त होण्यासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी बलिदान दिले. नांदेड हा जिल्हा तेलंगणाच्या सीमेवरच असल्याने या जिल्ह्याने मुक्तिलढ्यात सर्वतोपरीने योगदान दिले.**

# युवकांचा पुढाकार

**विनोद रापतवार**

हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या लढ्यात प्रत्येक घटकांचा समावेश होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही मराठवाडा आणि तेलंगणात निजामाची राजवट होती. निजाम हा जनतेवर अत्याचार करत होता. हा अन्याय असह्य होत होता. युवकांनी पुढाकार घेत निजामाची सत्ता उलथवण्याची शपथ घेतली होती. त्यासाठी सैनिक कॅम्प उभारण्यात आले.

## उमरी बँक ॲक्शन

स्वातंत्र्य सैनिक दत्ताजी उत्तरवार यांची रजाकारांनी हत्या केली. त्यापाठोपाठ गोविंदराव पानसरे यांची हत्या करण्यात आली. यामुळे स्वातंत्र्य सैनिकांचे पित्त खवळले होते. त्यांनी या घटनेचा प्रतिशोध घेण्याचे ठरवले. यासाठीच 'ऑपरेशन उमरी बँक' निश्चित करून ही मोहीम यशस्वी केली.

दत्ताजी आणि पानसरे यांच्या हत्येचा प्रतिशोध निजामाची बँक लुटून घेण्याचा निर्णय देशमुखांच्या घरी झालेल्या बैठकीत घेण्यात आला. यामुळे प्रतिशोध पूर्ण होईल, निजामाला आर्थिक नुकसान होईल अन् बँकेच्या लुटीतून मिळणाऱ्या पैशातून हत्यारे घेण्यासाठी आर्थिक मदत होईल, अशी भूमिका होती. त्यासाठी 'ऑपरेशन उमरी बँक' निश्चित करण्यात आले.

या ॲक्शनसाठी चार गट करण्यात आले, तर प्रत्यक्ष बँकेवर २० जणांच्या तुकडीने हल्ला केला. त्यात अनंत भालेराव, आबासाहेब लहानकर, साहेबराव बारडकर, किशोर शहाणे, दिगंबर उत्तरवार, मालाणी आदींचा समावेश होता. ऑपरेशन उमरी बँकेनंतर निजाम सरकारला मोठा हादरा बसला. त्यांनी लुटीतील २२ लाख ६६ हजार रुपयांचा आकडा जाहीर केला. ऑपरेशन उमरी बँकेची योजना यशस्वीपणे पार पडल्याने विजयोत्सव सर्वत्र साजरा करण्यात आला. त्या काळी मिळवलेल्या यशामुळे विजयी कमान उभारण्यात आली होती. त्याकाळी उभारलेली ही विजयी कमान आजही इतिहासाची साक्ष देत शाबूत आहे.



## महिलांची असामान्य कामगिरी

निजामाला वठणीवर आणण्यासाठी मराठवाड्यातील स्त्रीशक्ती जागृत झाली. कावेरीबाई बोधनकर, विमलाबाई डोईफोडे, शंकुतलाबाई साले, आशाताई वाघमारे, गीताबाई चारठाणकर, दगडाबाई शेळके या रणरागिणी शस्त्रास्त्र मिळवण्यासाठी सशस्त्र लढ्यासाठी पुढे आल्या. दगडाबाई शेळके यांना विदर्भातून होमगार्डचे प्रशिक्षण मिळाले. त्यांच्या या योगदानामुळे लढ्याला एक निर्णायक वळण मिळाले होते.

निजामाने स्वतंत्र राजेशाही टिकवण्याचा निर्णय घेतला होता. स्वतंत्र भारतात पुन्हा एकदा स्वातंत्र्याच्या मशाली पेटल्या. क्रांतिकारकांच्या हाती शस्त्रे आली. मात्र ही शस्त्रे पुरवली, ती मराठवाड्यातल्या रणरागिणींनी! यांचे या लढ्यात खूप मोठे योगदान आहे.

## ऑपरेशन कोळी

नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यात अत्याचार करणाऱ्या ५५ रझाकारांना कंठस्नान घातले, ती क्रांतिकारी योजना म्हणजे ऑपरेशन कोळी. त्या काळी रझाकारांनी छळाचा कहर केला. सामान्यांवर प्रचंड अत्याचार झाले. सामान्य रयतेची सहनशीलता संपली. 'रझाकारांच्या तलवारीने मरायचे तर लढून मरू' अशी ईर्ष्या उमरखेड कॅम्पवरच्या स्वातंत्र्य सैनिकांच्या मनात निर्माण झाली. त्यातूनच 'ऑपरेशन कोळी'ची योजना आखली गेली. रझाकाराचा हल्ला होणार, ही बातमी गुप्तहेरांनी आणली आणि कोळीकरांनी रझाकारांशी दोन हात केले. मोठा संघर्ष झाला आणि त्यात ५५ रझाकारांना कंठस्नान घातले. त्यातून वंदे मातरम्चा उद्घोष झाला.

## लेव्ही वसुलीविरुद्धचा उठाव

हैद्राबाद मुक्तिसंग्रामाला गती देण्यासाठी लेव्हीविरुद्धचा उठाव अर्थात इजळी येथील प्रकरण महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्यानंतर

भारतातील जनता स्वातंत्र्याची नवी पहाट अनुभवत होती. मात्र हैद्राबाद संस्थानात निझाम राजवटीची दंडेली चालूच होती. रयतेकडून अव्वाच्या सव्वा शेतसारा वसूल केला जाई. त्यातही प्रचंड दंडेली होती. लोकांच्या सहनशीलतेला सीमा नव्हत्या. रयत प्रचंड संतापली; पण काहीच करता येत नव्हते. शेवटी इजळीमध्ये उद्रेक झाला. गावकऱ्यांनी वसुलीसाठी दंडेली करणाऱ्या तहसीलदारास ठार मारले. हैद्राबादची रयत आता दंडेली सहन करणार नाही, हा संदेशच या घटनेने सरकारला दिला. निजामाने गावकऱ्यांना कठोर शिक्षा व काहींना तर फाशीसारख्या शिक्षा ठोठावल्या होत्या.

## इस्लापूर ॲक्शन

उमरी बँक ऑपरेशनवरून शासनाच्या अर्थव्यवस्थेला आव्हान दिले. प्रशासकीय यंत्रणेचा ढिसाळपणा प्रकाशात आला. सरकारच अस्तित्वात नसल्याचे जाणवले. हैद्राबादच्या पोलिसांनी आणि रझाकारांनी अनन्वित अत्याचार करायला सुरुवात केली होती. सुरक्षित ठिकाणी असलेली पोलीस ठाणी त्यांची प्रमुख सत्ताकेंद्रे होती. किनवट तालुक्यातील इस्लापूर पोलीस ठाणे हे सुरक्षित पोलीस ठाणे होते. तिथे रझाकारांचे वर्चस्व होते. रझाकारांच्या अन्यायात दिवसेंदिवस वाढ होत होती. सामान्य रयत हवालदिल झाल्याचे वृत्त ऐकून तरुणांचे रक्त सळसळत होते. इस्लापूरवर हल्ला करायची मोहीम आखण्यात आली. या व्यापक मोहिमेमध्ये १७५ लोकांचा सहभाग होता. ३० जून १९४८ ॲक्शन करण्याचे निश्चित झाले. ठरल्याप्रमाणे पोलिसांवर गोळीबार करण्यात आला. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात स्वातंत्र्यसैनिक जयवंतराव पाटील, लखासिंग लमाणी हे जखमी झाले. हैद्राबाद मुक्ती आंदोलनात जानकीलाल गुलाबचंद राठी, तुकाराम जारकर आणि लखासिंग लमी यांना हौतात्म्य आले. या ॲक्शननंतर या परिसरातील रझाकारांचा अत्याचारी धुमाकूळ थांबला. सामान्य रयतेने काही प्रमाणात सुटकेचा निश्वास सोडला होता.

## कल्हाळीचा रणसंग्राम

१९४८ च्या ऑगस्ट महिन्यात हैद्राबाद राज्यातील परिस्थिती तणावपूर्ण बनत गेली. रझाकारांचे अत्याचार वाढत गेले. शासनाचे परिस्थितीवर नियंत्रण राहिले नव्हते.

निजाम प्रशासन शेतकऱ्यांकडून जुलमी लेव्हीची वसुली केली जायची. त्यासाठी गावेच्या गावे लुटली जायची. याचा प्रचंड संताप लोकमानसात धुमसत होता. कल्हाळीला वसुली करण्यासाठी वसुली अधिकारी पठाण रझाकारांसह येणार, ही बातमी शेतकऱ्यांना समजली. कल्हाळीचे सारे गावकरी नाईकांच्या गढीत एकत्र जमले. त्यांनी मिळतील ती शस्त्रास्त्रे एकत्र केली. रझाकारांविरोधात लढून त्यांना हाकलून लावायचे, शेतसारा द्यायचाच नाही, या ईर्ष्येने मराठवाड्यातला शेतकरी पेटून उठला. मोठा संघर्ष झाला. त्यात ३६ लढवय्ये कामी आले. स्वतंत्र भारतात झालेले हे हौतात्म्य होते.

## झेंडा प्रकरण

१५ ऑगस्ट १९४७ रोजी नांदेडच्या रेल्वे स्टेशनवर तिरंगा फडकवण्यात आला. रझाकारांनी याबद्दलचा तंटा उपस्थित केला. रेल्वे ही निजाम स्टेट रेल्वे होती. रेल्वेची उभारणी हैद्राबाद राज्याने केली होती. अशी त्यांची भूमिका होती. रेल्वे ही केंद्र सरकारच्या अखत्यारीतील बाब. या रेल्वेला राज्याबाहेर येण्यास बंदी लादल्यास दळणवळण खुंटेल, याची जाणीव झाल्यावर तणाव कमी झाला. पोस्ट ऑफीस हे इंग्रजांच्या अखत्यारीत येत होते. पोस्टाच्या कार्यालयावर झेंडा फडकवण्यात आला. तेव्हाही रझाकारांनी दंडेली केली. त्या तिरंग्याशेजारी हैद्राबादचा असफिया झेंडाही लावण्यात आला. तात्पर्य केंद्रीय कार्यालयावर तिरंगा झेंडा लावला गेला, मात्र या झेंड्यावर बंदी आली.

तिरंगा झेंडा काँग्रेस कार्यालयावरून उतरवला जावा त्याची सावलीदेखील ईदच्या मिरवणुकीवर पडू नये, असा आग्रह मुस्लीम जमातवाद्यांनी धरला होता. दोन्ही बाजूला संघर्षाची तयारी झाली होती. कुठल्याही परिस्थितीत तिरंग्याचा अपमान होऊ द्यायचा नाही, या ईर्ष्येने सारे प्रेरित झाले होते. शेवटी इत्तेहादुल मुसलमीनचे अखलाख हुसैन यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखले. हुसैन यांनी झेंड्यासमोर शेरवानी रॅली आणून मिरवणुकीतील लोकांना पुढे सरकण्याचा संकेत दिला. हळूहळू तणाव कमी झाला.

### हैद्राबाद संस्थान मुक्त झाले...

सत्ता हातातून जाणार या भीतीतून निझामाकडून जनतेवरील अत्याचार अतिशय तीव्र करण्यात आले. कत्लेआमच्या स्वरूपात संघर्ष सुरू करण्याची घोषणा रझाकारांनी केली. त्यासाठी निझामाने पाकिस्तानातून शस्त्रास्त्रे मागवली. इकडे, जनताही आता स्वातंत्र्यासाठी इरेला पेटली. राजेशाहीविरुद्ध लोकशाही असा हा संघर्ष होता. शेवटचा पर्याय म्हणून भारताचे सैन्य १३ सप्टेंबरला हैद्राबाद राज्यात चहूबाजूने शिरले. निझामाचे सैन्य रझाकाराचा फौजफाटा आणि भारतीय सैन्यात ठिकठिकाणी संघर्ष झाला. चार दिवसानंतर १७ सप्टेंबरला आपल्या कोठीवर पांढरा ध्वज फडकवत निझामही शरण आला. मेजर जनरल चौधरींनी हैद्राबाद संस्थान जिंकल्याची घोषणा केली.

## आझाद हैद्राबाद रेडिओ

हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील सशस्त्र लढा सुरू झाला. १९४७च्या भारतीय स्वातंत्र्यानंतरची ही गोष्ट. मराठवाडा अर्थात हैद्राबाद संस्थानातील सर्व भाग पारतंत्र्यातच होता. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरदेखील मराठवाडा व इतर भाग स्वातंत्र्यासाठी लढत होता. या लढ्यासाठी अनेक मार्गांनी स्वातंत्र्यसैनिक, जनता प्रयत्नरत होती.

लढ्याच्या हालचाली भूमिगत होत्या. स्वातंत्र्य सैनिकांशी संपर्क साधणे अवघड होते. नांदेडच्या पद्माकर लाठकरांनी धैर्य दाखवले. डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात त्यांनी मुंबई परिसरातून 'आझाद हैद्राबाद रेडिओ' केंद्राचे प्रसारण सुरू केले. स्वातंत्र्यसंग्रामाच्या सगळ्या बातम्या, घडामोडी या केंद्रावरून दिल्या जायच्या. जीवावर बेतणारे हे काम नांदेडच्या स्वातंत्र्यसैनिकांचे होते, ही गोष्ट अभिमानाने नोंदवली पाहिजे.

जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड

**भारत जेव्हा स्वतंत्र झाला, त्यावेळी देशात ५६५ संस्थाने होते. स्वातंत्र्यानंतर ५६२ संस्थाने भारतात विलीन झाली. सन १७२४ ते १९४८ अशी एकूण २२४ वर्षे हैद्राबादच्या निजामाचे शासन होते. निजाम हे व्यक्तीचे नाव नव्हे, तर ती एक पदवी होती. निजाम म्हणजे व्यवस्थापक. सन १७२४ मध्ये पहिला निजाम मीर कमरुद्दीन खान. पुढे २२४ वर्षे सन १९४८ पर्यंत या गादीवर एकूण सात निजामांनी राज्यकारभार केला. यामध्ये मीर कमरुद्दीन खान, मीर निजाम अली, मीर अकबरअली सिकंदरजाह, अलिखान नासिउद्दौला, तहनीयतखान असफउद्दौला, मीर महेबूबअली आणि मीर उस्मानअली यांचा समावेश आहे.**

# सशस्त्र संघर्ष

**विवेक खडसे**

भारत स्वतंत्र झाला तेव्हा हैद्राबाद, जुनागड आणि जम्मू-काश्मीर या संस्थानांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. हैद्राबाद निजाम संस्थान शासन हे देशातील सर्वात श्रीमंत संस्थान होते. भारत स्वतंत्र झाला, तरी हैद्राबाद संस्थानचा राजा मीर उस्मान अली याची वेगळ्या देशाची कल्पना होती. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल, क्रांतिसिंह नाना पाटील व स्वामी रामानंद तीर्थ यांच्यासारख्यांच्या मार्गदर्शनात हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या लढ्यात अनेक स्वातंत्र्यसैनिक एकत्र आले. या लढ्याचे नेतृत्त्व सर्वसामान्य व्यक्तींनी केले. राजाविरुद्ध प्रजा असा हा संघर्ष होता. या लढ्यामध्ये असंख्य राष्ट्रप्रेमी असलेल्या मुसलमानांनीदेखील सहभाग घेतला.

## निजामविरोधात लढा

हैद्राबाद संस्थान हे देशातील सर्वाधिक मोठे संस्थान होते. इ.स. १७२० पासून आसिफजाही घराण्याची सत्ता या संस्थानावर होती. मराठवाडा, तेलंगणा, आंध्रप्रदेश व कर्नाटकमधील १६ जिल्ह्यांचा कारभार निजामाकडे होता. इतर जिल्ह्यांच्या तुलनेत धाराशिव जिल्ह्यात हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा लढा अधिक तीव्रतेने लढला गेला. जिल्ह्यातील धाराशिव, परंडा आणि कळंब हे तालुके तेव्हा निजामाचे वैयक्तिक उत्पन्नाचे तालुके होते.

इंग्रज ज्या पद्धतीने राज्यकारभार करायचे तशाच प्रकारे निजामाचे शासन होते. निजामाकडे पोलीस, टपाल, रेल्वे व लष्कर होते. निजामाकडून होणाऱ्या अन्याय व अत्याचारामुळे निजामाच्या राजवटीला जनता मात्र कंटाळली होती. निजामाच्या विरोधात गावोगावी माणसे जागे होऊ लागली. सर्वसामान्य माणूस निजामाच्या विरोधात पेटून उठला होता. एकीकडे देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त होऊन आनंद घेत असताना हैद्राबाद संस्थानातील जनता रझाकारांच्या अत्याचाराला बळी पडत होती.



हैद्राबादचा निजाम मीर उस्मान अली याने ५७ वर्षे हैद्राबादच्या रूपाने उस्मानाबादवर अधिराज्य गाजवले. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत निजामाचा समावेश होता. हैद्राबाद संस्थांच्या सीमावर्ती भागातून जो भाग स्वतंत्र भारतातील होता, त्या भागातून हैद्राबाद मुक्तिसंग्रामाला नागरिकांचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला होता. उस्मानाबादच्या शेजारी असलेल्या सोलापूर भागातून नागरिकांनी जबरदस्त पाठिंबा दिला होता. हैद्राबाद मुक्तिसंग्रामासाठी लढणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांनी हैद्राबाद सीमेजवळील भागात आपले सुरक्षित स्थळ निर्माण केले होते. याला कॅम्प म्हणण्यात येत होते. अशा प्रकारचे कॅम्प उस्मानाबाद परिसरात जुलै १९४७ ते मार्च १९४८ या कालावधीत गौडगाव, बार्शी, चिंचोली, वाघोली, आंबेजवळगे, कौडगाव, वाघदरी, पानगाव मुस्ती व इट या भागात सक्रियपणे कार्यरत होते. उस्मानाबाद जिल्ह्यातील कॅम्पचे नियंत्रण सोलापूर येथून होत होते. या केंद्राची जबाबदारी पूर्णपणे फुलचंद गांधींकडे सोपवली होती. त्यांच्या सोबतीला बळंतराव नागणे गुरुजी, विश्वंभर हराळकर, बाबासाहेब परांजपे व व्यासाचार्य संदीकर होते. यांच्याकडे शस्त्र खरेदीचे अधिकार देण्यात आले होते. चिलवडीच्या रामभाऊ जाधवांवर गौंडगावच्या कॅम्पची जबाबदारी सोपवली होती. त्यांना दासा कांबळे, नबी पापा तांबोळी, नरहर मालखरे, राजेंद्र देशमुख, वसंत देशमुख, दत्तात्रय गणेश, मनोहर टापरे, भगवान तोडकरी, रामभाऊ सूर्यवंशी व शिवाजी नाडे यांची भक्कमपणे साथ मिळाली. कॅम्पमधील लोकांवर जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे ते काम करत होते. अशाच प्रकारचे काम मुस्ती, वाघोली व काजळा येथे होते. या कॅम्पच्या माध्यमातून पोलीस ठाण्यावर हल्ले करणे व वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येत होते. सार्वजनिक ठिकाणी हल्ले करताना जीवितहानी होणार नाही, याची काळजी घेण्यात येत होती. निजामाच्या जुलमी सत्तेला विरोध करून त्यासाठी लढण्याकरिता आपल्या घरांवर तुळशीपत्र

ठेवून अनेकांनी जीवाची बाजी लावली.

## राष्ट्रीय शाळेची स्थापना

तुळजापूर तालुक्यात असलेला हिप्परगा (नरसोबाचे) या गावात सन १९२१ मध्ये व्यंकटराव देशमुख व त्यांचे बंधू अनंतराव कुळकर्णी यांनी राष्ट्रीय शाळेची स्थापना केली. होणाळकर बंधूंनी तर राहण्यासाठी बांधलेली इमारत विनामूल्य वापरण्यासाठी दिली. हे गाव सध्या लोहारा तालुक्यात येते. शाळेला पाण्याची गरज म्हणून त्यांच्या मालकीची विहीरदेखील मोफत वापरण्यास दिली. दहावीपर्यंत वर्ग असलेल्या या शाळेत १५० ते २०० विद्यार्थी शिक्षण घेत होते. २३ शिक्षक ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत होते. शारीरिक शिक्षणाकडे शाळेचे विशेष लक्ष होते. दंड, सूर्यनमस्कार, कुस्ती, पोहणे दंड बैठका, मल्लखांब, लाठीकाठी, जांबिया, तलवार पट्टा, भालाफेक, लेझीम आणि लष्करी कवायतीचे खेळ विद्यार्थ्यांना शिकवले जात होते. वक्तृत्वकला विद्यार्थ्यांना यावी यासाठी वादविवाद सभा आयोजित केल्या जायच्या. बहुसंख्येने असलेल्या बहुजन समाजाला निजाम राजवटीतून मुक्त करणारी नवी सेना तयार करणे हा संस्थेचा उद्देश होता. या शाळेतूनच विद्यार्थ्यांना देशभक्तीची धडे देण्याचे काम करण्यात येत होते. ही शाळा अनेकांसाठी प्रेरणादायी होती. शिक्षण क्षेत्रात मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत धाराशिव जिल्हा आघाडीवर होता. त्याचे श्रेय हिप्परगा राष्ट्रीय शाळेला जाते. हिप्परगा येथील वास्तव्याच्या काळात स्वामी रामानंद तीर्थ यांना हैद्राबाद संस्थानात निर्माण होत असलेल्या परिस्थितीचा संबंध येऊ लागला होता.

हैद्राबाद संस्थानात भारताचा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यावर व तिरंगा फडकण्यावर बंदी घातली होती. या बंदीला झुगारून धाराशिव भागातील कळंब, ढोकी, तेर, मातोळा, हिप्परगा, तुगाव व सास्तुरसारख्या भागात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. चिलवडीच्या रामभाऊ जाधव या स्वातंत्र्य सैनिकाने शेकडो लोकांना एकत्र करून खेड्यापाड्यातून तिरंग्याची मिरवणूक काढली.

सन १९३८ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैद्राबाद स्टेट काँग्रेसची स्थापना केली. त्यावर देखील निजामाने बंदी आणली. याच काळात स्वामी रामानंद तीर्थ यांनी झेंडावंदन आणि सत्याग्रह करण्याचा कार्यकर्त्यांना आदेश दिला. सत्याग्रह बेकायदेशीर ठरवून निजामाने गुन्हे नोंदवून अटकसत्र सुरू केले. त्यामुळे उस्मानाबादचा तुरुंग स्वातंत्र्यसैनिकांनी भरून गेला होता. या सत्याग्रहात चिलवडीचे रामभाऊ जाधव, बाबासाहेब परांजपे, ॲड. फुलचंद गांधी, राघवेंद्र दिवाण, भगवान तोडकरी, शिवाजी नाडे व राजेंद्र देशमुख प्रामुख्याने सहभागी झाले होते.



## मराठवाडा शब्दाचा जन्म

मराठवाड्यातील सर्वात विस्तारित व मोठा जिल्हा हा धाराशिव होता. सातवा निजाम मीर उस्मान अली याचे उस्मानाबादशी जवळचे नाते होते. कारण १९०४ मध्ये नळदुर्ग हे जिल्ह्याचे ठिकाण बनवून धाराशिव येथे आणून त्याला उस्मान अलीचे नाव दिले. तेव्हापासून धाराशीवचे उस्मानाबाद असे नामांतर झाले. १७६० मध्ये मराठवाडा या शब्दाचा जन्मही उस्मानाबाद जिल्ह्यातच झाला. १७६० च्या निजाम व मराठी यांच्या युद्धात निजामाचा पराभव झाला. त्यानंतर त्यांच्यात एक तह झाला. यात असे ठरले की, युद्धातील खर्चासाठी निजामाने मराठ्यांना ६० लक्ष होन रक्कम द्यावी. तसेच गोदावरी खोऱ्यातील मराठी बोलणाऱ्यांचा प्रदेश म्हणजेच मराठीवाडा. त्यावरूनच मराठवाडा निजामाने मराठ्यांना द्यावा, अशाप्रकारे मराठवाडा या शब्दाचा जन्म झाला.

महाराष्ट्राची कुलदेवता तुळजापूरची तुळजाभवानी माता, तेरमधील संतश्रेष्ठ गोरोबा काका, हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक सुफी संत ख्वाजा शमशोद्दिन गाझी यांचा दर्गा, हिप्परगा येथील राष्ट्रीय शाळेने क्रांतिवीर, स्वातंत्र्यसैनिक व राष्ट्रीय नेत्यांची निर्मिती केली. या शाळेचे प्राचार्यपद स्वामी रामानंद तीर्थ यांनी भूषवले. हैद्राबाद संस्थानातील १६ जिल्ह्यांपैकी भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांचा प्रथम सशस्त्र कॅम्पची स्थापना करून त्याची सुरुवातही धाराशिव जिल्ह्यात झाली.

धाराशिव तालुक्यातील चिलवडी, उमरगातील दाळिंब, गुंजोटी व येनेगूर येथे हैद्राबादच्या निजामाविरोधात वातावरण निर्मिती करण्यासाठी सभा घेऊन लोकांचे मनोबल वाढवण्याचा प्रयत्न केला. जिल्ह्यातील सर्वसामान्य लोकांनी

निजामाच्या जुलमी सत्तेविरुद्ध सत्याग्रह व उपोषण बंदी असताना देखील जाहीर सभा व प्रभात फेऱ्या काढून लोकजागृती केली. आता सत्याग्रहाऐवजी हाती शस्त्रे घेऊन जशास तसे उत्तर देण्यासाठी जिल्ह्यातील तरुण पेटून उठले होते. चांगल्या वाईट परिणामांची त्यांनी तमा बाळगली नाही. निजाम शासन तसेच रझाकारांविरुद्ध भूमिगत होऊन सशस्त्र संघर्ष करू लागले. यालाच हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा लढा म्हटले आहे.

## रझाकारांविरोधात रणशिंग

कळंब तालुक्यातील गौर हे गाव. गावातील तरुण मंडळींनी देशप्रेमाने प्रेरित होऊन मुक्तिसंग्रामात उडी घेतली. भूमिगत होऊन ते चिंचोलीच्या कॅम्पमध्ये सहभागी झाले. इट हे भूम तालुक्यातील देशमुखांचे गाव. गावात असलेल्या अठरापगड जातीने एकत्र येऊन रझाकारांविरोधात स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले. शेजारच्या गावांनीही त्यामध्ये आपला सहभाग दिला. तुळजापूर तालुक्यातील नंदगाव हे कर्नाटक राज्याच्या सीमेवर असलेले शेवटचे गाव. या गावात सुद्धा अठरापगड जातीचे लोक राहत. या गावावरसुद्धा रझाकारांच्या गुंडांनी हैदोस घालून सर्व गाव लुटून जाळून टाकले. हैद्राबाद संस्थानात स्वातंत्र्याचे वारे वाहत असताना धाराशिव जिल्ह्यातील चिलवडी गावचे योगदान हैद्राबाद मुक्तिसंग्रामात महत्त्वपूर्ण आहे. चिलवडी गावाने क्रांतिवीर रामभाऊ जाधव यांच्या नेतृत्त्वात आघाडी घेतली. त्यांनी निजामी जुलमी सत्तेविरुद्ध कार्यक्रम हाती घेतले. अनेक तरुण भूमिगत होऊन निजामी राजवटीच्या विरोधात काम करत होते. रामभाऊ जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी निजाम सरकारचे सर्व कायदे, नियम मोडून काढून परिसरातील अनेक करोडगिरी व नाके लुटून ते मोडून काढले. परवानाधारक अफू,गांजा व दारूची दुकाने बंद केली. अनेक निजामी पोलीस स्टेशन आणि रझाकार केंद्रे नष्ट करून टाकली.




## मुक्तिसंग्रामात महिलांचे योगदान

मराठवाडा मुक्तिसंग्रामात महिला स्वातंत्र्य सैनिकांनीदेखील योगदान दिले आहे. त्याकाळच्या स्त्रियांची स्थिती आजच्या काळातील स्त्रियांसारखी नव्हती. त्या काळातील स्त्री ही शैक्षणिक, सामाजिक व राजकीयदृष्ट्या खूपच मागास होती. शिक्षणाच्या सुविधा त्याकाळी कमी प्रमाणात असल्यामुळे आणि चूल व मूल एवढेच महिलांचे मर्यादित कार्यक्षेत्र होते. शाळांची संख्या कमी, तालुका आणि जिल्हा ठिकाणीसुद्धा मोजक्याच शाळा होत्या. ग्रामीण भागातून तालुका आणि जिल्हा ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी जाणे म्हणजे वाहतूक सुविधांचा अभाव आणि आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्यामुळे अशा ठिकाणी खोली भाड्याने करून राहणे म्हणजे खर्चिक बाब होती. शैक्षणिक सुविधांचा अभाव आणि आर्थिक स्थितीमुळे मुलींना शिक्षण घेणे कठीण होते. भारतीय संविधानाने महिलांना विविध क्षेत्रात आरक्षण दिल्याने आज महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसत आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामात जवळपास १४ महिला स्वातंत्र्य सैनिकांनी आपले योगदान दिल्याची नोंद आहे. यामध्ये आशाताई वाघमारे, सुशीला दिवाण, पानकुंवर कोटेचा, सुलोचना बोधनकर, गीता चारठाणकर, प्रतिभा वैशपायन, ताराबाई परांजपे, गोडवरीबाई, कावेरीबाई, उषा पांगुतीबाई, लताबाई, दगडाबाई शेळके, शकुंतला साले व करुणा चौधरी यांचा समावेश आहे. यातील काही महिला स्वातंत्र्यसैनिक या धाराशिव जिल्ह्यातील आणि सध्याच्या लातूर जिल्ह्यातील निलंगा, औसा, लातूर व उदगीर तालुक्यातील आहे. यातील काही महिला स्वातंत्र्यसैनिकांचे पती हे स्वातंत्र्य सैनिक होते. पती भूमिगत झाल्यानंतर घर सांभाळणे, स्वातंत्र्यसैनिकांची भोजनाची व्यवस्था करणे, त्यांना गुप्त वार्ता पोहोचवणे, स्वातंत्र्यसैनिक भूमिगत होऊन आश्रयाला आल्यास त्याला लपवणे आणि त्याला सुरक्षित जायला मदत करणे आदी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. किसनराव टेके व त्यांची पत्नी गोदावरी टेके अशा स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान विसरून चालणार नाही. ५ मे १९४८ रोजी अनसिंग्यात निजामाविरोधात मोठा संघर्ष करून श्रीधर वर्तकसारख्या देशभक्ताला गमावून बसण्याची वेळ आली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी ऑपरेशन पोलो मोहिमेंतर्गत भारतीय लष्कराने चारही बाजूने हैद्राबादमध्ये सैनिक घुसवले होते. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने विनाशर्त शरणागती पत्करली. जवळपास १०९ तासांच्या संघर्षानंतर भारतीय लष्कराने हैद्राबाद संस्थान ताब्यात घेऊन भारतीय संघराज्यात विलीन केल्याने अखेर मराठवाडा निजामाच्या जोखडातून मुक्त झाला.

**जिल्हा माहिती अधिकारी, धाराशिव**

**गंगाधर मोरे आणि अनंत भालेराव यांचे वडील वैजापूरला शेजारी राहायचे. त्यांनी सांगितलेला अनंत भालेरावांचा मुक्तिसंग्रामातील अद्‌भुत प्रसंग..**

# झुंजार पत्रकार अनंत भालेराव

**बाबा भांड**

१५ ऑगस्ट, १९४७

चौदा ऑगस्ट, एकोणीसशे सत्तेचाळीस.

मध्यरात्र नुकतीच कललेली. अंधारबनाची छाया पसरलीय चहूकडे, असंख्य चांदण्यांचं कोंदण अंगाखांद्यावर लेवून.

काळोखाच्या आसमंतातील गुहा पसरतेय हात.

सर्वत्र वातावरण दबा धरून बसलेलं. कधी काळी संधी मिळेल, ह्याची वाट बघत.

गेले काही दिवस ऐकायला येतं. चहूकडे नाकेबंदी होत आली होती. काही बातम्या सांगोवांगीच्या, तर बऱ्याचशा अफवा होत्या.

गावागावांतून भीतीचं वातावरण पसरलेलं. घरांच्या भिंतीसुद्धा सादळून गेल्यात. कुठं रझाकाराची लाथ बसते, नेम नाही.

लोक अंधारात मारुतीच्या पायावर, खळ्यात अन् चार भिंतींच्या आतही, गटागटानं हळुवार चर्चा करायचे. उद्या काय होणार? कुणालाही सांगता येत नव्हतं.

एखादा-दुसरा छत्रपती संभाजीनगर-जिल्ह्याच्या गावी जाई. 'मराठवाडा' पेपर पोटात लपवून घेऊन येई. मग आठ दिवस त्याच बातम्या गावभर फिरत राहायच्या.

दिल्लीला गांधीबाबांनी असं सांगितलं. पंडितजी असं म्हणाले. लवकरच इंग्रज लोक आपला देश सोडून जाणार. मग आपणच आपले राजे. लोक बोलायचे.

काही बातम्या मात्र विचित्र असायच्या.

हैद्राबादच्या निजामानं स्वतंत्र राहायच्या हालचाली सुरू केल्या. कासिम रिझवीच्या रझाकारी फौजेनं जनतेची नाकेबंदी करण्याचा प्रयत्न जारी ठेवला. रझाकारांनी अवलंबलेल्या अनेक जुलमी प्रकारांना गावागावांतून संघटित प्रतिकार होऊ लागला.

अजिंठ्याच्या डोंगरात रांगेचं कडं करून बसलेलं पिशोर गाव बाहेरून शांत दिसत होतं. छत्रपती संभाजीनगरपासून दूर, तरीही चळवळीचं केंद्र बनलं होतं. हजार, दीड हजार वस्तीचं गाव. डोंगरांनी वेढून टाकल्याने मोटारगाडी पोचण्यास सरळ असा रस्ताच नाही. डोंगरातील दऱ्याखोऱ्यातील अनोळखी रस्त्यांवर मोर्चे बांधून अनेकदा रझाकारांना परत पळावं लागलं. रस्त्यात गारद व्हावं लागलं; पण पिशोर गावाच्या वेशीपर्यंत त्यांना जाता आलं नाही. येत नव्हतं. गेल्या पंधरा दिवसांपूर्वी कन्नडच्या फौजदारासह रझाकारांनी प्रयत्न करून बघितला; पण त्यांची दाणादाण झाली. ती बातमी औरंगाबादला पोचण्यास उशीर लागला नाही.

गावात प्रामुख्यानं घाटावर काम करणारा शेतकरीवर्ग. रामराव पाटील, पोलीस पाटील, अन् त्यांचा मुलगा अनंता हा गावातील चळवळीचा प्रमुख होता. आपल्या साथीदारांच्या मदतीनं त्यानं गावाबाहेर छोटीशी छावणीच उभारली होती.

गावात येण्यास दोन प्रमुख रस्ते म्हणजे त्यांचं नाकं. तिसरा रस्ता नव्हता गावात यायला. सगळीकडे डोंगराच्या अभेद्य भिंती.

गावातील प्रत्येक घर म्हणजे किल्ला बनला होता. नाक्यावर अनंताचं राखीव तीस-पस्तीस तरुणांचं सैन्य.

अनंताला निरोप्याकडून संदेश आला होता. एक आनंदाचा, तर दुसरा आव्हानाचा.

आनंद ह्याच्यासाठी होता, की त्यांचं फार मोठं काम झालं होतं. कालच पुण्याहून माल निघाला. प्रवरासंगमावर जावं लागणार.

दुसरा संदेश मात्र वेगळा होता.

एक-दोन दिवसांत रझाकारांची फार मोठी धाड पिशोरवर येण्याची दाट शक्यता होती.

आपल्या साथीदारांना सूचना देऊन तो निघाला. कन्नडपासून कायगावपर्यंत कन्नडची ट्रक होती. पुढची जोखीम मात्र फार मोठी होती. मध्ये वाहते गोदामाई. अलीकडे निजामाचा मुलूख. पलीकडे नगर जिल्हा. इंग्रजांचा अंमल.

आठ दिवस झाले. पावसाला तोंड लागलं. गोदामाईचं पाणी कमी होत नव्हतं.

पहिल्या दिवशी तर प्रवरा नदीचं पाणी गोदावरीच्या धूऽ धावी प्रवाहात न शिरल्यानं गावात एकच हाहाकार उडाला.

प्रवरेचं पाणी मागं तुंबत गेलं. गावातल्यांना हे नवीन नसलं, तरी म्हातारे कोतारे म्हणू लागले, आता तरी काही दिवस पाऊस उघडावा.

अलीकडच्या तीरावरचं कायगाव अंधारात निपचित पडलेलं. पलीकडच्या तीरावर प्रवरा गाव. प्रवरा आणि गोदामाईच्या मिठीत वसलं होतं टोकं गाव.

पेशव्यांच्या सावकाराचं गाव.

मध्ये वाहते आहे गोदामाई; आणि सगळीकडे साचलेलं प्रवरेचं पाणीच पाणी.

कायगावच्या मंदिराच्या ओट्यावर काहीजण डोक्यांवर कांबळी आणि हातात कंदील घेऊन उभे. पाऊस येतोच आहे. सगळ्यांच्या डोक्यांत हळूहळू चढणाऱ्या पाण्याचाच विचार.

ओट्यावर उभ्या असणाऱ्यांपैकी अनंताची चुळबुळ वाढत होती.

पाणी असंच वाढत गेलं तर? पलीकडच्या तीरावर कसं जाता येईल?

पट्टीचे डोंगावालेही अंधारात डोंगा पाण्यात घालायला तयार नव्हते.

प्रवरासंगमाच्या काठचं शंभूचं मंदिर काळोखात बुजून गेलं होतं.

मंदिरावर नेहमी फडकणारा भगवा झेंडा आता दिसणं शक्य नव्हतं.

वेळ टळत चालली होती. सकाळपर्यंत पाणी उतरलं नाही, तर

सगळा घोटाळा व्हायचा. म्हणून अनंता बेचैन होत होता.

दूर पलीकडे तीरावर थोडा जाळ दिसला. अनंता सावरला.

ब्रह्मचारी मठाच्या गच्चीवरचा तो जाळ असावा. जाळ पुन्हा थोडा मोठा झाला आणि विझला. अनंताला त्याचा काही अर्थ लागेना. भास तर नाही ना तो?

पुन्हा जाळ दिसला आणि मागं-पुढं फिरत राहिला.

अनंता सावध झाला.

खिशातून डायरी-पेन्सिल काढली. कंदिलाच्या प्रकाशात एक पान उघडलं.

समोरच्या उजेडानं आणखी काही नागमोडी वळणं घेतली. त्यानं खिशातून बॅटरी काढली.

उजेडाच्या दिशेनं चालू करून हात हलविला. बॅटरी ओट्याच्या काठावर समोर तोंड करून ठेवली. समोरचा उजेड आता नाचत होता. वेगवेगळ्या वर्तुळांत. कधी खाली, तर कधी पूर्व-पश्चिम.

अनंता छोट्याशा वहीवर पटापट नोंद घेत होता. त्याच्या शेजारचा म्हातारा म्हणाला,

'असं कधी झालं नव्हतं, भाऊ. शंभूच्या देवळावर दिवट्या दिसाव्यात.

आमचे काळ्याचे पांढरे झाले इथं, एकही दिवस असं दिसलं नाही. वेताळाच्या दिवट्या शंभूच्या डोक्यावर!'

अनंता म्हाताऱ्या बुवाकडे वळत म्हणाला,

'तसंही असेल, बाबा, कदाचित.'

कंदिलाच्या धूसर उजेडात म्हातारे-बुवांची मिशी थरारली. नाकपुडी फुरफुरली.

अनंता मनाशीच हसला.

आता समोरचा उजेड फिरणं बंद झालं होतं.

डायरीतील रेषांची जुळवाजुळव करून तो उठला. काम फत्ते झाल्याचं समाधान त्याला झालं. आता पुढची तयारी पार पाडली, म्हणजे झालं.

मग येऊ दे हजारो रझाकार! तो मनाशीच म्हणाला.

गोदामाईंच्या पलीकडील काठावरचं प्रवरासंगम गाव-अंधाराच्या चिरनिद्रेत पहुडलं होतं.

मध्येच दूरवर भुंकणाऱ्या कुत्र्याचा आवाज काळोखी शांततेला ओरखडे ओढून जाई.

गोदाकाठच्या (वडाच्या मिठीतल्या) ब्रह्मचारी आश्रमातील बहुतेक बालब्रह्मचारी आपापल्या पथारीवर अंगावरच्या लंगोटीसह पहुडले होते, अंगाची मोट करून.

आश्रमातीच्या कोपऱ्यातील शंभूच्या मंदिरावरील गच्चीवर फक्त हालचाल होती.

रात्र वाढत होती आणि कलाकलानं वाढणारं गोदामाईचं पाणी सूंऽसूंऽ करीत उफाळत होतं.

अंगणात गाय हंबरली. नुकताच पाऊस कमी झाला. अंगणात चिखल साचलेला.

परसाळीतील एक उठला. तारवटलेल्या डोळ्यानं अंगणातील गाईखाली साचलेलं पाणी परातीनं उपसून काढलं. तिच्यासमोर एक कडब्याची पेंढी सोडली. पांगलेली चिपाडं सारखी केली. टपटप आवाज करीत गाईनं शेण टाकलं. अंधारात शेणाचा घमघमाट शंभूच्या मंदिरात पाझरत गेला. काहीशा गरम वाफा सर्वत्र पसरू लागल्या. गोमूत्र पाण्यात मिसळून पाणी झालं.

मंदिरावरचा भगवा झेंडा डौलानं डोलत होता.

हातातला कंदील सावरत बाबा मंदिराच्या मागच्या बाजूच्या शिडीवरून खाली उतरत होते. कमरेत लुंगीत विझलेला टेंभा खोचलेला. अंगावर लुंगीशिवाय कपडा नसल्यानं, त्यांचा काळा रंग अंधाराशी एकजीव झाला होता.

कंदिलाच्या अंधूक प्रकाशात त्यांच्या छातीवरचे काळे कुळकुळीत केस, तेजदार डोळे आणि मानेवर रुळणारे केस उठून दिसायचे.

गळ्यातला रुद्राक्षाचा एकुलता एक मणी, बाबा पायऱ्यांवरून उतरताना मागंपुढं हालत होते. पायांतील खडावांचा टक् टक् आवाज अंधारातील एकांतावर ठोके देत होता.

बाबा अंगणात आले, तेव्हा समोरच्या वडाच्या झाडातून काहीतरी फडफडत गेलं. मागे उरला फक्त पानांचा आवाज.

बाबांनी तिरक्या नजरेनं वर बघण्याचा प्रयत्न केला. काळोखातील विशाल पोकळीशिवाय डोळ्यांत काही मावत नव्हतं.

बाबांनी कंदील पायरीवर ठेवला.

समोर प्रवरा नदी तुंबलेली. उजव्या बाजूला गोदामाईचा प्रचंड जलाशय. समोरचं टोकं गाव पाण्यानं वेढलेलं आणि अंधारानं गिळलेलं. डाव्या बाजूला उतारावरून पाण्याचा खळखळाट ऐकू येतोय. प्रवरेचं पाणी उतार मिळेल तिकडे वाट शोधतंय. ब्रह्मचारी आश्रम चोहोबाजूंनी पाण्यानं वेढून टाकलाय.

बाबांना ह्याचं काही वाटलं नाही.

पाण्याच्या पातळीपासून आश्रम अंदाजे वीस फूट उंचीवर होता. म्हणजे इतकं पाणी कधीच चढणं शक्य नव्हतं.

बाबांनी गळ्यातील मणी उगीच चाळवला. एक झटका देऊन पाटीवर फेकून दिला. कमरेला आतापर्यंत तसाच असलेला विझलेला टेंभा काढून पायरीवर ठेवला.

समोरच्या एका गावात एक दिवा मिणमिणत होता. निबिड अंधारातही काही आवर्तनांची चाहूल तर नसावी ना? बाबा मनाशी म्हणाले.

कदाचित तो आमचा दीपस्तंभ असावा. कदाचित प्रलयाग्नीचा वंशजही.

बाबा स्वत:शीच हसले.

'जय शंभो, असंही तुझ्या मनात असेल, तर कृतार्थतेनं फाटक्या झोळीत स्वीकारायला हवं.'

वडाच्या वरच्या पानांत पुन्हा फडफड झाली; पण त्यांनी वर बघितलं नाही. अशा अंधारात काहीच दिसणार नाही. फक्त वडाचं झाड मूळ पारंब्यांसह डोळ्यांत रुतून बसेल. गेल्या काही वर्षांचा भूतकाळ पाठशिवणी करू लागेल. साऱ्या घटना गोदामाईच्या पाण्यातील भोवऱ्याप्रमाणे गरगरून समोर यायच्या. आणि बाबा त्यात बुडून जात. तरीही काही प्रश्नांची उकल बाबांना होत नव्हती.

आपण हे व्रत का स्वीकारलं? गेले काही दिवस आपण जे काही झपाटल्या सारखं करतो आहोत, त्याला काही अर्थ आहे



का?

दूरवर बघत बाबा पुन्हा हसले.

त्यांना माहीत होतं. हे प्रश्न आता नवीन नव्हते. उत्तर माहीत नसलं, तरी. नाही तरी प्रश्न-उत्तरं तरी काय आहेत? उलट सुलट फिरणारे भोवरेच ना?

एकदा त्यांत अडकलो, की फिरणं आलंच. कधी उलटं, तर कधी सुलटं. फरक काय तो एवढाच.

तिकांड कलण्याची वेळ झाली, वडाच्या फाटाळलेल्या फांद्यांच्या मधून वर बघताना त्यांच्या लक्षात आलं.

'फाटाळलेली जागा भरून काढता येत नाही पुन्हा,' ते म्हणाले.

रात्र सरपटत होती.

गेले काही दिवस बाबांवर कामाच्या जोखमीचं ओझं वाढत होतं. आश्रमातील अध्यापनात त्यांचं लक्ष लागत नव्हतं. नाही तरी अध्यापन, आश्रम वगैरे काही खरी कामं नव्हतीच. ते एक बाहेरीलपण होतं.

सकाळपर्यंत अनंता यायला हवा होता. त्याला निरोप पोहोचला, की तो निघणार आणि ठरलेल्या वेळी कायगावला येणार, हे त्यांना माहीत होतं. आपण कोडवर्ड देणार वगैरे ठरल्याप्रमाणे झालं.

आज पाणी कमी झालं असतं, तर उजाडण्यापूर्वीच त्याला परत जाता आलं असतं.

बाबा मनात कामाची जुळवाजुळव करीत होते.

नाही तरी घरदार-शेतीवाडीपेक्षा आपण करतोय, ते चांगलं नाही का! गावात राहून जे करता आलं नसतं ते आपण करत आहोत आणि आता माघारी फिरणं शक्य नव्हतं.

मनाची तयारी करून ते उठले. कमरेची लुंगी मुडपून कमरेला नीट खोवली. पायरीवरील कंदील उचलला. पाण्याचा तुंब जेथपर्यंत आला, तेथपर्यंत ते आले.

पाण्याची एक हळुवार लाट आली आणि बाबांचे पाय धुऊन निघाले. काहीशा उबदार पाण्यानं एक शिरशिरी सर्वांगातून निघून गेली.

'पाणी वाढलं तर नाही ना!' ते स्वत:शीच पुटपुटले.

समोरच्या वडाचं खोड कासराभर अंतरावर राहिलं.

'जय शंभो,' म्हणत ते एक एक पाय पाण्यात टाकू लागले.

तिसऱ्या पावलाला पाणी गुडघ्यांच्यावर लागलं. लुंगीचा समोरचा भाग पाण्यानं भिजतो आहे, हे त्यांच्या लक्षात येताच, लुंगी खसकन फेडून खांद्यावर टाकली.

पाणी बेंबीच्या जवळ आलं होतं आणि वडाचा बुंधा फक्त हाताच्या अंतरावर होता.

मधेच एक पारंबी डोक्याला लागून गेली. ते दचकले नाहीत, तरी ह्या अनपेक्षित स्पर्शानं त्यांना आत कुठं तरी धक्का दिला. खोडाशी येताच त्यांना बरं वाटलं.

एका हातात कंदील.

दुसरा हात पाण्यात घालून काही चाचपडून बघण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पाणी हनुवटीला लागताच पाण्यातला हात बाहेर काढला.

हातात कंदील नसता, तर पाण्यात बुडी मारली असती, त्यांच्या डोक्यात विचार येऊन गेला.

पुन्हा वाटलं, ह्या कंदिलामुळं इथपर्यंत येता आलं. गळ्यातला रुद्राक्षाचा एकुलता एक मणी हातानं चाळवताना ते शहारले.

चटकन लुंगीच्या एका टोकाला कंदिलाची कडी बांधली. दुसरं टोक पारंबीला घट्ट बांधलं.

कंदील पारंबीला हलकासा झोका घेऊ लागला. चहूबाजूला पाणीच पाणी आणि कंदिलाच्या खालच्या बाजूला अंधाराचं गरगरणारं वर्तुळ.

हलणाऱ्या कंदिलाकडे बाबा बराच वेळ बघत होते.

मध्येच एक पतंग कंदिलाच्या काचेवर झडप घालतो. हातानं पतंगाला हाकलावं, म्हणून ते दोन्ही हात मागं-पुढं हलवतात. डावा हात पाण्याला लागून तापलेल्या काचेवर काही शिंतोडे उडतात. चऽर चऽर-

तिला बघून आपणांस असंच झालं.

विसरायचं म्हटलं, तरी ते बाहेर पडू शकत नव्हते. ते एक चक्र होतं. स्वतःच्या आरीभोवती फिरणारं. आज तीन वर्षं होत आहेत. दिवस पळताहेत येणाऱ्याचा पाठलाग करीत.

बाबांचं चांगलं चाललं होतं. गावातल्या पंधरा-वीस पोरांची शाळा.

पोरांना अभ्यास शिकवण्यापेक्षा बाबांचं शिकवणं वेगळं होतं.

सकाळी व्यायाम. नंतर प्रभातफेरी. सामुदायिक प्रार्थना. गांधीबाबा-नेहरूंच्या गोष्टी सांगणं. मुसलमानांच्या जुलमाविरुद्ध पोरांची मनं तयार करणं. रात्री भजनात तुकडोजीबाबांची अन् सानेगुरुजींची गीतं म्हणणं.

बाबांची ही हालचाल लक्षात यायला उशीर लागला नाही. रविवार, बाबा शेजारच्या गावी बाजाराहून परतले. घर समोर दिसत होतं. धुरानं वेढलेलं. ते पळत दारापर्यंत आले. बायकोचं भाजलेलं वांगं झालं होतं.

त्यांच्या समोर तिचं प्रेत घोड्याला बांधून फरफटत नेलं.

काय होतं आहे, ते समजण्यापूर्वी डाव्या पायात बंदुकीची गोळी येऊन लागली.

शुद्धीवर आले, तेव्हा समोर पडल्या होत्या फुटलेल्या बांगड्यांच्या काचा अन् गावातल्या अर्धवट जळालेल्या भिंती.

बाबांनी वर बघितलं. काळ्याशार वडातून असंख्य तारे डोळे उघडझाप करीत होते. वडाच्या फाटाळलेल्या जागी मात्र खळंभर टपोरे जोंधळे पसरावे, तशा चांदण्या विखुरल्या होत्या.

फाटाळलेल्या गतकाळाच्या घटना मनात कुठं तरी खिंडार पाडून जातात आणि असहायतेची बोच वाढत जाते. आपण आता तरी ती घटना विसरलो पाहिजे.

ते पुन्हा पाण्यात वाकले. रुद्राक्षाचा मणी पाण्यावर तरंगू लागला.

खोडाभोवती त्यांनी चांगलं चाचपून बघितलं. वरच्या पंखाच्या फडफडीशिवाय हाती काही लागत नव्हतं. आवाजाच्या दिशेनं त्यांनी वर बघितलं. दोन तेजस्वी लोलक तुटून खाली आल्याचा त्यांना भास झाला. पुन्हा बघितलं. ते लोलक कंदिलाला चिकटले असावेत.

दुसऱ्या क्षणी घू घू आवाज.

'जय शंभो! हे लक्षण ठीक नाही...' म्हणत ते पचकन थुंकले. थुंकी पाण्यावर तरंगत हेलकावे खाऊ लागली. पाण्यावर विरत जाऊन बेंबीला लागली.

मनाची तयारी करून त्यांनी पाण्यात पुन्हा एक वेळ हात घातला. भिजलेल्या फडक्यात बांगड्याच्या काचा हाताशी येताच, कंदील सोडून ते पाण्याबाहेर आले.

बाबा आश्रमात आले, तेव्हा पूर्वेकडे तांबडं फुटण्यास काही वेळ बाकी होता.

त्यांची चाहूल लागताच अंगणातील गाय ताडकन उभी राहिली.

ते पसाळीतील मागच्या खोलीत आले. बळदाचा दरवाजा उघडून त्यांनी कंदिलाच्या प्रकाशात कोपऱ्यातील गठुडं बघून घेतलं.

'जय शंभो, अनंता येईपर्यंत जपायला हवं.' म्हणत त्यांनी दार बंद करून घेतलं.

कासराभर सूर्य वर आल्यानं बाबांच्या खोलीतल्या खिडकीतून एक लांब कवडसा आत आला.

'जय शंभो' म्हणत ते उठून बसले. दोन्ही पाय पसरून बसले. एका-दोन वेळा जमिनीला डोकं लावलं. अंगाला आळोखे-पिळोखे देऊन उभे राहिले.

रात्रीच्या प्रसंगाच्या आठवणीनं बाबांना हसू आलं. डाव्या हातानं दाढी वरून हात फिरवून त्यांनी समोर बघितलं.

समोरचं दार अर्धवट लोटलेलं होतं. बाजूच्या पाठशाळेत पोरांचं पठन ऐकू येत होतं.

खुंटीवरची लुंगी गुंडाळून ते बाहेर पडले.

मोठ्या दारात येताच, त्यांचं लक्ष समोर गेलं. फक्त ओली व निसरडी जमीन.

मग रात्रीचं स्वप्न तर नव्हतं ना! ते अथांग पाणी. आपलं भारावल्यासारखं वडापर्यंत जाणं. फाटाळलेल्या फांद्यांतून निबिड अंधारात खिळे मारलेल्या चांदण्या बघणं.

आता त्यापैकी काही शिल्लक नव्हतं. होती फक्त ओली जमीन.

समोरचं टोकं गाव आता ताजंतवानं दिसत होतं आणि उजव्या बाजूला गोदामाईचं पाणी बरंच कमी झालं होतं.

दुपारी पाऊस आला नाही, तर संध्याकाळपर्यंत अगदी नेहमीच्या पातळीवर पाणी येईल.

एक एक पाय सांभाळीत ते चालू लागले.

आश्रमाचा भाग सोडताच खडावांना चिखल लागून त्या जड झाल्या.

आपल्या आठवणीसुद्धा अशाच असतात, अवेळी न कळत चिकटून जाणाऱ्या.

चालणं अशक्य झालं, तेव्हा खडावा तिथंच सोडून ते चालू लागले.

आणखी पुढं गेल्यानंतर पक्क्या पायऱ्या लागल्या.

यांचं बरं आहे. कितीही पाणी वाहून गेलं, तरी पायऱ्यांना त्याचं काही नाही. नाही तर ह्या दरडीचं कसं? कधी ढासळतील, ह्याचा नेम नाही. माझ्यासारख्या.

बाबांनी लुंगी सोडली. हात जोडले आणि पाण्यात सूर मारला. पाण्याबाहेर आले. पूर्वेकडे तोंड करून हात जोडले.

समोरून अनंता येत होता.

अंगावर फक्त कमरेला चड्डी. तळपत्या उन्हात त्याचा गोरा रंग तकाकत होता.

अंग सुकलं, तरी चड्डी ओलीच होती.

जवळ येताच त्यानं बाबांच्या पायाला स्पर्श केला.

'असलं धाडस कशाला केलं, देवा!' बाबा म्हणाले.

काही न बोलता अनंता फक्त हसला.

नुकतंच स्नान केलेला बाबांचा भरदार बांधा त्याचं लक्ष खिळवून टाकीत होता.

बाबांना तो काही आजच प्रथम भेटत नव्हता. ह्यापूर्वी एक-दोनदा अशाच कामासाठी भेट झाली होती; पण अंधाऱ्या रात्री.

अंधाऱ्या रात्री काळ्या सावलीसारखी दिसणारी बाबांची आकृती, तळपत्या उन्हात बघून तो मनात हरकून गेला.

अनंताच्या खांद्यावर हात ठेवीत ते म्हणाले,

'देवा, कसं येणं केलं अशा खळाळत्या पाण्यातून? आम्ही आत येणारच होतो डोंगा घेऊन.'

'एक डोंगावाला तयार झाला होता सकाळी; पण ऐनवेळी गावात दोन घोडेस्वार आले. सगळ्यांची झडती चालू झाली. गावाच्या खाली एक मैल अंतरावर जाऊन पोहत यावं लागलं.' अनंतानं माहिती दिली.

दोघे आश्रमाकडे परतू लागले. ठोऽ आवाज झाला. त्यासरशी दोघे पोटावर पडले. पुन्हा दोन आवाज झाले. थोड्या वेळानं बाबांनी मान वर करून चाहूल घेतली. पलीकडच्या तीरावर दूर जाणाऱ्या घोडेस्वाराकडे बघत ते म्हणाले,

'देवा, वेळीच नाल ठोकले पाहिजेत ह्यांच्या पायांना!'

घोडे दूर गेल्यानंतर ते उठले.

काळ्याशार बाबांच्या छातीला ओली माती चिकटली होती. ते पुन्हा पाण्यापर्यंत आले. हलक्या हातानं छाती, गुडघे, हातांच्या तळव्यांना लागलेली माती धुऊन परत आले.

रात्री मुलं परसाळीत झोपल्यानंतर बाबा उठले. सगळीकडे सामसूम होती.

बळदातील जड ओझं बाहेर काढलं.

आश्रमातील त्यांचा सहकारी जयंताला डोंगा तयार करायला सांगितलं.

अनंतानं काही विचारण्यापूर्वी ते म्हणाले,

'देवा, जपून जा. यादीप्रमाणे बरोबर आहे सगळं.'

टोक्याला माल ट्रकमधे टाकून अनंता व जयंता आत चढले. ट्रक दिसेनासा झाल्यानंतर बाबा परतले.

पूर्वेला तांबडं फुटण्याची वेळ.

अनंता आणि जयंता पाठीवरच्या बोचक्यासह डोंगरातून तोल संभाळीत चाललेले.

गावात पोचायला अर्धा तास सहज लागेल.

अंधूक प्रकाशात जयंताकडे बघत अनंता हसला.

तोंडावर रुळणाऱ्या लांब केसांच्या बटा पाठीवर टाकीत जयंत ओझं सांभाळीत अनंताशी पाय जुळवून चालू लागला.

'काय, महाराज, ओझं झालं ना?' अनंतानं विचारलं.

आत वीस-पंचवीस मिनिटात घरी.

ऐकून जयंताला हायसं वाटलं. गावाजवळचा मुख्य रस्ता सोडून अनंता पाऊलवाटेनं वर आला. बाजरीच्या उभ्या पिकातून ओली माती तुडवीत चालू लागला. वरच्या वेशीतून दोघं गावात शिरले.

आता चांगलं फटफटलं होतं. गावात अजून सामसूम होती. घराच्या समोरच्या दारानं आत न येता, मागच्या दारानं पत्र्यात जायचं ठरवून तो मागच्या गल्लीत वळला. त्यांची चाहूल लागताच कुत्रं चवताळून अंगावर आलं. मोत्या मोत्या म्हणताच ते पायांत शेपटी घालून समोर आलं. गोठ्यातील पत्र्याचं दार आतून बंद होतं.

'रामा, दार उघड!'

दार उघडताच ते दोघे आत आले. पाठीवरील ओझं कोपऱ्यात भुसाखाली झाकून ठेवण्यापूर्वी त्यांतला एक पिस्तोल काढून घेतला. कमरेला शर्टखाली खोचला.

'रामा, लक्ष ठेव. मी परत येईपर्यंत इथून हलू नकोस,' सांगून ते बाहेर पडले.

घराचं मागचं दार वाजवलं.

मधल्या चुलत्यांनी दार उघडलं. दोघे आत आल्यानंतर दार बंद झालं. चुलते काही बोलले नाहीत. अनंताला त्याचं काही वाटलं नाही. नेहमी तो रात्री अपरात्री यायचा. सगळ्यांना ते माहीत होतं.

कधी तरी फक्त आजी विचारायची.

अनंता समोरच्या बैठकीत आला. सगळे गप्प होते.

कपाटातला रेडिओ सुरू केला.

जन गण मन लागलं होतं.

त्यानंतर त्यानं ऐकलं, त्यामुळं तो ताडकन उडाला.

भारत स्वतंत्र झाला. दीडशे वर्षांची गुलामगिरी संपली.

लपवाछपवी संपली.

काय करावं, त्याला सुचेना, दोघे इकडे तिकडे वेड्यासारखे पळत होते.

काहीतरी आठवून अनंता बैठकीबाहेर आला. चौक ओलांडून वडिलांच्या खोलीत आला.

वडील घोंगडीवर पडून आढ्याकडे बघत होते. दोघे चुलते बाजूला बसलेले.

अनंता आल्याचं बघून वडिलांनी अंग वळविलं.

'कधी आलास?' त्यांनी विचारलं.

आत्ताच. सांगताना अनंताच्या डोक्यात वादळ घोंगावत होतं.

अनंता पुढं आला. वडिलांच्या पायाला स्पर्श करण्यासाठी वाकणार, तोच त्याला दिसलं.

पायांजवळचं अंथरूण रक्तानं भिजलं होतं. आणि आत होते फक्त घोट्यापासून तोडलेले पाय.

'बाबा, आपण स्वतंत्र झालो!' हे त्याच्या ओठांवर आलेले शब्द विझून गेले.

'अनंता, यज्ञाला सुरुवात झाली आता.' कळ सहन करीत वडील म्हणाले, 'भारत स्वतंत्र झाला; पण निजामानं स्वतंत्र राहायचं जाहीर केलं. खरी गुलामगिरी आताच सुरू झाली.'

अनंताच्या डोळ्यांसमोर वडिलांचे घोट्यापासून तोडलेले पाय अन् गोठ्यातील शस्त्रांचं गाठोडं.

दुसऱ्या यज्ञाला सुरुवात झाली होती...

**ज्येष्ठ लेखक, छत्रपती संभाजीनगर.**

**हैद्राबाद मुक्तिसंग्राम, स्वातंत्र्य सैनिक, स्मारके हे शब्द कानावर पडल्यानंतर तो काळ अक्षरशः जगलेल्या व्यक्तींच्या आयुष्यात डोकावून पाहणे आणि मग नंतर त्यांच्या असीम धाडसाचे, त्यागाचे मनोमन कौतुक करणे अशा सगळ्या टप्प्यांमधून अनेकांनी प्रवास केलेला आहे. १७ सप्टेंबर हा दिवस त्या मुक्तिसंग्रामाचे मौलिक स्मरण करण्याचा दिवस. त्या दिवशी त्या सगळ्या सैनिकांच्या विषयी एक व्यापक अशी कृतज्ञतेची जाणीव मनात साठते. हैद्राबाद मुक्तिसंग्रामात स्त्रियांनी महत्त्वाची कामगिरी बजावली होती, हे पाहिले की डोळे दिपून जातात. अशाच स्वातंत्र्य सेनानी म्हणजे डॉ. ताराबाई परांजपे. त्यांनी वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षीच कांचनमुक्तीचे व्रत स्वीकारले होते.**

# कांचनमुक्त तारा

**डॉ. वृषाली किन्हाळकर**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात जन्मलेल्या पिढ्यांना, स्वातंत्र्यपूर्व काळातील जगणे संपूर्णपणे कळू शकत नाही. केवळ इतिहास वाचणे आणि त्या जुन्या काळातील मानवी भावभावना समजून घेणे यात खूप फरक आहे.

हैद्राबाद मुक्तिसंग्राम, स्वातंत्र्य सैनिक, स्मारके हे शब्द कानावर पडल्यानंतर तो काळ अक्षरशः जगलेल्या व्यक्तींच्या आयुष्यात डोकावून पाहणे आणि मग नंतर त्यांच्या असीम धाडसाचे, त्यागाचे मनोमन कौतुक करणे अशा सगळ्या टप्प्यांमधून अनेकांनी प्रवास केलेला आहे. १७ सप्टेंबर हा दिवस त्या मुक्तिसंग्रामाचे मौलिक स्मरण करण्याचा दिवस. त्या संग्रामात स्वतःच्या आयुष्याची महत्त्वाची वर्ष व्यतीत करणारी, जीवाचा धोका पत्करून तळमळीने काम करणारी माणसे होती.

सगळ्यांचीच नावे माहीत नसली, तरीही त्या दिवशी त्या सगळ्या सैनिकांविषयी एक व्यापक अशी कृतज्ञतेची जाणीव मनात साठते. मुळातच मराठवाडा हा भाग तसा मागासलेलाच होता. आजही काही प्रमाणात इतर मराठी प्रदेशापेक्षा मराठवाड्यात मागासलेपणाच्या खुणा सापडतातच. तरीही हैद्राबाद मुक्तिसंग्रामात स्त्रियांनी महत्त्वाची कामगिरी बजावली होती, हे पाहिले की डोळे दिपून जातात.

स्त्रियांना शिक्षणाची, खुलेपणाने बाहेर फिरण्याची फारशी मुभा नसण्याचा तो काळ होता. तरीदेखील या स्त्रिया पुरुषांच्या इतक्याच उत्साहाने, देशप्रेमाच्या उत्कट भावनेने, जोखमीची कामे करत होत्या, हे वाचून ऐकून ऊर अभिमानाने, कौतुकाने भरून येतो. मी प्रत्यक्ष पाहिलेल्या, अनुभवलेल्या स्वातंत्र्यसेनानी म्हणजे डॉ. ताराबाई परांजपे. नांदेडला १९८६ ला मी माझा वैद्यकीय व्यवसाय सुरू केला, तेव्हापासून ताराबाईंचे नाव मी ऐकत होते. पुढे शहरातील साहित्यिक कार्यक्रमांमधून परिचय व नंतर भेटी होत राहिल्या.

'संन्यस्त स्वातंत्र्यसेनानी पूज्य स्वामी रामानंद तीर्थ' हे त्यांचे पुस्तक मला अतिशय आवडले होते.

ताराबाईंना जेव्हा जेव्हा मी बघायची, तेव्हा तेव्हा प्रकर्षाने एक गोष्ट लक्षात यायची ती म्हणजे त्या कधीही सोन्याचे अलंकार वापरत नसत. या गोष्टीचे मला कुतूहल वाटायचे.



डॉ. तारा परांजपे

मग उपरोक्त पुस्तकाच्या वाचनानंतर मला कळले की, त्यांनी वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षीच कांचनमुक्तीचे व्रत स्वीकारले होते. १६ व्या वर्षी किती समज असते बरं मुलींना? अन् खरे तर मुलींना त्या अवखळ वयात नटण्या-मुरडण्याची केवढी हौस असते?

बालपणापासून अगदी हलाखीची परिस्थिती अनुभवलेल्या ताराबाई अगदी त्याच नटण्या-मुरडण्याच्या वयात नोकरीला लागल्या अन् सबंध घराचा आधाराचा खांब बनल्या.

स्वामी रामानंद तीर्थ यांना प्रथम पाहण्याचा योग ताराबाईंना आला तो खरे तर बकुळ फुलांच्या मोहाने! बकुळीची फुले गोळा करायला मैत्रिणीसोबत त्या ज्या वाड्यात जायच्या, तिथेच स्वामी रामानंद तीर्थ राहायचे.

त्यांना पाहिले अन् १४ वर्षांच्या ताराबाईंना वाटले की, जी बकुळीची फुले गोळा करण्यासाठी आपण या घराजवळ आलो तिथे लिहीत बसलेले जे व्यक्तिमत्त्व पाहिले ते तर बकुळ फुलासारखेच आहे! एकदम पटकन मनात न भरणारे मात्र सौम्य सुगंध देणारे व्यक्तिमत्त्व. तो सुगंध मात्र दीर्घकाळ टिकणारा!

खरोखरच स्वामी रामानंद तीर्थ यांच्या अनन्य देशभक्तीचा अन् कार्यकर्तृत्वाचा सुगंध कित्येक वर्षे टिकून राहील असाच आहे.

स्वामी रामानंद तीर्थ यांच्या सहवासात राहण्याचा, त्यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभण्याचा सुयोग ताराबाईंच्या भाळी लिहिलेला होता. घरच्या तंग आर्थिक वातावरणामुळे ताराबाई खादी भांडारात नोकरी करायच्या. तिथेच स्वामी रामानंद तीर्थ यांच्याशी प्रत्यक्ष परिचय झाला आणि मग प्रौढ शिक्षणाच्या कामात स्वामी रामानंद तीर्थ यांनी ताराबाईंना गुंतवले अन् जराशी आर्थिक मदतही त्यामुळे ताराबाईंना झाली.

पुढे मग अच्युतराव देशपांडे आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्याशी वारंवार भेटी होत गेल्या अन् १६ व्या वर्षीच ताराबाईंनी कांचनमुक्तीचे अवघड व्रत घेतले! प्रत्यक्ष मुक्तिसंग्रामात भाग घेण्याचे मार्गदर्शन ताराबाईंना भाऊसाहेब वैशंपायन यांनी केले.

नाशिकला जाऊन त्यांनी रीतसर प्रशिक्षण घेतले. महिलांना मुख्यत्वे गटसभा घेणे, पत्रके वाटणे, संग्रामासाठी निधी गोळा करणे अशी कामे होती. गटसभेसाठी कधी वक्ते मिळाले नाहीत, तर स्वतःच विचार मांडावे लागत. ताराबाई तडफदारीने सगळी कामे करत. निजामविरोधी वातावरण तयार करण्याच्या कामी हिरिरीने पडेल ते काम करत. एकदा निधी गोळा करत करत त्या चक्क एका मुसलमान घरातच गेल्या. दाराशी तेलंगणातील रांगोळी दिसल्याने त्यांना वाटले की सबंध गल्लीच हिंदूंची आहे! घरात जाऊन त्या निजामी जुलमांबाबत बोलू लागल्या आणि मग ती माणसे चिडली! सुदैवाने एक वयोवृद्ध गृहस्थ तिथे होते. त्यांनी केवळ ही मुलगी असल्यामुळेच वातावरण शांत केले आणि ताराबाईंना जायला सांगितले. त्या चिडलेल्या माणसांपुढे ताराबाईंचे काय झाले असते याचा विचार केला तरी आपल्या अंगाचा थरकाप उडतो!

अशा अनेक धोक्याच्या प्रसंगांमधून ताराबाई गेल्या! एकदा एक सायक्लोस्टाइलची मशीन एका घरातून दुसऱ्या घरात हलवायच्या कामी त्यांनी पूर्ण तेलंगणातला पोशाख केला होता आणि पद्माकर लाठकरांच्या सोबत पोलिसांना गुंगारा देत देत ते मशीन सुरक्षित ठिकाणी नेले होते. ते जड मशीन भांड्याकुंड्याच्या पोत्यात ठेवून डोक्यावर घेऊन त्या कितीतरी अंतर चालत गेल्या होत्या.

एकदा अशीच निजामाविरोधी पत्रके लपवण्याची वेळ आली तेव्हा ताराबाईंनी वाड्यातल्या मोलकरणीच्या मुलांना पत्रकांवर झोपवले व वरून पांघरून टाकले. मोलकरीणीनेदेखील सहकार्य केले, हे ही विशेषच! मात्र ताराबाईंच्या खोलीत स्टेन्सिलस मिळाल्यामुळे तत्काळ त्यांच्यासाठी वॉरंट निघाले आणि मग त्या भूमिगत झाल्या होत्या. पोलिसांच्या भीतीला न जुमानता भूमिगत असूनही त्या बैठका घेत असत. हैद्राबादेतच राहत असत. एकदा पोलिसांची धाड आली आणि भिंतीवरून उडी मारून पळून जाताना ताराबाईंना पायाला मोठी दुखापत झाली होती. मुंबईहून मनमाडला शस्त्रास्त्रे पोहोचवण्याचे अतिशय जोखमीचे कामदेखील त्यांनी अनेकवेळा केले. अशाच कामांच्या धावपळीतच त्यांच्या आईने ताराबाईंचे लग्न करण्याचे ठरवले.

स्टेट काँग्रेसचे पूर्णवेळ कार्यकर्ते श्री.नागनाथराव परांजपे यांच्याशी ताराबाईंचा विवाह २६ जानेवारी १९४७ रोजी झाला. या दाम्पत्यावर स्वामीजींनी आयुष्यभर आपल्या मायेची सावली धरली होती. स्वतः स्वामीजींनी लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर आजन्म ब्रह्मचर्य पाळून देशसेवेसाठी आयुष्य खर्ची घालण्याची शपथ घेतली होती, तेव्हा त्यांचे वय होते केवळ १७ वर्षांचे!

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झालेल्या ताराबाईंनी हैदराबाद मुक्तिसंग्रामात ज्या तडफदारपणे काम केले, ते पाहिले की लक्षात येते की कोवळ्या वयात अशा अलौकिक व्यक्तीच्या सहवासात राहता आले, तर आयुष्य किती उजळून निघते!

मुक्तिसंग्रामाची यशस्वी सांगता झाल्यानंतरच्या काळातदेखील लौकिक जीवनात मोह भोग यांचे पाश दूर ठेवणे ताराबाईंना आयुष्यभर जमले आणि स्वतः बरोबरच त्यांनी इतर अनेक स्त्रियांचे आयुष्य शिक्षणाद्वारे विकसित केले! नांदेड येथे स्वामीजींनी नांदेड एज्युकेशन सोसायटी स्थापून त्याअंतर्गत पीपल्स महाविद्यालयाची स्थापना केली.

ताराबाईंनी मुक्तिसंग्राम संपल्यानंतर स्वतः नोकरी करत शिक्षणही घेतले. एम. ए., पीएच.डी. करून पुढे त्यांनी बी.एड्. केले. त्यानंतर स्वामीजींच्या आदेशानुसारच त्यांनी नांदेडला शाळेत शिक्षिकेचे काम पत्करले. स्वामीजींनी सांगितले, 'आपला राजकीय लढा आता संपला आहे. आता दुसरा लढा समाज परिवर्तनाचा आहे. तू नांदेडला जाऊन समाजाच्या परिवर्तनासाठी आता शिक्षणाचे माध्यम निवड.'

पुढे १९६४ साली त्या सरकारी नोकरी सोडून पीपल्स महाविद्यालयात मराठीच्या प्राध्यापक झाल्या.

१९८२ साली त्यांनी याच महाविद्यालयाचे प्राचार्यपद स्वीकारले! तसे तर नांदेडला आल्यापासूनच ताराबाई समाजसेवेत होत्याच. मुक्तिसंग्राम ऐन भरात येण्याच्या काळातही त्यांचे प्रौढ शिक्षणाचे काम अतिशय नेटाने चालू होतेच. ते आयुष्यभर त्यांनी अतिशय समरसतेने केले. जातिभेद त्यांच्या मनात कधीच नव्हता आणि स्वामीजींच्या सहवासाने, मार्गदर्शनाने ताराबाईंचे व्यक्तिमत्त्व आणि विचार सातत्याने अधिक डोळस, कार्यप्रवण होत गेले.

ताराबाईंनी 'बालसदन'देखील फार तळमळीने चालवले. स्वातंत्र्य सैनिक म्हणून त्यांना मिळणारे निवृत्तिवेतन त्या या अनाथ मुलांसाठी खर्च करत असत.

त्यांच्या घरी प्रेमाने वाढलेल्या मुलांचे जगणे, शिक्षण आणि सुयोग्य संस्कारांमुळे एका सुघड अवस्थेपर्यंत जाऊ शकले. आपल्या पायावर उभे राहून स्वतःला सक्षम करणारी ही मुले म्हणजे ताराबाईंच्या नितळ, निर्भेळ माणुसकीची साक्ष आहेत. वयाच्या १६ व्या वर्षी सुवर्ण अलंकाराचा मोह आयुष्यभरासाठी सोडून देणाऱ्या ताराबाई म्हणजे एक महान आदर्श आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हते तरीही स्वयंस्फूर्तीने शिक्षण घेऊन अनेकांना शिक्षण स्वावलंबनाचा पथ दाखवणाऱ्या ताराबाईंना एक खंत होती. त्यांना आशा होती की, शिक्षणाने माणसे सुसंस्कृत स्वावलंबी होतील, त्याचबरोबर समाजाभिमुखही होतील. सामाजिक जाण ठेवून काही सकारात्मक सेवाभावी कार्य करण्यासाठी उद्युक्त होतील, मात्र दुर्दैवाने असे घडले नाही. अनेक वर्षे माजघरात बंदिस्त असणारी स्त्री, शिक्षण मिळाल्यावर स्वतंत्र सक्षम झाली, मात्र ती आत्मकेंद्रित राहिली. आणखी एक गोष्ट म्हणजे माणसांची भौतिक लालसा वरचेवर वाढत गेली. माणसांनी पदव्या मिळवल्या. घराघरात सुबत्ता आली मात्र माणसे उत्तरोतर संकुचित विचारसरणीची बनत गेली. देशप्रेम, त्याग, सचोटी, सत्य या गोष्टी कालबाह्य होत चालल्या आहेत, याचे दुःख ताराबाईंना वाटायचे. तरीही त्या आशावादी होत्या. समाजात बदल होईलच असे त्यांना वाटायचे. 'वो सुबह कभी तो आयेगी' या पंक्तीवर त्यांचा अढळ विश्वास होता. त्यांची ही आशा, खरी ठरावी, यासाठी प्रत्येक माणसाने भौतिक सुखांची क्षणभंगुरता समजून घेऊन सद्गुणांची जोपासना करण्याचा प्रयत्न करावा आणि आपल्या जगण्यात गरजा आणि मोह यांचा एक उत्तम समतोल साधावा हीच या लढाऊ, त्यागमयी, कांचनमुक्त ताराबाईंना उचित श्रद्धांजली ठरेल!

**ज्येष्ठ लेखिका, नांदेड**

**सरदार वल्लभभाई पटेल यांच्या आदेशानुसार १३ सप्टेंबर १९४८ रोजी फौजांनी निजामास चारी बाजूंनी घेरण्यास सुरुवात केली. भारतीय फौजा निजामाच्या संस्थानात घुसू लागल्या. फौजेपुढे निजामाचे सैन्य कुचकामी ठरले. माघार घेऊ लागले. हैद्राबाद संस्थानचे सेनाप्रमुख यांनी १७ सप्टेंबर १९४८ रोजी शरणागती पत्करली आणि निजाम शरण आला. हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात सामील झाले. हैद्राबाद मुक्तिसंग्रामास यश मिळाले.**

# हैद्राबाद मुक्तिसंग्राम अमृतमहोत्सव

**डॉ. राजू पाटोदकर**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी संपूर्ण भारत देश स्वातंत्र्याची पहाट मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरी करत होता; परंतु हैद्राबाद प्रांत मात्र पारतंत्र्यांच्या बेडीत अडकून होता. हैद्राबादचा निजाम हा आपल्या आधिपत्याखालील हैद्राबाद संस्थानाला स्वतंत्र भारतामध्ये विलीन करून देण्यास इच्छुक नव्हता. निजामाच्या आधिपत्याखाली मराठवाडा म्हणजे त्या काळातील ५ जिल्हे छत्रपती संभाजीनगर, परभणी, नांदेड, बीड आणि धाराशिव होते. या भागातील जनता मात्र मोठ्या आशेने स्वातंत्र्याची वाट पाहत होती. निजाम जुलमी राजवट व रझाकारांच्या माध्यमातून पाहिजे तसा अन्याय अत्याचार जनतेवर करत होता. त्याला जनता कंटाळली होतीच, त्यांच्या मनातील स्वातंत्र्याचा आक्रोश उफाळून आणि उसळून येत होता. हैद्राबाद संस्थानातील लाखो आंदोलक निजामाविरुद्ध पेटून उठले. एका दशकापासून सुरू असलेली क्रांतीची ज्योत आता तेजस्वीरूप धारण करू लागली. ज्योतीची ज्वाला झाली व त्यांच्या मनातील ज्वाला अधिकच भडकू लागली. भारत सरकारचा पाठिंबा होताच. पहिले गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वात अखंड भारताची संकल्पना होती. एक मोठा स्वातंत्र्यलढा उभारला गेला. जमेल तसा, मिळेल त्या मार्गांनी निजामाविरुद्ध लढा सुरू झाला. हजारो कुटुंबांची राखरांगोळी झाली. शेवटी या क्रांतिलढ्यास यश मिळाले हैद्राबाद संस्थान स्वतंत्र भारतात १७ सप्टेंबर १९४८ रोजी सामील झाले. निजाम शरण आला. भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही या भागातील लोकांना स्वातंत्र्याची पहाट अनुभवयास तब्बल एक वर्ष एक महिना दोन दिवस वाट पाहावी लागली.



स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आपण नुकताच साजरा केला. या अमृतमहोत्सवी वर्षाची सांगता होत असतानाच हैद्राबाद स्वातंत्र्यलढ्याचा अमृतमहोत्सव सुरू होत आहे. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी इंग्रजांविरुद्धचा लढा हा अहिंसेच्या मार्गातून उभारला, तर हा हैद्राबाद मुक्तिसंग्राम स्वातंत्र्यलढा सशस्त्र लढा होता. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी आपल्या देशात ५६५ संस्थाने होती. त्यापैकी ५६२ संस्थाने भारतात विलीन झाली. केवळ ३ संस्थाने विलीन झाली नव्हती. त्यात जुनागड, काश्मीर, हैद्राबाद या तीन संस्थानांचा समावेश होता. या हैद्राबाद संस्थानात कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, छत्तीसगडचा काही भाग व मराठवाड्यातील तत्कालीन ५ जिल्हे (आताचे ८ जिल्हे) होते. हैद्राबाद संस्थानाचा नवाब आसफजाह घराण्याचा नवाब मिर उस्मान अली खान होता. त्याचा सेनापती कासिम रिझवी याने रझाकारांच्या माध्यमातून संस्थानाच्या जनतेवर अत्याचार सुरू केले.

## सशस्त्र लढा


काही झाले तरी आता माघार घ्यायची नाही, या ध्येयाने प्रेरित होऊन हा लढा सुरू झाला होता. या सशस्त्र लढ्यात असहकाराची चळवळ, सविनय कायदेभंग, करोडगिरी नाके पेटवले. हल्ले, आंदोलने, जंगल सत्याग्रह रेल्वे घातपात, पोलीस ठाण्यांवर हल्ले अशा सर्व बाबींचा समावेश होता. प्रसंगी बँकांवर सशस्त्र हल्ले झाले. हा स्वातंत्र्यसंग्राम चार टप्प्यांमध्ये विभागला जातो. प्रथम टप्पा म्हणजे सविनय कायदेभंगाचा निजामाच्या अन्यायी कायद्याला विरोध करायचा जवळपास २७० खेड्यांनी लेव्ही, तर ५५० खेड्यांनी निजामाला कर देण्यास नकार दिला. निजामाच्या आसफि झेंड्याऐवजी तिरंगा राष्ट्रध्वज फडकवण्याचा पराक्रम १ हजार ४६ खेड्यांमधून झाला. दुसऱ्या टप्प्यात बहिष्कार आणि असहकाराचा वापर केला गेला. विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजवर, वकिलांनी कोर्टावर, खेड्यापाड्यातील पाटील, कुलकर्णी, पंच यांनी सरकारवर बहिष्कार टाकला. खेड्यापाड्यातून सामान्य घरातील लहान थोर मंडळी यात उतरली व आंदोलन सक्षम होत गेले.

तिसरा टप्पा काहीसा दाहक म्हणावा लागेल. निजामाने बंडाविरुद्ध कडक कारवाई सुरू केली. अन्याय, अत्याचार, रझाकारांचा अमानुषपणा वाढला, तसा जन आंदोलनाचाही आक्रमकपणा वाढीस लागला. ते सरकारी जागा, इमारती, सरकारची मालमत्ता यांचे नुकसान करू लागले. बस जाळणे, पूल पाडणे, रेल्वे इंजिन, रुळ उखाडणे, दळणवळण बंद करणे, सरकारी गोदामे लुटणे असे आंदोलन होऊ लागले आणि चौथ्या टप्प्यात निर्णायक लढ्याची तयारी

सुरू झाली. या चौथ्या टप्प्यात सशस्त्र हल्ला होत होता. स्वातंत्र्यसैनिकांनी हाती शस्त्रे घेतली व निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा निकराचा लढा सुरू झाला. या हल्ल्यात जवळपास ८५० पोलीस मारले, १५२ करोडगिरी नाके, २७ पोलीस ठाणे, ६० रझाकार केंद्रे उद्ध्वस्त केले. पोलीस आणि रझाकारांचा १६५ खेडे यांनी मोठा प्रतिकार केला. मुख्य म्हणजे २५० खेडेगावांनी निजामीसत्ता नाकारून स्वातंत्र्याचा झेंडा रोवला. ही एक ढोबळ आकडेवारी. निजामाशी लढताना अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा झाले, पण शेवटी हा सशस्त्र लढा यशस्वी झाला. रझाकारांनी केलेला अन्याय, अत्याचार, त्रासलेली स्थानिक जनता एक भयावह असे वातावरण त्याकाळी होते.

## स्वातंत्र्याची पहाट

पूर्वीच्या ज्या लोकांनी हा त्रास भोगला, ते आपली आठवण सांगताना म्हणायचे की, भारत जरी १५ ऑगस्टला स्वतंत्र झाला असला तरी आम्ही स्वतंत्र झालो नव्हतो. रझाकारांनी सर्व प्रकारचे अन्याय करण्यास सुरुवात केली. आमचा स्वातंत्र्याचा लढा सुरूच होता. शेवटी भारताची आर्मी आणि सरदार वल्लभभाईंचे पोलीस आले व आम्हाला स्वतंत्र केले. बीड जिल्ह्यातील पाटोदा या गावच्या एका घटनेची आठवण ज्येष्ठांनी सांगितली. पाटोद्यात दुपारी भारतीय सैन्याचे रणगाडे आले. त्यांनी लांबूनच फायरिंग सुरू केले. त्यात पाटोदा शाळेतील एक शिपाई मृत झाला. थोडी फायरिंग करून रणगाडे परत सौताडा भागात गेले. फायरिंगमुळे गावातील लोक हवालदिल झाले. सरकारचे अधिकारी पळून गेले. गावातील काही मंडळींनी सौताड्याला जाऊन आर्मीला विनंती केली. आर्मी व पोलीस आल्याने परत धांदल उडाली. रझाकार घाबरून लपू लागले, तर गावकरी आनंदाने नाचू लागले. हातात पांढरे निशाण घेऊन गावची काही बुजूर्ग मंडळी त्या आर्मीला सामोरी गेली. अधिकाऱ्यांचे स्वागत केले. त्यांनी गावात येऊन रझाकारांना पकडले. अशा प्रकारची मराठवाड्यात सर्वत्र पोलीस कारवाई झाली आणि मराठवाडा भारतीय संघराज्यात सामील झाला. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक साहेबराव थोरवे यांनी एका मुलाखतीत सांगितले आहे की, जसा भारतातील आर्मीने निजामाच्या हद्दीत प्रवेश केला तशी रझाकारांनी शरणागती पत्करली. सर्व कार्यकर्त्यांमध्ये आनंदाची लाट उसळली. नवीन पर्वाची पहाट झाल्याप्रमाणे वाटे. संघर्ष शेवटी फळाला आला. या स्वातंत्र्यसंग्रामात थोरवे यांना जे काम दिले त्यात उपलब्ध दारुगोळा कार्यकर्त्यांना वाटणे, योग्य सूचना देणे, संघटन करणे अहमदनगरच्या सरहद्दीवर ठाणे निर्माण करणे अशी कामे होती. एकूण या स्वातंत्र्य संग्रामात नेत्यांपेक्षाही कार्यकर्ते मोठे होते. प्रत्येकजण लहान थोर, विद्यार्थी, महिला, वयस्कर मंडळी, तरुण, जवान मंडळी आत्मीयतेने स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढ्यात उतरली होती. हा लढा अस्तित्वाचा, अस्मितेचा, राष्ट्रीयतेचा होता.


स्वामी रामानंद तीर्थ

## ऑपरेशन – पोलो – पोलीस ॲक्शन

भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी काही झाले तरी निजाम तयार नव्हता. निजाम त्यावेळी आपल्या हैद्राबाद संस्थानला स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा मिळावा यासाठी युनायटेड नेशन (युनोत) देखील गेला होता. तो स्वत:ला मुघलांचा वारस समजत असे. इंग्रज आता भारत सोडून जात आहेत, तेव्हा मुघलांचा वारस म्हणून हा भारत देश आपल्याला मिळावा असे त्याचे मत होते. भारतात संस्थानांचे विलीनीकरण बाबतही ब्रिटिशांनी तीन अटी टाकून आगळीक केली होती. अर्थातच तो विषय वेगळा आहे. असो विलीनीकरणाबाबत गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी पाठवलेल्या प्रस्तावाकडे निजामाने आणि कासिम रिझवीने दुर्लक्ष केले. त्याचे रझाकारामार्फत जनतेवर अत्याचार सुरूच होते. अगदी हैद्राबाद संस्थानामध्ये वंदे मातरम् म्हणायलादेखील बंदी होती. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या आदेशानुसार १३ सप्टेंबर १९४८ रोजी फौजांनी निजामास चारी बाजूंनी घेरण्यास सुरुवात केली. भारतीय फौजा निजामाच्या संस्थानात घुसू लागल्या. आपल्या फौजेपुढे निजामाचे सैन्य कुचकामी ठरले. माघार घेऊ लागले. हैद्राबाद संस्थानाचे सेनाप्रमुख यांनी १७ सप्टेंबर १९४८ रोजी शरणागती पत्करली आणि निजाम शरण आला. हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात सामील झाले. हैद्राबाद मुक्तिसंग्रामास यश मिळाले.

एकूणच ऑपरेशन पोलो अर्थातच पोलीस ॲक्शन यशस्वी झाल्यानंतर गावोगावी रझाकारांना पकडण्याची मोहीम सुरू झाली. अनेक ठिकाणी रझाकार, त्यांना मदत करणारे हितचिंतक, रझाकारांचे नातेवाईक यांना स्वातंत्र्यसैनिकांनी वाचवले. कारण स्वातंत्र्यसैनिकांच्या मनात केवळ स्वातंत्र्य मिळावे हीच भावना होती आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांच्या मनात सुडाची भावना अजिबात नव्हती. एकूणच हा हैद्राबाद स्वातंत्र्याचा लढा अन्यायी राजवटीविरुद्ध न्याय मागण्यासाठीचा होता.

स्वातंत्र्याचा लढा हा स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वात लढला गेला. लाखो पुरुष महिलांनी या लढ्यात जहाल व मवाळ असे दोन गट होतेच. तेलंगणा कर्नाटक भागातील मंडळी काहीशी मवाळ तर मराठवाड्यातील जहाल होते. गांधीजींच्या अहिंसेवर श्रद्धा असलेल्या मंडळींनी या लढ्यात सत्याग्रहही केला आणि हाती शस्त्रही धरले. हेही एक आगळेवेगळे वैशिष्ट्ये म्हणावे लागेल. या हैद्राबाद-मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या लढ्यामध्ये ज्या ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, त्यांच्या घरादाराची राखरांगोळी झाली आणि त्यातूनच क्रांतीची ज्योत फुलून स्वातंत्र्याची नवी पहाट उगवली. या महत्त्वपूर्ण बलिदानाबाबत अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्या सर्वांना त्रिवार अभिवादन!

**संदर्भ :** १) हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी. लेखक –स्वामी रामानंद तीर्थ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. २) हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि बीड जिल्हा. लेखक – डॉ. सतीश साळुंके, परिवर्तन प्रकाशन, बीड.

**उपसंचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, पुणे.**

**मराठवाडा हा प्रदेश संतांची भूमी म्हणून ओळखला जातो. हा भाग निजामी राजवटीखाली असल्यामुळे शासनाकडून मराठी भाषेची गळचेपी होत असे व उर्दू आणि फार्सी भाषांना शासकीय व्यवहारात अग्रक्रम असे. त्यामुळे मराठी भाषा समृद्ध करण्याची जबाबदारी ही मराठी भाषकांची होती. या भागातील संतांना या परिस्थितीची पूर्ण जाणीव असल्यामुळे कोणत्याही शासकीय मदतीची अपेक्षा न करता त्यांनी सामान्य मराठी माणसांच्या बळावर मराठी भाषेचे आपल्या साहित्याने संरक्षण व संगोपन करून तिचे लखलखते स्वरूप कायम ठेवण्याचे महान दायित्व लीलया पेलले. या संतपरंपरेत प्रामुख्याने संत ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडे, संत जनाबाई आणि त्यांचे कुटुंबीय, संत गोरा कुंभार, जगमित्र नागा, संत नरहरी सोनार, श्रीजनार्दनस्वामी, संत भानुदास, संत एकनाथ, संत बहिणाबाई या वारकरी संप्रदायातील संतांचा समावेश होतो.**


# मराठवाड्यातील संत परंपरा

**सुभाष देशपांडे**

समर्थ रामदास हेही मराठवाड्यातील आहेत. या लहानशा लेखात सर्व संतांचा विस्तृत परिचय किंवा त्यांच्या साहित्याची सर्वांगीण नोंद करता येणे शक्य नाही. त्यामुळे वारकरी पंथाच्या काही संतांच्या-त्यातही प्रामुख्याने अभंगरचनेचा-विचार करणे योग्य होईल. वारकरी संप्रदायातील सर्व संत हे पांडुरंगाचे निष्ठावान अनन्य भक्त होते. त्यांच्या भावविश्वात पांडुरंग आणि पंढरपूर यांचे अनन्यसाधारण असे स्थान आहे. पांडुरंग आणि पंढरपूर हे त्यांचे बहिश्चर प्राण आहेत, असे म्हणणे वावगे ठरू नये. त्यामुळे सर्वच संतांनी पांडुरंग आणि पंढरपूर हेच आपल्या अभंगांचे विषय केले आहेत. भक्ती, श्रद्धा, समर्पण यांनी हे अभंग भरभरून वाहताना दिसून येतात. समर्थ रामदासांनीही पांडुरंगाचे दर्शन घेतल्यानंतर पांडुरंगांवर अभंग लिहिला आहे. मराठी माणसाच्या मनातील आणि भावविश्वातील आराध्य दैवत पांडुरंगच आहे. त्यामुळे मराठी भाषेचे वैभव म्हणजे हे अभंग आहेत. या लेखात मी ज्ञानेश्वरी, भागवत यांसारख्या ग्रंथांचा विचार न करता फक्त अभंगांचाच विचार करणार आहे.

## संत ज्ञानेश्वर माउली

वारकरी संप्रदायातील सर्वच संतांनी पांडुरंगाच्या सगुण आणि निर्गुण रूपाचे अत्यंत मनमोहक शब्दांमध्ये वर्णन केले आहे. ते वर्णन आपल्या अंतरंगात कायम रूतून बसते. सर्व संतांच्या अशा काही अभंगांचा विचार आता करावयाचा आहे. संत ज्ञानेश्वरांचा खालील लोकप्रिय अभंग



आपल्याला परिचित आहे. संत ज्ञानेश्वर म्हणतात,

*रूप पाहता लोचनीं।*
*सुख जालें वो साजणी।।१।।*
*तो हा विठ्ठल बरवा।*
*तो हा माधव बरवा।।धृ.।।*
*बहुत सुकृतांची जोडी।*
*म्हणुनि विठ्ठली आवडी।।२।।*
*सर्व सुखाचें आगरु ।*
*बापरखुमादेविवरु।।३।। अ.क्र.१।।*

हा पांडुरंग म्हणजेच श्रीकृष्ण कसा आहे याचे वर्णन करतान ते म्हणतात,

*विश्व भुलवी योगमाया तो।*
*गोकुळीं रहिवासु तो गे बाई।।१।।*
*वसुदेवकुमरू तो।*
*देवकीनंदनु तो गे बाई।।धृ।।*
*रखुमादेविवरु तो।*
*शुकादिकांचिंतन तो गे बाई।।२।। अ.क्र.२०।।*

केवळ वरील दोन अभंगांचा विचार केला तरीही त्यावरून संत ज्ञानेश्वरांची पांडुरंगावर किती भक्ती, प्रेम, विश्वास आणि निष्ठा होती याचा प्रत्यय येतो. पांडुरंगाचे दर्शन होताच सुखाचा अनुभव त्यांना येतो. कारण हा पांडुरंग बरवा आहे आणि अनेक जन्माच्या पुण्याचे संचित असेल तरच त्याचे दर्शन घडते. संत ज्ञानेश्वरांना असे वाटते की, आपण मागील अनेक जन्मात पुण्याची कमाई केली म्हणून आपल्याला हे भाग्य लाभले आहे. संत ज्ञानेश्वरांना तीव्र अशा रंगसंवेदनांची जाणीव आहे. त्यामुळे आपल्या काही अभंगांमधून निळ्या, काळ्या, सावळ्या रंगसंवेदनांद्वारे पांडुरंगाचे वर्णन केलेले आहे. त्यातून संत ज्ञानेश्वरांच्या ऋतुंभरा प्रज्ञेचे आणि प्रतिभेचे दर्शन घडते. पांडुरंगास सगुण म्हणावे की, निर्गुण असा प्रश्न त्यांना पडला असावा. तो सगुण आहे तसाच निर्गुणही आहे अशी त्यांची प्रचिती आहे. तो स्थूल, सूक्ष्म, साकार, निराकार, दृश्य आणि अदृश्य असा त्यांचा साक्षात अनुभव आहे.

पांडुरंगाइतकेच त्यांना पंढरपूरचे प्रेम आहे. मी तर म्हणेन की, त्यांना पंढरपूरचे वेडच आहे. पंढरपूर हे वैकुंठच आहे अशी त्यांची धारणा आहे. *'माझे जिवींची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी'* असे ते म्हणतात. पंढरपूरच्या वाटेवर चालले तरी त्या वाटसरूचे भाग्य उदयास येते.

पंढरपूरच्या वाटेवर चालले म्हणजे आपोआप अनंत यागाचे पुण्य लाभते, वैकुंठाचा मार्ग गवसतो. जप, तप, अनुष्ठान, क्रिया, कर्म, धर्म यांचे वर्म संतांकडून समजते. भक्तिमार्ग म्हणजे आनंदाची वाटचाल असते. पंढरपूरचा भक्तिमार्ग पुंडलिकाने आखून दिला आहे. या मार्गावर दिंड्या, पताका, टाळांचा घोष, गरूडटकांचे भार, वैष्णवजन करत असलेला पांडुरंगाचा जयजयकार असे देवदुर्लभ वातावरण असते. पंढरपूरची वाटचाल सुरू केली की, सर्व प्रकारच्या पुण्याचे फळ प्राप्त होते. संतांच्या मनात पंढरपूरचे स्थान किती पुण्यप्रद होते हे सहजपणे यावरून लक्षात येते.

पांडुरंग हे श्रीकृष्णाचे दुसरे रूप आहे यावर संत ज्ञानेश्वरांचा अतूट विश्वास आहे. 'बाळक्रीडा अभंग' या शीर्षकाखाली श्रीकृष्णाचे गुणगान करणारे एकूण २३ अभंग आहेत. वानगीदाखल केवळ खालील एक अभंग येथे देतो.

*परब्रह्म सांवळे गोपवेशें निराळें।*
*हृदयकमळीं स्थिरावलें काय सांगो।।*
*कायावाचामनें पाहे जों पाहणें।*
*तव नवलाव हाये निर्गुणरया।।१।।*
*नामरूपीं गोडी हेचि आवडी आतां।*
*न विसंबे सर्वथा तुजलागी।।धृ.।।*
*जगड्व्याळ प्रपंचभान हें तुज नुडे हन।*
*वायां भोगिसिजाण कारे याचे।।*
*तुझीचि बुंथी तुजचि न कळे याचें चोजं।*
*केंवी वर्णिसी सहज गुणे रया।।२।।*
*म्हणोनिं दृष्टि चोरूनि पडे मिठी।*
*मन चोरूनिया पुढतापुढती तुजचिमाजि।।*
*बापरखुमादिविवरा विठ्ठला।*
*उदारा येणेंचि नाही त्रिशुद्धि।*
*येणें निवृत्तिरायें खुणा दाऊनिया।*
*सकळगुणीं गुणातीत तुटली आधी रया।।३।।*
*अ.क्र.१३।।*

संत ज्ञानेश्वरांनी पाळणा, घोंगडी, पाईक, हमामा, अंबुला, विरहिणी, एकविध, ज्ञानेश्वर महाराजांचा बुद्धिरूपी सखीशी संवाद, संतपर, ज्ञानेश्वर महाराज व निवृत्तिनाथ यांचा संवाद, उपासनापर, पांडुरंग प्रसादान प्राप्त झालेल्या स्थितीचा विचार, डौर, गळति, सौरी, फुगडी, पांगुळ, आंधळा, नामपर व कीर्तनपर, नाममाळा, करुणापर, देवापाशी मागणे, ढोंगी परमार्थ्यास उपदेश, खऱ्या त्यागाचे वर्म न कळता बाह्य गृहादि त्यागास उपदेश, मनास उपदेश, जनांस उपदेश, मुमुक्षूस उपदेश, ज्ञानपर, कूट, संसारतापाने तप्त झालेले प्राणी खरे सिद्ध नसता बाह्य वेषधारी साधूचा आश्रय करतात. त्याचा परिणाम, वासुदेव, बाळछंद, कापडी, मदालसा, हरिपाठ, जीर्ण हस्तलिखित प्रतींतील अभंग या शीर्षकाखाली अनेक अभंग दिलेले आहेत.

## चित्सूर्य निवृत्तिनाथ

ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठ बंधू संत निवृत्तिनाथ हेच त्यांचे सद्‌गुरूही होते. त्यांना 'चित्सूर्य' या विशेषणाने सार्थपणे गौरवले जाते. ज्ञानेश्वरीच्या १४व्या अध्यायाचा प्रारंभच त्यांनी सद्‌गुरू स्तवनाने केला आहे. ते वाचताना आपल्या असे लक्षात येते की,



माउलीच्या प्रतिभेला येथे गगनभरारी घ्यावीशी वाटली आहे. त्यातून त्यांची आपल्या सद्‌गुरूंविषयी असलेली भक्ती, आदर, श्रद्धा आणि नितांत विश्वास यांचे दर्शन होते. त्या वर्णनातून संत निवृत्तिनाथांच्या समग्र व्यक्तिमत्त्वाचे नितांत रमणीय दर्शन होते. संत ज्ञानेश्वरांनी या वर्णनात आपल्या सद्‌गुरूंना आचार्य, समस्तसुरवर्या, प्रज्ञाप्रभातसूर्या, सुखोदया, निरंतरकारूण्यसिंधू, विशदविद्यावधूवल्लभा आदी विशेषणांनी गौरवले आहे. त्यांना सागराची उपमा दिली आहे. संत ज्ञानेश्वरांनी केलेले हे वर्णन आपल्याला निवृत्तिनाथांचे यथार्थ दर्शन घडवते. हे वर्णन केवळ आपल्या ज्येष्ठ बंधूंचे नाही, तर आपल्या सद्‌गुरूंचे आहे हे संत ज्ञानेश्वर आपल्या प्रत्येक शब्दांमधून जाणवून देतात आणि ते सहजपणे आपल्या प्रत्ययास येते.

संत निवृत्तिनाथांनीही 'पंढरीमाहात्म्य' आणि 'पंढरीतील काला' या शीर्षकाखाली पंढरपूरचा महिमा वर्णन केला आहे. त्यातील केवळ दोन अभंगांचे अवलोकन केल्यास संत निवृत्तिनाथांचे पंढरपूरवर असलेले प्रेम आणि भक्ती याचा प्रत्यय आपल्याला येतो.

*पुंडलिकपेठ वैष्णवाचा हाटं करिती*
*बोभाट हरिनामाचा।।१।।*
*वाळलें अंबर अमृतुषार।*
*झेलीत अमर चकोर झाले।।२।।*
*देव मुनी सर्व ब्रह्मादिक लाठे।*
*पंढरीये पेठे प्रेमपिसे।।३।।*
*निवृत्ति निर्वाळिला ज्ञानदेव सोपान।*
*खेंचर तल्लीन वीनटला।।४।। अ.क्र.७*
*वैष्णवांचा मेळ सकळ मिळाला।*
*विठ्ठलनामकाला पंढरीसी।।१।।*
*हरिनाम विनट हरि उच्चारीत।*
*सप्रेम डुल्लत भक्तजन।।२।।*
*चालिला सोपान ज्ञानदेव निधी।*
*मुक्ताई गोविंदीं तल्लीनता।।३।।*
*निवृत्ति खेचर परसा भागवत।*
*आनंदे डुल्लत सनकादीक।।४।। अ.क्र.२९*

पंढरपुरातील पांडुरंग हे तर त्यांचे आराध्य दैवत आहे. त्याच्या सगुणनिर्गुण रूपाचे वर्णन करताना ते देहभान विसरून जातात. पांडुरंग सर्व गुणांचा पुतळा असून तो अद्वैतस्वरूपी श्रीकृष्ण आहे, असा त्यांचा विश्वास आहे. त्याला नामरूप नाही. तो मांगल्याचा पुतळा आहे. तो सर्व सिद्धीचे साधन, आनंदाचा उद्‌बोध, देवकीये लीळे, श्रुतीचा आकार आणि साकार गोपाळ आहे, असे ते म्हणतात.

## साक्षात्कारी संत सोपानदेव

संत सोपानदेव हेही ज्ञानेश्वरांचे बंधू. त्यांचे फक्त ४९ अभंग सकलसंतगाथेत उपलब्ध आहेत. त्यांनाही पंढरपूर आणि पांडुरंग प्रिय आहेत. पंढरपूरचा महिमा सांगणारे एकूणा २२ अभंग दिलेले आहेत. पंढरीचे माहात्म्य वर्णन करताना ते तल्लीन होतात. पंढरपूरला जावे आणि विठोबाकडे

प्रेमामृताची खूण मागावी असे ते म्हणतात. पांडुरंग हे श्रीरामाचे स्वरूप आहे असे ते म्हणतात. श्रीराम, श्रीकृष्ण आणि पांडुरंग अभिन्न आहेत. आपला निस्सिम भाव प्रकट करताना ते म्हणतात,

*मी न नेणें ती भक्ति नेणें त्या मुक्ति।*
*तुझ्या नामपंथी मार्गु मना।।१।।*
*हेंची मज चाड न करि मी आशा।*
*तुज हृषीकेशा चिंतितुसें।।२।।*
*तूंची माझें धन जोडी हे निजाची।*
*जननी तूं आमुची जिवलगे।।३।।*
*सोपान म्हणे तुजविण न कळे।*
*तुजमाजी सोहळे मनें केलें।।४।।*
*अ.क्र.१४*

त्यांचे सद्‌गुरू निवृत्तिनाथ हेच होते. आपल्याला आत्मस्थिती त्यांच्यामुळेच लाभली असे ते आपल्या अभंगातून प्रतिपादन करतात. त्यांच्यामुळेच आपल्या कल्पना व वासना पळाल्या असे ते नि:संकोचपणे सांगतात. आपले द्वैत संपून अद्वैत त्यांच्यामुळेच लाभले, असा त्यांचा विश्वास आहे. त्यांच्यामुळे आपल्याला आत्मरूपाची स्थिती लाभली हे सांगणारे एकूण आठ अभंग त्यांनी लिहिले आहेत.

उपदेशपर अभंगांतून त्यांनी हरिभक्तीचा पुरस्कार केला आहे. आपल्या मनात हरिशिवाय इतर कोणताही भाव असू नये, असे आग्रहाने प्रतिपादन करतात. वासनांत न अडकता केवळ हरीची भक्ती करावी असाही उपदेश ते करतात. त्या काळात सोवळ्या-ओवळ्याचे अपार प्रस्थ होते. आजही काही प्रमाणात ते आहे. ही भावना केवळ माणसांच्या मनात असते. परमेश्वर सदोदित सोवळाच असतो. खरे सोवळे कसे असते यावर त्यांनी आपल्या अभंगामधून प्रकाश पाडला आहे.

परमेश्वर हा सर्वव्यापी असून त्याने सारे विश्व व्यापले आहे. म्हणूनच तर परमेश्वराला विश्वव्यापी, विश्वात्मा असे म्हटले जाते. परमात्मा सर्वत्र असून त्याशिवाय दुसरा भाव मनात असू नये, असे ज्ञानपर अभंगात ते सांगतात.

*हरी असे देहीं सर्वकाळ संपन्न।*
*म्हणोनि चिंतन निरंतर।।१।।*
*हरिविण नाहीं हरिविण नाहीं।*
*दिशा दुम पाहीं बिंबलासे।।२।।*
*हरिविण देवो नाहीं अन्य भावो।*
*हरि असे सर्व देहभावीं।।३।।*
*सोपान सांगतु हरि सर्वत्र वसे।*
*भाग्यवंता दिसे सर्व काळ।।४।।*
*अ.क्र.३९*

सोपानदेवांच्या अभंगांचे अवलोकन केले की, तेही निस्सीम भागवत आणि भक्त होते याचा प्रत्यय येतो. असा प्रत्यय आला की आपण आपोआप त्यांच्यापुढे नतमस्तक होतो.

## संत मुक्ताबाई

संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडात संत मुक्ताबाई या सर्वात लहान असल्या तरी ज्ञानाने आणि अधिकाराने त्या श्रेष्ठ होत्या. संत ज्ञानेश्वरांनाही 'ताटी'च्या अभंगातून समजावण्याचे सामर्थ्य त्यांच्यापाशी होते. म्हणूनच त्यांना



'सणकांडी' अशा विशेषणाने गौरवले जाते. सकलसंतगाथेत त्यांचे एकूण केवळ ४२ अभंग आहेत. पण त्यामध्ये संत मुक्ताबाईंचे प्रतिभासामर्थ्य दिसून येते. त्यांनी पंढरपूरचे माहात्म्य विशद करणारे, नामपर, संतपर, उपदेशपर आणि कूट अशा अभंगांची रचना केलेली आहे. त्यांच्या काही अभंगांचा परामर्श येथे घ्यावयाचा आहे.

पंढरपूरचा महिमा वर्णन करणारे केवळ तीन अभंग त्यांनी लिहिले आहेत. या तीन अभंगांमधून त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की, पंढरपूर ही नामाची पेठ असून येथे आल्यानंतर सामान्य जिवांचा उद्धार होतो. पुंडलिकाने पांडुरंगास येथे आणून सामान्य जनांचे तारण केले आहे. पांडुरंगाचा आदी, मध्य आणि अंत समजत नाही, म्हणून श्रुतीही नेती नेती असे म्हणतात. आपण पांडुरंगाचे चिंतन करून मुक्त झाले असे त्या म्हणतात. *'मुक्ताई चिंतनें मुक्त पैं जाली। चरणी समरसली हरिपाठें'*. हा त्यांचा प्रत्यक्ष अनुभव आहे.

वारकरी संप्रदायात नामस्मरणाला अतीव महत्त्व आहे. आपल्या अभंगांमधून त्याचे मोल त्यांनी अधोरेखित केले आहे. नामस्मरणाने वैकुंठाची प्राप्ती होते, वासनांचा निरास होतो, प्रत्यक्ष पांडुरंगाचे दर्शन घडत, जीवन्मुक्त होता येते. नामस्मरणाने मानवाचे तारण होते.

संत ज्ञानेश्वरांच्या सहवासात त्या काळातील सर्व जातींचे संत एकत्र आले होते. त्यांचे मोल मुक्ताबाईंनी जाणले होते. म्हणूनच कदाचित त्यांनी 'संतपर' अभंग लिहिले असावेत. त्यांनी एकूण नऊ संतपर अभंगांची रचना केली आहे. संतांमुळेच आपण सावध झालो आणि भक्तिमार्गास लागलो, असा त्यांचा विश्वास आहे. संतांमुळेच सर्व वासनांपासून मुक्ती मिळाली असा त्यांचा रास्त दावा आहे. संतांचा अप्रतिम गौरव त्यांनी खालील अभंगामध्ये केला आहे.

संत मुक्ताबाईंनी उपदेशपर एकूण २१ अभंग लिहिले आहेत. या अभंगांमधून सामान्य माणसांना भक्तीची वाटचाल सुलभ होण्यास मदत होते. परमेश्वराची भक्ती केली तर शांती आणि समाधान भक्तांना प्राप्त होते आणि मग *'विश्रांति मनाची निजशांती साची। मग त्या यमाची भेटी नाही'* असे त्या प्रतिपादन करतात. तसेच सारे विश्व परमेश्वराने व्यापले असून जिकडे पाहाल तिकडे परमेश्वराचे दर्शन होते. असे जरी असले तरी परमेश्वराचा आदी, मध्य आणि अंत लागत नाही. त्यांनी दोन कूट अभंगांची रचना केली आहे. खाली दिलेला अभंग आपल्या सर्वांच्या परिचयाचा आहे.

*मुंगी उडाली आकाशीं।*
*तिणें गिळिलें सूर्याशीं।।१।*
*थोर नवलाव जाहला।*
*वांझे पुत्र प्रसवला।।२।।*
*विंचु पाताळाशी जाय।*
*शेष माथां वंदी पाय।।३।।*
*माशी व्याली घार झाली।*

*देखोन मुक्ताई हांसली॥४॥अ.क्र.४२*

संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांच्या अभंगांचे अवलोकन केल्यानंतर मराठवाड्यातील इतर संतांच्या अभंगांचा मागोवा घ्यावयाचा आहे. लेखाची शब्दमर्यादा लक्षात घेता प्रत्येक संताचा स्वतंत्रपणे विचार करणे शक्य होत नाही; पण त्यामुळे या संतांच्या लेखनाचे आणि कर्तृत्त्वाचे मोल थोडेसेही कमी होत नाही. मराठवाड्यात जनाबाई आणि त्यांचे कुटुंबीय, संत गोरा कुंभार, संत जगमित्र नागा, संत नरहरी सोनार, संत एकनाथांचे सदगुरू श्रीजनार्दन स्वामी, संत भानुदास, संत एकनाथ, संत बहिणाबाई हा संतांचा मेळा आहे. या संत मेळ्यातील संतांना परस्परांविषयी प्रेम आणि आदर आहे. या सर्वांचे आराध्य दैवत पांडुरंग आहे.

## संत गोरा कुंभार

श्रीसकल संत गाथेत संत गोरा कुंभार यांचे एकूण २० अभंग आहेत. त्यातूनच त्यांनी आपले आत्मचरित्र काही अंशी लिहिले आहे, पण त्यांचे ध्येय निर्गुणाचा संग धरण्याचे आहे.

*नाहीं दिवस राती नाहीं कुळ याती।*
*नाही माया भ्रांति अवघेची।*

आपल्या एकविधा भक्तीने आपण काय साध्य केले आहे याचे त्यांना संपूर्ण भान आहे. ते म्हणतात,

*निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगें।*
*तंव झालों प्रसंगीं गुणातीत॥१॥*
*मज रूप नाहीं नांव सांगू काई।*
*झाला बाई काई बोलूं नये॥२॥*
*बोलतां आपली जिव्हा पैं खादली।*
*खेचरी लागली पाहतां पाहतां॥३॥*
*म्हणे गोरा कुंभार नाम्या तुझी भेटी।*
*सुखासुखी मिठी पडली कैसी॥४॥*
*अ.क्र.७*

ते पांडुरंगाच्या भक्तीमध्ये इतके गुंतले आहेत की त्यामुळे *'बोलतां हे बोली बोलवेना'* अशी त्यांची स्थिती झाली आहे. ते महासुखाच्या सागरात पोहत आहेत, असे म्हणतात. केशवाच्या भेटीसाठी आपण देहभान विसरलो आहोत, असे ते ठामपणे सांगतात. आपल्या जातीचे भान असल्यामुळे *'देवा तुझा मी कुंभार। नासीं पापाचे डोंगर।'* असे नि:संकोचपणे सांगतात. संत नामदेवराय हे त्यांचे सदगुरू आहेत. त्यांच्यावर संत गोरा कुंभारांचा नितांत विश्वास आहे. म्हणूनच ते म्हणतात, *'नामा ऐसें नाम तुझिया स्वरूपा। आवरण आरूपा कोण ठेवी।'*. एकूणच पांडुरंग आणि संत नामदेव यांच्यावर नितांत श्रद्धा आणि विश्वास असणारे ते आहेत. शिवाय सर्वत्र एकत्व पाहण्याचा त्यांचा स्वभाव आहे. नामस्मरणावर त्यांचा अतूट आणि गाढ विश्वास आहे. संत नामदेवरायांच्या मदतीने संत ज्ञानेश्वरांनी आपल्याभोवती सर्व जातींच्या संतांचा मेळा जमा केला होता. त्यात संत गोरा कुंभार हे एक रत्न होते असे म्हणणे वावगे ठरू नये.

## जगमित्र नागा

श्रीसकल संत गाथेमध्ये संत जगमित्र नागा यांचे आठ अभंग आहेत. त्या अभंगांमधून त्यांच्या भक्तीचे स्वरूप जसे स्पष्ट होते, तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वावरही प्रकाश पडतो. भक्तांवर कितीही संकटे आली तरी भगवंत त्यांचे रक्षण करतो, असा त्यांचा गाढ विश्वास आहे. आपल्या अभंगात ते म्हणतात की, 'प्रल्हादाला, गोपाळांना, पांडवांना, बिभिषणास अग्नी जाळू शकला नाही, कारण त्यांच्या अंतरंगात भगवंत होता. आपल्या अंत:करणातही भगवंत असल्यामुळे आपल्याला अग्नी जाळू शकत नाही.' असे ते ठामपणाने सांगतात. संकटात असलेल्या भक्तांचे रक्षण भगवंत करतो असे ते अनेक उदाहरणे देत स्पष्ट करतात. श्रीकृष्ण लोणी खाताना गोपीने त्याला पकडले आणि त्याला यशोदामाईकडे घेऊन गेली. तिथे गेल्यानंतर तिला सर्वत्र कृष्णच दिसावयास लागला. भक्तांसाठी विविध रूपे धारण करून त्यांना मदत करण्याची श्रीकृष्णाची ख्याती आहे, असे ते प्रतिपादन करतात.

*भक्तासाठी रूपें धरी।*
*त्याचें काम अंगे करी॥१॥*
*आला पुंडलिकासाठीं।*
*अकस्मता जगजेठीं॥२॥*
*अनंत ब्रह्मांडे रचिलीं।*
*नानापरी क्रीडा केली॥३॥*
*हे तव न कळे कोणासी।*
*जगमित्र नागा ध्याय मानसीं॥४॥*
*अ.क्र.५*

## संत नरहरी सोनार

श्रीसकल संत गाथेमध्ये संत नरहरी सोनार यांचे एकूण ३४ अभंग आहेत. या अभंगांमधून त्यांचा परमार्थमार्गाचा सखोल अभ्यास प्रत्ययास येतो. त्यातून हेही जाणवते की त्यांना साक्षात्कारी अनुभूती प्राप्त झाली आहे. त्यांच्या अभंगांचे आणखी एक अनन्यसाधारण वैशिष्ट्य असे आहे की, आपल्या व्यवसायाचा योग्य तो उपयोग करून त्यात त्यांनी अत्यंत कुशलतेने भक्तीचा व्यवहार गुंफला आहे. खालील अभंग त्याचा प्रत्यय आपल्याला देतो.

*देवा तुझा मी सोनार।*
*तुझे नामाचा व्यवहार॥१॥*
*देह बागेसरी जाणे।*
*अंतरात्मा नाम सोनें॥२॥*
*त्रिगुणाची करूनी मूस।*
*आंत ओतिला ब्रह्मरस॥३॥*
*जीव शिव करूनी फुंकी।*
*रात्रंदिवस ठोकाठोकी॥४॥*
*विवेक हातवडा घेऊन।*
*कामक्रोध केला चूर्ण ॥५॥*
*मनबुद्धिची कातरी।*
*रामनाम सोने चोरी॥६॥*
*ज्ञान ताजवा घेउन हातीं।*
*दोन्ही अक्षरें जोखिती॥७॥*
*खांद्या वाहोनी पोतडी।*
*उतरला पैलथडी॥८॥*
*नरहरी सोनार हरीचा दास।*
*भजन करी रात्रंदिवस॥९॥ अ.क्र.१२*

या एका अभंगावरून आपला व्यवसाय करताना त्यांचे सर्व लक्ष भक्तीकडेच होते, हे आपल्या लक्षात येते. जणू चोवीस तास त्यांना भक्तीचेच वेड असावे याचा प्रत्यय येतो. नामस्मरणावर त्यांची निष्ठा आहे. म्हणूनच ते म्हणतात, *'सकळ धर्मांचे कारण। नामस्मरण हरिकीर्तन'*, त्याकाळात असलेल्या सर्व जातीच्या संतांवर त्यांचे प्रेम आहे. त्यांची सेवा करण्यात त्यांना आनंद वाटत होता. पांडुरंगाइतकीच त्यांची शिवावर म्हणजे महादेवावर भक्ती असल्याचे त्यांच्या अभंगावरून दिसून येते.

या संतपरंपरेत जनार्दन स्वामी, संत भानुदास, संत एकनाथ आणि संत बहिणाबाई यांचाही समावेश होतो.

**ज्येष्ठ लेखक, घाटकोपर पूर्व, मुंबई.**

**मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे अमृतमहोत्सवी वर्ष... या निमित्ताने छत्रपती संभाजीनगर शहरासह मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यांमध्ये विविध कार्यक्रमांच्या आयोजनातून मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या लढ्याचे स्मरण करण्यात आले. येथे आयोजित राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णयदेखील घेण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत झालेल्या विविध कार्यक्रमांनी मुक्तिसंग्राम इतिहासाच्या आठवणी जागवल्या.**

# मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे **अमृतमहोत्सवी वर्ष**

**गणेश फुंदे**

१५ ते १७ सप्टेंबर २०२३ या कालावधीत छत्रपती संभाजीनगरमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शालेय स्तरापासून ते महाविद्यालय स्तरापर्यंतच्या मुलांना मुक्तिसंग्राम माहिती व्हावा यासाठी व्याख्याने, विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच मुक्तिसंग्रामाचे महत्त्व सांगणारा एका तासाचा माहितीपट गावोगावी दाखवण्याचे नियोजन केले होते.

### विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण

मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. सातारा व देवळाई परिसरातील मलनिस्सारण योजनांचे ई-भूमिपूजन, हर्सूल येथील घनकचरा प्रक्रिया केंद्राचे ई-लोकार्पण, महानगरपालिकेच्या एज्युकेशन कंट्रोल रूमचे उद्घाटन, छत्रपती संभाजीनगर येथील विविध रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाचा शुभारंभ, नागरिकांच्या सार्वजनिक वापरासाठी आकांक्षिक स्वच्छतागृह बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन, कांचनवाडी येथील अग्निशमन केंद्र इमारतीचे लोकार्पण, हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उद्यान बॉटनिकल गार्डन येथील विकास कामे, महानगरपालिकेने खरेदी केलेल्या विविध यंत्रसामग्रीचे लोकार्पण, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखान्या'चे लोकार्पणही यावेळी करण्यात आले.

छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील पायाभूत सुविधांसाठी शासनाने वेळोवेळी निधी उपलब्ध करून दिला आहे. मराठवाड्याच्या शाश्वत विकासाला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. मराठवाडा मुक्तिसंग्राममध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान, त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून दिल्ली येथील



महाराष्ट्र सदन येथे त्यांचा पुतळा उभारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याबरोबरच शहरातील सुमारे ३०० वर्षांपूर्वीच्या तीन पुलांच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी जाहीर केले.

## प्रभातफेरीने उत्साहाचे वातावरण

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचा विजय असो, मराठवाड्याचा जयजयकार, भारतमाता की जय अशा विविध घोषणांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शालेय विद्यार्थ्यांनी काढलेल्या प्रभातफेरीतून मुक्तिसंग्रामाच्या आठवणी जाग्या झाल्या. क्रांती चौक येथून प्रारंभ झालेल्या या प्रभातफेरीत विद्यार्थ्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. सुमारे तीन ते साडेतीन हजार विद्यार्थी प्रभातफेरीत सहभागी झाले होते. या फेरीदरम्यान विविध शाळेच्या विद्यार्थ्यांनी मल्लखांब, कुस्ती, योगासने, बॉक्सिंग, लेझिमची प्रात्यिक्षिके सादर केली.

## महिला बचतगटांचे प्रदर्शन

मराठवाडा सांस्कृतिक मैदानावर उभारण्यात आलेल्या भव्य मंडपात महानगरपालिकेने आयोजित केलेले तीन दिवसीय कार्यक्रम आणि महिला बचतगटांचे प्रदर्शन लक्षवेधी ठरले. यावेळी गायक अभिजित शिंदे व सरला शिंदे यांनी देशभक्तीपर गीते सादर करून विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित केला. यावेळी माजी सैनिकांचा सहभाग असणाऱ्या नागरिक मित्र पथकातील सदस्यांचा आणि सफाई कर्मचाऱ्यांचा विशेष गौरव केला.

## विशेष व्याख्यानमालेचे आयोजन

मराठवाडा मुक्तिसंग्रामात निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध स्वातंत्र्यसेनानींनी दिलेला लढा आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी व स्फूर्तिदायी आहे. यापासून सर्वांनी बोध घेत कार्य करण्याची गरज असल्याचा सूर मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्ष सांगता समारंभाच्या निमित्त आयोजित विशेष व्याख्यानमालेत उमटला.

वंदे मातरम सभागृह येथे 'मुक्तिसंग्रामात धगधगता मराठवाडा' आणि 'लढ्यातील महिला क्रांतिकारक' या विषयांवर विशेष व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्याते सारंग टाकळकर यांनी भारतीय सैनिकांनी निजामाविरुद्धच्या लढ्याची माहिती दिली. मराठवाडा मुक्तिसंग्रामात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून अनेक महिला स्वातंत्र्यसैनिक सहभागी झाल्या होत्या. या लढ्यात रणरागिणींनी खंबीरपणे साथ दिली, असे 'लढ्यातील महिला क्रांतिकारक' या विषयावर बोलताना डॉ. रश्मी बोरीकर यांनी सांगितले.

## 'नाट्य गौरव'

मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य संचालनालयाने 'नाट्य गौरव' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात राज्य हौशी मराठी, हिंदी, संगीत, संस्कृत, बालनाट्य, दिव्यांग बालनाट्य आणि मराठी व्यावसायिक नाट्य स्पर्धेचे राज्यस्तरीय पारितोषिक वितरण सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास केंद्रीय वित्त राज्यमंत्री भागवत कराड, गृहनिर्माण, इतर मागास व बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे, आमदार हरिभाऊ बागडे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## 'मराठवाडा दौड'

मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त जिल्हा क्रीडा कार्यालय व महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय क्रीडा संकुल येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दौडचे आयोजन करण्यात आले होते. दौडमध्ये शहरातील विविध शाळा, महाविद्यालयांचे विद्यार्थी, खेळाडू, क्रीडाप्रेमी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. ढोल-ताशा, लेझिमच्या गजरात सर्वांचा उत्साह यावेळी द्विगुणित करण्यात येत होता. महाराष्ट्रीयन वेशभूषा परिधान करून विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या, तर देशभक्तीपर गीतांनी वातावरण अधिकच उत्साहवर्धक झाले होते. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने क्रीडा संकुलातून निघालेली दौड सूतगिरणी चौक, गजानन महाराज मंदिर, सेव्हन हिल मार्गे क्रांती चौक येथे पोहोचली.

## गर्जा मराठवाडा कार्यक्रम

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृतमहोत्सवाच्या शुभेच्छा सर्व नागरिकांना दिल्या. तसेच मुक्तिसंग्रामात ज्यांनी हौतात्म्य पत्करले त्यांना विनम्र अभिवादन केले. क्रांती चौक येथे 'गर्जा मराठवाडा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नावीन्यपूर्ण पद्धतीने लेझर शोद्वारे मराठवाडा मुक्तिसंग्रामाची माहिती या कार्यक्रमात सादर करण्यात आली. कलाकारांनी कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

## हुतात्मा स्मृतिस्तंभास अभिवादन

मराठवाडा मुक्तिसंग्रामदिनी छत्रपती संभाजीनगर शहरातील सिद्धार्थ उद्यानातील स्मृतिस्तंभास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुष्पचक्र अर्पण करून मुक्तिसंग्रामातील हुतात्म्यांना अभिवादन केले. त्यानंतर पोलीस दलातर्फे बंदुकीच्या फैरी झाडून अभिवादन करण्यात आले. मुख्य शासकीय समारंभात मुख्यमंत्र्यांनी ध्वजारोहण केले. ध्वजारोहण सोहळ्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी उपस्थित स्वातंत्र्य सैनिकांच्या भेटी घेतल्या, त्यांच्याशी संवाद साधून त्यांची विचारपूस केली. त्यानंतर स्मृतिसंग्रहालयास भेट देऊन पाहणी केली.

## मराठवाड्याचा मागासलेपणाचा शिक्का आता पुसणार– मुख्यमंत्री

मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी मंत्रिमंडळ बैठकीत ४५ हजार कोटी रुपयांहून अधिक विविध विकासकामांचा संकल्प केला आहे, मराठवाड्यात विकासाची कामे सुरू झाली असून यातून मराठवाड्यावरचा मागासलेपणाचा शिक्का आता पुसणार आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठवाड्याच्या जनतेला दिली.

मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामात अनेकांनी योगदान दिले. या मुक्तिसंग्रामाची प्रेरणा कायम राखण्यासाठी विभागातील

प्रत्येक जिल्ह्यात स्मृतिस्तंभ उभारण्यासाठी दोन कोटी रुपये देण्यात आले आहेत. यामुळे पुढील पिढ्यांना या मुक्तिसंग्रामाची प्रेरणा मिळत राहील. मंत्रिमंडळ बैठकीत मराठवाड्याच्या विकासाचा संकल्प करण्यात आला आहे. मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासाच्या पर्वाची ही सुरुवात आहे. जिल्ह्यातील रखडलेल्या प्रकल्पांना शासन गती देत आहे. ही गती देत असताना नवे प्रकल्पही कार्यान्वित करण्यात येत आहेत. केंद्रशासनाच्या मदतीनेही अनेक प्रकल्प राबवण्यात येत आहेत. त्यासाठी केंद्राकडे मदतीचा प्रस्तावही पाठवण्यात आला आहे. मराठवाड्यात रस्ते विकास, आरोग्य, शिक्षण, सिंचन, कृषी अशा विविध क्षेत्रात विकास करण्यासाठी प्रकल्प राबवण्यात येत आहेत. मराठवाड्याची भूमी ही इथल्या जनतेने मोठ्या कष्टाने समृद्ध केली आहे. सध्या पावसाने ओढ दिली आहे. त्यामुळे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये, म्हणून यंदा एक रुपयात पीक विमा दिला आहे. कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत देण्यास शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही देऊन मराठवाड्याच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे. मराठवाड्याला विकसित प्रदेश म्हणून आपण पुढे नेण्याचा संकल्प करू या, असे आवाहन यावेळी मुख्यमंत्र्यांनी केले.

## चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त सिद्धार्थ उद्यानात मुख्य शासकीय समारंभस्थळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे आयोजित चित्रप्रदर्शनाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची यावेळी विशेष उपस्थिती होती. या प्रदर्शनात मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या इतिहासाशी निगडित महत्त्वाची छायाचित्रे व महत्त्वाच्या माहितीचे सादरीकरण करण्यात आले. तसेच डॉ. मंगला बोरकर यांनी तयार केलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या रेखाचित्रांची मांडणीही प्रदर्शनात करण्यात आली.

जिल्हा माहिती कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी संपादित केलेल्या 'मराठवाडा मुक्तिसंग्रामाची स्मृतिगाथा' या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच नांदेड जिल्हा माहिती कार्यालयाने तयार केलेल्या 'मराठवाडा मुक्तिसंग्राम, एक आकलन' ही माहिती पुस्तिका, आणि स्मृतिदर्शिका २०२३-२४ चे प्रकाशन करण्यात आले. जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत या पुस्तकांची निर्मिती करण्यात आली आहे.

## सांस्कृतिक कार्य विभागाचे सूक्ष्म नियोजन

मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक संचालनालयाचे प्रधान सचिव विकास खारगे यांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रमांचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले होते. मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यात विविध कार्यक्रमांच्या आयोजनाबाबत त्यांचे बारकाईने लक्ष होते. सांस्कृतिक कार्यक्रमांपासून ते व्याख्यानमाला, प्रबोधन कार्यक्रमांसह सर्वच बाबींचा दैनंदिन आढावा त्यांनी घेतला. अतिशय शिस्तबद्ध आणि काटेकोर नियोजनामुळे सर्व कार्यक्रम यशस्वीपणे पार पडले.

## चित्ररथाद्वारे जनजागृती

**जालना :** मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवानिमित्त जालना पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मराठवाडा मुक्तिसंग्रामात स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या अभूतपूर्व योगदानाची माहिती सर्वदूर पोहोचवण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली चित्ररथ जिल्ह्यातील १५४ शहरे व गावांतून फिरवण्यात आला व जनजागृती करण्यात आली. या चित्ररथाच्या माध्यमातून मराठवाडा मुक्तिसंग्रामाची माहिती जिल्ह्यातील जनतेपर्यंत पोहोचवण्यात आली. जालना येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हा क्रीडा कार्यालयामार्फत महिलांसाठी स्व-संरक्षण व सुरक्षेचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. शाळांनी श्रमदान, स्वच्छता आणि विद्यार्थ्यांना स्मारक भेटींचे आयोजन करून माहिती दिली. जिल्ह्यातील शाळांमधून अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त स्वातंत्र्यसैनिकांच्या भेटी घेऊन मुलाखती घेण्यात आल्या. जिल्ह्यांतील शाळांमधून जिल्हास्तरीय ऑनलाइन बालनाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

## विविध कार्यक्रमांचे आयोजन

**बीड :** मराठवाडा मुक्तिसंग्रामानिमित्त शहरातील हुतात्मा स्मारक चौकात हुतात्म्यांना मानवंदना देण्यात आली. उपस्थित स्वातंत्र्यसैनिकांनी ही मानवंदना दिली. पोलीस मुख्यालय येथे मुख्य शासकीय कार्यक्रमात कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. जिल्हा माहिती कार्यालय बीडच्या वतीने मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास गावागावात पोहोचावा, यासाठी तयार करण्यात आलेल्या चित्ररथालाही श्री. मुंडे यांनी हिरवा झेंडा दाखवून रवाना केले. सतीश साळुंखे यांचे 'हैद्राबाद मुक्तीचा रणसंग्राम' हे काळाचा पट उलटणारे नाटक अत्यंत चांगल्या पद्धतीने मंचावर कलाकारांनी अभूतपूर्व अभिनय करून सादर केले. या नाटकातून इतिहासासह प्रबोधन करण्यात आले. मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनातून विविध प्रेरणादायी



## वयोवृद्ध स्वातंत्र्यसेनानींप्रति मुख्यमंत्र्यांचा आदरभाव

मुख्य शासकीय सोहळ्यात ध्वजारोहणानंतर उपस्थितांना संबोधित केल्यानंतर मुख्यमंत्री शिंदे हे सोहळ्यास उपस्थित स्वातंत्र्यसैनिकांना भेटण्यासाठी गेले. तेथे भेटत असताना समोरून ९० हून अधिक वर्षे वय असणाऱ्या विमल देशपांडे या त्यांना भेटण्यासाठी येत असताना मुख्यमंत्र्यांना दिसल्या. त्यांना वयोमानामुळे गर्दीतून वाट काढणे शक्य होत नव्हते. त्यांची अवस्था पाहून मुख्यमंत्र्यांनी स्वतः सांगितले की, 'त्यांना तेथेच बसू द्या, मीच तेथे येतो,' असे म्हणत मुख्यमंत्री श्रीमती देशपांडे यांच्यापर्यंत पोहोचले आणि त्यांची आस्थेने विचारपूस केली. या प्रसंगातून मुख्यमंत्र्यांच्या ज्येष्ठांप्रति असलेल्या आदरभावाचे दर्शन उपस्थितांना झाले.





कार्यक्रम राबवण्यात आले. जिल्ह्यात चार दिवस राबवण्यात आलेल्या या कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी आणि नव्या, तरुण पिढीला मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास कळावा, त्यातून स्फूर्ती मिळावी यासाठी इतिहासवीरांचे स्मरण करण्यात आले. इतिहासतज्ज्ञ डॉ. सतीश कदम यांचे व्याख्यान झाले, तर शिवशाहीर बंडू खरोटे यांनी मराठवाड्याचा गौरवशाली इतिहास पोवाड्याच्या माध्यमातून सादर केला.

## चित्रप्रदर्शनासह विविध कार्यक्रम

**परभणी** : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या अमृतमहोत्सवानिमित्त परभणी येथे मुख्य शासकीय कार्यक्रमात पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमानंतर पालकमंत्र्यांनी स्वातंत्र्यसैनिक, वीरमाता, वीरपत्नी, वारस यांची भेट घेऊन विचारपूस केली. जिल्हा प्रशासनाकडून एकता दौड, सायकल रॅली, व विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, कविसंमेलन, सकाळी एकता दौड व सायकल रॅली, विद्यार्थ्यांची प्रभातफेरी, गीतगायन, पोवाडा, भारुड अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला. महानगरपालिकेच्या वतीने आयोजित चित्रकला व रांगोळी स्पर्धेत महिलांचा



सहभाग लक्षणीय ठरला. शासकीय जिल्हा ग्रंथालयात आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथप्रदर्शनाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. मुक्तिसंग्रामाशी संबंधित माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

## व्याख्यानमालेचे आयोजन

**लातूर** : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.लातूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात आले. जिल्हा परिषदेचा माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा माहिती कार्यालय आणि बाबासाहेब परांजपे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'शौर्यगाथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची' व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. शालेय आणि कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास पोहोचवण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये ८२ व्याख्याने झाली. मराठवाडा मुक्तिसंग्रामात लातूर जिल्ह्यात झालेले लढे, विविध प्रसंग घटनांचा इतिहास एकत्रित स्वरूपात मांडण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय, लातूरच्या वतीने 'मराठवाडा मुक्तिगाथा : लातूर विशेष' या स्मृतिग्रंथाची निर्मिती करण्यात आली. मराठवाडा अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त जिल्ह्यातील महसुली मंडळाच्या गावांमध्ये चित्ररथाद्वारे मुक्तिसंग्रामाचा इतिहास पोहोचवण्याचा उपक्रम राबवण्यात आला. जिल्ह्यातील ६० महसूल मंडळांच्या गावांसह प्रमुख शहरांमध्ये दोन चित्ररथांच्या माध्यमातून मराठवाडा मुक्तिसंग्रामावरील माहितीपट दाखवण्यात आले. जिल्हा प्रशासनाच्या वतीने तालुका शहरे आणि जिल्हास्तरावर ग्रंथ व दुर्मीळ छायाचित्रांच्या प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद मिळाला.

## सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रतिसाद

**नांदेड** : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. नांदेड जिल्ह्यात मराठवाडा मुक्तिसंग्रामातील हुतात्मा गोविंद पानसरे यांच्या समाधीस्थळी श्रद्धांजली अर्पण करून अमृतमहोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्हा प्रशासनाच्या वतीने १४ ते १७ सप्टेंबर दरम्यान जिल्ह्यांत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्वच्छता रॅली व प्रभातफेरी, परिसंवाद, चित्रप्रदर्शन, चित्ररथ; तसेच मध्यरात्री १२ वाजता गावांमध्ये दीपप्रज्वलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिल्ह्यातील ग्रामस्थांनी घेतलेला सहभाग नोंद घेणारा ठरला. मराठवाडा मुक्तिसंग्रामात महत्त्वाचा मानला जाणारा व



निर्णायक लढा ठरलेल्या उमरी येथे ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ.प्रभाकर देव यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच मराठवाड्यातील ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञांच्या मुलाखती, भाषणे यांना युट्यूबच्या माध्यमातून देण्यात आलेल्या प्रसिद्धीला मोठा प्रतिसाद मिळाला. पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला.

## मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा जागर

**हिंगोली** : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त पालकमंत्री संदीपानराव भुमरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



जिल्ह्यातील स्थानिक कलावंतांमार्फत विविध परंपरागत लोककला सादरीकरणाचे कार्यक्रम जिल्हाभर आयोजित करण्यात आले. पोवाडा, पोतराज, गोंधळी आदी विविध परंगपरागत पथनाट्ये व लोककला सादरीकरणाच्या माध्यमातून मुक्तिसंग्रामाचा जागर करण्यात आला. जिल्ह्यात विविध क्रीडा स्पर्धा, चित्ररथ, सायकल रॅली, मॅराथॉन, कविसंमेलन, दिव्यांगांसाठी विविध कलागुण स्पर्धा, स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबिर, ग्रंथप्रदर्शन, वृक्षारोपण, रांगोळी स्पर्धा, कुस्ती स्पर्धा, व्यसनमुक्तीचा जागर, तसेच गौरव रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## सायक्लोथॉन, ऑपरेशन पोलोच्या स्मृतींना उजाळा

**धाराशिव** : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त पालकमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणांनी ऑपरेशन पोलोच्या अमृतमहोत्सवी वर्षाची सुरुवात झाली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने ऑपरेशन पोलोच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शाळकरी विद्यार्थी, सर्वसामान्य नागरिक आणि सायकलपटूंनी धाराशिव ते तुळजापूर असा प्रवास करत देशभक्तीपर घोषणा देत ७५ वर्षांपूर्वी मराठवाडा मुक्तिसाठी शहीद झालेल्या जवानांना मानवंदना दिली. तुळजापुरात मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या वेळी शहीद झालेल्या सैनिकांच्या वारसांचा सत्कार करण्यात आला. जिल्ह्यात ७५ हजार वृक्षलागवड व प्रत्येक ग्रामपंचायतीत ७५ दिव्यांचे दीपोत्सव या उपक्रमाला जिल्हाभरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



## प्रतिज्ञा :

छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थितांना मराठवाडा विकासाची प्रतिज्ञा दिली.

१. स्वतंत्र भारताचे नागरिकत्व देणाऱ्या आणि वैभवशाली महाराष्ट्राशी जोडणाऱ्या मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा आम्ही सार्थ अभिमान बाळगू...

२. हा मुक्तिसंग्राम अनेक ध्येयवादी स्वातंत्र्यसैनिकांच्या अमूल्य बलिदानातून आणि जनतेच्या सक्रिय पाठिंब्यातून सिद्ध झाला आहे, याची आम्ही कृतज्ञतापूर्वक जाणीव ठेवू...

३. मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृतमहोत्सव वर्षात सदैव आम्ही सानंद वचनबद्ध राहू...

**सहायक संचालक (माहिती)**
**संचालक माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध लोकाभिमुख निर्णय घेण्यात आले. मराठवाड्याचा कायापालट घडवणारा तब्बल ४६ हजार ५७९ कोटी ३४ लाख रुपयांचा संकल्प मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केला.**

# मराठवाड्याचा कायापालट करण्याचा संकल्प

**किशोर गांगुर्डे**

मराठवाड्यात विकासकामे, योजनांसाठी ३७ हजार १६ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. राज्य मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्य/मराठवाड्यासाठी ९ हजार ४३७ कोटी ९० लाख खर्चाचे निर्णय घेण्यात आले.

मराठवाड्याच्या विकासासाठी एकूण ४६ हजार ५७९ कोटी ३४ लाख खर्च करण्यात येणार आहेत.

| मराठवाड्यात सुरू असलेल्या कामांची विभागनिहाय माहिती | |
|---|---|
| जलसंपदा | २१ हजार ५८० कोटी २४ लाख रुपये |
| सार्वजनिक बांधकाम | १२ हजार ९३८ कोटी ८५ लाख |
| पशुसंवर्धन, दुग्धविकास, मस्त्यव्यवसाय | ३ हजार ३१८ कोटी ५४ लाख |
| नियोजन | १ हजार ६०८ कोटी २८ लाख |
| परिवहन | १ हजार १२८ कोटी ६९ लाख |
| ग्रामविकास | १ हजार २९१ कोटी ४४ लाख |
| कृषी विभाग | ७०९ कोटी ४९ लाख |
| क्रीडा विभाग | ६९६ कोटी ३८ लाख |
| गृह | ६८४ कोटी ४५ लाख |
| वैद्यकीय शिक्षण | ४९८ कोटी ६ लाख |
| महिला व बालविकास | ३८६ कोटी ८८ लाख |
| शालेय शिक्षण | ४९० कोटी ७८ लाख |
| सार्वजनिक आरोग्य | ३५.३७ कोटी |
| सामान्य प्रशासन | २८७ कोटी, |
| नगरविकास | २८१ कोटी ७१ लाख |
| सांस्कृतिक कार्य | २५३ कोटी ७० लाख |
| पर्यटन | ९५ कोटी २५ लाख |
| मदत व पुनर्वसन | ८८ कोटी ७२ लाख |
| वन विभाग | ६५ कोटी ४२ लाख |
| महसूल विभाग | ६३ कोटी ६८ लाख |
| उद्योग विभाग | ३८ कोटी |
| वस्त्रोद्योग | २५ कोटी |
| विधि व न्याय | ३ कोटी ८५ लाख |

## विभागनिहाय घेण्यात आलेले निर्णय

### जलसंपदा विभाग

- मराठवाड्यातील पश्चिम वाहिनी नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळवणार. २२.९अ.घ.फूट पाणी वळवण्यासाठी १४ हजार ४० कोटींची योजना राबवणार.
- पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यानाचे रूप पालटवणार. १५० कोटी.
- वैजापूर तालुक्यातील शनिदेवगावला उच्चपातळीचा बंधारा. १७९३ हे. क्षेत्र सिंचित होणार. २८५ कोटी ६४ लाख रुपये.

### नियोजन विभाग

- विविध तीर्थक्षेत्रांचा विकास करणार.
- वेरूळ येथील श्री क्षेत्र घृष्णेश्वर मंदिराचा सुधारित विकास आराखडा. १५६.६३ कोटी रुपये.
- श्री तुळजाभवानी मंदिराचा १३२८ कोटींचा विकास आराखडा.
- श्री क्षेत्र औंढा नागनाथ तीर्थक्षेत्र विकास. ६०.३५ कोटी.
- उदगीर येथे बाबांच्या समाधी स्थळ विकास आराखड्यासाठी १ कोटी रुपये.
- सिल्लोड तालुक्यातील मोजे केळगावचे श्री मुर्डेश्वर महादेव मंदिर देवस्थानाच्या ४५ कोटींच्या विकास आराखड्यास मान्यता.
- पाथरी येथे साईबाबा तीर्थक्षेत्र विकास आराखडा. ९१.८० कोटी रुपये.

### महिला व बालविकास विभाग

- मराठवाड्यातील ३४३९ अंगणवाड्यांच्या बांधकामांचा तीन वर्षांचा कालबद्ध कार्यक्रम. ३८६.८८ कोटी रुपये.

### शालेय शिक्षण विभाग

- मराठवाड्याची राणी लक्ष्मीबाई स्व. दगडाबाई शेळके यांचे धोपटेश्वर येथे स्मारक उभारणार. ५ कोटी.
- मराठवाड्यातील स्वातंत्र्यसेनानीच्या गावातील शाळा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेतून विकसित करणार. ७६ तालुक्यांतून

शाळा निवडणार. विविध सुविधांसाठी ९५ कोटी.

- बीड जिल्ह्यांतील ऊसतोड कामगारांच्या मुलींसाठी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना. १६०० मुलींना लाभ. ८०.०५ कोटी रुपये.
- मराठवाड्यातील निजामकालीन शाळांची दुरुस्ती व पुनर्बांधणी करणार. २० टक्के लोकसहभागाची अट शिथिल. २०० कोटी खर्च.
- परभणी जिल्ह्यातील सोनपेठ आणि पालम तालुक्यांमध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरू करणार. ४०० मुलींना शिक्षण घेणे शक्य. २०.७३ कोटी खर्च.

## क्रीडा विभाग

- परभणी जिल्हा क्रीडा संकुलासाठी कृषी विभागाची जागा मंजूर. १५ कोटी रुपये.
- छत्रपती संभाजीनगर येथे क्रीडा विद्यापीठ स्थापण्यासाठी समिती गठित. ६५६.३८ कोटी खर्चून अद्ययावत क्रीडा विद्यापीठ उभारणार.
- छत्रपती संभाजीनगर येथे कलाग्रामच्या जागेवर एमआयडीसी आणि मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम उभारणार.
- परळीत ५ कोटींचे तालुका क्रीडा संकुल उभारणार.
- उदगीर तालुक्यात जळकोट येथे ५ कोटी खर्चून क्रीडा संकुल उभारणार.
- परभणी जिल्हा क्रीडा संकुलाचे अद्ययावतीकरण करण्यासाठी १५ कोटी रुपयांस मंजुरी.

## पशुसंवर्धन विभाग

- मराठवाड्यात दुधाची क्रांती येणार. सर्व जिल्ह्यांतील ८,६०० गावांत दुधाळ जनावरांचे वाटप. ३,२२५ कोटी रुपये.
- तुळजापूर तालुक्यात शेळी समूह योजना राबवण्यासाठी १० कोटी रुपये.
- देवणी या गोवंशीय प्रजातीच्या उच्च दर्जाची वंशावळ निवड - ४ कोटी रुपये.

## पर्यटन विभाग

- फर्दापूर, छत्रपती संभाजीनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज संकल्पना उद्यान उभारणार. प्रत्येकी ५० कोटी रुपये.
- उदगीर तालुक्यातील हत्तीबेट येथे पर्यटनस्थळ- ५ कोटी रुपये.
- अंबड येथील मत्स्योदरीदेवी संस्थानाचा विकास. ४० कोटी रुपये.

## सांस्कृतिक कार्य विभाग

- मराठवाड्यातील विविध स्मारके, प्रसिद्ध मंदिरांचा विकास. अंबेजोगाई, संगमेश्वर, तर, महादेव मंदिर माणकेश्वर, तेर मंदिर, महालक्ष्मी मंदिर, होट्टल मंदिर, भोग नृसिंह, गुप्तेश्वर मंदिर धाराशूर, चारठाणा मंदिर समूह, आदी. २५३ कोटी ७० लाख रुपये.

## महसूल विभाग

- बीड जिल्हाधिकारी इमारत उभारणार. ६३.६८ कोटी रुपये.
- लातूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयाची मध्यवर्ती प्रशासकीय शासकीय इमारत.

## वन विभाग

- लातूर, वडवाव, नागनाथ टेकडी आदींचा विकास करणार. ५.४२ कोटी रुपये.
- माहूर येथे वनविश्रामगृह बांधणार.

## मदत व पुनर्वसन

- वसमत मौजे कुरुंदा येथे पूर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्यासाठी ३३.०३ कोटी रुपये.
- मराठवाड्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा मजबूत करणार. प्रादेशिक आपत्ती प्रतिसाद केंद्र आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे बळकटीकरण. ५५.६९ कोटी रुपये खर्च.
- धारुर तालुक्यातील सुकळी या गावाचे पुनर्वसन.

## उद्योग विभाग

- आष्टीला कृषिपूरक क्षेत्रासाठी एमआयडीसी उभारणार. ३८ कोटी रुपये.
- वसमत, चाकूर, वडवणी (पुसरा), मौजे सिरसाळा ता. परळी येथे एमआयडीसी स्थापन करणार.
- उदगीर आणि जळकोट येथे एमआयडीसी मंजूर.

## कौशल्य विकास विभाग

- धाराशिव विश्वकर्मा रोजगार योजना राबवणार.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

- मराठवाड्यातील रस्ते सुधारणार. ३०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांची कामे हाती घेणार. २४०० कोटी रुपये.
- नाबार्ड अर्थसाहाय्यातून मराठवाड्यात ४४ कामे हाती घेणार. १०९ कोटी रुपये.
- हायब्रीड ॲन्यूईटी योजनेतून मराठवाड्यातील १०३० कि.मी. लांबीचे रस्ते सुधारणार. १० हजार ३०० कोटी रुपये.
- औसा तालुक्यातील मातोळा येथे; तसेच कंधार तालुक्यातील मौजे कंल्हाळी येथे हुतात्म्यांचे स्मारक उभारणार.
- लोहारा तालुक्यातील मौजे हिप्परगा येथे बहुउद्देशीय इमारत उभारणार.
- लातूर-बार्शी-टेंभुर्णी महामार्ग चार पदरी करणे.

## ग्रामविकास विभाग

- मराठवाड्यातील ७५ ग्रामपंचायतींना आता स्वतःचे कार्यालय मिळणार आहे. पुढील ३ वर्षांत १८० कोटी रुपये देणार. स्व. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत.

## ऊर्जा विभाग

- परळी औष्णिक विद्युत केंद्र येथील प्लांट्सना मंजुरी.

## गृह विभाग

- नांदेड शहरात सीसीटीव्हीचे जाळे. १०० कोटी रुपये.
- १८ निजामकालीन पोलीस स्टेशन्सचा होणार कायापालट. ९२.८० कोटी रुपये.
- छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौक पोलीस ठाणे इमारत आणि निवासस्थाने; तसेच मिल कॉर्नर येथील निवासस्थाने. १९१ कोटी ६५ लाख रुपये.

## परिवहन विभाग

- छत्रपती संभाजीनगर विभागात आधुनिक ११९७ ई-बसेस चालवणार. ४२१ कोटी रुपयांस मान्यता.

- छत्रपती संभाजीनगर विभागात वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्र स्थापन करणार. १३५.६१ कोटी रुपये.
- राज्यातील ९ राष्ट्रीय महामार्गांवर (इंटेलिजन्स ट्राफिक मॅनेजमेंट सिस्टिम) बसवणार.

## नगरविकास विभाग

- मराठवाड्यातील विविध शहरांमधील मूलभूत सोयीसुविधा विकासासाठी रुपये ६४०.२९ कोटी रुपये निधी . त्यापैकी रुपये ५३४.७४ कोटी रुपये नगरपरिषद/ नगरपंचायत क्षेत्रासाठी, तर ५०५.५५ कोटी रुपये महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर.
- केंद्रपुरस्कृत अमृत २.० - छत्रपती संभाजीनगर शहरासाठी २७४०.७५ कोटी रुपये किमतीचा पाणीपुरवठा प्रकल्प २७५.६८ कोटी रुपये किमतीचा मलनिस्सारण प्रकल्प, तर २.७८ कोटी रुपये किमतीचा सरोवर पुनरुज्जीवनाचा प्रकल्प असे एकूण ३०५९.२१ कोटी रुपये किमतीचे प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत.
- नांदेड वाघाळा महानगरपलिकेसाठी ३२९.१६ कोटी रुपये किमतीचा मलनिस्सारण प्रकल्प.
- भूम नगरपरिषदेसाठी १.८३ कोटी रुपये किमतीचा सरोवर पुनरुज्जीवनाचा प्रकल्प.
- माहूर नगरपरिषदेसाठी २४.६२ कोटी रुपये किमतीचा सरोवर पुनरुज्जीवनाचा प्रकल्प.
- पेठ उमरी नगरपंचायतीसाठी ३.६० कोटी रुपये किमतीचा सरोवर पुनरुज्जीवनाचा प्रकल्प.
- औंढा नागनाथ तीर्थक्षेत्रासाठी ३६.४४ कोटी रुपये किमतीचा पाणीपुरवठा प्रकल्प.
- खुलताबाद शहरासाठी २१.३२ कोटी रुपये किमतीचा पाणीपुरवठा प्रकल्प.
- नळदुर्ग शहरासाठी ९३.४२ कोटी रुपये किमतीचा रस्ते विकास प्रकल्प.
- माजलगाव शहरासाठी ४६.५४ कोटी रुपये किमतीचा रस्ते विकास प्रकल्प.
- तुळजापूर तीर्थक्षेत्रासाठी १५८.५२ कोटी रुपये किमतीचा रस्ते विकास प्रकल्प.
- उमरगा शहरासाठी १२६.८२ कोटी रुपये किमतीचा रस्ते विकास प्रकल्प.
- अंबड शहरातील भुयारी गटार प्रकल्प १६.५६ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.
- जालना शहर पाणीपुरवठा प्रकल्पामध्ये ३५ एमएलडी क्षमतेचे अंबड येथे जलशुद्धीकरण केंद्र व १५ एमएलडी क्षमतेचे जालना येथे जलशुद्धीकरण केंद्र बांधण्यासाठी ५६ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.
- श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग विकास आराखडा - २८६.६८ रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.
- परभणी शहराचा ४०८.८३ कोटी रुपये किमतीचा मलनिस्सारण प्रकल्प मंजूर करण्यात येईल.
- लातूर रस्ते विकास प्रकल्प ४१.३६ कोटी रुपये मंजूर करण्यात येईल.
- उदगीर नगरपरिषदेस नाट्यगृहाच्या बांधकामासाठी १२ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात येईल.
- नांदेड वाघाळा महानगरपालिका क्षेत्रातील कार्यान्वित असलेल्या घनकचरा प्रकल्प व प्रगतिपथावर असलेल्या बायोगॅस प्रकल्पासाठी ८.०७ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

## माहिती व तंत्रज्ञान संचालनालय

- मराठवाड्यात ४३२ ग्रामपंचायतींना भारतनेट जोडणी वर्षभरात देणार. २८६ कोटी रुपये.
- छत्रपती संभाजीनगर व नांदेड येथे विद्यापीठ परिसरात मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यासाठी माहिती संग्रहालय.

## रोजगार हमी योजना

- मराठवाड्यात ४ लाख विहिरींचा कार्यक्रम राबवणार.

## कृषी विभाग

- मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी बीड येथे सीताफळ आणि इतर फळांवर प्रक्रिया उद्योग. ५ कोटी रुपये.
- हिंगोलीतील हरिद्रा संशोधन केंद्रासाठी १०० कोटी रुपये.
- अंबाजोगाई येथील शासकीय कृषी महाविद्यालयात मुलामुलींचे वसतिगृह सुरू. १०५ कोटी रुपये.

## सार्वजनिक आरोग्य विभाग

- आष्टी येथे उप जिल्हा रुग्णालय, अहमदपूर, चाकूर, माजलगाव येथे ट्रॉमा केअर सेंटर.
- किनगाव ग्रामीण रुग्णालय बांधकाम. एकूण निधी ३५ कोटी ३७ लाख रुपये.

## मृद् व जलसंधारण विभाग

- अहमदपूर तालुक्यातील मानार नदीवर ९ कोल्हापुरी बंधारे.
- आष्टी आणि शिरुर तालुक्यात कोल्हापूर बंधाऱ्यांचे लातूर टाईप बॅरेजमध्ये रूपांतर आणि गंगाखेड तालुक्यातील मासोळी, घळाटी, टोकवाडी आणि पोखर्णी नदीवर सिमेंट नाले बंधारे.

## अल्पसंख्याक विकास

- छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्याक आयुक्तालय व जिल्हास्तरावर स्वतंत्र कार्यालय.
- पारंपरिक शिक्षणाबरोबर बोर्डाच्या शालेय अभ्यासक्रमाचे शिक्षण देणारे मदरशांचे अनुदान २ लाखांवरून १० लाख करणे.

## इतर घोषणा

- परळी वैजनाथ विकास आराखड्यात आयुर्वेद पार्कचा समावेश,
- वेरूळ येथे शहाजी राजे भोसले यांचे स्मारक.

## छत्रपती संभाजीनगर, धाराशिव नामकरण फलकांचे अनावरण

छत्रपती शिवाजी महाराज की जय... छत्रपती संभाजी महाराज की जय... या जयघोषाच्या निनादात छत्रपती संभाजीनगर महसुली विभागाचे आणि धाराशिव जिल्हा नामकरण फलकांचे अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी छत्रपती संभाजीनगर महसुली विभाग, जिल्हा, तालुका, गाव आणि धाराशिव जिल्हा, तालुका, गाव या नामकरण फलकांचे अनावरण करण्यात आले.

संचालक (माहिती), संचालक माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर तथा मा. मुख्यमंत्री महोदयांचे
जनसंपर्क अधिकारी.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७३व्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण राज्यात 'नमो ११ कलमी कार्यक्रम' राबवण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे, छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा मुक्तिसंग्रामदिनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत या अभियानाची घोषणा केली. 'नमो ११ कलमी' कार्यक्रमात समाविष्ट असलेल्या विविध घटकांवर टाकलेला हा दृष्टिक्षेप...**

# नमो ११ कलमी कार्यक्रम

### नमो महिला सशक्तीकरण

नमो ११ कलमी कार्यक्रमात नमो महिला सशक्तीकरण अभियान राबविण्यात येणार असून ७३ लाख महिलांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. ४० लाख महिलांना शक्ती गटाच्या प्रवाहात जोडण्यासोबतच २० लाख नवीन महिलांच्या शक्ती गटाची जोडणी करण्यात येणार आहे. अभियानांतर्गत ५ लाख महिलांना रोजगार व तांत्रिक प्रशिक्षण, ५ लाख महिलांना उद्योग उभारणीसाठी भांडवल; तसेच ३ लाख महिला उद्योजिकांना बाजारपेठ व ग्राहक उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### 'नमो ११ कलमी' कार्यक्रमात सर्व घटकांचा समावेश

जगभरात भारताचा गौरव आणि सन्मान वाढवण्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे मोलाचे योगदान आहे. जी-२० परिषदेचे अध्यक्षपद भारताला मिळणे ही देशाच्या दृष्टीने गौरवाची बाब आहे. राज्याच्या ज्या शहरांमध्ये ही परिषद झाली, त्या ठिकाणी आपल्या शासनाने घेतलेल्या निर्णयांची माहिती इतर देशांपर्यंत पोहोचवण्याची संधी या परिषदांच्या माध्यमातून मिळाली.

दिल्ली येथे झालेल्या जी २० च्या बैठकीत प्रधानमंत्री यांनी घेतलेल्या निर्णयांना, ठरावांना विविध देशांचे राष्ट्राध्यक्ष, प्रधानमंत्र्यांनी एकमुखाने संमती दिली. 'वसुधैव कुटुंबकम्' हा आपला मूलमंत्र आहे. 'सबका विकास, सबका साथ, सबका प्रयास, सबका विश्वास' या ठरावावरही एकमुखाने शिक्कामोर्तब करण्यात आला. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'नमो ११ कलमी' कार्यक्रम घोषित केला आहे. यात समाजातील सर्व घटकांच्या कल्याणाचा विचार करण्यात आला आहे. या सर्व कार्यक्रमांच्या नियोजन आणि अंमलबजावणीवर विशेष लक्ष राहणार आहे.

**- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

### नमो कामगार कल्याण

भारत उभारणीसाठी योगदान देणाऱ्या हातांचा सन्मान म्हणून 'नमो कामगार कल्याण अभियान'अंतर्गत ७३ हजार बांधकाम कामगारांना सुरक्षा संच उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### नमो शेततळी

या अभियानांतर्गत ७३ हजार शेततळ्यांची उभारणी करण्यात येणार असून पडणाऱ्या प्रत्येक पावसाचा थेंब अन् थेंब याद्वारे साठवण्यात येणार आहे. शेततळ्यांच्या माध्यमातून शेतीला मुबलक पाणी उपलब्ध करून देत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याबरोबरच याच शेततळ्यातून मत्स्यव्यवसायासारखे शेतीसंलग्न व्यवसाय उभारण्यावरही भर देण्यात येणार आहे.



### नमो आत्मनिर्भर व सौर ऊर्जा गाव

या अभियानातून ७३ आत्मनिर्भर गावे विकसित करण्यात येणार आहेत. बेघरांना किंवा कच्च्या घरात राहणाऱ्यांना पक्की घरे बांधून देणे, घरांमध्ये शौचालय बांधून त्याचा वापर होण्यासाठी प्रयत्न करणे, पक्क्या रस्त्यांचे जाळे उभारणे, गरजू नागरिकांना गावातच रोजगार उपलब्ध करून देणे, महिलांचे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण करणे, पाण्याच्या बाबतीत पूर्णपणे स्वावलंबी बनवणे, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना पूर्णपणे आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे, सेंद्रिय शेतीसाठी मार्गदर्शन व साह्य, सेंद्रिय उत्पादनांसाठी विशेष बाजारपेठ, उत्पादन निर्यातीसाठी मार्गदर्शन, उत्पादनांवर प्रक्रियेसाठी मार्गदर्शन व ७३ यशस्वी प्रगतशील शेतकऱ्यांचा गौरव या अभियानातून करण्यात येणार आहे.

### नमो गरीब व मागासवर्गीय सन्मान

गरीब व मागासवर्गीय वस्त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी 'नमो गरीब व मागासवर्गीय सन्मान अभियान' राबवण्यात येणार आहे. प्रधानमंत्री आवास

योजनेच्या माध्यमातून गरीब व मागासवर्गीयांना पक्की घरे बांधून देण्यात येणार आहेत. तसेच वस्त्यांमध्ये पक्क्या रस्त्यांची उभारणी, घरांमध्ये वीज पुरवठा, समाजप्रबोधनाचे काम व्हावे, यासाठी समाजमंदिराची उभारणी, गरीब व मागासवर्गीय महिलांना सामाजिक व आर्थिक सक्षम होण्यासाठीही या अभियानातून मदत करण्यात येणार आहे.

### नमो ग्राम सचिवालय

या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात ७३ ग्रामपंचायत कार्यालयांची उभारणी करण्यात येणार आहे. ग्रामपंचायतीमध्ये सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून याठिकाणी पूर्णपणे सौर ऊर्जेचा वापर होण्यासाठीचे नियोजन करण्यात येणार आहे. सर्व ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये वेगवान इंटरनेट सुविधा देण्यात येणार असून संपूर्ण गावाचे नियंत्रण कक्षाची उभारणीही याद्वारे करण्यात येणार आहे.

### नमो आदिवासी स्मार्ट शाळा

आदिवासी स्मार्ट शाळांची उभारणी व सुधारणा करण्याबरोबरच ७३ विज्ञान केंद्रे या अभियानांतर्गत उभारण्यात येणार आहेत. आधुनिक संसाधनयुक्त शाळांच्या उभारणी, वेगवान इंटरनेट सुविधा, विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान व डिजिटल शिक्षण, अंतराळविषयक व विज्ञानातील महत्त्वाच्या विषयांबाबत मार्गदर्शन, महत्त्वाच्या शोधांबाबत माहिती, प्रशिक्षण वर्ग, विज्ञान प्रयोगशाळा; तसेच अंतराळ दर्शन आदी सुविधा या शाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### नमो दिव्यांग शक्ती

या अभियानाद्वारे दिव्यांग पुनर्वसन केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. अभियानस्वरूपात दिव्यांगांचे सर्व्हेक्षण व ओळख निश्चित करण्यात येणार आहे. दिव्यांगांना दिव्यांग प्रमाणपत्र, परिवहन व रेल्वे पास आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. दिव्यांगांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्यासाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ देणे, दिव्यांगांना तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देणे, दिव्यांगांना व्यवसाय उभारण्यासाठी भांडवल व कर्ज देण्याबरोबरच दिव्यांगांचे व त्यांच्या पालकांचे या अभियानातून समुपदेशन करण्यात येणार आहे.

### नमो क्रीडा मैदान व उद्यान

७३ सुसज्ज क्रीडा मैदाने व उद्यानांची उभारणी या अभियानाद्वारे करण्यात येणार आहे. यातून खेळाडूंना मैदानी क्रीडा सुविधा देण्याबरोबरच खेळाडूंचे समुपदेशन करून त्यांच्या सक्षमीकरणावर भर देण्यात येणार आहे.



### नमो शहर सौंदर्यीकरण

७३ ठिकाणी शहर सौंदर्यीकरण प्रकल्प राबवण्यात येणार आहे. शहरातील जीवनमान उंचावण्यासाठी बगिचे, तलाव, रस्ते, पदपथ, दुभाजक, चौक अशा सार्वजनिक ठिकाणी सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे. लोकसहभागाच्या माध्यमातून सौंदर्यीकरण टिकून राहावे यासाठीही प्रयत्न करण्यात येणार आहेत.

### नमो तीर्थस्थळ व गडकिल्ले संरक्षण

या अभियानातून ७३ ऐतिहासिक धार्मिक स्थळांची सुधारणा करण्यात येणार आहे. ऐतिहासिक व पुरातन मंदिरांचा जीर्णोद्धार, प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देणे, डिजिटल दर्शन, परिसर सुशोभिकरण व स्वच्छता आदी कामे या अभियानातून करण्यात येणार आहेत.

### 'नमो ११ कलमी कार्यक्रम' : एक दृष्टिक्षेप

- नमो महिला सशक्तीकरण अभियान - ७३ लाख महिलांना शासकीय योजनांचा लाभ
- नमो कामगार कल्याण अभियान - ७३ हजार बांधकाम कामगारांना सुरक्षा संच
- नमो शेततळी अभियान - ७३ हजार शेततळ्यांची उभारणी
- नमो आत्मनिर्भर व सौर ऊर्जा गाव अभियान - ७३ गावे आत्मनिर्भर करणार
- नमो गरीब व मागासवर्गीय सन्मान अभियान - सर्वांगीण विकास करणार
- नमो ग्राम सचिवालय अभियान - प्रत्येक जिल्ह्यात ७३ ग्रामपंचायत कार्यालयांची उभारणी
- नमो आदिवासी स्मार्ट शाळा अभियान - स्मार्ट शाळांची उभारणी
- नमो दिव्यांग शक्ती अभियान - दिव्यांग पुनर्वसन केंद्र उभारणार
- नमो क्रीडा मैदान व उद्यान अभियान - सुसज्ज क्रीडा मैदाने व उद्यानांची उभारणी
- नमो शहर सौंदर्यीकरण अभियान - ७३ शहरांमध्ये शहर सौंदर्यीकरण प्रकल्प राबविण्यात येणार
- नमो तीर्थस्थळ व गडकिल्ले संरक्षण अभियान - ७३ पवित्र व ऐतिहासिक धार्मिक स्थळांची सुधारणा

**महाराष्ट्र राज्य हे विविधतेने नटलेले आहे. राज्यातील पुरातनकालीन मंदिरे, सुसज्ज लेणी, विस्तृत समुद्रकिनारा, ऐतिहासिक वारसा असलेली स्थळे पाहण्यासाठी जगभरातील पर्यटक भेट देतात. राज्याचा समृद्ध इतिहास व संस्कृती ही देशी व विदेशी पर्यटकांना भुरळ घालत असते. इतिहासाची साक्षीदार असलेली स्थळे युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ यादीत समाविष्ट असून यामध्ये एलोरा, अजिंठा, मुंबईतील घारापुरीची किंवा एलिफंटा लेणी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, आर्ट डेको इमारतींचे समूह अशी पाच ठिकाणे, तर नैसर्गिक वर्गवारीत पश्चिम घाटाचाही समावेश आहे.**

# ऐतिहासिक वैभव...

**संध्या गरवारे-खंडारे**

पर्यटनाचे बलस्थान असलेले हे वैभव नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यासाठी विविध पर्यटन महोत्सवांचे आयोजन करणे, खासगी टूर ऑपरेटर्सच्या साहाय्याने पर्यटन सहलींचे आयोजन करणे, आदी पर्यटनासाठीचे विविध उपक्रम शासनामार्फत राबवण्यात येतात. युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळ यादीत समाविष्ट असलेल्या राज्यातील स्थळांची थोडक्यात माहिती देत आहोत.

## एलोरा लेणी (वेरूळ लेणी)

औरंगाबाद जिल्ह्यातील एलोरा लेणी स्थानिक बोलीमध्ये वेरुळ लेणी म्हणून ओळखल्या जातात. एलोरा किंवा एलापुरा, ही थोड्या काळासाठी राष्ट्रकुटाची राजधानी होती. लेणींचा सर्वात जुना संबंध १०व्या शतकात एक अरब भूगोलतज्ज्ञ अल-मास उदी यांनी केला आहे. इ.स.१३५२ मध्ये सुल्तान हसन गंगू, बहमनी शासकाने लेण्यांना भेट दिली. ज्यांच्यासाठी या लेण्यातील त्यावेळी रस्ते दुरुस्त केले गेले. लीळाचरित्र आणि अमृतानुभवात या लेण्यांचा उल्लेख आहे.

महाराष्ट्रात १००० हून अधिक लेण्या आहेत, ज्या इ.स.पूर्व तिसऱ्या शतकापासून ते १२व्या शतकापर्यंतच्या कालावधीत अस्तित्वात आल्या. प्राचीन भारतीय कला आणि शैली वास्तुकलेचे एलोरा लेणी हे उत्कृष्ट उदाहरण आहे. एलोरा लेणी भारतातील परंपरेतील बुद्ध, ब्राह्मण आणि जैन या तीन प्रमुख धर्मांचे प्रतिनिधित्व करतात. ही लेणी दख्खन पठ्ठ्यातील कातळ (बेसॉल्ट) खडकातून खोदलेली आहेत. लेणी साधारण ६व्या शतकापासून ते ११व्या शतकापर्यंतची माहिती देते. एलोरा डोंगररांगेमध्ये एकूण १०० पेक्षा अधिक लेणी आहेत, त्यापैकी ३४ लेण्यांना बहुतेक पर्यटक भेट देतात. ३४ लेण्यांपैकी १ ते १२ बौद्ध लेणी, १३ ते २९ ब्राह्मणी लेणी आणि ३० ते ३४ जैन लेणी आहेत. एलोराच्या प्रेक्षणीय वास्तुशिल्प आणि शिल्पकलेची विपुलता आणि धार्मिक सुसंवाद याला १९८३ मध्ये युनेस्कोने 'जागतिक वारसा स्मारक' म्हणून घोषित केले आहे. येथून औरंगाबाद विमानतळ ३६ कि.मी. अंतरावर असून सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन येथून ३६ कि.मी. असून या शिवाय खासगी बसेस व राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस पर्यटकांसाठी उपलब्ध आहेत.

## अजिंठा लेणी

औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यामध्ये अजिंठा लेणी इ.स.पूर्व २ रे शतक ते इ.स. ४थे शतक अशा प्रदीर्घ कालखंडात २९ बौद्ध लेणी कोरल्या आहेत. औरंगाबाद शहरापासून १०० ते ११० कि.मी. अंतरावर वाघूर नदीच्या परिसराशेजारी ही लेणी आहेत. ही लेणी नदीपात्रापासून १५-३० मीटर (४०-१०० फूट) उंचीवर विस्तीर्ण अशा डोंगररांगांमधील कातळांवर कोरल्या आहेत. प्राचीन भारतात धर्मशाळा, लेणी क्वचित मंदिरेसुद्धा मुख्यत्वे व्यापारी मार्गांवर विश्रांतीसाठी उभारण्यात येत असत. अजिंठा गावाजवळच्या लेण्यांची निर्मितीही याच उद्देशातून सुरू झाली असावी, असे मानले जाते. पुरातत्त्वशास्त्रीय पुराव्यानुसार ही लेणी दोन वेगवेगळ्या कालखंडांत निर्माण केली गेली. ९, १०, १२, १३ व १५-अ ही लेणी हीनयान कालखंडात कोरली गेली असावीत. हा कालखंड साधारणतः इ.स.पूर्व दुसऱ्या शतकाच्या सुमारास सुरू झाला. या सगळ्या लेण्यांतून बुद्धांचे दर्शन स्तूप-रूपांत होते. या व्यतिरिक्त १ ते २९ क्रमांकांची लेणी साधारणतः ८००-९०० वर्षांनंतर (इ.स.च्या सहाव्या व सातव्या शतकाच्या आसपास) महायान कालखंडात निर्माण केली गेलेली असावीत. या लेण्यांतून बुद्धांचे सर्वसामान्य लोकांस परिचित असे रूप दिसून येते.

बौद्ध धर्माचा वारसा जतन करणारी प्रदीर्घ ऐतिहासिक कालखंडाची पार्श्वभूमी लाभलेली अजिंठा लेणी या भारताची जागतिक आंतरराष्ट्रीय पर्यटनासाठी ठळक ओळख करून देणाऱ्या महत्त्वाच्या लेणी आहेत. लेणी घनदाट जंगलाने वेढलेल्या





आहेत. भारताच्या केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या प्रतिष्ठित पर्यटन स्थळ प्रकल्पात देशातील १२ पर्यटन स्थळांची निवड करण्यात आली असून, महाराष्ट्रातील अजिंठा व वेरूळच्या लेण्यांचा या यादीत समावेश आहे. अजिंठा लेणी ही जागतिक वारसा स्थान म्हणून युनेस्कोने १९८३ साली घोषित केली आहे. या लेण्यांना भारतातील पहिल्या जागतिक वारसा स्थळाचा मान आहे. जून २०१३ मध्ये महाराष्ट्राच्या सात आश्चर्यांची घोषणा करण्यात आली असता, त्यात अजिंठा लेणी हे प्रमुख आश्चर्य ठरले आहे. लेण्यांमधील चित्रांपैकी एका लेणीचे चित्र भारतीय चलनातील २० रुपयांच्या एका नोटेवर आहे.


अजिंठा लेण्यांत गौतम बुद्धाच्या विविध भावमुद्रा, तसेच बौद्ध तत्त्वज्ञानाला चित्रशिल्प रूपात व्यक्त करणाऱ्या शिल्पकलेचा अद्वितीय आविष्कार पाहायला मिळतो. अशी ही अजिंठा लेणी देशी पर्यटकांसोबतच प्रामुख्याने विदेशी पर्यटकांच्या सर्वाधिक पसंतीचे पर्यटन स्थळ ठरले आहे. चित्र-शिल्पकलेचा नितांत सुंदर अनुभव देणाऱ्या या लेण्यांमधून त्या काळात वापरण्यात आलेल्या रंगछटा पर्यटकांना पाहावयास मिळतात. अजिंठा येथे एकूण २९ लेण्यांपैकी हीनयान कालखंडातील लेण्यांमधली ९व्या व १०व्या क्रमांकाची लेणी ही चैत्यगृहे आहेत व १२, १३ आणि १५-अ क्रमांकाचे लेणे हे विहार आहे. महायान कालखंडातील लेण्यांपैकी १९, २६ व २९ क्रमांकाची लेणी चैत्यगृहे असून १, २, ३, ५, ६, ७, ८, ११, १४, १५, १६, १७, १८, २०, २१, २२, २३, २४, २५, २७ व २८ क्रमांकांची लेणी विहार आहेत. या लेण्यांचे क्रमांक त्यांच्या निर्मिती कालानुक्रमानुसार दिलेले नसून एकापाठोपाठ एक येणाऱ्या लेण्यांनुसार दिले आहेत. अजिंठ्यातील चित्रे ही प्रामुख्याने बुद्धांच्या जीवनावर आधारित जातक कथांचे चित्रण करतात. बुद्धांच्या जन्मापूर्वीपासूनच्या कथा यामध्ये समाविष्ट आहेत. या कथांमधून सांस्कृतिक दुवे तसेच नीतिमूल्ये दिसून येतात. बुद्धाचे आयुष्य, त्याचे विविध अवतार, त्याचे पुढील जन्म असे सर्व वर्णन या जातक कथांमध्ये दिसून येते. भिंतींवरील जातकांची चित्रे ही बोधप्रद आहेत. दहाव्या आणि अकराव्या लेण्यातील सातवाहनकालीन चित्रकला पाहून तत्कालीन चित्रकारांचे कौशल्य लक्षात येते. एका चित्रात अनेक लोकांचा समूह चित्रित करण्याची या चित्रकारांची हातोटी विलक्षण आहे. येथून औरंगाबाद विमानतळ १०८ कि.मी. अंतरावर असून सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन येथून १०८ कि.मी. असून या शिवाय खासगी बसेस व राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसही पर्यटकांसाठी उपलब्ध आहेत.

## घारापुरीची लेणी किंवा एलिफंटा लेणी

घारापुरीची लेणी किंवा एलिफंटा लेणी ही मुंबईपासून ६-७ मैल अंतरावर लहान बेटावर खोदली आहे. त्याचे प्राचीन नाव श्रीहरी असून या बेटावरील अवाढव्य दगडी हत्तीमुळे त्यास पाश्चात्यांनी एलिफंटा हे नाव दिले. १९८७ साली या लेण्यांना युनेस्को वारसा स्थळ म्हणून घोषित करण्यात आले. शिल्पाकृती, त्यांची घडण, पेहराव वगैरेंवरून जेम्स बर्जेस, जेम्स फर्ग्युसन, भगवानलाल इंद्राजी इ. पुरातत्त्ववेत्यांनी ही लेणी आठव्या-नवव्या शतकांत खोदलेली तसेच राष्ट्रकुटांची असावीत असे अनुमान काढले आहे. येथील आकृत्या गुप्त व शक परंपरांशी निगडित असल्यामुळे चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याने हर्षवर्धनाच्या पराभवानंतर ही लेणी खोदली, असेही म्हटले जाते. येथील शिल्पकाम शैव संप्रदायाचे आहे. त्यात अनेक वेचक, निवडक शिवकथा समूर्त झालेल्या दिसतात. या लेण्यांचे वैशिष्ट्य म्हणजे येथील स्तंभ आणि शिल्पे यांची रचना वेरूळच्या दुमार लेण्यांसारखी आहे.

घारापुरी लेण्यांत एकूण पाच लेण्यांचा समूह आहे. यामधील मुख्य (शिव) लेणी क्र. १ किंवा ज्यास महाकाय गुहा असे म्हणतात, ती २७ मीटर (८९ फूट) वर्गचा मंडप आहे. या लेणीमध्ये भव्य दालन असून मध्यभागी एक भव्य त्रिमुखी मूर्ती आहे. मूर्तीचे खोदकाम उत्थित पद्धतीचे असून प्रतिमेभोवती प्रदक्षिणापथ नाही. शिरस्त्राणासह त्रिमूर्तीची उंची ५.२३ मी. असून यात विधाता, त्राता आणि संहारक अशी तिन्ही अंगे कोरली आहेत. काही शिल्पांची फार मोठ्या प्रमाणावर मोडतोड झालेली असून १७व्या-१८व्या शतकांत पोर्तुगीज सैनिकांनी नेमबाजीचा सराव करण्याकरिता अनेक शिल्पे बंदुकी व तोफा यांच्या गोळ्यांनी छिन्नविच्छिन्न केली. त्याचप्रमाणे झिरपणाऱ्या पाण्यामुळे गुहांमध्ये नासधूस होत असते. याकरिता भारतीय पुरातत्त्व खात्याने चिरांत दाबाने सिमेंट भरणे, पाणी जाण्याकरिता पन्हाळ्या खोदणे, वरचे छत तोलून धरण्याकरिता दगडी खांब उभारणे इ. महत्त्वाची कामे कुशलतेने हाती घेतली आहेत.

आग्नेय दिशेला लेणी क्र. २. असून ती अपूर्ण आहे. लेणी क्र. ३ ही लेणी क्रमांक २ च्या पुढे आहे. सहा खांब असलेला सभामंडप आणि मंडप आहे. लेणी क्र. ४ ही बहुतांश नष्ट झालेली आहे. तसेच व्हरांड्यात काही स्तंभ नाहीत. लेणी क्र. ५ अपूर्ण आणि जीर्णावस्थेत आहे, त्यात कोणतेही कलात्मक अवशेष नाहीत. मुख्य लेण्यांव्यतिरिक्त उरलेल्या लेण्यांतही काही मूर्ती आहेत.



घारापुरीतील काही शिल्पाकृती सध्या मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात (प्रिन्स ऑफ वेल्स) ठेवलेल्या आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, पूर्वी व्हिक्टोरिया टर्मिनस स्टेशन म्हणून ओळखले जात होते, हे भारतातील व्हिक्टोरियन गॉथिक रिव्हायव्हल आर्किटेक्चरचे उत्कृष्ट उदाहरण आहे, जे भारतीय पारंपरिक स्थापत्यकलेतून व्युत्पन्न केलेल्या विषयाशी मिश्रित आहे. ब्रिटिश वास्तुविशारद एफ.डब्ल्यू. स्टीव्हन्स यांनी डिझाइन केलेली ही इमारत 'गॉथिक सिटी आणि भारताचे प्रमुख आंतरराष्ट्रीय व्यापारी बंदर म्हणून (बॉम्बेचे) मुंबईचे प्रतीक बनले. उत्तर मध्ययुगीन इटालियन मॉडेल्सवर आधारित उच्च व्हिक्टोरियन गॉथिक डिझाईननुसार, १८७८ मध्ये सुरू होऊन टर्मिनल १० वर्षांमध्ये बांधले गेले. त्याचे उल्लेखनीय दगडी घुमट, बुर्ज, टोकदार कमानी ग्राऊंड प्लॅन पारंपरिक भारतीय



राजवाड्याच्या वास्तुकलेच्या जवळ आहेत. हे दोन संस्कृतींच्या साम्यांचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे, कारण ब्रिटिश वास्तुविशारदांनी भारतीय कारागिरांसोबत काम करून भारतीय स्थापत्य परंपरा आणि मुहावरे यांचा समावेश करून मुंबईसाठी एक नवीन शैली तयार केली.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (पूर्वीचे व्हिक्टोरिया टर्मिनस) ही इमारत ब्रिटिश, इटालियन आणि भारतीय वास्तुशिल्प नियोजन आणि भारतीय रेल्वेसाठी तिचा वापर यांची अभिव्यक्ती आहे. संपूर्ण इमारत, संपूर्ण रचना अखंडता राखून ठेवते. त्याचा दर्शनी भाग, बाह्य दृश्य आणि वापर मूळ आहे. इमारतीचा परिसर हा भारतीय रेल्वेद्वारे संरक्षित क्षेत्र आहे. टर्मिनस हे मुंबई महानगरातील प्रमुख रेल्वे स्थानकांपैकी एक आहे आणि ३ दशलक्षाहून अधिक रेल्वे प्रवासी दररोज त्याचा वापर करतात. सुरुवातीच्या ४ रेल्वे ट्रॅक व्यतिरिक्त, टर्मिनस आता ७ उपनगरी आणि ११ वेगळे स्टेशन-बाहेर टॅक्सीची सुविधा देते. यामुळे आजूबाजूच्या अनेक भागांची पुनर्रचना झाली आणि नवीन इमारतींची भर पडली. भारतीय रेल्वे या टर्मिनसवरील गर्दी कमी करण्यासाठी आणि इतर स्थानकांवरील काही वाहतूक वळवण्यासाठी काम करत आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस युनेस्कोने २००४ मध्ये जागतिक वारसा स्थळ म्हणून नोंदवले.

## व्हिक्टोरियन गॉथिक आणि आर्ट डेको एन्सेम्बल्स

जागतिक व्यापार केंद्र बनल्यानंतर, मुंबई शहराने १९व्या शतकाच्या उत्तरार्धात महत्त्वाकांक्षी शहरी नियोजन प्रकल्प राबवला. यामुळे ओव्हल मैदानाच्या खुल्या जागेच्या सीमेवर असलेल्या सार्वजनिक इमारतींचे एकत्रीकरण, प्रथम व्हिक्टोरियन निओ-गॉथिक शैलीमध्ये आणि नंतर, २० व्या शतकाच्या सुरुवातीस, आर्ट डेको मुहावरेमध्ये तयार केले गेले. व्हिक्टोरियन जोडणीमध्ये बाल्कनी आणि व्हरांड्यासह हवामानाला अनुकूल असलेले भारतीय घटक समाविष्ट आहेत. आर्ट डेको इमारती, त्यांच्या सिनेमा आणि निवासी इमारतींसह, आर्ट डेको इमारतीसह भारतीय कलेचे एकत्रीकरण करतात, एक अनोखी शैली तयार करतात ज्याचे वर्णन इंडो-डेको म्हणून केले जाते. या दोन गोष्टी १९व्या आणि २०व्या शतकात मुंबईच्या आधुनिकीकरणाच्या टप्प्यांची साक्ष देतात. १९व्या आणि २०व्या शतकात मुंबईच्या शहरी विकासाच्या दोन टप्प्यांमध्ये शहराला तटबंदीच्या व्यापारी चौकीपासून भारतातील पहिल्या शहरामध्ये रूपांतरित केले. पहिल्या विस्तारामध्ये १८८०च्या दशकात व्हिक्टोरियन गॉथिक सार्वजनिक इमारतींच्या गटाचे बांधकाम आणि ओव्हल मैदानाची निर्मिती समाविष्ट होती.

दुसरा विस्तार म्हणजे २०व्या शतकाच्या सुरुवातीला बॅकबे रिक्लेमेशन स्किम, ज्याने मुंबईला आर्ट डेको निवासी, व्यावसायिक आणि मनोरंजन इमारती आणि मरिन ड्राईव्ह सी-फ्रंटच्या निर्मितीसह पश्चिमेकडे विस्तार करण्याची नवीन संधी दिली. आज ओव्हल मैदान त्याच्या पूर्वेकडील व्हिक्टोरियन गॉथिक इमारतींचे एक नेत्रदीपक संयोजन आणि त्याच्या पश्चिमेकडील आर्ट डेको इमारतींचे आणखी एक प्रभावी समागम १९४७ मध्ये आधुनिक स्वतंत्र भारताकडे नेण्यासाठी मुंबईच्या आधुनिकीकरणाच्या टप्प्यांची साक्ष देते.

व्हिक्टोरियन गॉथिक आणि आर्ट डेको इमारतींचे एकत्रीकरण वास्तुशास्त्रीय स्वरूप, सजावटीच्या आकृतिबंध, डिझाईन, स्केल आणि सामग्रीच्या बाबतीत प्रामाणिकतेच्या अटी पूर्ण करते. ते त्यांचा मूळ वापरही टिकवून ठेवतात. ओव्हल मैदान शहरी खुल्या जागा म्हणून त्याची सत्यता टिकवून ठेवते आणि मरिन ड्राईव्हने समुद्राभिमुख आर्ट डेको विकास म्हणून त्याची नेपत्य कायम ठेवले आहे.

## पश्चिम घाट

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाच्या नैसर्गिक यादीत पश्चिम घाटाचाही समावेश आहे. पश्चिम घाट, ज्याला सह्याद्री पर्वतरांग असेही म्हणतात, ही पर्वत रांग आहे जी भारतीय द्वीपकल्पाच्या पश्चिम किनाऱ्याला समांतर १,६०,००० कि.मी. क्षेत्र व्यापते यामध्ये गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडू ही राज्ये येतात. पश्चिम घाट हे युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ आहे आणि जगातील ३६ जैवविविधता हॉटस्पॉट्सपैकी एक आहे. याला कधीकधी भारताचे ग्रेट एस्कार्पमेंट म्हटले जाते. त्यात देशाच्या वनस्पती आणि जीवजंतूंचा खूप मोठा भाग आहे. पश्चिम घाट हिमालयापेक्षा जुना आहे. या डोंगररांगा मान्सून हवामान पद्धतींवर प्रभाव टाकतात.

## महाराष्ट्रातील गडकिल्ले

किल्ले बांधण्याची प्रक्रिया महाराष्ट्रात सातवाहन काळातच चालू झाली असली तरी सद्य:स्थितीत दुर्ग म्हणून आढळणाऱ्या स्थापत्य रचना बहुतांशी बहमनी राजवटीत

बांधण्यास सुरुवात झाली. निजामशाहीच्या काळात आधीची बांधकामे वापरली गेली व नव्यानेही किल्ले बांधले गेले. मलिक अंबर या कर्तबगार, मुत्सद्दी सेनापतीने निजामशाही एकाचवेळी इतर पातशाह्या व मोघलांशी टक्कर देऊ शकली. मलिक अंबरला गनिमीकावा (गोरिल्ला वॉर फेअर) या युद्धतंत्राचा जनक मानले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे भोसले हे मलिक अंबरच्याच तालमीत तयार झालेले होते. मात्र गनिमीकावा व डोंगरावरील किल्ल्यांच्या स्थापत्यरूपाने उभे असलेले किल्ले याचा यथोचित वापर केला तो छत्रपती शिवाजी महाराज यांनी! दुर्गम जागी असणाऱ्या दुर्गांचा आधार घेऊन त्यांनी स्वराज्य स्थापले. दख्खनमधल्या जुलमी सल्तनती तसेच दिल्लीतील मोगलाई कारभारामुळे रयत त्रस्त झाली होती. छत्रपती शिवाजी महाराज यांनी उभे केलेले स्वराज्य खऱ्या अर्थाने रयतेचे स्वत:चे कल्याणकारी राज्य होते. १७व्या शतकात जगातील अर्थकारणाचा एक तृतीयांश भाग असणाऱ्या बलाढ्य मुघल साम्राज्याला आणि त्याचवेळी दख्खनमधील इतर सल्तनतींवर आणि पश्चिम किनारपट्टीवरील इंग्रज, डच व पोर्तुगीज यांचा एकाचवेळी सामना करत हे स्वराज्य छत्रपती शिवाजी महाराज यांनी निर्माण केले. ही जगाच्या इतिहासातील अद्वितीय घटना आहे.

त्यामुळेच सांस्कृतिक विभागांतर्गत असणाऱ्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाने महाराष्ट्र राज्यातील मराठा सामरिक वास्तू स्थापत्य व गनिमी कावा या विषयाचे शृंखला नामांकन युनेस्कोच्या जागतिक वारसा म्हणून तात्पुरत्या यादीत समावेश करण्यासाठी प्रस्ताव एप्रिल, २०२० मध्ये भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाला सादर केला होता. महाराष्ट्रातील शिवकालीन लष्करी स्थापत्यात साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, रायगड, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग किल्ला व तामिळनाडू राज्यातील जिंजी किल्ला यांचा समावेश आहे. युनेस्कोच्या विहित पद्धतीनुसार प्राथमिक प्रस्तावानंतर अंतिम नामांकनाचा विस्तृत प्रस्ताव महाराष्ट्र शासनास आता भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण व केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयामार्फत युनेस्कोस सादर करत आहे. यात प्रत्येक किल्ल्याचा साईट मॅनेजमेंट प्लॅन सादर होणे अपेक्षित आहे. ज्यात सरकारतर्फे कायदेशीर सर्वेक्षण या वास्तूंना दिले गेले असल्यास त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे केली जात आहे की नाही, संवर्धन कार्याची स्थिती काय आहे, पर्यटक सुविधा व शास्त्रीय संवर्धन यांचा योग्य ताळमेळ आहे का या अनेक बाबींचा समावेश असणे अपेक्षित आहे. यापुढे जाऊन प्रत्येक किल्ल्याचे जागतिक वैशिष्ट्यपूर्ण मूल्य (आऊटस्टॅण्डिंग युनिव्हर्सल व्हॅल्यू) ही प्रभावीपणे अधोरेखित होणे गरजेचे आहे. हा प्रस्ताव दाखल झाल्यानंतर संबंधित विषयातील युनेस्कोचे तज्ज्ञ प्रस्तावित वारसास्थळांना भेट देतात व जागतिक वारसा म्हणून नामांकन देणे अथवा न देणे याबाबत युनेस्कोस शिफारस करतात.

## कोकणातील कातळशिल्पे

भारतातील रॉक आर्ट हा देशाच्या सुरुवातीच्या मानवी सर्जनशीलतेचा सर्वात जुना भौतिक पुरावा आहे. हे साधारणपणे रॉक पेंटिंग्ज, रॉक एचिंग्ज, कप मार्क्स आणि रिंग मार्क्सच्या स्वरूपात संपूर्ण भारतात आढळतात. तथापि, कोकण प्रदेशातील (दक्षिण पश्चिम महाराष्ट्र ते दक्षिण



कर्नाटक) सडावर भूगर्भांचे मोठे प्रमाण हे कोकण प्रदेशातील (दक्षिण पश्चिम महाराष्ट्र) रॉक आर्टच्या प्रागैतिहासिक मानवी अभिव्यक्तीचे सर्वात उल्लेखनीय समूह आहे. मध्याश्मयुगापासून प्रारंभिक ऐतिहासिकपर्यंतचा काळ आहे. अपरंता या नावाने ओळखला जाणारा कोकण प्रदेश हा प्राचीन काळापासून सांस्कृतिकदृष्ट्या चैतन्यपूर्व प्रदेश आहे. या प्रदेशाने सागरी आणि आंतरदेशीय व्यापार संबंधांची भरभराट केली होती. या समुहामध्ये मांडलेल्या ६०० हून अधिक आकृत्या दक्षिण महाराष्ट्रातील कशेळी, रुंध्येटाळी, देवाचे गोठाणे, बारसू, देवी हसोल, जांभारून, उक्षी, कुडोपी आणि गोव्यातील पानसायमोल येथे चित्रित केल्या आहेत. हे सर्वात व्यापक, सु-संरक्षित आणि कलात्मकदृष्ट्या वेगळे सांस्कृतिक क्षेत्र आहेत. १२,००० वर्षे सामग्री, रचना, स्केल, प्रतिमांची गुणवत्ता आणि कलात्मक तंत्रे केवळ मुख्यतः जीवजंतूंच्या श्रेणीबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करत नाहीत, तर दगडावर अमूर्त आणि मानववंशीय रूपे चित्रण केलेले आहे. जिओग्लिफ्स कलात्मक कौशल्याची वाढती कुशलता आणि एचिंग आणि स्कुपिंगच्या तंत्रांची उत्क्रांती दर्शवतात, जे रॉक आर्टमध्ये प्रभुत्व मिळवण्यासाठी मूलभूत आहेत. या विषयाचे शृंखला नामांकन युनेस्कोच्या जागतिक वारसा म्हणून तात्पुरत्या यादीत समावेश करण्यात आले आहे. या मानवाचा काळ साधारणत: १० हजार वर्ष मागे नेता येईल. काही तज्ज्ञांच्या मते या मानवाचा काळ हा मध्यपुरापाषाण काळ ते आद्यऐतिहासिक काळापर्यंत जातो. किंबहुना तो ताम्रपाषाण काळाच्या समकालीन असल्याचे भासते. अभ्यासाअंती युनेस्कोच्या निकषांमध्ये विचारात घेण्यासाठी उत्कृष्ट सार्वत्रिक मूल्यांवर आधारित कातळशिल्पांचे अर्थात उत्कृष्ट वैश्विक मूल्य (Outstanding Universal Value) असलेल्या कातळशिल्पांची निवड केली आहे.

## युनेस्कोच्या जागतिक वारसा नामांकनासाठीची प्रक्रिया

युनेस्कोच्या जागतिक वारसा नामांकनासाठी स्थळ व्यवस्थापन आराखडा प्रस्ताव पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र शासनद्वारे मंत्रालयीन प्रशाकीय विभागास सादर करण्यात येतो. त्यानंतर प्रशाकीय विभागाद्वारे मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्यासमोर सादरीकरण करण्यात येते. राज्यस्तरीय मान्यतेनंतर भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, नवी दिल्ली यांना पुढील कार्यवाहीसाठी हा प्रस्ताव सादर करण्यात येतो. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, नवी दिल्ली यांच्या मार्फत सांस्कृतिक कार्य, भारत सरकार यांच्या निर्देशानुसार ही संपूर्ण माहिती युनेस्कोला सादर करण्यात येते.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**ऑगस्ट क्रांती दिनापासून सुरू झालेल्या 'मेरी माटी, मेरा देश' अर्थात 'माझी माती, माझा देश' या अभियानाच्या पहिल्या टप्प्यात राज्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक गाव, शहर आणि महानगरात या अभियानाला भरभरून प्रतिसाद मिळाला. अधिकाधिक लोकसहभाग, स्थानिक लोकप्रतिनिधींचा पुढाकार असावा, यासाठीचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच या अभियानाची सांगता १ नोव्हेंबर २०२३ रोजी नवी दिल्ली येथे होणार आहे.**

# माझी माती, माझा देश...

**दीपक चव्हाण**

देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असतानाच आगामी काळात देशाची वाटचाल कशी असावी, यावर मंथन व्हावे, भविष्याचा वेध घेताना या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांचेही स्मरण व्हावे आणि २०४७ पर्यंत आपला देश विकसित देश म्हणून नावारूपाला यावा, यासाठी सर्वांच्या योगदानाची गरज आहे. आपल्या देशाच्या मातृभूमीविषयीची कायम कृतज्ञता आणि या वीरांना योगदानाचे स्मरण व्हावे, म्हणून देशात 'मेरी माटी, मेरा देश' अर्थात 'माझी माती, माझा देश' अभियानाची सुरुवात ९ ऑगस्ट २०२३ रोजी करण्यात आली.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव या उपक्रमाचा सांगता सोहळा ९ ऑगस्टपासून सुरू झाला आहे. या सांगता सोहळ्याच्या निमित्त राज्यात 'मिट्टी को नमन, वीरों को वंदन' या घोषवाक्यासह देशभर आयोजित 'मेरी माटी, मेरा देश' अर्थात 'माझी माती, माझा देश' या अभियानाची सुरुवात झाली. राज्यात ग्रामपंचायत, तालुकास्तर, जिल्हास्तर असे विविध उपक्रम त्यानिमित्त आयोजित केले गेले. देशासाठी बलिदान दिलेल्या शहीद वीरांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि नमन करण्यासाठी हे अभियान राबवण्यात येत आहे. लोकप्रतिनिधी, प्रशासन, लोकसहभाग अशा सर्वांचा सहभागाने राज्यात सर्वत्र विविध उपक्रम राबवण्यात आले. 'पंचप्रण प्रतिज्ञा', 'वसुधा वंदन', 'वीरों को वंदन' यांसारखे उपक्रम; तसेच गाव, पंचायत गट, शहर, नगरपालिका क्षेत्रातील स्थानिक शूरवीरांच्या त्यागाला वंदन करणारे शिलाफलक किंवा स्मारक फलक शहरी आणि ग्रामीण भागात उभारले गेले.



## राज्यभरात विविध कार्यक्रम

९ ते ३० ऑगस्ट २०२३ दरम्यान 'मेरी माटी, मेरा देश' मोहिमेत गाव आणि गट स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था; तसेच राज्यस्तरावरील कार्यक्रम आयोजित केले गेले. दिल्लीत 'अमृत वाटिका' तयार करण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यांतून ७५०० कलशांमध्ये माती घेऊन 'अमृत कलश यात्रा' काढण्यात येणार असून ही 'अमृत वाटिका', 'एक भारत श्रेष्ठ भारत' या वचनबद्धतेचे प्रतीक असणार आहे. जनसहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी https://merimaatimeradesh.gov.in हे संकेतस्थळ सुरू करण्यात आले असून, माती किंवा मातीचा दिवा हाती धरून काढलेला सेल्फी नागरिक या संकेतस्थळावर अपलोड करू शकणार आहेत. या उपक्रमात सर्वांनी सक्रिय सहभाग घेतला. आपल्या देशाच्या वीरांप्रतीची कृतज्ञता लाखो नागरिकांनी व्यक्त केली.

स्वातंत्र्यानंतरच्या अमृतमहोत्सवी काळात देशाने अनेक बाबतीत उत्तुंग झेप घेतली आहे. या विकसित भारताचे प्रतिबिंब आता प्रत्येक बाबींमध्ये दिसत आहे. जागतिकस्तरावर आपल्या देशाची विविध पातळींवर प्राधान्याने नोंद घेतली जाते. प्रत्येक भारतीयांना अभिमानाची अशी ही बाब आहे. त्यामुळेच केवळ एखादा कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता गाव ते शहरांपर्यंत आपल्या मातीविषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी, याबाबत अभियान स्वरूपात कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

## स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग

पहिल्या टप्प्यात ग्रामपंचायत स्तरावर शिलाफलक, वीरांचा सन्मान, वसुधा वंदन (अमृतवाटिका), पंचप्रण शपथ, ध्वजारोहण, राज्यगीत आणि राष्ट्रगीत गायन असे कार्यक्रम घेण्यात आले. गावातील अमृत सरोवर / शाळा / ग्रामपंचायत आदी ठिकाणी या शिलाफलकांची उभारणी करण्यात आली. त्यावर स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचा लोगो, प्रधानमंत्री यांचा व्हिजन २०४७ संदेश, स्थानिक शहीद वीरांची नावे, ग्रामपंचायत/शहराचे नाव, दिनांक याबाबी नमूद केल्या गेल्या. हौतात्म्य पत्करलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबीयांचा सत्कार, संरक्षण, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि राज्य पोलीस दलातील सेवानिवृत्त व्यक्तींचा सत्कार या उपक्रमाच्या माध्यमातून ठिकठिकाणी केला गेला. गावातील योग्य जागा निवडून वसुधा वंदन म्हणून ७५ देशी वृक्षांच्या रोपांची लागवड करून अमृत वाटिका तयार करण्यात आल्या.

राज्यातील २७,९३३ ग्रामपंचायती आणि ४१४ महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायतींनी यामध्ये सहभाग नोंदवला. ग्रामपंचायत क्षेत्रात २७,९३३ शिलाफलकांची उभारणी आणि अमृतवाटिकांची निर्मिती करण्यात आली. या माध्यमातून ३२ लाख ८४ हजार ८९ इतकी रोपे लावण्यात आली. १ लाख ३३ हजार ६५७ ठिकाणी वीरों को वंदन अर्थात 'वीरांना नमन' यासाठीचे कार्यक्रम घेण्यात आले. ९६ लाखाहून अधिक नागरिकांनी पंचप्रण प्रतिज्ञा घेतली. मनपा, नगरपालिका आणि नगरपंचायत क्षेत्रात ४३१ ठिकाणी शिलाफलक उभारणी, ५३३ ठिकाणी अमृतवाटिका उभारणी, ३१ हजार वृक्षरोपण आणि १६ लाख ९७ हजार नागरिकांनी पंचप्रण शपथ घेतली. यामध्ये सर्व शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी, माजी सैनिक, स्वयंसाहाय्यता महिला बचतगट, सर्व अधिकारी, कर्मचारी, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षक वृंद, अशासकीय संस्था, नेहरू युवा केंद्र, विद्यार्थी सैनिक दल, राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी ग्रामपंचायत स्तरावरील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

## राज्यस्तर अभियानाचा शुभारंभ



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह मुख्य सचिव मनोज सौनिक आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत या 'माझी माती, माझा देश' अभियानाचा शुभारंभ मंत्रालयातील त्रिमुर्ती प्रांगण येथे करण्यात आला. पंचप्रण प्रतिज्ञा यानिमित्त घेण्यात आली. 'भारताला विकसित देश बनवायचे आहे. तसेच २०४७ पर्यंत भारताला विकसित देश बनवण्याचे स्वप्न साकार करायचे आहे. गुलामगिरीची मानसिकता मुळापासून उखडून टाकायची आहे. देशाच्या समृद्ध वारशाचा अभिमान बाळगायचा आहे. एकता आणि एकजुटता यासाठी कर्तव्यदक्ष राहायचे आहे. नागरिकांचे कर्तव्य बजावयाचे आहे. तसेच देशाचे रक्षण करणाऱ्यांचा आदर ठेवायचा आहे', अशी प्रतिज्ञा यावेळी उपस्थितांनी घेतली.

## अमृत कलश यात्रा

विविध गावागावांतून वसुधा वंदन कार्यक्रमातून जमा केलेली एक मूठ माती कलशामध्ये गोळा केली गेली. या कलशावर तालुका, जिल्हा व राज्याचे नाव लिहून हा मातीचा कलश दिल्ली येथे नेला जाणार आहे. या दुसऱ्या टप्प्यासाठी गाव हा घटक मानून तयारी करण्यात येत आहे. गावागावात प्रत्येक नागरिकांना यामध्ये सहभागी करून घेतले जाणार आहे. या अमृत कलश यात्रेसाठी प्रत्येक घराघरातून माती संकलन केले जाणार आहे. यावेळी पंचप्रण शपथ घेतली जाणार आहे. गावांप्रमाणेच शहरी भागात अशाच पद्धतीने कार्यवाही केली जाणार आहे. १ ते १३ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत राज्यातील ३५१ तालुके आणि ४१४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था येथे प्रत्येक गावातून जमा झालेल्या अमृत कलशामधील माती आणि तांदूळ तालुकास्तरावर जमा केले जाणार आहेत.

तालुकास्तरावरील उपक्रमात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, नेहरू युवा केंद्र, स्काऊटस ॲण्ड गाईड्स, अंगणवाडी कर्मचारी, महिला यांचा सहभागातून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन याबाबत नियोजन करण्यात आले आहे. त्यानंतर २७ ऑक्टोबर २०२३ रोजी मुंबई येथे राज्यातील सर्व तालुक्यांमधील, शहरांमधील कलशांचे ऑगस्ट क्रांती मैदान येथे एकत्रीकरण करण्यात येणार आहे. नागरी स्थानिक संस्था क्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्यातून केवळ एक कलश असेल. त्यानंतर हा अमृत कलश नवी दिल्ली येथील अमृत वाटिकेसाठी पाठवला जाणार आहे. १ नोव्हेंबर २०२३ रोजी नवी दिल्ली येथे मुख्य सोहळा होणार आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**




**राज्य मंत्रिमंडळाच्या मंत्रालय येथील १८ ऑगस्ट, ६ सप्टेंबर आणि ३ ऑक्टोबर २०२३; तसेच छत्रपती संभाजी नगर येथील १६ सप्टेंबर २०२३ रोजीच्या बैठकीत ग्रामविकास, जलसंपदा, शालेय शिक्षण, वने, वैद्यकीय शिक्षण, पशुसंवर्धन, विधि व न्याय, कृषी, महिला व बालविकास, नगरविकास, कौशल्य, सार्वजनिक आरोग्य, अन्न व नागरी पुरवठा, ऊर्जा, अल्पसंख्याक विकास, उच्च व तंत्रशिक्षण, गृहनिर्माण आदी विभागांचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती..**

# कल्याणकारी निर्णय

### जोड रस्ते योजना

१७ जिल्ह्यांतील सर्व आदिवासी वाडे, पाडे मुख्य रस्त्याने जोडण्यासाठी 'भगवान बिरसा मुंडा जोड रस्ते योजना' राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. हा प्रकल्प सुमारे पाच हजार कोटी रुपयांचा असेल. एकंदर ६८३८ कि.मी. लांबीचे रस्ते बांधण्यात येणार आहेत.

आदिवासी गावे आणि पाड्यांमध्ये रस्त्यांअभावी अनेक दुर्दैवी घटना घडतात. या योजनेमुळे मुख्य रस्त्यांशी या वाड्यांचा सातत्याने संपर्क राहील. नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सर्व आदिवासी पाडे बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी नवीन 'भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना' राबवण्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. या रस्त्यांसाठी आदिवासी विकास विभागाची स्वतंत्र समिती असेल; तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग हे रस्ते बांधेल.

### आनंदाचा शिधा

राज्यातील शिधापत्रिकाधारकांना गौरी गणपती, दिवाळीसाठी १०० रुपयात आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि एक लिटर खाद्यतेल असा हा शिधा अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक; तसेच छत्रपती संभाजी नगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे; तसेच नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेवरील (एपीएल) व केशरी शिधापत्रिकाधारकांना देण्यात येईल. हा शिधा जिन्नस १९ सप्टेंबर रोजी गौरी गणपती उत्सवानिमित्त व त्यानंतर १२ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या दिवाळी निमित्त वितरित करण्यात येईल.

राज्यातील एकूण १ कोटी ६५ लाख ६० हजार २५६ शिधापत्रिकाधारकांना हा आनंदाचा शिधा मिळेल. या खरेदीसाठी घाऊक बाजारातील दर व अनुषंगिक खर्चासह ८२७ कोटी ३५ लाख इतक्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली. प्रति संच २३९ रुपये या दराने हा शिधा जिन्नस संच खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

### विद्यावेतनात भरीव वाढ

शासकीय आयटीआयमधील प्रशिक्षणार्थींच्या विद्यावेतनात ४० रुपयांवरून ५०० रुपये अशी भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थ्यांना १९८३ पासून ४० रुपये इतके विद्यावेतन शैक्षणिक साहित्याकरिता व इतर आवश्यक खर्चाकरिता देण्यात येते. या विद्यावेतनात मागील ४० वर्षांत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. वाढत्या महागाई दराच्या व शैक्षणिक साहित्यातील खर्चामध्ये झालेल्या वाढीनुसार विद्यावेतनात वाढ करण्याची मागणी सातत्याने लोकप्रतिनिधी व प्रशिक्षणार्थींकडून करण्यात येत होती.



### महाराष्ट्र कॅसिनो कायदा रद्द

महाराष्ट्र कॅसिनो कायदा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य शासनाने महाराष्ट्र कॅसिनोज (नियंत्रण आणि कर) अधिनियम, १९७६ पारित केला आहे. मात्र जवळपास ४५ वर्षे होऊन देखील तो अंमलात येऊ शकलेला नाही. या अधिनियमाची अंमलबजावणी राज्यात करावयाची किंवा कसे या संदर्भात वरिष्ठ पातळीवर साधक-बाधक विचारविमर्श होऊन महाराष्ट्रासारख्या राज्यात अशा स्वरूपाचा कायदा अंमलात आणण्यात येऊ नये, अशी भूमिका घेण्यात आली आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्र कॅसिनोज (नियंत्रण आणि कर) अधिनियम १९७६ हा कायदा निरसित करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीमध्ये ठेवण्यात आला होता. या बैठकीमध्ये हा कायदा निरसित करून त्यानुषंगाने विधिमंडळास विधेयक सादर करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

### पुनर्विकासासाठी परवानगी

मुंबई प्रेस क्लबला फोर्ट येथे अटी व शर्तींच्या अधीन राहून विशेष बाब म्हणून पुनर्विकासासाठी परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

फोर्टमधील भूकर क्र.९/७२९ येथील मिळकत शासनाने १९९४ पासून ३० वर्षांच्या कालावधीसाठी प्रेस क्लब, मुंबई यांना दिली आहे. २०१७ तसेच २०१८ मध्ये राज्य शासनाने पुनर्विकासास व पुनर्बांधकामास परवानगी देण्याच्या धोरणात सुधारणा केली. त्यानंतर या मिळकतीला अधिमूल्य आकारून २२ मार्च २०२१ च्या ज्ञापनान्वये काही अटी व शर्तींवर परवानगी देण्यात आली होती. मुंबई प्रेस क्लबने केलेल्या विनंतीवरून पुनर्विकास अधिमूल्य आकारण्यापासून सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला.

मुंबई प्रेस क्लबमध्ये काही भागाचा वाणिज्यिक वापर होत असल्याने मुंबई शहर जिल्हाधिकारी यांनी शर्तभंग नियमानुकूल करण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, काही अटी व शर्तींच्या अधीन राहून या विकासास परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रेस क्लबच्या या मिळकतीच्या भाडेपट्ट्याचा कालावधी १ नोव्हेंबर २०२४ रोजी संपत असून इमातीच्या पुनर्विकासासाठी परवानगी देताना भाडेपट्ट्याच्या नूतनीकरणाबाबतचा निर्णय घेण्यात यावा, अशी सूचनाही जिल्हाधिकारी यांना देण्यात आली आहे.

## सुधारित निवृत्तिवेतन

राज्यातील दुय्यम न्यायालयातील निवृत्त न्यायिक अधिकाऱ्यांना सुधारित निवृत्तिवेतन लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाने शिफारस केली होती. या शिफारशी लागू केल्यामुळे थकबाकीपोटी ५५८ कोटी १६ लाख आणि आवर्ती खर्च ७९ कोटी ७३ लाख एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आली. या न्यायिक अधिकाऱ्यांना १ जानेवारी २०१६ ते ३१ जून २०२३ या कालावधीतील थकबाकीची २५ टक्के रक्कम ३१ ऑगस्ट २०२३ पूर्वी देण्यात येईल. तसेच २५ टक्के रक्कम ३१ ऑक्टोबर २०२३ पूर्वी आणि ५० टक्के रक्कम ३१ डिसेंबर २०२३ पूर्वी रोखीने देण्यात येईल.

## मंडणगड येथे दिवाणी न्यायालय

रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड येथे ग्राम न्यायालयाऐवजी दिवाणी न्यायालय, कनिष्ठस्तर व न्याय दंडाधिकारी, प्रथम वर्ग न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या न्यायालयासाठी ७ नियमित पदे निर्माण करण्यास आणि ४ पदांच्या सेवा बाह्य यंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी ७१ लाख ७६ हजार ३४० इतका वार्षिक खर्च येईल.



## पोषण अभियान कार्यक्रम

केंद्राच्या सूचनांप्रमाणे राज्यात पोषण अभियान कार्यक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. या अभियानात आता राज्याचा हिस्सा वाढून ४० टक्के एवढा झाला आहे.

२०१८-१९ या आर्थिक वर्षापासून राज्यात राबवण्यात येणारा पोषण अभियान हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम केंद्र शासनाने पोषण २.० अंतर्गत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आता राज्यात राबवण्यात येईल. पूर्वी या कार्यक्रमासाठी केंद्राचा आणि राज्याचा हिस्सा ८०:२० असा होता; पण आता तो सुधारित होऊन ६०:४० असा करण्यास मान्यता देण्यात आली. या पोषण अभियानात ० ते ६ वर्षे बालकांमध्ये खुजे आणि बुटकेपणाचे प्रमाण तसेच कुपोषण, रक्तक्षय कमी करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये अंगणवाडी सेविकांना रिअल टाईम मॉनिटरसाठी मोबाइल फोन, सीमकार्ड उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच प्रशिक्षणही देण्यात येते. राज्याच्या वाढीव हिश्शापोटी १५३ कोटी ९८ लाख असा खर्च अपेक्षित आहे.

## २०२३ चा अध्यादेश मागे

सहकारी संस्था अधिनियमामध्ये सुधारणा करण्यासाठी ७ जून २०२३ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेला वर्ष २०२३ चा अध्यादेश क्र.२ मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. क्रियाशील सदस्यांबाबतचा मजकूर वगळणारा अधिनियम २८ मार्च २०२२ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला, मात्र सहकारी संस्थांवर विपरित परिणाम होत असल्याचे निदर्शनास आल्यावरून या वगळण्यात आलेल्या तरतुदी ७ जून २०२३ रोजीच्या शासन राजपत्रात नव्याने समाविष्ट करण्याबाबत अध्यादेश क्र.२ प्रसिद्ध करण्यात आला.

परंतु या तरतुदी पुन्हा समाविष्ट केल्यास सहकारी संस्था आणि सभासदांसाठी अडचणीच्या ठरून वारंवार कायदेशीर तंटा निर्माण होण्याची शक्यता विचारात घेऊन सदरील अध्यादेश मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

## सायबर सुरक्षेसाठी प्रकल्प

सायबर गुन्ह्यांविरुद्ध तातडीने उपाययोजना करण्यासाठी राज्यात ८३७ कोटी रुपयांचा सायबर सुरक्षा प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पामुळे नागरिकांना आता एका फोनवरून आठवडाभर २४ तास कार्यरत कॉल सेंटरवर तक्रार नोंदवता येणार आहे. अत्याधुनिक सायबर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तक्रारीचा तपास केला जाईल, जेणेकरून गुन्ह्याच्या मुळापर्यंत जाऊन गुन्हा उघड करणे व गुन्हा सिद्ध करून शिक्षेचे प्रमाण वाढवण्यास मदत होईल.

सायबर गुन्हेगारी ही जगातील सर्वात मोठी संघटित गुन्हेगारी म्हणून उदयास आली असून, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या समस्येचा मुकाबला करण्याची गरज निर्माण झाली आहे. राज्यात सर्वच स्तरावर नागरिकांकडून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत असून सायबर फसवणुकीच्या प्रकारांनाही त्यांना सामोरे जावे लागत आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांकडूनही सायबर तंत्रज्ञानाचा वापर करून आभासी पद्धतीने नवनवीन प्रकारे गुन्हे करण्याचे प्रमाण वाढत आहे.

सायबर गुन्ह्यांचे गुंतागुंतीचे स्वरूप हाताळण्यात सध्या उपलब्ध असणारी



साधने, संसाधने आणि तंत्रज्ञान यांच्यात आमूलाग्र सुधारणा करून आणि अत्याधुनिकता आणून या धोक्याचा प्रभावीपणे सामना करणे आवश्यक झाले आहे. राज्याच्या गृह विभागाने ही गरज ओळखून, सायबर गुन्हेगारीला आळा घालून राज्याला एक 'सायबर सुरक्षित' राज्य बनविण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा प्रकल्पाची आखणी केली आहे.

## मुंबईत आंतरराष्ट्रीय महोत्सव

मुंबई आंतरराष्ट्रीय महोत्सवाच्या आयोजनासाठी मुंबई आंतरराष्ट्रीय महोत्सव फाऊंडेशन गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुंबई आंतरराष्ट्रीय महोत्सव दरवर्षी जानेवारी महिन्याचा ३ रा शनिवार ते ४ था रविवार असे एकूण ९ दिवस आयोजित करण्यात येईल. हा महोत्सव लोकसहभागातून सातत्याने सुरू राहावा म्हणून मुंबई आंतरराष्ट्रीय महोत्सव फाऊंडेशनची स्थापना करण्यात येत आहे. उद्योगपती आनंद महिंद्रा हे या फाऊंडेशनचे अध्यक्ष असतील, याशिवाय यामध्ये सचिन तेंडुलकर, हर्ष जैन, अमिताभ चौधरी, रॉनी स्क्रूवाला, पार्थ सिन्हा, निरजा बिर्ला हे मान्यवर असतील. मुख्य सचिव सह अध्यक्ष असतील. तसेच इतर वरिष्ठ अधिकारीदेखील या समितीत असतील.

मुंबईस हजारोंच्या संख्येने दररोज पर्यटक भेटी देत असतात. विदेशी पर्यटकांच्या भेटीत देशात राज्याचा १२ वा क्रमांक लागतो. यापैकी १४ टक्के पर्यटक मुंबईत येऊन जातात. मुंबईत आणि राज्यात वेगवेगळ्या पर्यटन स्थळांचा विकास आणि पर्यटन महोत्सवाद्वारे जास्तीतजास्त पर्यटक आकर्षित करण्यासाठी अशा प्रकारे महोत्सवाचा निर्णय घेण्यात आला आहे.

## विविध कंपन्यांना मुद्रांक शुल्कात सूट

केंद्राच्या विविध कंपन्यांना मालमत्ता आणि जमिनीच्या हस्तांतरण दस्तांवर मुद्रांक शुल्कात संपूर्ण सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला. शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया आणि भारत अर्थमुव्हर्स या कंपनीच्या मालमत्ता शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया लँड असेट्स लिमिटेड आणि भारत अर्थमुव्हर्स लिमिटेड अँड असेट्स लिमिटेडला हस्तांतरित होणार आहेत. तसेच राष्ट्रीय जमीन मुद्रीकरण महामंडळ, विमान वाहतूक महानिर्देशनालय आणि भारतीय विमान प्राधिकरण यांच्यादरम्यान हडपसर ग्लायडिंग सेंटर, पुणे यांची जमीन भाडेपट्ट्याने हस्तांतरित करावयाची आहे. याशिवाय एअर इंडियाची पालीहिल रोड येथील मालमत्ता एअर इंडिया असेट्स होल्डिंगला हस्तांतरित होणार आहे. यावरील मुद्रांक शुल्कात १०० टक्के सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## घरांसाठी मुद्रांक शुल्कात कपात

मध्य नागपूरमधील नाईकवाडी बांगलादेश झोपडपट्टीतील घरांसाठी लोकहितास्तव मुद्रांक शुल्क कमी करून १००० इतके निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

१९७२ पासून या झोपडपट्टीत अंदाजे २२ हजार नागरिक राहतात. १२ सप्टेंबर १९९१ रोजी ही झोपडपट्टी म्हणून घोषित करण्यात आली आहे. या ठिकाणी विकासाची कामेही झाली असून महापालिकेकडून नकाशादेखील मंजूर करून घेण्यात आला आहे.

## मेट्रो कारशेडसाठी जागा

मेट्रो कारशेडसाठी ठाण्यातील मोघरपाडा येथील जागा एमएमआरडीएला हस्तांतरित करण्याचा त्याचप्रमाणे राज्यातील मेट्रो प्रकल्पांना ब्रीज लोन साठी शासन हमी देण्यासंदर्भात निर्णय घेण्याकरिता उच्चाधिकार समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. मुंबई मेट्रो टप्पा-४, ४अ, १० आणि ११ या मेट्रो मार्गांसाठी मौजे मोघरपाडा येथे सर्वे नं.३० मधील १७४.०१ हेक्टर क्षेत्र एमएमआरडीएला हस्तांतरित करण्यात येईल. या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी आवश्यक जमीन संपादनाची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

मोघरपाडा या ठिकाणच्या १६७ भाडेपट्टेधारक शेतकरी आणि ३१ अतिक्रमणधारक ग्रामस्थ यांच्यासाठी भरपाईची सुयोग्य योजना एमएमआरडीएकडून त्यांच्या स्तरावरून करण्यात येणार आहे.

## ब्रीज लोनसाठी समिती

मुंबई मेट्रो मार्ग-३ साठी मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशनला १ हजार कोटी रुपयांचे ब्रीज लोन देण्यासाठी शासन हमी देण्यास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे राज्यातील फक्त मेट्रो प्रकल्पांना तात्पुरत्या स्वरूपात ब्रीज लोन घेण्याकरिता शासन हमी देण्यासाठी उच्चाधिकार समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. या समितीचा कार्यकाळ दोन वर्षांनी शासन मान्यतेने वाढवण्यात येईल.

## शासन हमीवर कर्ज उपलब्ध

आर्थिक अडचणीतील सहकारी साखर कारखान्यांना राज्य सहकारी बँकेकडून शासन हमीवर कर्ज उपलब्ध करणार आहे. हे कर्ज अटी आणि शर्तींच्या अधीन राहून उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

या योजनेच्या अनुषंगाने सहकारी साखर कारखान्यांना त्यांच्या फेस व्हॅल्युनुसार कर्ज व तारणाचे प्रमाण १ : १.५० एवढे ठेवून एनसीडीसीच्या धर्तीवर कर्ज मंजूर करण्यात येईल. या मुदती कर्जावर मासिक पद्धतीने द.सा.द.शे. ८ टक्के व्याजदराची आकारणी केली जाईल. राज्य शासनाने निर्देशित केलेल्या कारणाव्यतिरिक्त अन्य कारणासाठी या कर्जाचा विनियोग करता येणार नाही.

## कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर नियोजन

राज्यात आतापर्यंत सरासरीच्या ८१.०७ टक्के पाऊस झाला असून कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ते नियोजन काटेकोरपणे करण्यात यावे असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. राज्यात १ ते ६ सप्टेंबर दरम्यान केवळ २४.०५ म्हणजे सरासरी १३.६० टक्के पाऊस पडला आहे. २५७९ पैकी ४४६ महसुली भागात २१ दिवसांपेक्षा जास्त पावसाचा खंड पडला आहे. यासंदर्भात मंत्रिमंडळ बैठकीत आढावा घेण्यात आला.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले की, महाराष्ट्रात १ कोटी ७०

## ‘मेरी माटी मेरा देश’मधील अमृत कलश यात्रा

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवामधील ‘मेरी माटी मेरा देश’ अर्थात ‘माझी माती माझा देश’अंतर्गत १ सप्टेंबरपासून अमृत कलश यात्रा सुरू झाली असून राज्यामध्ये देखील ४ टप्प्यामध्ये ही यात्रा पार पडेल. याविषयी सर्व मंत्र्यांनी आपापल्या भागांमध्ये ही यात्रा यशस्वी होईल, यासाठी प्रयत्न करावे अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे यांनी मंत्रिमंडळात सादरीकरण केले. राज्यातील सर्व विभाग, जिल्हा, तालुका आणि अगदी ग्रामपंचायत पातळीपर्यंत या यात्रेचा उपक्रम राबवण्यात येईल. शहर आणि गावातील प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, नागरिक आणि मुले-विद्यार्थी या यात्रेत जोडावयाचे आहेत.



१ ते ३० सप्टेंबरपर्यंत प्रत्येक घर, वॉर्ड आणि गावातून माती किंवा तांदूळ कलशांमध्ये गोळा करायचा आहे. हे करताना आनंदी आणि उत्साहाचे वातावरण हवे. वाजतगाजत ही माती आपल्याला गोळा करायची आहे.

१ ते १३ ऑक्टोबरपर्यंत ब्लॉकस्तरावर आणि पालिका, नगरपंचायती, नगरपरिषदा यांच्या स्तरावर ही सर्व गोळा केलेली माती आणि तांदूळ एकत्र आणून एका मोठ्या कलशामध्ये एकत्र करायची आहे. यावेळी सुद्धा आपल्या जिल्हा किंवा शहरातल्या सांस्कृतिक संस्था, एनसीसी, एनएसएस, स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांना एकत्र करून कार्यक्रम करण्यात येतील. यात आपापल्या भागातील देशासाठी लढलेले आणि उल्लेखनीय कामगिरी केलेले जवान, पोलीस, स्वातंत्र्यसैनिक किंवा हुतात्म्यांचे कुटुंबीय यांना बोलावून त्यांचा गौरव करण्यात येईल. २२ ते २७ ऑक्टोबर या कालावधीत ब्लॉकपातळीवरचे हे कलश मुंबईत एकत्र आणण्यात येतील. त्यावेळीही मोठा सांस्कृतिक आणि देशभक्तीपर कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. २८ ते ३० ऑक्टोबरपर्यंत देशाच्या राजधानीत रेल्वेद्वारे हे कलश वाजत-गाजत पाठवण्यात येतील. यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दिल्लीतील हुतात्मा स्मारकाजवळ देशाच्या वीरांच्या स्मरणार्थ उभारलेल्या अमृत वाटिकेत या कलशांची माती आणि तांदूळ लावतील.

लाख शेतकऱ्यांनी पीक विम्यासाठी नोंदणी केली आहे. नियमानुसार पीक विम्याचा अग्रीम, पिण्याचे पाणी, चारा उपलब्धता यासाठी काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. पावसाअभावी पिण्यासाठी पाणी राखीव ठेवण्यास शासनाचे प्राधान्य आहे. पीकविम्याची अग्रिम रक्कम कशी देता येईल, याचे चांगले नियोजन करावे. किती नुकसान झाले आहे हे अचूकरीत्या काढणे, यंत्रणांमध्ये समन्वय राहील हे पाहण्याचे निर्देश त्यांनी दिले. पिण्याच्या पाण्याचे आरक्षण महत्त्वाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना कशाप्रकारे मदत करता येईल हे आम्ही पाहत आहोत, असेही ते म्हणाले.

यावेळी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार यांनी सादरीकरण केले. या वर्षी पाऊस महाराष्ट्रात उशिराने दाखल झाला होता. उशिरा येऊनही जून महिन्यात सरासरी १११.५ मिमी म्हणजे सरासरीच्या ५३.७ टक्के पाऊस पडला. त्यानंतर जुलै महिन्यात पावसाने चांगली हजेरी लावली. सरासरी पर्जन्यमानाच्या १३८.७ टक्के म्हणजेच ४५९.० मिमी पाऊस जुलैत पडलेला आहे. त्यानंतर ऑगस्ट महिन्यात पावसाने ओढ दिली असून ऑगस्ट महिन्याच्या सरासरीच्या केवळ ३८.० टक्के म्हणजे १०७.९ मिमी पाऊस राज्यात पडला आहे. सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला ही परिस्थिती कायम राहिली आहे. सप्टेंबर महिन्याच्या सरासरीच्या १३.६० टक्के इतकाच पाऊस पडलेला आहे अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

## मराठवाड्यातील प्रकल्पांना मान्यता

मंजुरी देण्यात आलेल्या प्रकल्पांमध्ये अंबड प्रवाही वळण योजना (ता. दिंडोरी) जि. नाशिक, निम्न दुधना प्रकल्प (ता. सेलू) जि. परभणी, जायकवाडी टप्पा- २ (ता. माजलगाव) जि. बीड, बाभळी मध्यम प्रकल्प (ता. फुलंब्री) जि. नांदेड, वाकोद मध्यम प्रकल्प (ता. ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प (ता. पुसद) जि. यवतमाळ, पोटा उच्च पातळी बंधारा (ता. औंढा, नागनाथ) जि.हिंगोली, जोडपरळी उच्च पातळी बंधारा (ता. वसमत) जि. हिंगोली, पिंपळगाव कुटे उच्च पातळी बंधारा (ता. वसमत) जि. हिंगोली, ममदापूर उच्च पातळी बंधारा (ता.पूर्णा), जि. परभणी, उनकेश्वर उच्च पातळी बंधारा (ता.किनवट) जि. नांदेड यांचा समावेश आहे.

## बंधाऱ्यांना एकच प्रशासकीय मान्यता

साखळी बंधाऱ्यांमधील प्रत्येक बंधाऱ्याची स्वतंत्र प्रशासकीय मान्यता न घेता प्रकल्प म्हणून सर्व साखळी बंधाऱ्यांची मिळून एकत्र प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## देशी गोवंशाचे जतन

लाल कंधारी व देवणी गोवंश प्रजातीचे जतन व संवर्धनाकरिता अंबेजोगाई तालुक्यातील मौजेसाकुड येथे पशुसंवर्धन विभागाची ८१ हेक्टर जमीन प्रक्षेत्र उभारण्यासाठी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळास देण्याचा निर्णय घेण्यात आला. लालकंधारी व देवणी या देशी गोवंशाचे मूळ पैदास क्षेत्र मराठवाड्यात असून, गोवंशाचे अस्तित्व मराठवाड्यातील लातूर, बीड, धाराशिव, परभणी, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये आहे. २०१३ मध्ये लाल कंधारी गायींची संख्या १,२६,६०९ इतकी होती, ती २०२० मध्ये १,२३,९४३ इतकी कमी झाली आहे. तसेच २०१३ मध्ये देवणी गायींची संख्या ४,५६,७६८ वरून सन २०२० मध्ये १,४९,१५९ इतकी कमी झाली आहे. या प्रजातींचे महत्त्व विचारात घेऊन या जातींचे

जतन व संवर्धन करण्यासाठी हा निर्णय घेतला आहे.

साकुड पशुपैदास प्रक्षेत्रासाठी १३ नियमित पदे व ३७ इतकी पदे बाह्यस्रोताद्वारे भरण्यात येतील. पशुधनासाठी चारा, पशुखाद्य, औषधी; तसेच वीज, पाणी यासाठी दरवर्षी ६ कोटी इतक्या निधीस मान्यता देण्यात आली आहे.

## फिरती प्रयोगशाळा

गायी-म्हशींची उत्पादकता वाढवण्यासाठी गायी-म्हशींमध्ये भृण प्रत्यारोपणाची सुविधा किफायतशीर दरात निर्माण करण्याकरिता फिरती प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. विदर्भ, मराठवाडा, पुणे विभाग आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी अनुक्रमे अकोला, छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि अहमदनगर येथे प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण चार OPU-IVF ET प्रयोगशाळा स्थापन करण्यात येतील. या तीन प्रयोगशाळांसाठी एकूण १८०२.७२ लाख रुपये इतका निधी पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यास येईल.

## महिलांच्या सक्षमीकरणासाठी तरतूद

उमेदच्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी १,०७६ कोटींची वाढीव तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये एक लाख २४ हजार गटांना २४८.१२ कोटी रुपये वितरित करण्यात येणार आहेत. मराठवाड्यातील १२ लाख ४५ हजार महिलांना आणि मराठवाड्यातील ८,८३३ समुदाय संसाधन व्यक्तींना त्याचा प्रत्यक्ष लाभ होणार आहे.

मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये एक लाख २४ हजार स्वयंसाहाय्यता गटांमध्ये साधारणपणे १२ लाख २३ हजार महिलांचा समावेश आहे.

## वरिष्ठ निवासी डॉक्टर्सना मानधन

सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वरिष्ठ निवासी डॉक्टरांना पुढील ५ वर्षांसाठी ८५ हजार रुपये सुधारित मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी वार्षिक १२.९८ कोटी खर्चासही मान्यता देण्यात आली.



हिंगोली येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास ४८५ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता. तसेच धाराशिव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

## सिल्लोड येथे दिवाणी न्यायालय

सिल्लोड येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच परळी वैजनाथ येथे नवीन शासकीय कृषी महाविद्यालय, कृषी व्यवसाय व व्यवस्थापन महाविद्यालय करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे जिरेवाडी येथे ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय कृषी महाविद्यालय; तसेच कृषी व्यवसाय व व्यवस्थापन महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## सोयाबीन संशोधन प्रशिक्षण केंद्र

परळी वैजनाथ येथे सोयाबीन संशोधन प्रशिक्षण व प्रक्रिया उपकेंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे सोयाबीन उत्पादनास गती येईल.

मौजे जिरेवाडी येथील शासकीय जमिनीवर हे प्रशिक्षण व प्रक्रिया उपकेंद्र सुरू करण्यात येणार आहे. यासाठी २४ कोटी ५ लाख रुपये निधीस मान्यता देण्यात आली. सोयाबीन हे मराठवाड्यातील महत्त्वाचे पीक असून देशात १२०.९० लाख हेक्टर क्षेत्रावर, तर महाराष्ट्रात ४९.०९ लाख हेक्टर आणि मराठवाड्यात २४.८७ लाख हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची लागवड होते.

## गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शाळा दत्तक

राज्यातील शासकीय, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व माध्यमांच्या शाळांसाठी 'दत्तक शाळा योजना' राबवण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेत रकमेच्या स्वरूपात देणगी देता अथवा स्वीकारता येणार नाही. कॉर्पोरेट ऑफिसेसना सीएसआरच्या माध्यमातून अशा प्रकारची देणगी देता येईल. पायाभूत व भौतिक सुविधा ज्यामध्ये स्थापत्य व विद्युत काम, काळानुरूप आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य, डिजिटल साधने, आरोग्य सुविधा, रेन वाटर हार्वेस्टिंग, सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशिन्स यांसारख्या नावीन्यपूर्ण बाबींसाठी वस्तू व सेवांच्या स्वरूपात देणगी देता येईल. देणगीदारास पाच वर्षे अथवा दहा वर्षे कालावधीसाठी शाळा दत्तक घ्यावी लागेल. राज्यातील शहरी व ग्रामीण भागामध्ये समाजातील दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, कॉर्पोरेट ऑफिसेस आदींच्या सहकार्यातून शाळांसाठी पायाभूत सुविधा व आवश्यक संसाधनांची उपलब्धता वाढवून त्यायोगे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणाचा प्रसार करण्याचा या योजनेचा मूळ उद्देश आहे.

## कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ



समग्र शिक्षाअंतर्गत व्यवस्थापन व कार्यक्रमांतर्गत करार पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात १० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यस्तरावरील कार्यालयात ६४ व जिल्हास्तरावरील कार्यालयात ६,१८७ असे एकूण ६,२५१ कर्मचारी यांना याचा लाभ मिळेल.

## सौरऊर्जा कुंपणासाठी थेट रक्कम

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेत सौरऊर्जा कुंपणाच्या किमतीच्या ७५ टक्के किंवा १५ हजार रुपये यापैकी जी कमी असेल, अशी रक्कम थेट हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने अनुदान स्वरूपात देण्याचा निर्णय घेण्यात आला. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास

## रोगाचा प्रादुर्भाव झालेल्या सोयाबीन पिकांचे पंचनामे करण्याचे निर्देश

राज्यातील नऊ जिल्ह्यांमध्ये सोयाबीन पिकावर पिवळा मोझॅक (येलो मोझॅक) हा विषाणूजन्य रोग आणि खोडकूज, मूळकूज या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला असून कृषी विभाग आणि मदत व पुनर्वसन विभागांनी संयुक्तपणे तातडीने सोयाबीन पिकांचे पंचनामे सुरू करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत दिले.



पावसाचा मोठा खंड आणि सप्टेंबरमध्ये झालेला पाऊस, तापमानात बदल तसेच इतर काही कारणांमुळे सोयाबीनवर या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. विशेषतः वर्धा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, यवतमाळ, सोलापूर, लातूर, वाशीम, नांदेड या जिल्ह्यांत हा प्रादुर्भाव दिसत असल्याने सोयाबीनचे पीक पिवळे पडत चालले आहे.

नुकसान झालेल्या क्षेत्रामध्ये विमा संरक्षित क्षेत्राचा अंतर्भाव असल्यामुळे विम्याची मदत वेळेत करणे शक्य व्हावे आणि त्यांना मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळावा म्हणून प्राधान्याने हे पंचनामे करावेत, असे निर्देश देण्यात आले.

योजनेसाठी २०२३-२४ साठी अर्थसंकल्पित १०० कोटी रुपयांपैकी ६० कोटी रुपयांची तरतूद सौरऊर्जा कुंपणाकरिता करण्यात आली आहे.

## मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान

राज्यातील महिलांना तांत्रिक व व्यवासायक्षिमुख प्रक्षिक्षण देण्यात येणार आहे. राज्यातील महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना रोजगारभिमुख शिक्षण आणि प्रशिक्षण त्याचबरोबर आवश्यक मदत करुन स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. शासनाच्या विविध योजनांचे लाभ प्रत्येत जिल्ह्यात किमान एक लाख महिलांना मिळावेत, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.

## सामाजिक भवनासाठी भूखंड

गोर बंजारा सामाजिक भवनासाठी नवी मुंबई, बेलापूर येथील सेक्टर क्र. २१ व २२ मधील भूखंड सिडकोच्या प्रचलित धोरणानुसार निश्चित केलेल्या भाडेपट्टादराने इतर मागास बहुजन कल्याण विभागास वाटप करण्यात येणार आहे. भूखंडाच्या कमाल ४,००० चौ.मी. क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्रासाठी राखीव किमतीच्या १२५% दराने दर निश्चित करण्यात येईल.

## आयटीआय इन्क्युबेशन सेंटर

जालना येथे आयटीआय इन्क्युबेशन सेंटरसाठी १० कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली आहे. MAGIC (Marathwada Accelerator for Growth Incubation Council)

जालना जिल्ह्यातील ८ शासकीय व ४ खासगी आयटीआयचे विद्यार्थी, स्टाफ व जिल्ह्यातील नवउद्योजक यांच्यासाठी नावीन्यता व उद्योजकता वाढीसाठी हे सेंटर उपयुक्त ठरू शकणार आहे.

## वैद्यकीय अधिकाऱ्यांना लाभ

राज्यातील २००५ पूर्वी नियमित पदावर अस्थायी सेवेत असणाऱ्या आणि २००९ मध्ये नियमित सेवेत समावेशन झालेल्या वैद्यकीय अधिकारी, गट-अ यांना मॅटच्या आदेशानुसार वेतन निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली.

## नांदेड येथे कृषी महाविद्यालय

नांदेड येथे ६० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय कृषी महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. या महाविद्यालयासाठी ४५ शिक्षक आणि ४३ शिक्षकेतर पदे निर्माण करण्यात येतील. या महाविद्यालयासाठी १४६ कोटी ५४ लाख खर्चास मान्यता देण्यात आली.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू

हिंगोली येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. या महाविद्यालयास ४३० खाटांचे रुग्णालय संलग्नित असेल, यासाठी अंदाजे ४८५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास जमीन

धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी कौशल्य व उद्योजकता विभाग आणि जलसंपदा विभागांची जागा उपब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. या महाविद्यालयास एकूण दोन्ही विभागांची मिळून १२ हेक्टर ६४ आर जमीन उपलब्ध करून देण्यात येईल.

## दिवाळीनिमित्त आनंदाचा शिधा

दिवाळीनिमित्त शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांमध्ये आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेण्यात आला. या शिध्यात आता मैदा आणि पोह्याचादेखील समावेश करण्यात आला आहे.

पूर्वी आनंदाचा शिधा या संचात रवा, चना डाळ, साखर आणि खाद्य तेल असे ४ जिन्नस होते. मात्र आता यामध्ये दोन जिन्नसांची भर पडली आहे.




राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटूंब शिधापत्रिकाधारक; तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेवरील केशरी शेतकरी अशा १ कोटी ६६ लाख ७१ हजार ४८० शिधापत्रिकाधारकांना हा आनंदाचा शिधा मिळेल.

यामध्ये १ किलो साखर, १ लिटर खाद्य

तेल; तसेच प्रत्येकी अर्धा किलो रवा, चना डाळ, मैदा आणि पोहे असा शिधा राहील. हा आनंदाचा शिधा २५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत वितरित करण्यात येईल. यासाठी येणाऱ्या एकूण ५३० कोटी १९ लाख इतक्या खर्चासदेखील मान्यता देण्यात आली.

## कृषी पंप वीज जोडण्या पूर्ण करणार

कृषी पंप वीज जोडण्या वेगाने पूर्ण करण्यासाठी उच्च दाब वितरण प्रणाली योजनेला ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. विदर्भ, मराठवाड्यातील प्रलंबित कृषी पंप वीज जोडणी यातून पूर्ण करण्यात येईल.



ही योजना २०१८ ते २०२० या वर्षात पूर्ण करावयाची होती. परंतु मुसळधार पाऊस आणि शेतात उभी पिके असल्याने ट्रान्सफॉर्मर्स (रोहित्र) उभारणीत अडथळा निर्माण झाला. 'कोविड'मुळे देखील या योजनेची प्रगती होऊ शकलेली नाही. उपकेंद्रांच्या कामांसाठी लागणारा वेळ १५ते १८ महिन्यांचा होता. त्यामुळे या योजनेचा मूळ खर्च ५ हजार ४८ कोटी १३ लाख इतक्यावरून ४ हजार ७३४ कोटी ६१ लाख इतका सुधारित करण्यात आला आणि योजनेचा कालावधी मार्च २०२३ पर्यंत वाढवण्यात आला होता. सध्या १ लाख ३८ हजार ७८७ वीज जोडण्यांपैकी २३ कृषी पंप वीज जोडण्या आणि ९३ उपकेंद्रांपैकी ४ उपकेंद्रांची कामे प्रलंबित आहेत. सध्या पावसाळ्यामुळे या उपकेंद्रांची कामे पूर्ण करण्याकरिता योजनेचा कालावधी मार्च २०२४ पर्यंत वाढवण्यात आला आहे.

## परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेस मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. दरवर्षी २७ विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळेल.

क्युएस वर्ल्ड रॅन्किंगमधील २०० च्या आत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये पदव्युत्तर पदवी पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी बिनशर्त प्रवेशास पात्र विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती राहील. याकरिता १० कोटी ८० लाख इतक्या खर्चास देखील मंजुरी देण्यात आली.

विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी यासाठी एकूण १० शिष्यवृत्ती, तर औषधी व जीवशास्त्र, लिबरल आर्ट व ह्युमॅनिटीजसाठी प्रत्येकी ६, शेतकीसाठी ३ आणि कायदा व वाणिज्यसाठी २ अशा या २७ शिष्यवृत्ती राहतील.

## अतिरिक्त कौटुंबिक न्यायालये

नागपूरला पाच अतिरिक्त कौटुंबिक न्यायालये स्थापन करून ४५ पदांना मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला. नागपूर येथे चार कौटुंबिक न्यायालये असून वाढत्या कौटुंबिक विवादांच्या प्रकरणांमुळे ही पाच अतिरिक्त कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या नागापूरच्या कौटुंबिक न्यायालयांमध्ये ८ हजार ४१८ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहेत. या न्यायालयांच्या उभारणीपोटी ५ कोटी ६० लाख ५४ हजार खर्चास देखील मान्यता देण्यात आली.

## श्री मौनी विद्यापीठ तंत्रनिकेतनच्या शाखांना अनुदान

कोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटी येथील श्री मौनी विद्यापीठ संचालित इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हिल ॲण्ड रूरल इंजिनिअरिंग या अनुदानित संस्थेतील तीन विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांना २०२३-२४ पासून ९० टक्के शासन अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

याशिवाय या संस्थेत १६ शिक्षकांची पदेदेखील निर्माण करण्यात येतील. या संस्थेत सध्या विद्युत अभियांत्रिकी ६०, यंत्र अभियांत्रिकी १२०, संगणक अभियांत्रिकी ४० अशी २२० प्रवेश क्षमता आहे. सध्याच्या अनुदानित संस्थेतील अधिव्याख्याता (उपयोजित यंत्रशास्त्र) या पदाचे रूपांतरण कर्मशाळा अधीक्षक या पदात देखील करण्यात येईल. या अनुदानापोटी व पद निर्मितीसाठी मिळून १ कोटी ७७ लाख ७ हजार ९९२ इतका वार्षिक निधी देण्यासही मान्यता देण्यात आली. केंद्र शासनाने अतिदुर्गम ग्रामीण भागात कमी खर्चात शैक्षणिक सुविधा मिळाव्यात म्हणून स्थापन केलेल्या एस. राधाकृष्णन यांच्या समितीने देशातील १० विद्यापीठात तंत्रनिकेतन अभ्यासक्रम सुरू करण्याची शिफारस केली होती. यात गारगोटी येथील श्री मौनी विद्यापीठाचा समावेश आहे.

## ओनरशिपमधील इमारतींचा पुनर्विकास

महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्ट (महाराष्ट्र वेश्म मालकी अधिनियम १९७० मधील नोंदणी केलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाला वेग देण्याचा निर्णय घेण्यात आला. यानुसार पुनर्विकासास विरोध करणाऱ्या सदनिका मालकांच्या निष्कासनाबाबत अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या संदर्भातील अध्यादेश स्वरूपात विधेयक आणण्यात येईल.

यामुळे आता विरोध करणाऱ्या रहिवाशी किंवा सभासदांविरुद्ध निष्कासनाची कार्यवाही करण्याकरिता स्वयंस्पष्ट तरतूद करण्यात येईल. अधिनियमात त्याप्रमाणे कलम ६ (अ) नंतर कलम ६ (ब) समाविष्ट करण्यात येईल.

या अधिनियमात ७ जुलै २०१८ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणात बहुसंख्य वेश्म मालकांची (सदनिका मालकांची) संमती आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. बहुसंख्य या शब्दाची व्याख्या ५१ टक्के वेश्म मालक अशी आहे. कलम ६ नुसार बहुसंख्येने पारित केलेल्या प्रस्तावास काही सदस्यांचा विरोध होतो आणि त्यामुळे असहकार करणाऱ्या सभासदांविरुद्ध कोणती कार्यवाही करावी, याची सुस्पष्ट तरतूद नसल्यामुळे पुनर्विकास खोळंबून इमारती धोकादायक होतात. विभागाच्या महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्टमध्ये नाही म्हणून ही तरतूद करण्यात आली.

**– टीम लोकराज्य**

**संयुक्त राष्ट्र संघाने २०२३ हे 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून घोषित केले आहे. पोषणमूल्यांमुळे तृणधान्यांचे आहारामधील अनन्यसाधारण महत्त्व आहे. नागरीकरणामुळे समाजामध्ये जीवनशैलीविषयक वाढत असलेले आजार नियंत्रित करण्याची क्षमता तृणधान्यांमध्ये आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने पौष्टिक तृणधान्य विशेष महिना संकल्पना राबवली आहे. जानेवारी महिना मकरसंक्रांत(भोगी) ला बाजरीसाठी समर्पित केला आहे. फेब्रुवारी महिना हुरडा पार्टीला ज्वारीसाठी समर्पित केला आहे. ऑगस्ट महिना श्रावणमासला राजगिरासाठी समर्पित केला आहे. सप्टेंबर महिना पितृपक्षाला राळासाठी समर्पित केला आहे. ऑक्टोबर महिना नवरात्री महोत्सवाला वरईसाठी समर्पित केला आहे. डिसेंबर महिना नाचणी/रागीसाठी समर्पित केला आहे.**

# पौष्टिक तृणधान्य
# **विशेष महिना संकल्पना**

दत्तात्रय कोकरे

जानेवारी महिना मकरसंक्रांत(भोगी) ला बाजरीसाठी समर्पित केला होता. मकरसंक्रांतीला भारतीय सणांमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. संक्रांत-भोगी सणाला बाजरी भाकरीला पारंपरिक महत्त्व आहे. मकरसंक्रांत ही हिवाळ्यात येते. हिवाळ्यामध्ये सर्दी-खोकला, विविध संक्रमण, विषाणूजन्य समस्यांपासून बचावासाठी बाजरी उपयुक्त आहे. पचनसंस्था निरोगी राखण्यासाठी हिवाळ्यात बाजरीचे सेवन हितकारक असते. रोगप्रतिकारशक्ती वाढवणे आणि निरोगी राहण्यासाठी बाजरीचे सेवन गरजेचे आहे. वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी बाजरी उत्कृष्ट पर्याय आहे. तसेच हिमोग्लोबिन वाढवण्याकरिता उपयुक्त असते.

फेब्रुवारी महिना ज्वारीसाठी समर्पित केला आहे. ज्वारीचा आहार सर्व ऋतुंमध्ये शरीरास पोषक ठरतो. पचनास हलके असल्याने लहान मुलांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांना आरोग्यदायी असते. ज्वारीमधील तंतूमय पदार्थ, प्रथिने, स्टार्च इ. पदार्थांच्या उपलब्धतेमुळे बद्धकोष्ठता, कर्करोग, हृदयविकार, रक्तदाब, कावीळ, मधुमेह, महिलांमधील पी.सी.ओ.डी.विषयक समस्या, सेलिक आजार, लठ्ठपणा, त्वचेचे आजार इ. आजार टाळणे शक्य होते. ज्वारी ग्ल्युटेनमुक्त असल्यामुळे ॲलर्जी असलेल्या लोकांना प्रमुख खाद्यान्न म्हणून उपयुक्त असते.

ऑगस्ट महिना राजगिरासाठी समर्पित केला आहे. भारतीयांसाठी श्रावण महिना विशेष असतो. श्रावण महिन्यात अनेक धार्मिक कार्ये, व्रत, उपवास केले जातात. उपवासासाठी राजगिरा अतिशय महत्त्वाचा आहे. आरोग्यदृष्ट्याही राजगिरा महत्त्वाचा आहे. राजगिऱ्याचा आहार शास्त्रानुसार सुपर फूड मानले जाते.

## राजगिरा पिकाचे महत्त्व

राजगिरा ही अत्यंत बहुउपयोगी व पौष्टिक वनस्पती असून जागतिक पातळीवर या पिकास उत्कृष्ट अन्न म्हणून घोषित



केलेले आहे. शरीरासाठी अत्यंत गुणकारी असल्याने सुपर फूड म्हणून प्रचलित आहे. राजगिरा ग्लुटेनमुक्त, फायबरने युक्त आहे. त्यामुळे वजन कमी करण्यास उपयुक्त, हाडाच्या मजबुतीसाठी वापर, विटॅमिन-सी भरपूर मात्रेत असल्याने त्वचा, केस व हिरड्यांच्या विकारांवर उपयुक्त आहे. स्तनदा मातांसाठी दुग्धवाढीकरिता उपयुक्त ठरतो. राजगिऱ्यामधील रक्तस्तंभक गुणधर्म रक्तस्त्राव थांबवण्यास मदत करतो. या धान्यामध्ये १४ ते १६ टक्के प्रथिने, कॅल्शिअम, फॉस्फरस व लोह खनिजांचे इतर तृणधान्यांच्या तुलनेत अधिक प्रमाण असते. लायसिन अमिनो आम्लाची आणि लिनोलिक या फॅटी ॲसिडची मात्रा इतर तृणधान्यांच्या तुलनेत जास्त असते. पौष्टिक गुणधर्मामुळे या पिकाच्या दाण्यास विविध प्रकिया उद्योगांमध्ये वाढती मागणी आहे. राजगिरापासून लाडू व गुळदाणी बनवतात.

सप्टेंबर महिना 'राळा' या तृणधान्यासाठी समर्पित केला आहे. राळ्याला पारंपरिक महत्त्व असते. या महिन्यात धार्मिक कार्ये केली जातात. यासाठी 'राळा' अतिशय महत्त्वाचा आहे. आरोग्यदृष्ट्याही राळा या तृणधान्याला महत्त्व आहे.

## 'राळा' पिकाचे महत्त्व

राळ्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्याने रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवते. अर्धशिशी, निद्रानाश, कॉलरा, ताप यांच्या उपचार पद्धतीमध्ये राळ्याचा प्रामुख्याने वापर केला जातो. राळ्याचा ॲण्टिऑक्सिडण्ट हा गुणधर्म रोगप्रतिकार शक्ती वाढवतो. लोहाचे प्रमाण जास्त असल्याने मेंदूला ऑक्सिजन पुरवठा सुरळीत ठेवून मेंदूची कार्यक्षमता वाढवते. मोड आलेले राळा खाल्ल्यास हाडांचा ठिसूळपणा कमी होऊन हाडे बळकट होतात. मधुमेह आणि पोटाच्या आजारांवर 'राळा' हे पौष्टिक अन्न म्हणून उपयुक्त आहे.

ऑक्टोबर महिना नवरात्री महोत्सवाला वरईसाठी समर्पित केला आहे. वरईला भगरही म्हटले जाते. उपवासासाठी ही भगर खाल्ली जाते.

## वरई पिकाचे महत्त्व

वरईत ग्लुटेन नसल्याने पचायला हलकी आहे. वरईमध्ये प्रथिने भरपूर असल्यामुळे वजन आटोक्यात ठेवण्यासाठीसुद्धा भगर उपयुक्त आहे. वरईत आयर्न जास्त प्रमाणात आढळते. म्हणूनच शरीरातील हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढवण्यासाठी भगर उपयोगी आहे. वरईत विटॅमिन-सी, ए व इ जास्त प्रमाणात असतात. वरईत खनिजेसुद्धा जास्त प्रमाणात आढळतात. ज्यामुळे आपली रोगप्रतिकारशक्ती वाढते. वरईत सोडियम नसते. ज्यामुळे बीपी नियंत्रणात ठेवण्यासाठी फायदा होतो. शरीरात साठलेल्या चरबीचे प्रमाण कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. स्त्रियांमधील अनियमित मासिक पाळीच्या समस्येवर वरई उपयुक्त आहे. वरईमध्ये ॲण्टिऑक्सिडंटचे प्रमाण भरपूर असते. त्यामुळे त्वचा, केस यांचे आरोग्य राखण्यास मदत होते. मॅग्नेशिअमचे प्रमाण भरपूर असल्याने रक्तातील ग्लुकोज नियंत्रित ठेवून इन्सुलिनचेसुद्धा नियमन करते.





## डिसेंबर महिना नाचणी/रागीसाठी समर्पित : नाचणी पिकाचे महत्त्व

नाचणीमध्ये तांदळाच्या तुलनेत ३० पट जास्त कॅल्शियम असल्याने हाडांच्या विकासाकरिता खूपच चांगला उपयोग होतो. वजन कमी करण्यासाठी नाचणी उपयुक्त आहे. मधुमेहावर तसेच ॲनिमियावरसुद्धा फायदेशीर आहे. मेंदूसाठीदेखील उपयुक्त ठरत आहे. रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी उपयुक्त आहे. ग्लुटेनमुक्त असल्याने सिलिक रोग असणाऱ्या व्यक्ती नाचणीचा आपल्या आहारात समावेश करतात. रागीमध्ये असणारे फेरूलिक ॲसिड हे युव्ही (UV) किरणांपासून होणाऱ्या त्वचेच्या त्रासापासून मुक्तता देतात.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**केंद्र शासन देशभर १७ सप्टेंबरपासून ‘आयुष्मान भव:’ मोहीम राबवत आहे. या मोहिमेच्या माध्यमातून विविध स्तरावर आरोग्य विषयक सेवा देण्यात येत आहे. मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता सार्वजनिक आरोग्य विभागानेदेखील आपली यंत्रणा सज्ज ठेवली आहे. देशभर मोहिमेचा शुभारंभ राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते १३ सप्टेंबर २०२३ रोजी करण्यात आला. याच दिवशी ‘राज्यस्तरीय कार्यारंभ दिन’ कार्यक्रमाचे मुंबईत आयोजन करण्यात आले. ही मोहीम ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत राबवण्यात येत आहे. ‘आयुष्मान भव:’ शब्दाप्रमाणे सर्वांना सुदृढ आरोग्य मिळावे, या हेतूने शासन कार्यरत असून मोहिमेच्या माध्यमातून आरोग्य सेवांचा जागर करण्यात येत आहे.**

# आरोग्य सेवांचा जागर

**निलेश तायडे**

‘आयुष्मान भव:’ हा आशीर्वादरूपी शब्द आपल्या आयुष्यात खूप महत्त्वाचा आहे. या शब्दाच्या अर्थावरच ही मोहीम आधारित आहे. मोहिमेचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनी १७ सप्टेंबरपासून झाला आहे. राज्यातही राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या उपस्थितीत मोहिमेचा कार्यारंभ करण्यात आला.

## संकेतस्थळावर माहिती उपलब्ध

राज्यात क्षयरोगमुक्त भारत अभियान जोरकसपणे राबवण्यात येत आहे. जास्तीत जास्त निक्षय मित्र बनवून क्षयरोगमुक्त भारत अभियानाला बळ देण्यात येत आहे. देशभरात मोहिमेदरम्यान घेतलेल्या उपक्रमांची, कार्यक्रमांची नोंदणी करण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने संकेतस्थळही विकसित केले आहे. मोहिमेची संपूर्ण माहिती डॅश बोर्ड स्वरूपात https://ayushmanbhav.mohfw.gov.in/public/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या संकेतस्थळावर देशातील कुठल्याही जिल्ह्यातील माहिती उपलब्ध आहे.

मोहिमेंतर्गत आयुष्मान आपल्या दारी ३.०, आयुष्मान सभा, आयुष्मान मेळावा, अंगणवाडी व प्राथमिक शाळांमधील मुलांची तपासणी आदी उपक्रम राबवण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान सेवा पंधरवडा राबवण्यात येत आहे. या पंधरवड्याच्या समारोपप्रसंगी २ ऑक्टोबर रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

## आयुष्मान आपल्या दारी ३.०

आयुष्मान आपल्या दारी या उपक्रमांतर्गत आजतागायत संपूर्ण देशात २५ कोटी आयुष्मान कार्डांचे वाटप करण्यात आले आहे. या अनुषंगाने या उपक्रमामधून सर्व जिल्ह्यांमधील पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करून आयुष्मान कार्डचे वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी काळजी घेण्यात येत आहे. वैयक्तिक स्तरावर आयुष्मान कार्ड संपृक्तता प्राप्त करणे, आयुष्मान कार्डची छपाई आणि



## शाळांमधील मुलांची तपासणी



या उपक्रमांतर्गत सर्व अंगणवाडी व प्राथमिक शाळांमधील ० ते १८ वर्ष वयोगटातील मुलांची विशेष मोहीम राबवून आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. मुलांची ३२ सामान्य आजारांची वेळेवर तपासणी व उपचार करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार मुलांना साहाय्यक उपकरणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच या मोहिमेत रक्तदान शिबिरांचे आयोजनही करण्यात येणार आहे.

वितरण अशाप्रकारे सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये आयुष्मान कार्ड वितरण मोहीम सुरू झाली आहे.

## आयुष्मान सभा

हा उपक्रम गावपातळीवर आरोग्य सेवा सुविधांची जनजागृती करण्याकरिता ग्रामपंचायत व व्हीएचएसएनसी (व्हिलेज हेल्थ, सॅनिटेशन ॲण्ड न्युट्रिशन कमिटी) यांच्यामार्फत राबवण्यात येतो. या मोहिमेचे मूळ उद्दिष्ट आयुष्मान कार्ड व आभा कार्डबाबत जनजागृती करणे, आरोग्यवर्धिनी केंद्रामार्फत असंसर्गजन्य आजार, सिकलसेल, लसीकरण व क्षयरोग आदी बाबत जनजागृती करणे; तसेच आरोग्यवर्धिनी केंद्रस्तरावर मिळणाऱ्या सेवा सुविधांचे मूल्यमापन करणे हा आहे. या सभेद्वारे आयुष्मान कार्ड व आभा कार्ड तयार करणे, प्रधानमंत्री आयुष्मान भारत जन आरोग्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांची व प्रत्यक्षात लाभ घेतेलेल्या लाभार्थ्यांची यादी प्रसिद्ध करणे, संलग्न रुग्णालयांची यादी प्रसिद्धीस देणे, असंसर्गजन्य रोग, सिकलसेल, आयुष्मान कार्ड व आभा कार्ड यांची जनजागृती करण्यात येत आहे. 'आयुष्मान भव:' मोहिमेमध्ये 'निरोगी गावे' आणि 'निरोगी ग्रामपंचायती' निर्माण करण्याचा प्रयत्न असणार आहे. ज्या पंचायती आरोग्य योजना यशस्वीपणे पूर्ण करतात, त्यांना 'आयुष्मान ग्रामपंचायत' किंवा 'आयुष्मान अर्बन वॉर्ड' म्हणून सन्मान देण्यात येणार आहे, जे त्यांच्या न्याय्य आरोग्य सेवेच्या तरतुदीच्या समर्पणाचे प्रतीक आहे. आयुष्मान सभांचे आयोजन तालुका, गाव, वॉर्ड स्तरावर करण्यात येत आहे.

## आयुष्मान मेळावा

आयुष्मान भारत आरोग्यवर्धिनी केंद्रावर दर आठवड्यातील शनिवार किंवा रविवार या दिवशी संकल्पनेनुसार उपक्रम राबवण्यात येत आहेत. पहिल्या आठवड्यात असंसर्गजन्य आजरांविषयी तपासणी, दुसऱ्या आठवड्यात क्षयरोग, कुष्ठरोग आणि अन्य संसर्गजन्य आजरांची तपासणी, तिसऱ्या आठवड्यात माता व बाल आरोग्य, पोषण आहार व लसीकरण, चौथ्या आठवड्यात डोळ्यांची तपासणी व डोळ्यांचे आरोग्य ही संकल्पना असणार आहे. या मेळाव्यादरम्यान आयुष्मान कार्ड व आभा कार्ड तयार करण्यात येणार आहे. सर्वसमावेशक आरोग्य सेवा, आयुष, मानसिक आरोग्य, वाढत्या वयातील आजार व उपचार, मौखिक आरोग्य, नेत्र, कान, नाक व घसा यांचे आरोग्य, समुपदेशन सेवा, योगा व वेलनेस उपक्रम, मोफत औषधी, प्रयोगशाळा तपासणी तसेच टेलीकन्सल्टेशन सेवा देण्यात येत आहेत.

सामुदायिक आरोग्य केंद्र स्तरावर वैद्यकीय महाविद्यालयाच्या मार्फत आठवड्याला किमान एक आरोग्य मेळाव्याचे आयोजनही करण्यात येणार आहे. या मेळाव्यात तज्ज्ञ सेवांपासून वंचित रुग्णांना सेवा पुरवण्यात येणार आहे. तसेच ज्या तालुक्यांमध्ये तज्ज्ञ सेवांचा अभाव आहे, अशा तालुक्यांमध्ये रुग्णांना तज्ज्ञ सेवांचा लाभ देण्यात येणार आहे. राज्यामध्ये २६ सप्टेंबरपर्यंत ११ हजार २९५ ठिकाणी मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यांमध्ये ६ लाख ४५ हजार १६९ नागरिकांनी भेट दिली.

मेळाव्यांमधून १ लाख ७१ हजार ६६० आभा क्रमांक वितरित करण्यात आले, तर ४४ हजार ७६९ आभा कार्ड देण्यात आले. तसेच मेळाव्यांमध्ये ४ लाख ७५ हजार ४७७ नागरिकांचा उच्च रक्तदाब, मधुमेह ४ लाख ४९ हजार ५८६, ४ लाख ९ हजार १९२ नागरिकांचा मौखिक कर्करोग, स्तन कर्करोगाची १ लाख ७१ हजार ८०५ व गर्भाशयाच्या कर्करोगाची १ लाख १४ हजार १५७ स्त्रियांची तपासणी करण्यात आली.

## रक्तदान शिबिरांचे आयोजन

'आयुष्मान भव:' मोहिमेंतर्गत रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. राज्यात आरोग्य विभागाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रक्तदान शिबिरे घेण्यात येत आहे. रक्तदान शिबिरांच्या आयोजनामध्ये महाराष्ट्र देशात अव्वल आहे. मोहिमेंतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान सेवा पंधरवडा राबवण्यात आला. देशभरात ६ ऑक्टोबरपर्यंत १५ हजार ८७७ शिबिरे घेण्यात आली असून ३ लाख ६ हजार ४०३ युनिट रक्त संकलित करण्यात आले आहे.

## अवयवदान प्रतिज्ञा

'आयुष्मान भव:' मोहिमेत सर्वात जास्त महत्त्वाचा भाग अवयवदान जनजागृती करणे आहे. त्यासाठी प्रतिज्ञा घेण्यात आल्या आहेत. महाराष्ट्राने अवयवदानाच्या सर्वात जास्त प्रतिज्ञांची नोंदणी केली आहे. राज्यात ६ ऑक्टोबरपर्यंत २१ हजार ८६९ प्रतिज्ञा नोंदणीकृत झाल्या आहेत. त्यामध्ये हृदय दानासाठी १६ हजार २०९, यकृत १५ हजार ७१०, फुफ्फुस १३ हजार ९९१, मूत्रपिंड १६ हजार ६४३, स्वादुपिंड अवयवासाठी १३ हजार ११० नोंदणी करण्यात आली आहे.

राज्यात 'आयुष्मान भव:' मोहिमेंतर्गत टिबीमुक्त अभियानही राबवण्यात येत आहे. जास्तीत जास्त नि:क्षय मित्र बनवण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. देशातून २०२५ पूर्वी टिबीमुक्तीचे उद्दिष्ट साध्य करावयाचे आहे. अशा प्रकारे राज्यात १७ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या 'आयुष्मान भव:' मोहिमेतून ३१ डिसेंबरपर्यंत आरोग्यविषयक सेवांचा जागर सुरू आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

# ग्राम स्तरावर गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आयुष्मान भव : अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ !



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

रमेश बैस
राज्यपाल



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

# आयुष्मान भवः

दि. 13 सप्टेंबर 2023

**अभियानाचा कालावधी :**
दि. 17 सप्टेंबर 2023 ते दि. 31 डिसेंबर 2023

## अभियानाचे प्रमुख घटक

### आयुष्मान आपल्या दारी 3.0

- अभियानांतर्गत पात्र लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड नोंदणी व वितरण
- लाभार्थ्यांची PMJAY पोर्टलवर नोंदणी
- आयुष्मान कार्ड तयार करणे

### रक्तदान मोहीम

- जिल्ह्यातील सर्व रक्तपेढींची e-Raktkosh Portal वर नोंदणी करणे व पोर्टलवर रक्तसाठा उपलब्धता व रक्तदान केलेल्यांची माहिती अद्ययावत करण्यात येईल.

### अवयवदान जागृती मोहीम

- सर्व आरोग्य संस्था, ग्रामसभा, शाळा, कॉलेज, कार्यालय येथे अवयवदानासाठी प्रतिज्ञा घेण्यात येईल.
- सर्वांना अवयवदानासाठी आवाहन करुन इच्छुकांची वेब लिंकवर नोंदणी करण्यात येईल.

### आयुष्मान सभा

- गाव पातळीवर आयुष्मान सभेचे आयोजन.
- सभेमध्ये सरपंच, ग्राम पंचायत सदस्य, गावातील मान्यवर मंडळी व इतर जनता यांचा समावेश.
- आयुष्मान कार्डचे वितरण (100 % आयुष्मान कार्ड व ABHA ID नोंदणी क्रमप्राप्त आहे)
- यापूर्वी ज्या लाभार्थ्यांनी आयुष्मान भारत जन आरोग्य योजनेचा लाभ घेतला आहे, अशा लाभार्थ्यांची यादी, प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत संलग्नित असलेल्या रुग्णालयांची यादी प्रसिद्ध करणे.

### स्वच्छता मोहीम

- दि. 17 सप्टेंबर ते दि. 02 ऑक्टोबर 2023 दरम्यान सर्व आरोग्य संस्थांमध्ये, शाळा, महाविद्यालय तसेच वैद्यकीय महाविद्यालय येथे स्वच्छता अभियान राबविण्यात येईल.

### वय वर्ष 18 वरील पुरुषांची आरोग्य तपासणी मोहीम

- या उपक्रमांतर्गत राज्यातील 18 वर्षांवरील सर्व पुरुषांची विशेष मोहीम राबवून आरोग्य तपासणी करण्यात येईल.

### आयुष्मान मेळावा

- संपूर्ण राज्यात आरोग्यवर्धिनी केंद्र स्तरावर आयुष्मान मेळाव्याचे आयोजन
- **चार आठवड्यांत** असंसर्गजन्य आजार सेवा (तपासणी, निदान, उपचार आणि संदर्भ सेवा), क्षयरोग, कुष्ठरोग व इतर संसर्गजन्य आजार (तपासणी, निदान, उपचार आणि संदर्भ सेवा), माता, बाल आरोग्य व पोषण आरोग्य सुविधा, सिकलसेल तपासणी व नेत्ररोग चिकित्सा, कान, नाक व घसा तपासणी करण्यात येईल.

### अंगणवाडी व प्राथमिक शाळांमधील मुलांची तपासणी

- या उपक्रमांतर्गत सर्व अंगणवाडी व प्राथमिक शाळांमधील मुलांची (0-18 वय वर्ष ) विशेष मोहीम राबवून आरोग्य तपासणी
- 32 सामान्य आजारांची वेळेवर तपासणी व उपचार तसेच आवश्यकता असल्यास जिल्हा रुग्णालय स्तरावर शस्त्रक्रिया करण्याकरिता संदर्भित करण्यात येईल.



तानाजी सावंत
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण



देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

अजितदादा पवार
उपमुख्यमंत्री

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ

### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.
- निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.







**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**दयानंद कांबळे**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : जयश्री भोज